# १

# औद्योगिक क्रांती: स्वरूप व परिणाम

**घटक रचना**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ पार्श्वभूमी

१.३ औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का घडली ?

१.४ औद्योगिक क्रांतीची प्रमुख कारणे

१.४.१ कच्च्या मालाची मुबलकता

१.४.२ कृषी क्रांती

१.४.३ अनुकूल सरकारी धोरण

१.४.४ शास्त्रीय शोध

१.४.५ औद्योगिक क्रांतीमधील महत्वाचे यांत्रिकीय शोध

१.४.६ बाष्पशक्ती (Steam)

१.४.७ दळणवळण क्षेत्रातील परिवर्तन

१.५ औद्योगिक क्रांतीचे आधुनिक जगावर झालेले परिणाम

१.५.१ सामाजिक परिणाम

१.५.२ आर्थिक परिणाम

१.५.३ राजकीय परिणाम

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१) औद्योगिक क्रांतीच्या अगोदर युरोपात झालेला विज्ञान विकास स्पष्ट करता येईल.

२) औद्योगिक क्रांतीने झालेल्या बदलाची यादी करता येईल.

३) नव्या ऊर्जा साधनांचा परिचय करुन घेता येईल.

४) औद्योगिक क्रांतीचे टप्पे स्पष्ट करता येतील.

५) इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांती का घडून आली, त्याची कारणे नोंदविता येतील

munotes.in

## १.१ प्रस्तावना

औद्योगिक क्रांती हा शब्द प्रयोग सर्वप्रथम ब्रिटिश इतिहासकार अर्नाल्ड टॉयन्बी यांनी इ.स. १८८४ मध्ये उल्लेख केला. औद्योगिक क्रांतीचा सर्वसाधारणपणे कालखंड हा १७५० ते १८५० असा मानला जात असला तरीही, सन १७७० ते १८३० असा मानला जातो. उद्योगधंद्यांमुळे जे अमुलाग्र बदल घडून आले, त्याला औद्योगिक क्रांती म्हटले जाते. इंग्लंडमध्ये प्रथम सुरू झालेल्या आणि नंतर सर्व युरोपभर पसरलेल्या उत्पादन साधने व प्रक्रियांत झालेल्या बदलाला **औद्योगिक क्रांती** असे म्हणतात. एक यंत्र अनेक माणसांची कामे अधिक वेगाने करत असल्यामुळे उद्योग, वाहतूक, संपर्क व शेती व्यवसाय या मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती झाल्याचे समजते. यंत्रसामुग्रीमुळे अनेक प्रकारच्या जीवनोपयोगी वस्तूंची उत्पादन फार मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे, त्यांच्या किमती तुलनेने कमी असतात. अनेकविध प्रकारच्या यंत्राच्या शोधांमुळे मानवी जीवन उत्तरोत्तर अधिक सुलभ झाले होते. औद्योगिक क्रांती प्रामुख्याने इंग्लंड व अन्य युरोपीय देशांमध्ये झाली होती. अनेक इतिहासकारांनी क्रांती या शब्दाबाबत शंका व्यक्त केली असली तरीही, सर्वसाधारणपणे क्रांती म्हणजे आपण राजकीय स्वरूपाची उलथापालथ म्हणजे क्रांती असे गृहीत धरले जाते. त्या अनुषंगाने औद्योगिक क्रांतीला क्रांती न म्हणता विकास म्हटले जावे असा प्रवाह प्रचलित होत गेला. कारण ही आकस्मिक स्वरूपाची घटना नसून प्रदीर्घ वर्षाचा (१०० वर्षाचा) कालखंड आहे. वरील उल्लेखित मत बरोबर वाटत असले तरीही क्रांती हा शब्दप्रयोग राजकीय घटकांनाच लागू होतो, असे नाही तर सामाजिक, आर्थिक, औद्योगिक इत्यादी क्षेत्रातही क्रांती होऊ शकते. ह्या दृष्टीने विचार केल्यास औद्योगिक क्रांती असा शब्द शब्दप्रयोग विचारणे अधिक समर्पक ठरतो. कारण इ. स. १७५० ते १८५० या शंभर वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात औद्योगिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आल्याचे समजते. उत्पादनाचे एकूण सर्व स्वरूपच बदलून गेले. पूर्वी सर्व उत्पादन हाताच्या साह्याने होत असे. आता त्याची जागा यंत्राने घेतली. परिणामी उत्पादनाचा वेग प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे किंमतीमध्ये घट निर्माण झाली.

औद्योगिक क्रांतीमुळे दुसरा महत्त्वपूर्ण बदल असा झाला की घराघरातून होणाऱ्या उत्पादनाची जागा आता कारखान्यांनी घेतली. परिणामतः मोठमोठे कारखाने अस्तित्वात येऊन स्वतःच्या घरी काम करणारे कारागीर, मजूर म्हणून कारखान्यात काम करू लागले. वेगाने होणारी उत्पादन पद्धतीमुळे प्रचंड प्रमाणात नफा मिळवून देणारी असल्यामुळे अधिकाधिक नफा मिळविण्याच्या लालसेपोटी कारखान्यात अधिकाधिक भांडवल गुंतविणे सुरू झाले. त्यातून औद्योगिक भांडवलदार वर्ग उदयास आला. त्याचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातवरही दूरगामी परिणाम झाले. म्हणूनच या संपूर्ण प्रक्रियेला व परिवर्तनाला औद्योगिक क्रांती असा शब्दप्रयोग वापरणे अधिक सोयीस्कर ठरतो.

## १.२ पार्श्वभूमी

मध्ययुगीन कालखंडात विविध प्रकारचे शोध लागल्याने कारखानदारी उदयाला आली. त्यातूनच औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ झाला. या क्रांतीची विविध कारणे असून त्याचा जलद

गतीने प्रसार झाला. औद्योगिक क्रांतीचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक क्षेत्रावर परिणाम झाले.

## १.३ औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का घडली ?

संपूर्ण युरोपात त्यावेळी फ्रान्स हे प्रमुख राष्ट्र म्हणून समजल्या जात होते. फ्रान्समध्ये रेशीम, ताग, कोळसा, लोखंड, जलशक्ती अशा अनेकविध साधन सामुग्रीने सुजलाम-सुफलाम होते. तरीही औद्योगिक क्रांती प्रथम फ्रान्समध्ये न घडता इंग्लंडमध्ये झाली. याचे प्रमुख कारण म्हणजे विदेशी व्यापारासाठी फ्रान्समध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तू ह्या विशेषत: विलासाच्या होत्या. अशा वस्तू हातानेच तयार कराव्या लागत होत्या. औद्योगिक विकासाकरिता इंग्लंडमध्ये जसे पूरक कायदे करण्यात आले, तसे फ्रान्समध्ये झाले नाही. इंग्लडचे भारत व अमेरिका बरोबर असणाऱ्या व्यापारिक धोरणातून इंग्लंडने भरपूर धन कमावले होते. अशा अनेकविध कारणांमुळे औद्योगिक क्रांती फ्रान्समध्ये न होता प्रथम इंग्लंडमध्ये झाली.

## १.४ औद्योगिक क्रांतीची प्रमुख कारणे

औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्व प्रथम इंग्लंडमध्ये सन सतराशे पन्नास ते अठराशे ५० या कालखंडामध्ये झाली याची अनेक कारणे आहेत. प्रबोधन व धर्मसुधारणेच्या चळवळीच्या काळात विज्ञान विज्ञानाचा चांगला प्रचार-प्रसार झाला. नौकानयन व्यापार व साम्राज्य निर्मितीमध्ये इंग्लंडमधील बुद्धिजीवी लोकांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. परिणामी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम होण्यास सर्वस्वी परिस्थिती अनुकूल होती. औद्योगिक क्रांतीची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १.४.१ कच्च्या मालाची मुबलकता :

यंत्रे चालविण्यासाठी कोळसा व लोखंड या कच्च्या मालाची आवश्यकता होती. इंग्लंडमधील वायव्य भागात कोळशाच्या व लोखंडाच्या खाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या. महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्यापैकी बऱ्याच खाणी ह्या जवळ जवळ होत्या. त्यामुळे कारखानदारांचा बराच फायदा झाला. अशाप्रकारे कोळसा व लोखंडाच्या खाणी जवळजवळ नसल्यामुळे इंग्लंडमधील औद्योगिकीकरणाला चालना देणारे ठरले.

### १.४.२ कृषी क्रांती :

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती च्या पहिले कृषी क्रांती झाली होती. कृषी क्षेत्रात यंत्राच्या उपयोगामुळे नावीन्यपूर्ण बदल होऊन लहान-लहान शेतजमिनीचे महत्व नष्ट झाले. परिणामी जमिनीच्या एकत्रिकरण प्रक्रियेला चालना मिळाली. अशाप्रकारे इंग्लंडमध्ये छोटे शेतकरी शेतमजूर मोठ्या संख्येने बेकार झाले. बांधबंदिस्ती कंपनीकरण नगदी पिकांची लागवड व चर्च या धर्म संस्थेच्या जमिनीचे सराव कुरणात रूपांतर यामुळे अनेक शेतकरी व शेतमजूर

munotes.in

बेरोजगार झाले. मोठमोठ्या कारखान्यांमध्ये प्रचंड मजुरांची आवश्यकता होती. अशा स्थितीत कृषी क्रांतीमुळे बेकार झालेले शेतकरी व शेत मजूर कमी मजूर उपलब्ध होत होते.

**१.४.३ अनुकूल सरकारी धोरण** :

इंग्लंडच्या सरकारने व्यापार-व्यवसाय व वखारी स्थापन करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन दिल्याने इंग्लडच्या व्यापारात वाढ होऊन जगाच्या फार मोठ्या प्रदेशावर तिचे साम्राज्य स्थापन झाले होते. ईस्ट इंडिया कंपनी. हडसन बे कंपनी आणि मस्कोव्ही कंपनी या सारख्या सनदी व्यापारी कंपन्यांना इंग्लंडमधील सरकारने प्रोत्साहन व मदत नेहमीच केली आणि वेळ प्रसंगी आपल्या सेना मार्फत त्यांचे रक्षणही केले.

**१.४.४ शास्त्रीय शोध** :

औद्योगिक क्रांती होण्यास महत्त्वपूर्ण कारण म्हणजे अनेक शास्त्रज्ञांनी व कारागिरांनी जे शास्त्रीय शोध लावले , त्यामुळे औद्योगिक क्रांती होण्यास खूप मोठी मदत झाली होती. जेम्स वॅट, जेम्स हारग्रीव्हज, जॉन के., रिचर्ड आर्कटाइट, सॅम्यूएल क्रॉम्प्टन, एडमंड कार्टराईट, हंफ्रे डेव्ही, जॉन स्टीमन, हेन्री बसामेर, थॉमस न्युकॉनमेन, जॉर्ज स्टिव्हन्सन आणि रॉबर्ट फुल्टण आदी शास्त्रज्ञांनी लावलेले विविध प्रकारच्या शोधामुळे औद्योगिक क्रांतीला गती मिळाली.

**१.४.५ औद्योगिक क्रांतीमधील महत्वाचे यांत्रिकीय शोध** :

कच्च्या मालाची मुबलकता, बाजारपेठेतील मक्तेदारीमुळे उत्पादित होणाऱ्या वस्तू ह्या कमी पडू लागल्या. परिणामी ज्यादा उत्पादित वस्तू निर्माण करण्याच्या लालसेपोटी यंत्रसामग्री निर्मितीसाठी शासन स्तरावर प्रोत्साहन देण्यात येऊन कारखान्यांना पूरक यंत्रांचे शोध लागले. यांत्रिकिय शोध खालील प्रमाणे आहेत.

**१.४.६ बाष्पशक्ती (Steam)** :

बाष्पशक्तीचा शोध हा औद्योगिक क्रांतीसाठी वरदान म्हणून समजला जातो. बाष्पशक्तीच्या शोधामुळे दगडी कोळशापासून निर्माण होणारी उष्णता व बाष्पशक्ती ह्यामुळे यंत्रे चालविणे सहज सोयीचे झाले. इ.स. १७०५ मध्ये थॉमस न्युकॉमेन याने वाफेच्या शक्तीवर चालणारे यंत्र सर्वप्रथम तयार केले होते. इ.स १७६९ मध्ये जेम्स वॅट यांनी न्युकॉमेनच्या यंत्रातील तांत्रिकीय दोष दूर करून ते अव्याहत चालत राहील अशी व्यवस्था केली. अधिक वेगाने चालणारी व कमी प्रमाणात कोळसा लागणार जेम्स वॅटचे बाष्प यंत्र अधिक कार्यक्षम होते. या यंत्राचा शोध लावण्यात मॅथ्यू बोल्टन यांची विशेष मदत झाली.

**१.४.७ दळणवळण क्षेत्रातील परिवर्तन**:

औद्योगिक कारखान्यांना लागणारा कच्चामाल इतर ठिकाणाहून कारखान्यापर्यंत नेणे आणि कारखान्यातील उत्पादित माल बाजारपेठा पर्यंत वाहतूक करणे. ही महत्त्वाचे असल्याने औद्योगिक क्रांतीसाठी वाहतुकीच्या क्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तन होण्याची गरज निर्माण झाली होती. जॉन अँडम या स्कॉटिश इंजिनीअरने खडी व डांबर यांचा उपयोग करून पक्के

रस्ते बनविण्याचे नवे तंत्र शोधून काढले. त्यामुळे इंग्लंडमध्ये अल्पावधीतच नव्या तंत्रज्ञानामुळे हजारो लांबीचे रस्ते तयार झाले.

सन १७५५ ते १८५० या कालावधीमध्ये मालाची वाहतूक करण्यासाठी अनेक कालवे खोदण्यात आले. कारण जलमार्गाने चालणारी वाहतूक ही कमी खर्चाची असते ड्युक ऑफ ब्रिजवॉटरने ब्रिंटुले नावाच्या इंजिनियरच्या मदतीने वर्सल ते मँचेस्टरपर्यंत कालवा तयार करण्याचा आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार जो कालवा तयार करण्यात आला त्याला "ब्रिजवाटर" असे नाव देण्यात आले. त्यानंतर लगेच कॅल्डर व मर्से नावाचे कालवे खोदण्यात आले. लवकरच लंडन ब्रिस्टल अशी मोठमोठी शहरे कालव्याद्वारे जोडण्यात आली. १९ व्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये दोन हजार मैल लांबीचे कालवे तयार झाले होते. कालव्याने वाहतूक करण्यात रस्त्यापेक्षा १/६ खर्च येत होता. सन १७९० मध्ये पोलादी जहाज तयार झाले आणि १८१२ मध्ये "कोमेट" नावाचे जहाज सागरात पदार्पण करण्यात आले होते. सन १८१४ मध्ये जॉर्ज स्टिफन्सन या ब्रिटिश अभियंत्याने बष्पशक्तीवर चालणाऱ्या पहिल्या आगगाडीचे इंजिन तयार केले. त्यानंतर लवकरच बाष्पशक्तीवर चालणारी जहाजे बांधण्यात आली. परिणामी वाहतूक खर्च कमी व मालाची निर्यात आयात करणे सहज सुलभ व शक्य झाले होते. इ.स. १८५० पर्यंत जवळपास ६००० मैल लांबीचे रेल्वे पटरी तयार करण्यात आली होती. दळणवळण क्षेत्रातील क्रांतीबरोबरच संपर्कक्षेत्रातही क्रांती झाली. इ. स. १८६६ मध्ये इंग्लंड व अमेरिका यांच्या दरम्यानच्या अटलांटिक महासागराच्या तळाशी तारायंत्राचे केबल टाकण्यात आल्यानंतर उभय देशात संपर्क साधणे शक्य झाले. अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनी दुरध्वनीचा शोध लावल्याने संपर्कक्षेत्रात पर्यायाने औद्योगिक क्रांतीत अभूतपुर्व क्रांती झाली.

**आपली प्रगति तपासा**

१. औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का घडली? ते स्पष्ट करा.

## १.५ औद्योगिक क्रांतीचा आधुनिक जगावर झालेले परिणाम

इंग्लंडमध्ये लागलेल्या विविध शोधामुळे कापड, लोखंड, कोळसा, उद्योगात फार मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेत. हाताची जागा यंत्राने घेतली. बाष्पशक्तीच्या शोधामुळे रेल्वे, जहाजामुळे दळणवण क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती घडून आली. नवीन शोधामुळे कारखान्यात नवीन प्रयोग सुरू झाले. महत्त्वाची बाब म्हणजे विजेचा शोध लागला. इंग्लंडमध्ये नवीन शोधून बनविलेली यंत्रे प्रारंभीच्या काळात फक्त इंग्लंडमध्येच वापर करण्यात येत होती. इंग्लड बाहेर नेण्यास बंदी होती. मात्र सन १८२५ मध्ये ही बंदी मोडीत काढल्यामुळे मोठ्या प्रमाणात यंत्रे इंग्लड बाहेर प्रामुख्याने पश्चिम युरोपात पोहोचल्यामुळे संपूर्ण युरोपात औद्योगिक क्रांतीचा प्रचार-प्रसार झाला होता. औद्योगिक क्रांतीने केवळ उद्योग क्षेत्रालाच प्रभावित केले नाही , तर त्याचे सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातही बदल घडून आले. त्या दृष्टीने आपण औद्योगिक क्रांतीच्या परिणामाचा विचार करू.

**१.५.१ सामाजिक परिणाम** :

मानवी जीवन व समाज यांचे असे एकही अंग नव्हते की ज्यावर औद्योगिक क्रांतीचे परिणाम झाले नाहीत.

१) औद्योगिक क्रांतीचा सामाजिक दृष्टिकोनातून सर्वात वाईट परिणाम असा झाला की घरगुती उद्योग नष्ट झालेत. औद्योगिक क्रांतीपुर्वी कारागीर स्वतःच्या घरीच काम करून वस्तूचे उत्पादन करीत होते. वस्तूचे उत्पादन कारागिरांच्या इच्छेनुसार मर्जीनुसार होत होते. त्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नव्हते. तो त्यांच्या व्यवसायाबाबत पूर्णत: स्वतंत्र होत. परंतु औद्योगिक क्रांतीमुळे हाता ऐवजी यंत्राच्या सहाय्याने वस्तूचे उत्पादन होण्यास प्रारंभ झाला. मोठमोठे कारखाने अस्तित्वात आले आणि त्यामुळे घरगुती व्यवसायावर गदा आली.

२) औद्योगिक क्रांतीचा सामाजिक दृष्टिकोनातून दुसरा परिणाम असा झाला की खेडे गावांमधून बेरोजगार मजूर मोठ्या संख्येने कारखाने असलेल्या नगरमध्ये येऊन वस्ती करू लागली. परिणामी नवीन नगरे उदयास येऊन खेडेगावे उजाड पडू लागली. औद्योगिक नगराच्या उद्याची व विकासाची ही स्थिती आणि खेडेगावची अधोगती सर्वप्रथम इंग्लंड मध्ये आढळून आली.

सन १७५० च्या सुमारास मॅंचेस्टर ची लोकसंख्या ४५००० होती. औद्योगिक क्रांतीत मॅंचेस्टर कापड उद्योगाचे फार मोठे केंद्र बनले आणि पुढील एक शतकात मॅंचेस्टर ची लोकसंख्या ३००००० बनली. लंडन, लंकाशायर इथली नगरांची भरभराट होऊ लागली. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे शहरातील सतत वाढत जाणारी मजुरांची संख्या आणि शहरातील निवास, रहदारी, परिवहन व अन्य नागरी सुविधा वाढत जात असल्यामुळे एका बाजूला मोठी औद्योगिक शहरे उदयास आली. तर दुसऱ्या बाजूला त्या शहरातील नागरी सुविधांवर ताण पडल्यामुळे असंख्य नागरी समस्या निर्माण झाल्या. घर भाडे याच्या किमती वाढल्यामुळे मजुरांना नाइलाजाने गलिच्छ वस्त्यांमधील झोपडपट्ट्यात राहणे भाग पडले. त्यामुळे औद्योगिक शहरात वाढत्या प्रमाणावर गलिच्छ वस्त्या निर्माण झाल्यामुळे पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, उद्याने व खेळाची मैदाने रहदारीची साधने व नागरी सुविधांचा अभाव असल्याने तेथे राहणाऱ्या कामगारांचे जीवन अगदीच कनिष्ठ प्रतीची निर्माण झाले होते.

**३) कायदा व सुव्यवस्थेचा अभाव :**

औद्योगिक नगरातील गलिच्छ वस्त्यांची होणारी वाढ व त्यामुळे निर्माण होणाय्रा अनेक समस्या अद्यापही औद्योगिक देशांना सोडविता आलेल्या नाहीत. अशा स्थितीमध्ये औद्योगिक शहरांमध्ये शांतता व सुव्यवस्था धोक्यात येणे स्वाभाविकच होते. गलिच्छ वस्त्यांमधील गुन्हेगारीचे प्रमाणही लक्षणीय वाढ होणे स्वाभाविकच होते. औद्योगिकरणामुळे भारतासारख्या देशाला, नव्याने सामोरे जाणाऱ्या देशाला या समस्या सुद्धा भेडसावत आहेत.

munotes.in

### १.५.२ आर्थिक परिणाम:

औद्योगिक क्रांतीमुळे नवीन उद्योग सुरू करण्यासाठी, आपले भांडवल गुंतविण्यासाठी, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैशाची उलाढाल करण्यासाठी बँकिंग व्यवस्था निर्माण करणे. औद्योगिक क्रांती मधून स्थापन झालेली कारखाने मुबलक प्रमाणात औद्योगिक मालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ लागले. परिणामी समाजात संपत्तीचे विषम वाटप होऊन खूप काही संपत्ती उद्योगपती, उद्योजक आणि भांडवलदार यांच्या खिशात जात असल्याने ते अधिकाधिक श्रीमंत होत गेले. तर त्यांच्या कारखान्यात कामकरणाऱ्या कामगारांच्या वाट्याला अतिशय अत्यल्प वेतन दिले जाई, हे वेतन इतके अत्यल्प असे की त्या वेदनामधून सांसारिक चरितार्थ मोठ्या मुश्कीलीने चालत असे.

समाजातील संपत्तीचे विषम वाटपामुळे अनेक विचारवंत व अभ्यासक यांनी समाजावर, औद्योगिक क्रांतीच्या आर्थिक परिणामाचा पाडा गिरविण्यास सुरुवात केली. या विचार प्रवाह मधून उदारमतवाद, स्वप्नरंजनात समाजवाद व शास्त्रीय समाजवाद, सहकारी समाजवाद, फेबियन समाजवाद, मार्क्स प्रणित साम्यवाद, यासारख्या विचारप्रणाली उदयाला आल्या. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लडचा साम्राज्यवाद व वसाहतवाद अतिशय जलद गतीने फोफावत होता. कच्च्या मालासाठी पुरवठा, व पक्क्या मालासाठी बाजारपेठेतील मक्तेदारी असा या वसाहतीचा दुहेरी उपयोग होत असल्याने त्यांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण होऊ लागले. रेल्वेमुळे देशांतर्गत व जहाजा मुळे विदेशात पक्का माल निर्यात करणे व कच्चा पूरक माल आयात करणे औद्योगिक देशांना सहज सुलभ झाले. इंग्लंड आपल्या वसाहतीतून कच्चा माल गोळा करीत असे. भारत व इजिप्तपासून कापूस, वेस्टइंडीज मधून साखर, मलायातून टिन व रबर, नायजेरियातून पामतेल, दक्षिण आफ्रिकेतून सोने व हिरे ह्याशिवाय अर्जेंटिनातून गहू व गोमांस चीनमधून चहा, चिलीमधुन नायट्रेट व तांबे ,ब्राझीलमधून कॉफी इंग्लंडमध्ये येत असे. या वसाहतींचा उपयोग उत्पादित मालाची विक्रीसाठी बाजारपेठ म्हणूनही होत होता. इ.स. १८४० मध्ये इंग्लडच्या निर्यात कापडापैकी २२ / कापड भारत व चीनमध्ये निर्यात केले जाई. सन १८९३ पर्यंत तर एकट्या भारतातच ४०% कापड निर्यात केली जावू लागले होते.

### १.५.३ राजकीय परिणाम:

औद्योगिक देशातील भांडवलदार वर्गाने शासनाला सतत आपल्या वर्चस्वाखाली ठेवले होते. आपल्या राजकीय दबावाचा दुरुपयोग करून भांडवलदारांनी मजुरांना वेठीस धरले. त्यांच्या आर्थिक शोषणामुळे मजूरांची स्थिती अतिशय दयनीय होत गेली. संख्येने बहुसंख्य असून त्यांची पिळवणूक सातत्याने होत होती. आपल्यावर होत असलेला अत्याचार मजूर जास्त दिवस सहन करू शकला नाही. त्यामुळेच आपण गुलाम बनलो असे त्याला वाटल्याने मजुराने यंत्राची तोडफोड सुरू केली. सन १८१२ मध्ये इंग्लड सरकारने कायदा करून यंत्राची नासधूस करणाऱ्यासाठी मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. कामगारांना आपली संघटना असल्याचे नितांत गरज भासू लागली. आपले ऐक्य झाल्याशिवाय परिस्थिती सुधारणा होणार नाही, याची कामगारांना जाणीव झाली. खरे तर इंग्लंडमधील राजकीय पक्षांना समाजवादी विचाराकडे झुकणाऱ्या कामगार संघटना प्रति सहानुभूती नव्हती. अशाच परिस्थितीत "पीटर लुक हत्याकांड" घडून आले. मजुरांची सभा सुरु

असताना त्यावर हल्ला करून पोलिसांनी अनेक मजुरांना ठार मारले (१८१९). त्याची दखल घेऊन इंग्लंड संसदेने सन १८२५ मध्ये आपल्या मागण्यासाठी मजूर संघटनांना मान्यता दिली. वेतनवाढ व कामाचे तास कमी करणे ह्या मजूर यांच्या प्रमुख मागण्या होत्या. मजूर कल्याणासाठी जे फॅक्टरी ॲक्ट करण्यात आले होते, त्यातील दोष म्हणजे या कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी निरीक्षकांकडे सोपविली होती. हे निरीक्षक भांडवलदारांचे समर्थक असल्यामुळे मजुरांच्या स्थितीत म्हणावा तसा बदल घडून आला नाही.

**आपली प्रगती तपासा:**

१] औद्योगिक क्रांतीचा आधुनिक जगावर झालेला सामाजिक परिणाम लिहा.

## १.६ सारांश

औद्योगिक क्रांतीमुळे विश्व इतिहासात एक नव्या युगाची सुरुवात झाल्याचे हे आपल्याला समजते. औद्योगिक क्रांतीपूर्वी एक हजार वर्षात मानवाने जेवढी प्रगती केली नव्हती, तेवढी प्रगती औद्योगिक क्रांतीच्या शंभर वर्षाच्या कालावधीमध्ये झाल्याचे हे वरील अभ्यासाअंती निदर्शनास आल्याचे समजते. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्राच्या साह्याने विविध वस्तूचे उत्पादन दर्जेदार आणि कमी किमतीत उपलब्ध होऊ लागल्याने त्याचा सर्वसामान्य ग्राहकांना निश्चितच फायदा झाला. तसेच ग्राहकांना बाजारपेठेतील अनेक वस्तूमधून आपल्या आवडीच्या वस्तू निवडण्याची संधी मिळू लागली. परिणामी औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिक देशातील लोकांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाली. कारखान्यातील नवनवीत उद्योगामुळे रोजगारांच्या संधी वाढल्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्याने एकंदरीत समाजाची भरभराट झाली. वाढत्या शास्त्रीय शोधामुळे कामगाराचे दैनंदिन जीवन अधिकाधिक सुखावह होऊ लागले. औद्योगिक क्रांतीमुळे जगभरातील अनेक देशात प्रवास करणे किंवा संपर्क साधणे सहज शक्य होऊ लागले. एका देशातील कच्चामाल दुसऱ्या देशात नेणे, तेथे त्यावर प्रक्रिया करून त्याचे पक्या मालात रूपांतर करून व नंतर हा पक्का माल विविध ठिकाणच्या बाजारपेठेत पाठविणे शक्य झाल्यामुळे पूर्वीची आर्थिक स्वयंपूर्णत: याची कल्पना मागे पडून विविध देश एकमेकावर विसंबून राहू लागले.

औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी उदयास आलीकारखानदारीमुळे. जल प्रदूषण, हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण घडून आलेकाही .हवेच्या प्रदूषणामुळे लोकांना श्वसनांचे विकार जडले. कारखान्यातून विषारी वायूंची गळती होऊन अनेक माणसे मृत्युमुखी पडली, विकलांग झालीकारखान्यातून व  शहरातून सोडलेले सांडपाणी, नद्या, नाले,  समुद्राच्या पाण्यात मिसळल्यामुळे पाणी दूषित झालेत्यातून लोकांना . अतिसार (गॅस्ट्रो(, कावीळ, अर्धांगवायू यांसारखे आजार होऊ लागले. जलचर प्राणी व जल वनस्पतींचे अस्तित्व धोक्यात आले . शहरे वकारखान्यांच्या वाढीतून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले.

## १.७ प्रश्न

१) वैज्ञानिक क्रांती म्हणजे काय ? ते सांगून त्यातील महत्वाच्या शोधांची माहीती लिहा.

२) कृषी क्रांतीमधील विकासाचे महत्वाचे टप्पे विशद करा.

३) औद्योगिक क्रांती ही संकल्पणा समजावून सांगा. औद्योगिक क्रांती प्रथम इंग्लडमध्ये का झाली ? त्याची कारणे लिहा.

४) औद्योगिक क्रांतीमधील महत्वांच्या शोधांची माहीती लिहा.

५) औद्योगिक क्रांतीचे परिणाम लिहा.

## १.८ संदर्भ


- आवटे, लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.
- गाडगीळ, पां. वा. रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१. –
- डॉ. आठल्ये, वि. भा., आधुनिक जगाचा इतिहास, नागपुर, 2010.
- प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग,नागपुर, जून 2005.
- डॉ. वैद्य सुमन, आधुनिक जग,नागपुर,2002
- डॉ. काळे, म. वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, 2001.
- प्रा. जोशी,पी.जी.,अर्वाचीन यूरोप,नांदेड,2008.
- डॉ.जैन,हुकमचंद,डॉ.माथुर, कृष्णचंद्र, आधुनिक जगाचा इतिहास,पुणे,2019.
- डॉ.कठारे,अनिल,आधुनिक जगाचा इतिहास,जळगांव,2015
- Carr. E. H. The Bolshevik Revolution, 3 Vols., London, 1961-64.


*****

munotes.in

# २

# अमेरिकन राज्यक्रांती (१७७६)

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ पार्श्वभूमी

२.३ अमेरिकन क्रांतीची मूलभूत कारणे

२.४ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध ची वाटचाल (वासाहतिक आंदोलन : विविध टप्पे)

२.५ अमेरिकेच्या यशाची कारणे/वसाहतीच्या यशाची कारणे

२.६ अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम / महत्व

२.७ सारांश

२.८ प्रश्न

२.९ संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

- विद्यार्थ्यांना अमेरिकन राज्यक्रांतीचा परिचय करून देणे.
- विद्यार्थ्यांना फ्रेंच राज्यक्रांतीची ओळख करून देणे.
- अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीचे स्वरूप अभ्यासाने
- अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीचा जगाचा इतिहासावर पडलेला प्रभाव अभ्यासाने.

## २.१ प्रस्तावना

अमेरिकेतील वसाहतीचे फ्रेंचाविरुद्ध संरक्षण करण्यासाठी इंग्लंडला इ.स. १७६३ साली सप्तवार्षिक युद्ध करावे लागले. या युद्धात इंग्लंडचा विजय झाला. परंतु हे युद्ध करण्यासाठी इंग्लंडला अफाट खर्च करावा लागला होता. युद्धानंतर ब्रिटिश शासनापुढे अफाट युद्ध कर्ज फेडणे, जिंकलेल्या नव्या प्रदेशाचे रक्षण करणे, अमेरिकेतील तैनात फौजेचा खर्च भागविणे,असे असंख्य प्रश्न निर्माण झाले होते. युद्धावर झालेल्या अफाट खर्चाचा काही भाग अमेरिकेतील वसाहतीवर कर बसवून वसूल करावा असा प्रश्न ब्रिटिश शासनाने स्वीकारला होता. परंतु या कायद्यांना वसाहतींमधील बहुसंख्य जनतेने तीव्र विरोध दर्शविला होता. इंग्लंड वर्चस्वाखाली असलेली अमेरिकेतील लोकांनी संघटितपणे ब्रिटिश शासनाने लादलेल्या धोरणाला विरोध दर्शविला. तडजोडीचे सर्व प्रयत्न विफल झाल्यानंतर

munotes.in

अमेरिकेतील लोकांनी इ.स. १७७६ साली आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली. म्हणूनच विश्व इतिहासामध्ये या घटनेला अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध असेही म्हणतात. इंग्लंडविरुद्ध अमेरिकेतील लोकांनी स्वातंत्र्ययुद्ध घोषित केले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेली अमेरिकन क्रांती म्हणजे अमेरिकेच्याच नव्हे तर संपूर्ण विश्व इतिहासातील टर्निंग पॉईंट म्हणून समजले जाते. गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त होणारा प्रथम देश म्हणजे अमेरिका होय. अमेरिकन क्रांतीने जगासमोर एक आदर्श निर्माण केला .युरोपीय शक्तीच्या साम्राज्यवादाला बळी पडलेल्या आशिया व आफ्रिकाखंडातील दुर्बल आणि मागासलेल्या देशांना संघटित शक्तीचे बळ मिळाले. गुलामगिरीच्या जोखडातून बंदिस्त असलेल्या देशांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. अमेरिकन क्रांतीचा परिणाम फ्रांसवरही झाला. फ्रान्समध्ये तर स्वकीयांचे शासन होते. अमेरिकन क्रांतीचे आणखी एक महत्त्व म्हणजे जगातील पहिले प्रजासत्ताक अस्तित्वात आले. शिवाय जगातील सर्व घटनाना आधारभूत असा मानवी हक्काचा जाहीरनामा ही सुद्धा अमेरिकन क्रांतीची देणगी होय. इंग्लंड विरुद्ध पुकारलेल्या स्वातंत्र्ययुद्धात शेवटी वसाहतीचा विजय होऊन त्याचे युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका हे नवे स्वतंत्र गणराज्य सन १७८३ साली उदयास आले होते. त्याचा सविस्तर अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## २.२ पार्श्वभूमी

### २.२.१ अमेरिकन राज्यक्रांतीचे स्वरुप:

अमेरिकन राज्यक्रांती ही वासाहतिक जनतेनी इंग्लड अशा बलाढ्य आक्रांतांच्या शोषणा विरुध्द वैचारिक व राजकिय क्रांती पुकारली होती. जी सन १७६५ आणि १७९१ दरम्यान वसाहतवादी उत्तर अमेरिकेत तीचे बिजारोपण द्रुढमूल झाले. १३ वसाहतींमधील अमेरिकन लोकांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केले. ज्यांनी अमेरिकन क्रांतिकारी युद्धात (१७७५-१७८३) ब्रिटिशांचा पराभव केला, ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवले आणि युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, संघराज्य स्थापन झाले. पहिली आधुनिक घटनात्मक उदारमतवादी लोकशाही स्थापन केली. हे विश्व इतिहासातील अतुलनिय अशी घटना म्हणून समजल्या जाते.

अमेरिकन वसाहतवाद्यांनी ब्रिटीश संसदेद्वारे कर आकारण्यावर आक्षेप घेतला, ज्यामध्ये त्यांचे थेट प्रतिनिधित्व नव्हते. इ.स. १७६५ च्या मुद्रांक कायद्याच्या संमताने वसाहतींवर अंतर्गत कर लादले गेले होते. ज्यामुळे वसाहतींचा विरोध झाला आणि अनेक वसाहतींच्या प्रतिनिधींची स्टॅम्प ॲक्ट निषेधार्थ काँग्रेसमध्ये बैठक झाली. ब्रिटीशांनी स्टॅम्प ॲक्ट कायदा रद्द केल्याने तणाव कमी झाला होता. परंतु इ.स. १७६७ मध्ये टाउनशेंड कायदा संमत झाल्यानंतर पुन्हा विद्रोह भडकला. ब्रिटीश सरकारने शांतता कमी करण्यासाठी सन १७६८ मध्ये बोस्टनमध्ये सैन्य तैनात केले, ज्यामुळे इ.स. १७७० मध्ये बोस्टन हत्याकांड घडले. ब्रिटिशांने नंतर बरेच कर रद्द केले. परंतु वासाहतिक जनतेवर कर लावण्याच्या संसदेच्या अधिकारावर प्रतिकात्मकपणे ठामपणे सांगण्यासाठी चहावरील कर कायम ठेवला. सन १७७२ मध्ये ऱ्होड आयलंडमधील गॅस्पी जाळणे, १७७३ चा चहा कायदा

पास होणे आणि डिसेंबर १७७३ मध्ये बोस्टन टी पार्टी यामुळे तणावात उत्तरोत्तर वाढ होत गेली. ब्रिटीशांनी बोस्टन हार्बर बंद करून आणि दंडात्मक कायद्यांची मालिका लागू करून प्रतिसाद दिला होता. ज्याने मॅसॅच्युसेट्स कॉलनीचे स्व-शासनाचे विशेषाधिकार प्रभावीपणे रद्द केले. इतर वसाहती मॅसॅच्युसेट्सच्या मागे धावल्या आणि तेरा वसाहतींपैकी बारा वसाहतींनी १७७४ च्या उत्तरार्धात ब्रिटनला त्यांच्या प्रतिकाराच्या समन्वयासाठी कॉन्टिनेन्टल काँग्रेस तयार करण्यासाठी प्रतिनिधी पाठवले.

अशा प्रकारे ब्रिटेनच्या विरोधकांना देशभक्त किंवा व्हिग्स म्हणून ओळखले जात असे, तर उपनिवेशवादी ज्यांनी राजसत्तेशी आपली निष्ठा कायम ठेवली त्यांना निष्ठावंत किंवा टोरीज म्हणून ओळखले जात असे. १९ एप्रिल १७७५ रोजी लेक्सिंग्टन आणि कॉनकॉर्ड येथे स्थानिक देशभक्त मिलिशियाने लष्करी साहित्याचा साठा हस्तगत करण्यासाठी पाठवलेल्या ब्रिटिश नियमित सैनिकांना तोंड द्यावे लागले. तेव्हा खुले युद्ध सुरू झाले. नव्याने स्थापन झालेल्या कॉन्टिनेंटल आर्मीमध्ये सामील झालेल्या देशभक्त मिलिशियाने बोस्टनमध्ये ब्रिटिश सैन्याला वेढा घातला. जमीन आणि त्यांच्या सैन्याने समुद्रमार्गे माघार घेतली. प्रत्येक वसाहतीने प्रांतीय काँग्रेसची स्थापना केली, ज्याने पूर्वीच्या वसाहती सरकारांकडून सत्ता स्वीकारली, निष्ठावाद दडपला आणि कमांडर इन चीफ जनरल जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नेतृत्वाखालील कॉन्टिनेंटल आर्मीमध्ये योगदान दिले. अशातच सन १७७५-७६ च्या हिवाळ्यात देशभक्तांनी क्विबेकवर आक्रमण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आणि सहानुभूती असलेल्या वसाहतवाद्यांना एकत्र केले.

कॉन्टिनेन्टल काँग्रेसने ब्रिटिश किंग जॉर्ज तिसरा यांना जुलमी घोषित केले ज्याने इंग्रज म्हणून वसाहतवाद्यांचे हक्क पायदळी तुडवले आणि त्यांनी ४ जुलै १७७६ रोजी वसाहतींना मुक्त आणि स्वतंत्र राज्य घोषित केले. देशभक्त नेतृत्वाने राजेशाहीचे शासन नाकारण्यासाठी उदारमतवाद आणि प्रजासत्ताकवादाच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा दावा केला. अभिजात वर्ग स्वातंत्र्याच्या घोषणेने घोषित केले की, 'सर्व पुरुष समान निर्माण केले गेले आहेत, जरी नंतरच्या शतकांपर्यंत घटनात्मक सुधारणा आणि फेडरल कायद्यांमुळे आफ्रिकन अमेरिकन, मूळ अमेरिकन, गरीब गोरे पुरुष आणि स्त्रियांना समान अधिकार दिले जातील.'

सन १७७६ च्या दरम्यान ब्रिटिशांनी न्यूयॉर्क शहर आणि त्याचे मोक्याचे बंदर ताब्यात घेतले, जे त्यांनी युद्धाच्या कालावधीसाठी राखले. कॉन्टिनेंटल आर्मीने ऑक्टोबर १७७७ मध्ये साराटोगाच्या लढाईत ब्रिटीश सैन्यावर कब्जा केला आणि त्यानंतर फ्रान्सने युनायटेड स्टेट्सचा मित्र म्हणून युद्धात प्रवेश केला आणि पहाता पहाता युद्धाचे जागतिक संघर्षात रूपांतर झाले. रॉयल नेव्हीने बंदरांवर नाकेबंदी केली आणि काही काळासाठी इतर शहरे ताब्यात घेतल्या गेली. परंतु वॉशिंग्टनच्या सैन्याचा पराजय करण्यात ते अयशस्वी झाले. ब्रिटेनने देखील दक्षिणेकडील राज्यांना विश्वासूंच्या अपेक्षित मदतीसह ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आणि युद्ध दक्षिणेकडे सरकले. ब्रिटीश जनरल चार्ल्स कॉर्नवॉलिसने १७८० च्या सुरुवातीस चार्ल्सटन, दक्षिण कॅरोलिना येथे अमेरिकन सैन्यावर कब्जा केला, परंतु प्रदेशावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी निष्ठावंत नागरिकांकडून पुरेसे स्वयंसेवक भरण्यात

तो अयशस्वी ठरला. शेवटी, संयुक्त अमेरिकन आणि फ्रेंच सैन्याने कॉर्नवॉलिसच्या सैन्यावर सन १७८१ मध्ये यॉर्कटाउनवर कब्जा केला आणि युद्धाचा प्रभावीपणे अंत केला. ३ सप्टेंबर १७८३ रोजी पॅरिसच्या करारावर स्वाक्षरी करण्यात आली, ज्याने औपचारिकपणे संघर्ष समाप्त केला आणि नवीन राष्ट्राच्या ब्रिटीश साम्राज्यापासून पूर्णपणे वेगळे होण्याची पुष्टी केली. अमेरिकन राज्यक्रांती संदर्भात पुढील घटक निहाय माहीती मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

### २.२.२ इंग्लंडच्या वसाहती :

सन १४९६ मध्ये इंग्लंडचा राजा हेन्री सातवा ह्याने जॉन केबटला अमेरिकेत वसाहती स्थापन करण्याचा परवाना दिला होता. त्यानंतर १०० वर्षांनी राणी एलिझाबेथ यांच्या कारकिर्दीत वॉल्टर रॅले ह्याने बरेच प्रयत्न केला. त्यादृष्टीने त्यांना राणीकडून परवाना मिळाला होता. सन १६०६ मध्ये व्यापारी उमराव व प्रतिष्ठित लोकांनी एकत्र येऊन लंडन कंपनी व प्लायमाऊथ कंपनी अशा दोन कंपन्या स्थापन करण्यात आल्या. शेवटी उशिरा का होईना लंडन कंपनीला अमेरिकेत वसाहती स्थापन करण्यात यश मिळाले होते. सन १६०७ मध्ये इंग्लंडचा राजा जेम्स प्रथमच्या कारकीर्दीत इंग्लंडची अमेरिकेत पहिली वसाहत स्थापन झाली होती. त्या वसाहतीला जेम्सटाऊन असे नाव देण्यात आले होते.

अशा प्रकारे इंग्लडला उत्तर अमेरिकेतील पूर्व किनाऱ्यावर वसाहती स्थापन करण्याला सुरुवात झाली. इग्लंडला उत्तर अमेरिकेत वसाहति स्थापन करत असताना तेथील मूळ रहिवाशांशी चांगले वागून त्यांच्या सोबत मिसळून त्या भुप्रदेशातील उत्पादनाची माहिती मिळवीत. त्यांच्या मदतीने लागवडीस सुरुवात केली. इंग्लंडच्या ताब्यात जसा भूप्रदेश येत गेला तसा तंबाखू, कापूस, केळी इत्यादी लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. त्यामध्ये काम करण्यास आफ्रिकेतून निग्रो गुलाम आणले जाऊ लागले. अमेरिकेत वसाहती स्थापन करण्यात इंग्रज व्यापारी यांचा पुढाकार असल्याने त्यामागील व्यापारी हेतू स्पष्ट होता. आपल्या उत्पादित मालासाठी इंग्लंडला बाजारपेठ यांची आवश्यकता होती. तसेच उद्योग व्यवसायाकरिता कच्च्या मालाचे आवश्यकता होती. इंग्लंडमध्ये प्रॉटेस्टंट व प्युरीटन यांचा छळ होत होता. या छळाला कंटाळून अनेक लोकांनी इंग्लंडमधून अमेरिकन वसाहतीमध्ये स्थलांतरित झाले होते. इंग्लंडची अमेरिकेत स्थापन झालेली दुसरी वसाहत मॅसॅच्युसेट्स होय. सन १६२० मध्ये इंग्लंडमधून काही लोक मे फ्लावर नावाच्या जहाजातून आले. त्यांना पिलग्रिम फादर्स असे म्हटले जाते. त्यांनीच ह्या वसाहतीची स्थापना केली होति. सन १६३२ मध्ये विल्यम पेन याने पेनसिल्व्हानिया नावाची वसाहत स्थापन केली होती. इंग्लंडची अमेरिकेतील शेवटची वसाहत जॉर्जिया होय. अशाप्रकारे अमेरिकन क्रांतीच्या वेळी अमेरिकेत इंग्लडच्या व्हर्जिनिया मॅसॅच्युसेट्स, पेनसिल्व्हानिया,मेरीलँड, कनेक्टिकट, होंड आयलँड, न्यू हॅम्पशायर, उत्तर कॅरोलिना, दक्षिण कॅरोलिना, न्युयॉर्क, डिलावरे, न्यूजर्सी आणि जॉर्जिया अशा एकूण १३ वसाहती स्थापन केल्या होत्या.

### २.२.३ इंग्लंडचे वसाहतीप्रती तत्व :

इंग्लंडची अमेरिकेत वसाहती स्थापन करण्यामागील मुख्य तत्त्व हे आर्थिक स्वरूपा बद्दलचे असल्याने, वासाहतिक पासून जास्तीत जास्त लाभ कसा मिळेल, असेच तत्व होते. मात्र

देशाच्या उन्नतीसाठी वसाहतींनी प्रयत्न करावे हीच इंग्लंडची अमेरिकन वसाहतीकडे पाहण्याचा मुख्य हेतू होता. इंग्लंडच्या एका व्यापार सदस्याने सन १७२६ मध्ये असे म्हटले होते की 'एका परावलंबी शासनाची प्रत्येक कृती मात्रुदेशाच्या लाभासाठी असली पाहिजे. एकंदरीत इंग्लंडचे वसाहती प्रती तत्त्व हे शुद्ध स्वार्थाचे होती असे दिसते. हेतू साध्य करण्यासाठी इंग्लंडने वसाहतीवर काही निर्बंध लादले. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

१] इंग्लंडच्या उत्पादित वस्तूशी स्पर्धा होईल अशा अमेरिकन वसाहतीमधील वस्तूंच्या उत्पादनावर बंदी घालण्यात यावी,

२] इंग्लडच्या उत्पादित मालाशी स्पर्धा करणाऱ्या अमेरिकन वसाहतीमधील माल बाजारपेठेत पाठयविण्यासाठी त्यावर जबर जकात लावण्यात यावी,

३] इंग्लंडच्या गरजेच्या उत्पादित मालाला शासनाने साहित्य द्यावे,

४] इंग्लडच्या वसाहतिने कागदी चलन स्वीकारू नये. गुलामांचा व्यापार इंग्लंडच्या दृष्टीने किफायतशीर असल्याने वसाहतींनी गुलामांचा व्यापार कमी करू नये. अशा स्वरूपाचे ते निर्बंध होते. वासाहतिक जनतेबद्दल इंग्लडचे वाढत गेलेले निर्बंधांमुळे वसाहतीमध्ये असंतोष निर्माण झाला. परिणामी अमेरिकन क्रांतीचा उद्भव झाला.

कृषी पिके घेण्यासाठी इंग्लंडने वासाहतिक शेतीवर आपले लक्ष केंद्रित केले. त्या कामी त्यांना मुळरहिवाशांशी रेड इंडियन्सची गरज होती. कारण शेतीकामासाठी जंगले कापणे, शिकार करणे, घरे बांधणे, तंबाखूची लागवड, इत्यादी कामे मूळ रहिवासी चांगल्याप्रकारे करीत असत. त्यानंतर कापडाची लागवड करणे सुरू झाली. कापड विणणे, उत्पादनासाठी आवश्यक अवजारे तयार करणे, या कामासाठी युरोपातून कुशल कारागीर बोलाविण्यात आले होते. हळूहळू विदेशी व्यापाराला चालना मिळाली. ह्या व्यापारातुन न्युयॉर्क, बोस्टन इत्यादी बंदराची भरभराट सुरू झाली. मूळ रहिवाशाशिवाय अमेरिकेत इंग्रज, फ्रेंच, स्पॅनिश असे विविध वंशाचे राष्ट्रीयत्व असणारे, विविध भाषा बोलणारे लोक राहतात. अमेरिकन वसाहतीमध्ये अनेक जमातींची सरमिसळ झालेली होती. इंग्लंडच्या अमेरिकेतील १३ वसाहतीवर इंग्लंडच्या राजाकडून गव्हर्नर नियुक्त केला जाईल. गव्हर्नरच्या मदतीसाठी एक प्रतिनिधी मंडळ नेमले जाईल. त्या प्रतिनिधींची निवड ही जनते तर्फे होत असे. आपल्या वसाहतीसाठी कायदे करण्याचा अधिकार हा प्रतिनिधी मंडळाला होता. अशाप्रकारे इंग्लंडच्या वसाहतींना अंतर्गत कारभाराची स्वातंत्र्य असले तरी त्यावर अंतिम सत्ता इंग्लंडच्या राजाची चालत होती.

**आपली प्रगती तपासा**

१) अमेरिकन राज्यक्रांतीच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट करा?

## २.३ अमेरिकन क्रांतीची मूलभूत कारणे

सन १७६३ च्या सप्तवार्षिक युध्दासाठी इंग्लंडला अफाट खर्च करावा लागला होता. या युद्धासाठी इंग्लंडवर १३७ दशलक्ष पौंडाचे कर्ज झाले होते. या व्यतिरिक्त इंग्लंडला

वसाहतीत खडी फौज ठेवण्यासाठी वार्षीक चार लक्ष पौंड खर्च येत होता. अशा परिस्थितीत इंग्लंडने वसाहतीसंबंधी नवनवीन धोरण बनविले आणि अमेरिकन क्रांतीकडे वाटचाल सुरू झाली. अमेरिकन क्रांतीच्या विविध कारणांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला अमेरिकेत क्रांती का झाली याची सविस्तर माहिती होते.

**१] दुरत्वाची भावना :**

वासाहतिक राष्ट्रांमध्ये वसाहती स्थापन करणारे इंग्लड, फ्रेंच काही ना काही कारणामुळे आपला स्वदेश सोडून आलेले होते. इग्लंडमधील स्टुअर्ट राज्यांच्या धार्मिक अत्याचारांना कंटाळून बरेच लोक इंग्लंड सोडून अमेरिकेत स्थलांतरित झाले होते. या स्थलांतरितामध्ये प्रामुख्याने ख्रिश्चन धर्मोपदेशक होते. अमेरिकेत स्थलांतरित होणाऱ्या मध्ये प्रॉटेस्टंट व प्युरिट्न पंथांचे तसेच काही प्रमाणात कॅथॉलिकही होते. इंग्लंडमध्ये त्यांच्यावर घातलेली बंधने हे त्यांना मान्य नसल्याने त्यांनी अमेरिकन वसाहतीत स्थलांतरित झाले. याव्यतिरिक्त वसाहती म्हणजे इंग्लंडमधील गुन्हेगार पाठविण्याचा प्रदेश बनला होता. अशा प्रकारे वाईट चारित्र्याचे लोक अमेरिकन वसाहतीत एकवटले होते. अशा लोकांकडून इंग्लडप्रति प्रेमाची आशा करणे व्यर्थ होते. दळणवळणाची अपुरी साधने फारशी उपलब्ध नसल्याने ही परस्पर संपर्क कमी होत होत. ह्या वरील सर्व कारणामुळे वसाहतीमध्ये इंग्लड बद्दल एक प्रकारची दुरत्वाची भावना निर्माण झाली होती. इंग्लंडचे वसाहतीवर निर्बंध जसजसे वाढत गेले, तसतसे हे संबंध अधिक विकोपास गेले.

**२] स्वातंत्र्याची भावना :**

अमेरिकन स्थापन झालेल्या वसाहती पैकी १३ वसाहती ह्या इंग्लंडच्या वर्चस्वाखाली होत्या. इंग्लंडच्या कायद्यानुसार वसाहतीवर कायदा राहत असे. वसाहतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लंडच्या राजाकडून एक गव्हर्नर नियुक्ती केला जाई. गव्हर्नरच्या मदतनीस प्रतिनिधी मंडळ नेमले जाई. प्रत्येक प्रतिनिधीमंडळातील सदस्यांची नियुक्ती ही निवडणूक पद्धतीने जनतेची तर्फे केली जाई. अशाप्रकारे जन निर्वाचित प्रतिनिधीमंडळ आणि इंग्लंडचा राजा नियुक्त गव्हर्नर यांचे संबंध फारसे चांगले जमत नव्हते. जनप्रतिनिधीमंडळ तर कधीकधी गव्हर्नर व न्यायाधीश अशा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे वेतन कमी करत असे. त्याबाबत इंग्लंडला हस्तक्षेप करता येत नव्हता. परिणामी इंग्लंड व वसाहती यांचे संबंध कालांतराने बिघडतच गेले. इंग्लंडच्या जोखडातून मुक्त होऊन आपल्या देशाच्या स्वतंत्रपणे कारभार चालवावा ही मनोभूमिका सर्वच वसाहतींमधील जनतेमध्ये तयार होत होती. वास्तविक पाहता वासाहतिक लोकही इंग्लंडच्या जनतेपेक्षा अधिक जागृत व स्वातंत्र्यप्रेमी होते. एक भिन्न संस्कृती अमेरिकन वसाहतीमध्ये उदयास येत होती. वसाहतीमध्ये मूळरहिवासी, इंग्रज, फ्रेंच, स्पॅनिश, डच अशा विविध वंश, जमाती, विविध भाषा असलेल्या लोकांची सरमिसळ होत होती. त्यातून अमेरिकन हा नवा समाज आकारास येत होता. त्या समूहामध्ये व्यापारी, उद्योगपती, शेतकरी, मजूर, असे विविध व्यावसायिक होते. त्यांनी शाळा महाविद्यालय सुरू करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. त्यातून नवी संस्कृती भरभराटीस येऊ लागली. ह्या पिढीला आपल्या युरोपातील जुन्या भूप्रदेशाबद्दल अजिबात आकर्षण वाटत नव्हते. ह्यावरील उल्लेखित सांस्कृतीक विविधतेमुळे इंग्लड वसाहतीमधील संबंध दुरावत होते.

**२.३.१ फ्रेंच धोका समाप्त** :

उत्तर अमेरिकेत क्युबेक् नावाची वसाहत ही १६०८ मध्ये स्थापन झाली होती. वासाहतीक प्रांतांमध्ये इंग्लडच्या वसाहतीच्या सीमेवर फ्रेंच वसाहतीचा प्रसार होऊ लागला. प्रामुख्याने फ्रेंच वसाहती त्या उत्तर व पश्चिम सीमा लगत वेढलेल्या गेल्या. तेथे फ्रेंचांनी व्यापार-उदीम सुरू करून लष्करी ठाणी प्रस्थापित केली. वसाहती स्थापन करण्यासाठी फ्रेंच सम्राट चौदाव्या लुईचे प्रोत्साहन मिळाल्याने इंग्लंडच्या वसाहतींना पर्यायाने धोका निर्माण झाला. परंतु लवकरच इंग्लंड व फ्रान्सचे बिघडले आणि त्यांच्या ऑस्ट्रियाच्या वारसा प्रश्नावरून त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्यांच्यामधील महत्त्वाचा संघर्ष युरोपच्या इतिहासात सप्तवार्षिक युद्ध म्हणून प्रसिद्ध आहे .या युद्धात इंग्लंडने फ्रान्सला पूर्णतः पराभूत केले. हे युद्ध १७५६ ते १७६३ साली लढले गेले होते. हे युद्ध पॅरिसच्या तहानुसार संपुष्टात आले. परिणामी वसाहतींना जाणवत असलेला फ्रान्सचा धोका समाप्त झाला. वसाहतींना आता इंग्लंडच्या संरक्षणाची गरज उरली नाही. एक प्रकारे त्या मुक्त झाल्यात. यातूनच वसाहतींनी इंग्लडला विरोध सुरू केला.

**२.३.२ वसाहतकाराची स्वतंत्र वृत्ती** :

अमेरिकेतील इंग्लंडच्या ह्या १३ वसाहती अत्यंत साहसी असून मायदेशातील इंग्रजांपेक्षा अधिक स्वातंत्र्य प्रिय होत्या. प्रत्येक वसाहतीसाठी स्वतंत्र विधिमंडळ होती. वसाहतींचा गव्हर्नर हा मायदेशाच्या सरकारकडून नियुक्त झालेला असला तरीही, त्याचा पगार देणे, राज्य कारभाराविषयी स्वतंत्र निर्णय घेणे, हे विधिमंडळाच्या अधिकारात होते, या काळात इंग्लंड मधील सत्ता ही उच्च लोकांच्या हाती असून, ती भ्रष्टाचाराने ग्रासलेली होती. याउलट वसाहतवाले पुरोगामी वृत्तीचे असून त्यांच्या विधानसभा, चैतन्ययुक्त व स्वतंत्र होत्या. त्यांचा प्रतिगामी व प्रतिक्रियावादी मायदेशापासून स्वतंत्र होण्याचा पक्का निर्धार झालेला होता. इंग्लंडने अनेक जाचक कायदे करून पुढील काळात वसाहतवरील निर्बंध जसे वाढविण्याचा प्रयत्न केला, तसतशी त्याची स्वातंत्र्यप्रति भावना पल्लवित झाल्या. त्या इंग्लंडपुढे नमल्या नाहीत. याचे पर्यवसान स्वातंत्र्ययुद्धात झाले.

**२.३.३ ब्रिटिशांचे अन्यायी कायदे** :

ब्रिटिश पार्लमेंटने वसाहतीबद्दल जाचक कायदे पास करून, वसाहतीवर निर्बंध लादले होते. इंग्लंडने अमेरिकेत आपले राजकीय वर्चस्व निर्माण करून प्रचंड आर्थिक लूट केली होती. इंग्लंडने वासाहतिक प्रदेशांमध्ये सन १६२१ रोजी तंबाखूच्या खाजगी निर्मितीवर बंदी घालणारा कायदा पास केला. त्यानुसार वसाहतीतील तंबाखूची निर्यात इतर देशात निर्यात करणे बेकायदेशीर ठरविण्यात आले. क्रॉमवेलने सन १६५१ साली नेव्हिगेशन ऍक्ट अमलात आणला होत. वसाहतीचा माल ने आन करण्यावर बंधने लादण्यात आली होती. त्यात अजून भर म्हणून इ.स. १७५२ च्या कायद्याने ब्रिटिश सावकाराने आपल्या कर्जाची वसुली वसाहतीतील ऋणको च्या मालमत्तेतून करण्याची परवानगी मिळवली.

इ.स. १७६३ मध्ये इंग्लंडने वसाहतवाल्यांना पश्चिमेकडील भूभागावर जाण्यास मनाई करणारा कायदा पास केला. सन १७६५ साली स्टॅम्प ॲक्ट पास करून वसाहतीवर लादल्या गेला. या कायद्याप्रमाणे कोणत्याही व्यवहार करारपत्रावर २० शिलिंगचा स्टॅम्प

लावण्याची सक्ती केल्या गेली. वसाहतीतून अधिकर कर वसुलीचा प्रयत्न मळीच्या कायद्याद्वारे झाले. ग्रेमंव्हिलचे धोरण क्रांतीला कारणीभूत ठरले. त्यांनी संसदेकडून पास करून घेतलेल्या कायद्यामध्ये साखर कायदा, जकात वसुली पद्धती संबंधीचा कायदा, हे महत्त्वाचे कायदे होते. वरील सर्व जाचक कायद्यामुळे वसाहतवाल्यांच्या मनात असंतोष भडकत गेला. या सर्व कायद्यामुळे वासाहतिक व्यापाऱ्यावर आणि एकूण अर्थव्यवस्थेवर मोठा आघात झाला. त्यामुळे दिवसेंदिवस असंतोष भडकत केला. ब्रिटिशांच्या धोरणाविरुद्ध विरोध संघटित होऊ लागला. स्टॅप ॲक्टने तर दैनंदिन व्यवहारावर परिणाम होऊ लागला. स्टॅम्प ॲक्टने ब्रिटिश शासनाविरुद्ध वसाहतीत निषेधाचे प्रचंड वादळ उठविले. परिणामी अशा परिस्थितीत अमेरिकन क्रांतीला कारणीभूत ठरणारी कारणे विकसीत होत गेली.

### **२.३.४ वासाहतिक नवा समाज** :

युरोप खंडातील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, हॉलांड, पोर्तुगीज व बेल्जियम इत्यादी देशांमधून एकवटलेली लोक अमेरिकेत स्थायिक झाली होती. त्या स्थानिकांमध्ये ब्रिटिशांची संख्या जास्त होती. युरोपातील या भिन्नभिन्न वंशातील लोक व स्थानिक रेड इंडियन्स यांच्यात वर्णसंकर होऊन नवा मिश्र समाज उदयास आला. या मिश्रित नव समाजात कोणत्याही वर्गाचे व धर्मसत्तेचे वर्चस्व नसून व्यक्तिस्वातंत्र्याला पूर्णवाव होता. त्यामुळे मायदेशाबद्दलची आपुलकी विसरून या भूमीला आपली कर्मभूमी, मातृभूमि मानणारा नवा समाज उदयास आला. आपल्या कर्मभूमी विषयी या समाजाच्या मनात आत्मीयता दिवसेंदिवस पल्लवित होत गेली. राष्ट्रवादाच्या प्रेरणा उदयास आल्या. यातूनच स्वातंत्र्ययुद्ध निर्माण झाले.

### **२.३.५ ना प्रतिनिधित्व ना कर** :

इ.स. १६६७ साली वासाहतिक लोकांनी कर आकारणीला विरोध केल्याने, अनेक कर मागे घेण्यात आले होते. परंतु सन १७६९ मध्ये वसाहतीवर कर लादण्याचा पार्लमेंटचा हक्क बजावण्यासाठी चहावरील पौंडामागील कर बराच कमी करण्यात आला. वासाह्तीतुन चहा पिण्याचे प्रमाण कमी झाल्याने ईस्ट इंडिया कंपनीला निर्यातीच्या भरपूर सवलती देण्यात आल्या होत्या. वासाहतिक जनतेला चहा स्वस्त किमतीत कमी करण्याची व्यवस्था करण्यात आली. परंतु इंग्लंडचा पंतप्रधान लॉर्ड नॉर्थ हा चहावरील कर कमी करण्यास तयार नव्हता. त्यामुळे संघर्षाला धार चढुन पार्लमेंटच्या कर बसविण्याच्या अधिकाराला आव्हान देण्यात आले होते. यातूनच ना प्रतिनिधी ना कर ही संकल्पना उदयास आली. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जोपर्यंत वसाहतींना प्रतिनिधित्व नाही, तोपर्यंत पार्लमेंटला वसाहतीवर कर बसविण्याचा अधिकार नाही, असे वासाहतिक जनतेचे ठाम मत बनले होते. वासाहतिक जनतेला ब्रिटिश पार्लमेंटचे सार्वभौमत्व मान्य नव्हते. शेवटी संघर्ष होऊन युद्धास तोंड फुटले.

### **२.३.६ वासाहतिक राष्ट्रवादाची निर्मिती :**

अमेरिकेतील वासाहतिक नवसमाजाने धार्मिक उन्नती, शिक्षण व सांस्कृतिक उन्नतीकडे जास्त लक्ष पुरविले होते. प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण व संशोधनासाठी असंख्य संस्था व ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली होती. प्युरिटियन,सेपरेटिस्ट व केकर या

सुधारणावादी धर्म पंथाचा प्रचार व प्रसार केला. तसेच छापखाने व वृत्तपत्रे सुरू करण्यात आली. कला, शास्त्र ,साहित्याची निर्मिती केली. जॉन हॉवर्ड, जेम्स लॉगन, बेंजामिन फ्रेंक्लिन,जॉन कॅम्बेल, पीटर जेंगर व विल्यम या व्यक्तींचा शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीत फार मोठा सहभाग होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे राष्ट्रवादाला चालना मिळाली. पर्यायाने स्वातंत्र्ययुद्धालाच चालना मिळाली.

### २.३.७ राज्यकर्त्यांचे जुलमी धोरण :

वासाहतिक जनतेनी ब्रिटिशांच्या जुलमी व अन्यायी धोरणाविरुद्ध विनंती अर्ज व सनदशीर मार्गाचा अवलंब स्वीकारला होता. परंतु या धोरणाला ब्रिटिशांनी प्रतिसाद दिला नाही. इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज आणि संसद यांनी आपल्या धोरणात तिळमात्र देखील बदल केला नाही. इंग्लंडमधील विचारवंतांनी ब्रिटीशांच्या या वरील धोरणावर टीका केली. परंतु त्याची दखल ब्रिटिश राज्यकर्त्यांनी घेतली नाही. तसेच शांततामय सनदशीर मार्गाचा उपयोग  होत नाही, हे समजल्यानंतर स्वातंत्र्ययुद्धाचा मार्ग अंगीकारला.

### २.३.८ इंग्लंडचे स्वार्थी धोरण :

युरोपमधील औद्योगिक क्रांती नंतर अनेक देशांमध्ये व्यापारासाठी वसाहती स्थापन करण्यासाठी स्पर्धा सुरू झाली होती. परिणामी अमेरिकेत अनेक वसाहती स्थापन झाल्या. सर्वात जास्त वसाहती स्थापन करण्याच्या स्पर्धेमध्ये इंग्लंड आघाडीवर होते. अमेरिकन वसाहतीकडून कच्चामाल मिळावा व वासाहतिक जनतेने पक्का माल बाजारपेठेत आणू नये,आणल्यास अमाप कर बसविण्यात आल्यामुळे इंग्लंडच्या या धोरणाविरुद्ध वासाहतिक जनतेने विद्रोह पुकारला.

### २.३.९ फिलाडेल्फिया येथील महत्वपूर्ण परिषदा :

इंग्लंडच्या अमानुष कृतीच्या निषेधार्थ व वासाहतिक जनतेच्या भवितव्यासाठी फिलाडेल्फिया येथे सन १७७४ ते सन १७७५ आणि सन १७७६ मध्ये तीन परिषद भरविण्यात आल्या. परिषदेमध्ये वसाहतीचे सर्व प्रतिनिधी उपस्थित होते. पहिल्या परिषदेत इंग्लंडच्या दडपशाहीचा निषेध करून प्रतिकाराचा निर्णय घेतला गेला. दुसऱ्या अधिवेशनात स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करून, जॉर्ज वाशिंग्टनला सेनापती म्हणून घोषित करण्यात आले. तिसऱ्या कॉंग्रेसच्या बैठकीत ब्रिटिश विरोधी लढ्याची व स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याची ऐतिहासिक घोषणा करण्यात आली. येथून पुढे स्वातंत्र्याच्या युद्धाला चालना मिळाली.

### २.३.१० तत्ववेत्यांच्या विचारांचा प्रभाव :

जॉन लॉक, हॅरिंग्टन, मिल्टन, मॉटेस्क्यु, व्हॉल्टेअर या युरोपियन विचारवंतांनी अमेरिकेत क्रांतीसाठी पृष्ठभूमी तयार केली. याव्यतिरिक्त अमेरिकन विचारवंत आणि नेत्यांनी अमेरिकेत क्रांतीची वैचारिक मशाल तयार केली. या विचारवंतांमध्ये सॅम्युअल ॲडॅम्स, जॉन ॲडॅम्स, अलेक्झांडर हॅमिल्टन, बेंजामिन फ्रेंक्लिन, थॉमस जेफरसन, जॉर्ज मेसन व थॉमस पेन इत्यादींनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. या महान विचारवंतांनी व नेत्यांनी समाज जागृत करून आंदोलनासाठी पृष्ठभूमि तयार केली. रॉजन विल्यम या धर्मोपदेशक,

कायदेपंडित मुलांनी वासाहतिक ताम्रवर्णीयांना नागरी हक्क बहाल केले. त्याने ऱ्होड आयलँड हे आदर्श वसाहत निर्माण केली. विल्यम पेन यांनी डिलावेअर वसाहतीची स्थापना करून, तेथे लोकशाही, नागरी हक्क, समता, राष्ट्रनिष्ठा जोपासली. रेड इंडियन व सर्व युरोपियनांना सहिष्णुतेची वागणूक दिली. थॉमस जेफरसन यांनी शस्त्र उठावासाठी लोकांना तयार केले. या तत्त्ववेत्त्यांच्या. विचारवंताच्या, विचारांच्या प्रभावातून, वासाहतिक जनतेच्या मनात स्वातंत्र्य युद्धाची प्रेरणा निर्माण केली. अशा प्रकारे अमेरिकन राज्यक्रांतीसाठी वरील अनेक कारणे कारणीभूत ठरल्याचे समजते व त्यातून अमेरिका स्वतंत्र बनली असे दिसते. ब्रिटिश संसदेच्या अधिकाराला आव्हान देण्याचे सामर्थ्य वासाहतिक लोकात आले. जॉन डिकोन्सनने पत्रकाद्वारे ब्रिटिश संसदेने केलेले कायदे नाकारले. ब्रिटिश मालावर बहिष्कार घातला गेला व स्वदेशीचा पुरस्कार केला गेला. यामुळे आंदोलन तीव्र झाले व क्रांतीला सुरुवात झाली.

**आपलीप्रगती तपासा**

१) अमेरिकन राज्यक्रांतिची कोनतेही दोन कारणे लिह.

२) अमेरिकन राज्यक्रांतिमधील तत्ववेत्यांच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट करा ?

## २.४ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची वाटचाल (वासाहतिक आंदोलन : विविध टप्पे )

इंग्लंडच्या अनेक जाचक धोरणामुळे वासाहतिक जनतेमधील असंतोष वाढतच गेला. विचारवंताच्या तंत्रज्ञानामुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागली. वसाहतीचे शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती झाली. लोकशाही, स्वातंत्र्य, उदारमतवाद, समता, बंधुत्व या उदार तत्त्वाचा स्वीकार वासाहतिक विचारवंतांनी आपल्या वसाहतीत केला. इंग्लंडचे आपल्यावरील वर्चस्व नको यासाठी लढा चालू केला. सन १७७६ मध्ये अमेरिका व इंग्लंड यांच्यात स्वातंत्र्य युद्ध सुरू झाले. या स्वातंत्र्य युद्धाचा शेवट सन १७८१ मध्ये झाला. या स्वातंत्र्य युद्धात अमेरिकेचा विजय झाला. या स्वातंत्र्ययुद्धामध्ये वसाहतवाल्यांची खूप मोठे योगदान आहे.

### **२.४.१ स्टॅम्प ॲक्ट निषेधार्थ परिषद** :

सप्तवार्षिक युद्धामुळे इंग्लंडचा खर्चाचा भाग वाढला होता. कराच्या रुपाने वसाहतीतून कर्ज फेडावे, अशी इंग्लंडच्या राजाने पार्लमेंटमध्ये जाहीर केले होते. म्हणून सन १७३० ते इ.स. १७६४ या काळात वसाहतीवर अनेक कर लागणारे कायदे पास केले. ब्रिटिश संसदेने सन १७६४ मध्ये स्टॅम्प ॲक्ट पास केला. दैनंदिन वस्तूची खरेदी विक्री, करारनामे, वृत्तपत्रे, गहानखत व मद्यविक्री परवाने यासाठी भरमसाठ किमतीचे स्टॅम्प वापरण्याची इंग्रजांनी शक्ती केली व या कायद्याची कडक अंमलबजावणी केली. स्टॅम्प ॲक्ट नुसार कोणतेही व्यवहार, करारपत्र पुस्तिका, वृत्तपत्र यावर वीस सिलिंगचा स्टॅम्प लावणे सक्तीचे करण्यात आले. वासाहतिक जनतेने या कायद्याला प्रखर विरोध केला. सन १७६५ मध्ये न्यूयॉर्क येथे मॅसॅच्युसेट्सच्या नेतृत्वाखाली, नऊ वसाहती एकत्र आल्या व स्टॅम्प ॲक्ट रद्द

करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. जेम्स ओटीस,पेट्रिक हेन्री, सॅम्युअल अँडॅम्स या विचारवंतांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून वसाहतीतील लोकमत या कायद्या विरुद्ध जागृत केले. परिणामी अमेरिकेत ब्रिटिशविरोधी हिंसाचारास सुरुवात झाली व शेवटी ब्रिटिश पार्लमेंटने स्टॅम्प ॲक्ट रद्द केला.

### २.४.२ फिलाडेल्फियाची पहिली परिषद:

५ सप्टेंबर १७७४ रोजी अमेरिकेतील वासाहतिक सभेचे पहिले अधिवेशन फिलाडेल्फिया या शहरात भरविण्यात आले. या अधिवेशनाला जॉर्जिया वगळून एकूण बारा वसाहतीमधील पंचावन्न प्रतिनिधी हजर होते. या अधिवेशनात असंख्य ठराव मांडण्यात आले होते. परंतु मान्यता मिळाली नाही. शेवटी या वासाहतिक सभेने अमेरिकेतील वसाहतींच्या राजकारणातील नव्या स्थानिक अधिकाऱ्यांना मान्यता दिली. या परिषदेमध्ये सनदशीर मार्गाने आपले हक्क अधिकार प्रस्थापित करण्याचे ठरविले. राजा व पार्लमेंटला विनंती करण्यात आली की, वसाहतींच्या संमतीशिवाय कोणतेही कर लादण्यात येऊ नये, वसाहतीच्या व्यापार व उद्योग धंद्यावर असलेल्या जाचक अटी दूर कराव्यात, तसेच ब्रिटिश माल विकत घ्यायचा नाही, असा निर्णय वसाहतीने घेतला.

### २.४.३ तिसऱ्या जॉर्जचे धोरण:

फिलाडेल्फियाच्या पहिल्या परिषदेने घेतलेले निर्णय, तिसऱ्या जॉर्जिया राजाला आवडले नाही. म्हणून त्यांनी वसाहतीवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. वासाहतिक जनतेने घेतलेल्या निर्णयाचा बिमोड करण्यासाठी त्याने वसाहतीत सैन्य पाठविले होते. तिसऱ्या जॉर्जने वसाहतीमध्ये ठिक-ठिकाणी ब्रिटिश फौजा पाठविण्यात आल्या होत्या. वसाहतींनी इंग्लंडला खंबीरपणे तोंड देण्याचे ठरविले.

### २.४.४ लेक्सिंग्टंनची लढाई:

बोस्टन चहा पार्टी आणि फिलाडेल्फियाची पहिली परिषद यामुळे इंग्लंड व वसाहती यांचे संबंध तुटन्याजोगे ताणल्या गेल्या होते. इंग्लंड व वसाहती यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठ प्रधानमंत्री लॉर्ड नॉर्थने इंग्लंडच्या संसदेत फेब्रुवारी १७७५ मध्ये एक तडजोड कायदा संमत करून घेतला. तडजोड कायद्याद्वारे वसाहतींना असे निर्देश देण्यात आले होते की, त्यांनी संरक्षणाचा वाटा स्वतःहून दिला तर, त्यांच्यावर वेगळे कर बसविले जाणार नाही. यानिमित्ताने इंग्लंड वसाहतीवर निर्बंध घालण्याचा प्रयत्न करत आहे, हे वासाहतिक नेत्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी लॉर्ड नॉर्थची तडजोड कायदा फेटाळून लावला. याच दरम्यान मॅसॅच्युसेटस वसाहतिमधिल कॅन्कॉर्ड येथे वसाहतवाल्यांनी मोठा शस्त्रसाठा जमा केल्याचे कळताच, ब्रिटिश सरसेनापती थॉमस गेज यांनी सेनापति समितीच्या नेतृत्वाखाली ७०० सैनिकांची तुकडी तो अवैध शस्त्रसाठा नेस्तनाबूत करण्यासाठी पाठविण्यात आली. परंतु मध्येच लेक्सिंग्टन येथे अमेरिकन क्रांतिवीरांनी ह्या फौजेला रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले होते. त्यावेळी झालेल्या संघर्षात ८ अमेरिकन क्रांतिवीर ठार झाले. सेनापती स्मिथच्य सैन्य तुकडीने कॅन्कॉर्डचा शस्त्रसाठा नष्ट केला असला तरी, परत येताना अमेरिकन नागरि सैन्याने त्यांच्यावर ठिकठिकाणी हल्ली केले. यावेळी जो संघर्ष

munotes.in

झाला,त्यामध्ये दोन्ही बाजूंची अनेक सैनिक मारले गेले. हाच अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचा प्रारंभ होय.

### २.४.५ फिलाडेल्फिया येथील दुसरी परिषद:

वासाहतिक सभेची दुसरी परिषद फिलाडेल्फिया येथे १० मे १७७५ रोजी घेण्यात आली. जॉर्ज यांनी आपले प्रतिनिधी परिषदेला पाठविल्यानंतर फिलाडेल्फिया या दुसऱ्या परिषदेत तेराही वसाहतीचे प्रतिनिधी एकत्र आल्याने तिला राष्ट्रीय सभेचे रूप आले. परिषदेतील महत्त्वाच्या निर्णयापैकी इंग्लंडशी एकजुटीने लढा देण्यासाठी सर्व वसाहतींचा सरसेनापती म्हणून जॉर्ज वाशिंग्टनची नियुक्ती करण्यात आली होती. येणारा सर्व युद्ध खर्च म्हणून सर्व वसाहतीने संयुक्तरित्या करावा, असेही निश्चित करण्यात आले. दुसऱ्या परिषदेला प्रत्युत्तर म्हणून ब्रिटिश सेनापती थॉमस गेजने एक जाहिरनामा काढला होत. त्यानुसार ब्रिटिश शासनाविरुद्ध लढणाऱ्या अमेरिकनांना राजद्रोही मानले जाईल, असे घोषित करण्यात आले.

### २.४.६ बंकर हिलची लढाई [जून १७७५]:

अमेरिकेत स्वातंत्र्य युद्धादरम्यान जे संघर्ष झालेत, त्यात बंकर हिलची लढाई महत्त्वपूर्ण मानली जाते. अमेरिकन सैनिकांनी बोस्टन जवळील एका टेकडीवर किल्ला बांधण्यास सुरुवात करताच, इंग्लंडच्या सैनिकांनी त्यावर तोफा डागल्या. त्यावेळी झालेला संघर्ष बंकर हिलची लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. बंकर हिलच्या लढाईत ब्रिटिशांना विजय मिळाला. पण त्यात हजारावर सैनिक व अधिकारी कामास आले. परिणामी थॉमस गेज ऐवजी हॉव यांची नियुक्ती करण्यात आली.

### २.४.७ स्वातंत्र्याचा जाहीरनामा:

वासाहतिक सभेने ४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रस्तुत केला. हा जाहीरनामा थॉमस जेफरसन यांनी तयार केला होता.

१] सर्वांना जीविताचा व सुखी राहण्याचा अधिकार आहे,

२] शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांचे मूळ स्त्रोत जनता आहे.

३] वरील अधिकार सरकार मान्य करत नसेल तर असे अधिकार बदलविण्याचा पूर्ण अधिकार जनतेला आहे,

४] निरंकुश शासनाला बदलविण्यासाठी लष्करी बलप्रयोगाची आवश्यकता वाटल्यास, त्याचा जरूर उपयोग करावा.

अशा प्रकारे वरील स्वातंत्र्याच्या या जाहीरनाम्यात लोकशाही आणि क्रांतीची तत्त्वे प्रतिबिंबित झालेली होती.

### २.४.८ वसाहतींची विजयाकडे वाटचाल:

सॅराटोगाच्या लढाई अमेरिकनांनी ब्रिटिशावर मिळविलेल्या जोरदार विजयामुळे, फ्रान्सने वसाहतीच्या स्वातंत्र्याला औपचारिक मान्यता दिली. परिणामी इंग्लडचा पंतप्रधान लॉर्ड नॉर्थने एक प्रतिनिधीमंडळ अमेरिकेला पाठवून १७६३ पासून ब्रिटिश संसदेने वसाहतीसंबंधी लादलेले सर्व कायदे रद्द करण्याचे आश्वासन दिले. परंतु वासाहतिक सभेने

ह्यापलीकडे इंग्लड बरोबर फक्त वसाहतीच्या स्वात्र्याबाबतच वाटाघाटी केल्या जातील, या धोरणाचा पुनरुच्चार केला. सन १७७९ मध्ये स्पेनने आणि १७८० मध्ये नेदरलँडने [हॉलांड] वसाहतीच्या बाजूने युद्धात उडी घेतल्याने, इंग्लडची कोंडी सुरू झाली. ऑगस्ट १७८१ मध्ये २०,००० अमेरिकन व फ्रेंच संयुक्त सैन्याने कॉर्नवालीसला वेढण्यास प्रारंभ केला. युद्धात तोफांचा मारा सुरू करण्यात आला.

शेवटी १९ ऑक्टोबर  १७८१ रोजी लॉर्ड कॉर्नवालीसने शरणागती पत्कारली. ब्रिटीश सैन्याची मोठी नामुष्की झाली. त्यामुळे इंग्लंडमध्ये नॉर्थचे मंत्रिमंडळ कोसळले. त्यानंतरही जमिनीवर व सागरात अधून-मधून चकमकी होत राहिल्या.

### २.४.९ पॅरिसचा तह:

सप्टेंबर  १७८३ मधे युद्ध थांबविण्यासाठी पॅरिस येथे वाटाघाटी सुरू झाल्या. वसाहतींची प्रतिनिधित्व बेंजामिन फ्रेंक्लिन,जॉन ॲडम्स इत्यादींनी केले. परस्पर चर्चा होऊन, वसाहती आणि इंग्लंड यांच्यात पॅरिसचा तह झाला. त्याला वासाहतिक सभेने आपली संपत्ती प्रदान केली. हा पॅरिसचा तह पुढील प्रमाणे होता-

१] इंग्लंडने अमेरिकेतील १३ ही वसाहतीचे स्वातंत्र्य मान्य केले,

२] अमेरिकेला पश्चिमेकडील मिसिसिपी नदी पर्यंतचा सर्व भाग देण्यात आला. अशाप्रकारे १३ वसाहतींची मिळून आधुनिक अमेरिका हे राष्ट्र उदयास आले.

३] इंग्लंड जवळ कॅनडा प्रदेश राहिला. वसाहतींना मदत केल्यामुळे स्पेनला फ्लॉरिडा इत्यादी प्रदेश मिळाला. फ्रान्सला इंग्रजांकडून भारतातील चंद्रनगर, बंगाल प्राप्त झाले.

४] ब्रिटिश सावकारांच्या अमेरीकेतील खाजगी कर वसुलीला विरोध न करण्याचे अमेरिकेने मान्य केली.

५] इंग्लंड व हॉलंड्ने परस्परांची जिंकलेले प्रदेश परत करण्याचे मान्य केले.

अशाप्रकारे पॅरिसच्या तहाने अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धची खऱ्या अर्थाने समाप्ती झाली. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या अमेरिकनांना पूर्ण यश मिळाले.

**आपली प्रगती तपासा**

१) स्टॅम्प  ॲक्ट बद्दल सविस्थर माहिती लिहा ?

२) पॅरिसच्या तहामधील वाटघाटी बद्दल माहीती लिहा?

## २.५ अमेरिकेच्या यशाची कारणे/वसाहतीच्या यशाची कारणे

ही एक आश्चर्यकारक घटना मानली पाहिजे की, अत्यंत शक्तिशाली अशा इंग्लंडला कमजोर अशा वसाहती समोर नमावे लागले. वसाहतीच्या तुलनेत इंग्लंड सेना संख्या धन आणि साधनसामग्री अशा सर्व दृष्टीने सरस होती. इंग्लंडची सागरी शक्ती अपार होती. त्यात वसाहतीचे प्रभुत्व अगदी नगण्य होते. याशिवाय वसाहतीमध्ये इंग्लंडचे समर्थन करणाऱ्यांची

संख्या बरीच होती. तरीही या युद्धात इंग्लंडला पराभव स्वीकारावा लागला होता. पराभवाची विविध कारणे पुढीलप्रमाणे आहेत .

### २.५.१ वासाहतिक स्वातंत्र्य योद्धे:

इंग्लड कितीही बलाढ्य असला तरीही, त्यांचा सामना आपल्या स्वातंत्र्यासाठी शीर तळहातावर घेऊन लढणाऱ्याशी होता. सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या संघर्षात वासाहतिक जनता आपले प्राणार्पण करावयास तयार होती. वासाहतिक नागरी सैन्यासमोर अनेक अडचणी होत्या. त्यांना धड कपडे नव्हती. वेतन नव्हते. त्यांची उपासमार होत होती. तरीही या अडचणींना सामोरे जाऊन स्वेच्छेने आणि तन-मन-धनाने वासाहतिक सैनिक स्वातंत्र्य संग्रामात उतरला होता. इंग्लड सेने सैन्यबळाच्या आधारावर ठीक ठिकाणी वासाहतिक सैन्याला पराभूत करीत. पण इंग्रज सैनिक तिथून पुढे गेले की, तो प्रदेश पुन्हा अमेरिकन सैनिक जिंकून घेत असत. शिवाय इंग्लंडमधील बरीच सैनिक हे भाडोत्री होती. ते केवळ पैशासाठी लढत होती. परिणामी अमेरिकन स्वातंत्र्य योध्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाही.

### २.५.२ जॉर्ज वॉशिंग्टनचे नेतृत्व :

अपुरी साधनसामुग्री असतानी देखील जॉर्ज वॉशिंग्टन यांनी ज्या कुशलतेने युद्धाशी तोंड दिले, त्याला इतिहासात तोड नाही. युद्धकाळात अनेक यश-अपयश आले, पण वॉशिंग्टनने आपल्या सैनिकांचे मनोधैर्य कधीच खचू दिले नाही. वॉशिंग्टनने सर्व वसाहतीतून आलेल्या सैनिकाला प्रशिक्षण दिले. शिस्त लावली. उत्साह निर्माण केला व स्वातंत्र्याची प्रेरणा जागृत केली. त्यांच्या असामान्य धैर्य व साहस चिकाटीमुळे अमेरिकेला ह्या युद्धात विजय प्राप्त झाला होता.

### २.५.३ अंतराचा मुद्दा :

वासाहतिक सैनिक आपल्याच भूमीवर परदेशी इंग्लड आक्रांतासोबत  लढत होते. की,जे युद्धाचे संचालन युरोपच्या अंतरावरुन मायदेशातून करीत होते. इंग्लंडमधून निर्णय घेणे जितके अवघड होते, तितकेच अवघड वेळच्यावेळी सेनेने पाठविण्याचे नियोजन करणे दुरापास्त होते. त्याचा युद्ध कार्यावर निश्चितच विपरीत परिणाम होत होता.

### २.५.४ इंग्लंड विरोधी वासाहतीकांची आघाडी :

अमेरिकेचा शोध लागल्यावर तेथे प्रथम वसाहत स्थापन करण्यात यश मिळाले. त्यातच अमेरिकेतून स्पेन अफाट संपत्ती खेचत असल्यामुळे, इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, इत्यादी देश अमेरिकेकडे आकर्षित झाले. योगायोगाने इंग्लंडने आपल्या आरमारी सामर्थ्याच्या जोरावर इतर प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत अमेरिकेत १३ वसाहती स्थापन केल्या. म्हणून इतर राष्ट्रांना इंग्लडबद्दल ईर्षा वाटू लागली. स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात ह्याच राष्ट्रांनी इंग्लंड विरुद्ध वसाहतींना सहाय्य केले होते. येथेच इंग्लंडचा पराभव समजण्यात आला. फ्रान्सने वसाहतींना लष्करी, आर्थिक तसेच खाद्यान्नाची बरीच मदत केल्याने वॉशिंग्टनच्या सैन्याला आघाडीवर लढणे शक्य झाले होते. युद्धकाळात बाल्टिक समुद्रात रशियाने इंग्लंडच्या आरमारी हालचालीत अनेक अडथळे निर्माण केले. फ्रान्सने आपले आरमारच



munotes.in

युद्धक्षेत्रात पाठविल्याने वसाहतींना मोलाची मदत झाली. या फ्रेंच कारभारामुळेच ब्रिटिश सेनापती लॉर्ड कॉर्नवालीसला यॉर्कटाऊन येथे शरणागती पत्करावी लागली होती.

**आपली प्रगती तपासा**

१) अमेरिकन राज्यक्रांतीमधील जॉर्ज वॉशिंग्टनचे योगदान स्पष्ट करा ?

२) वासाहतिक स्वातंत्र्य योध्दाबद्दल माहीती लिहा ?

## २.६ अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम / महत्व

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने घडवून आणलेली क्रांती ही जगातील एक महत्त्वपूर्ण घटना मानण्यात येते. या युद्धामुळे अमेरिकेत एक महान क्रांती घडून आली. अमेरिकेत स्थायिक झालेले इंग्रज लोक स्वकियांच्या म्हणजे इंग्लंडमधल्या इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त झाले. १३ वसाहतीचे एक संघराज्य अस्तित्वात आले.

अमेरिकन स्वातंत्र्य युध्द हे स्वकियांनी लादलेल्या पारतंत्र्याविरुध्दचा क्रांतिकारी संघर्ष होता. प्रशासनातील जनतेच्या सहभागासाठीचा लढा होता. लोकप्रतिनिधीत्वच्या हक्कासाठी संघर्ष होता. जुलमी कर आकारणी विरुद्ध आणि निरंकुश सत्तेविरुद्धचे ते युद्ध होते. या युद्धाने "प्रतीनिधित्वाशिवाय कर लादणी नाही"हा उद् घोष करीत लोकशाही विचाराचा पुरस्कार केला. स्वातंत्र्याचा जाहीरनामाच प्रसिद्ध केला. थॉमस जेफरसन यांनी आपल्या लेखणीने स्वातंत्र्याचा जाहीरनामा लिहिला.

### २.६.१ प्रजासत्ताकाचा उदय :

विश्व इतिहासात अमेरिकन क्रांती अनोखी मानली पाहिजे, कारण एकाच रक्ताचे असूनही वसाहतींनी अन्याय न सहन झाल्याने इंग्लंड विरुद्ध युध्द पुकारले होते. त्यात अमेरिकेतील १३ ही वसाहती सहभागी झाल्यात. ही ऐक्याची भावना इतकी प्रबळ सिद्ध झाली की, युद्धाच्या यशस्विनंतर वसाहतीने आपल्या स्वायत्तेचा बळी देऊन एक शक्तिशाली राष्ट्र उभारण्याचा संकल्प केला. त्याची परिणीती म्हणजे संयुक्त राज्य अमेरिका नावाचे नवे राष्ट्र उदयास आले.

राजेशाही बाजूला सारून अमेरिकेने प्रजासत्ताक स्वीकारणारे हे राष्ट्र विश्वात पहिलीच राष्ट्र म्हणून गणल्या गेले. संपूर्ण जगासमोर तो एक आदर्श ठरला. इंग्लंडमध्ये त्या वेळी लोकशाही होती,पण तिथे मर्यादित राजेशाही होती. म्हणूनच शुद्ध प्रजासत्ताक स्वीकारणारे अमेरिका राष्ट्र इतरांसाठी स्फुर्तीस्थान ठरले.

### २.६.२ संघराज्याचा उदय :

अमेरिकन राज्यक्रांतीने जगाला दिलेली दुसरी देणगी म्हणजे संघराज्यात्मक पद्धती होय. १३ वसाहतीनी आतापर्यंत उपभोगलेले स्वातंत्र्य आणि अधिकार कायम ठेवून, त्यांना एकत्र गुंतवण्यासाठी बलाढ्य अशा केंद्र सरकारची आवश्यकता भासत होती. परंतु तत्कालीन नेत्यांनी आपल्या बुद्धिचातुर्याने हे जिकीरीचे काम यशस्वीपणे करून दाखविले.

munotes.in

अशाप्रकारे १३ वसाहतींचे मिळून एक संघराज्य अस्तित्वात आले. जगातील हे मोठे व पहिले संघराज्य म्हणून गनल्यागेले.

### २.६.३ इतर राष्ट्रांना स्वातंत्र्याची प्रेरणा :

अमेरिकन क्रांतीचे पडसाद जगभर उमटल्याचे हे आपल्या निदर्शनात आले असेल. निरनिराळ्या देशातील वसाहतवादाखालील दबलेल्या जनतेने अमेरिकन राज्यक्रांतीपासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्यासाठी क्रांतीचा मार्ग अनुसरला. वसाहतवादाविरुद्धची पहिली चळवळ म्हणून या क्रांतीकडे बघितले जाते. राजाविना राज्य ही संकल्पना आधुनिक काळात अमेरिकन राज्यक्रांतीने रुजवली हे समजण्यात आले. अमेरिकन क्रांतीचा फार मोठा प्रभाव फ्रान्सवर पडला. पॅरिसच्या तहाने फ्रान्सला आपले गेलेले सर्व प्रदेश परत मिळाले. त्यापेक्षाही अतिशय महत्त्वाचा परिणाम फ्रान्सवर पडला. वसाहतींना मदत करण्याच्या निमित्ताने इंग्लंडविरुद्ध युद्धात उडी घेतली. एवढेच नव्हे तर लाखो नेत्याच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सैन्याने वसाहतींना अतिशय मोलाची मदत केली. फ्रेंच नौदलाच्या दबावामुळेच यार्कटऊनला ब्रिटिश सेनापती लॉर्ड कॉर्नवालीसला शरणागती पत्करणे भाग पडले. हे विजयी सेना आपल्या देशात जेंव्हा परतले , तेव्हा तेथील परिस्थिती बिकट होती. जुल्मी राजेशाहीने फ्रेंच जनतेचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. स्वभाविकच विजेत्या फ्रांस सेनेच्या मनात हा विचार प्रकर्षाने आला की आपण दुसऱ्यांना त्यांचे स्वातंत्र्य मिळवून देऊ शकतो, तर आपल्या देशातील लोकांना त्याचे स्वातंत्र्य मिळवून का देऊ शकणार नाही ? ह्या विचारांचा परिणाम म्हणजे फ्रेंच क्रांती होय. याशिवाय आणखी कारण फ्रान्स क्रांतीला सहाय्यभूत ठरली. उत्तर अमेरिकेत लढत असताना फ्रान्सचे बरेच धन खर्च झाले. त्यामुळे आर्थिक संकट भेडसावू लागले. याची परिणीती फ्रान्स क्रांतीत झाले. आयर्लंडची जनताही आपल्या स्वातंत्र्यासाठी इंग्लड वर संघर्ष करीत होती. आमच्यावर कर लादण्याचा अधिकार इंग्लंडला नाही, ही वसाहतीची घोषणा आयर्लंडला प्रेरणादायी वाटली. अमेरीकेतील वसाहतींना न्याय मिळाल्याचे पाहून त्यांनी साम्राज्य विरुद्धचा आपला संघर्ष अधिकच तीव्र केला आणि अखेर इंग्लंडला नमविले.

### २.६.४ स्वातंत्र्याचा जाहीरनामा :

स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातून समानतेच्या मूल्यांचा पुरस्कार करण्यात येऊन मानवाच्या मूलभूत हक्काचा उद्घोष झाला. मानवाचे मूलभूत हक्क नाकारणाऱ्या राज्यकर्त्या विरुध्द लढण्याचा हक्क खरे तर आधुनिक जगातील माणसाला अमेरिकन राज्यक्रांतीने दिला. लोकशाही शासन प्रणालीचा आणि राज्य संविधान बनविण्याचा वस्तुपाठ या अमेरिकन क्रांतीने जगाला दिला. समताधिष्ठित समाज निर्मितीस या क्रांतीमुळे प्रेरणा मिळाली आणि सरंजामी समाजव्यवस्था खिळखिळी होऊ लागली. व्यक्ती स्वातंत्र्याविषयी जाण निर्माण झाली आणि त्यातूनच गुलामगिरीविरुद्ध भावना बळावली. उत्तर अमेरिकेतील गुलामगिरी नष्ट झाली. प्रत्यक्षात स्वातंत्र्याचा जाहीरनामा लिहिण्याचे काम थॉमस जेफरसन यांनी केले. त्यावर चर्चा, तर्क, वितर्क व दुरुस्ती होऊन ४ जुलै १७७६ रोजी वासाहतिक सभेने स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याला मान्यता दिली. अमेरिकन स्वातंत्र्याच्या ह्या जाहीरनाम्यावर ब्रिटिश राजकीय विचारवंत लॉंक ह्याचा प्रभाव पडलेला होता. "जन्मता सर्व समान असल्याने, सर्वांना जगण्याचा, स्वातंत्र्याचा, सुख मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचा हक्क

आहे, कोणालाही हे हक्क हिरावून घेता येणार नाहीत. अशा प्रकारचे प्रतिपादन या जाहीरनाम्यात केलेले होते. एक प्रकारे जनतेचे हे निसर्गदत्त हक्क कोणी नाकारत असेल तर त्याविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा त्यातून मिळते. जगातील अनेक देशांना या जाहीरनाम्यात क्रांती मधील स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तत्त्वे अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनाम्याच्या प्रत्यक्ष परिणाम मानल्या जातो.

### २.६.५ इंग्लडवर पडलेला प्रभाव :

वसाहतीकडून इंग्लडला पराभव पत्करावा लागल्याने जबरदस्त धक्का बसला. वसाहतीवर एकामागून एक निर्बंध लादले गेल्यामुळे आपला पराभव झाला, याची इंग्लंडला चांगल्या प्रकारे जाणीव होती. इतर वसाहतीमध्ये असेच जर धोरण कायम ठेवले तर ते प्रदेशही आपल्या हातातून जातील, अशी भीती इंग्लंडला वाटू लागली. यामुळे इंग्लंडने आपल्या वासाहतीक धोरणात बदल केला. शोषण धोरणाचा त्याग करून काही अंशी आपल्या नियंत्रणाखाली भारत, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी वसाहतीत उदार धोरणाचा अवलंब केला. इंग्लंडच्या अंतर्गत राजकारणावरही या घटनेचा प्रभाव पडला होता. इंग्लंडचा राजा जॉर्ज तिसरा ह्याच्या धोरणामुळे अमेरिकेने बंड पुकारले होते. जॉर्ज तृतीयेच्या चुकीच्या निर्णयांमुळे व अकारण हस्तक्षेपामुळे युद्धकार्याचे नीट संचालन झाले नाही, इंग्लडला पराभवाचा सामना करावा. इंग्लंडला आर्थिक नुकसान सहन करावे लागले. वसाहती म्हणजे इंग्लंडचा माल खपण्यासाठी उत्तम बाजारपेठ होत्या. त्या हातातून गेल्याने इंग्लंडला आर्थिक फटका बसला. पराभवामुळे इंग्लडच्या प्रतिष्ठेला जोरदार धक्का बसला. महत्त्वाचे अनेक सागरी ठाणी इंग्रजांच्या हातून गेली. इंग्लंडमधील गुन्हेगार अमेरिकन वसाहतीत पाठविले जायचे ते आता बंद झाले. म्हणूनच ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड या वसाहती विकसित करण्यास इंग्लंडने पुढाकार घेतला.

### २.६.६ लिखित राज्यघटना :

अमेरिकन राज्यक्रांती काळात वासाहतिक नेत्यांनी 'कायद्याचे अधिराज्य' ही संकल्पना सुरुवातीपासूनच स्वीकारली होती. त्याकरिता आणि अमेरिकेचे संघराज्य असल्याने लिखित राज्यघटना आवश्यकच होती. त्यादृष्टीने क्रांतीच्या ज्वाला संपल्यावर नवी घटना तयार करण्याच्या हालचाली जलद गतीने सुरू झाल्या. सन १७८८ मध्ये फिलाडेल्फिया येथे एक परिषद घेऊन घटना तयार करण्याची जबाबदारी जॉर्ज वॉशिंग्टन, जॉन अडम्स, बेंजामिन फ्रेंक्लिन व म्पिदसनमैडिसन यांच्यावर सोपविण्यात आली. त्याप्रमाणे संयुक्त राज्य अमेरिकेची नवी राज्यघटना सन १७८९ मध्ये तयार झाली. या घटनेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती जगातील पहिले लिखित घटना होय, तिचा जगातील इतर घटना तयार करताना बराच प्रभाव पडला. घटनेनुसार अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष हे सर्वोच्च पद निर्माण करण्यात आले, तेथील कायदे मंडळ द्विग्रुही ठेवण्यात आले. कनिष्ठ सभागृह म्हणजे 'प्रतिनिधी सभागृह' आणि वरिष्ठ सभागृह म्हणजे सिनेट अशीत्यांची नावे आहेत. याशिवाय एक सर्वोच्च न्यायालय स्थापन करण्यात आले.

### २.६.७ उद्योग व व्यापार विकास :

अमेरिकन राज्यक्रांती युद्धाला प्रारंभ होताच वसाहतींनी इंग्लंडच्या मालावर बहिष्कार घातला. मात्र त्याचबरोबर घरगुती उद्योग सुरू करण्यात आले. परिणामी पोलाद निर्मिती,

कागद तयार करणे, त्यासाठी लागणारा दारुगोळा बनविणे व शस्त्रे तयार करणे या उद्योगांना चालना मिळून त्यांचा विकास होऊ लागला. युध्द काळात इंग्रज व अमेरिकेतील संबंध ताणले गेल्याने अमेरिकन मालाला असलेल्या इंग्लंडच्या ताब्यातील बाजारपेठ बंद करण्यात आल्या, त्यामुळे अमेरिकन मालाच्या निर्यातीत बरीच घट आली. परंतु युध्द समाप्तीनंतर परस्पर संबंध नीट होऊन अमेरिका बराच माल इंग्लडला जाऊ लागल्याने अमेरिकेतील उद्योगांना जोरदार चालना मिळाली. अमेरिका स्वतंत्र झाल्यावर तेथील सर्व बंदरे जागतिक व्यापारासाठी खुली करण्यात आली व त्याचा फायदा स्पेन ,फ्रान्स ,हॉलंड या देशाच्या व्यापाऱ्यांनी घेतला. परिणामी अमेरिकेचा जोरदार विदेशी व्यापार सुरू झाला. त्यामुळे अमेरिकेतील मोठमोठी घराणी त्याकडे आकर्षित होऊन त्यांनी जगभर व्यापारी संचार सुरू केला, तर चीन, अमेरिका, वेस्ट इंडीज बेटे युरोप, चीनपर्यंत अमेरिकेचा जोरदार व्यापार होऊ लागला.

### २.६.८ नवी आयुधांचा स्विकार :

प्रजासत्ताक,संघराज्यात्मक पद्धती,स्वातंत्र्याचा जाहीरनामा, लिखित राज्यघटना या व्यतिरिक्त अमेरिकन राज्यक्रांतीने संपूर्ण जगाला काही नवी आयुधेही दिलीत. शासनाबरोबर असहकार, परकीय मालावर बहिष्कार, आणि देशाभिमान म्हणून स्वदेशीचा वापर या नव्या मार्गाचा , तंत्राचा अमेरिकन क्रांती उपयोग करून घेण्यात आला. पुढील काळात अनेक राष्ट्रांनी आपल्या स्वातंत्र्य लढ्यात या शस्त्रांचा वापर केला.

**आपली प्रगती तपासा**

१) अमेरिकन राज्यक्रांतीचा इंग्लडवर पडलेल्या प्रभावाबद्दल थोड्क्यात माहीती लिहा ?

२) स्वातंत्र्याचा जाहीरनामा बद्दल थोड्क्यात माहीती लिहा ?

## २.७ सारांश

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने फ्रेंच राज्यक्रांती अपरिहार्य होऊन तेथील पुराणी राजसत्ता व सरंजामी समाजरचना संपुष्टात आली. एकोणिसाव्या शतकात यूरोपातील अनेक देशांत राजसत्तेचे उच्चाटन झाले ते काही अंशी अमेरिकेतील लोकशाहीच्या यशामुळेच, असे म्हणता येईल. अमेरिकेच्या यशामुळे इंग्लंडला आपल्या वसाहतविषयक धोरणात आमूलाग्र बदल करावा लागून, ब्रिटिश राष्ट्रकुलाचा पाया घातला गेला व जागतिक राजकारणात नवे विचारप्रवाह सुरू झाले. फ्रान्स-स्पेनसारखी राष्ट्रे अमेरिकेच्या बाजूने युद्धात सामील झाली व स्वातंत्र्ययुद्धाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा लाभून अमेरिकेच्या स्वातंत्र्याला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. १७८३ मध्ये पॅरिसच्या तहाने स्वातंत्र्ययुद्धाची समाप्ती झाली. तहाच्या वाटाघाटीत बेंजामिन फ्रँक्लिन व जॉन ॲडम्स यांनी अमेरिकन राष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. तेव्हा अमेरिकेची संस्थाने स्वतंत्र व स्वायत्त आहेत, असा रिचर्ड हेन्री लीचा ठराव काँग्रेसने संमत केला व ४ जुलै १७७६ रोजी अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा सर्वत्र फडकला.
इंग्लंडपासून स्वातंत्र्य मिळाल्याचा उत्साह व आनंद सर्वसामान्य अमेरिकन जनता अनुभवत होती. तशी सर्वसामान्य जनता स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य दोन्ही अवस्थेत एकसारखेच जीवन जगत असते. कधी कधी असे वाटते की स्वातंत्र्य म्हणजे केवळ

munotes.in

राज्यकर्ते बदलणे होय. देशाच्या सत्तेची सुत्रे आपल्या हाती असावती असे वाटणारे त्या देशातील महत्वकांक्षी लोक, काही बुद्धजीवी, भांडवलदार इत्यादी लोक हे ख-या अर्थाने स्वातंत्र्य चळवळीला जन्म घालत असतात. सर्वसामान्यांच्या नशिबात कोणाच्याही राज्यात भरडणेच असते. त्यांना आपण गुलामीत आहोत याची जाणीव देखील नसते. तंत्र होण्यापूर्वी असलेली त्याच्या जीवनाची व्यवस्था किंवा चौकट मोडलेली असते. यातनामय असली तरी त्या चौकटीला त्याचे शरीर व मन सरावलेले असते. हाताला बेडयांची सवय झालेली असते, मुक्त झालेले हात त्याला रिकामे-रिकामे वाटतात आणि डोळयासमोर एक मोठा शुन्य असतो. पुन्हा शुन्यापासून सुरवात करायची असते; परंतु आता त्याला स्वतःच्या जीवनाचे व्यवस्थापन स्वतः करायचे असते. त्यामुळे स्वातंत्र्स प्राप्तीनंतर नवीन व्यवस्था निर्माण होण्याचा काळ अत्यंत अस्वस्थतेचा व अनागोंदीचा असतो. प्रत्येक गुलाम देशाच्या वाटयाला स्वातंत्र्यानंतर हा काळ आलेला आहे. याला इतिहास साक्षी आहे. स्वातंत्र्यामुळे तुमचे जीवन बदलेल अशी स्वप्नं दाखवल्याने ते काही काळ हुरळतात, स्वातंत्र्य मिळाल्याचा जल्लोश साजरा करतात. काही काळाने स्वातंत्र्यासाठी दाखवण्यात आलेल्या स्वप्नांचा त्यांना विसर पडतो आणि कोणी तरी पुन्हा नव्या स्वातंत्र्याची स्वप्नं विकायला येईपर्यंत ते झोपी जातात.

## २.८ प्रश्न

१) अमेरिकन राज्यक्रांतीवर एक निबंध लिहा.

२) अमेरिकन राज्यक्रांतिची प्रमुख कारणे लिहा.

३) अमेरिकन राज्यक्रांतीमधील जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाबद्दल सविस्थर माहीती लिहा.

४) अमेरिकन राज्यक्रांतिचे परिणाम लिहा.

५) अमेरिकन राज्यक्रांतीमुळे इतर राष्ट्रांना स्वातंत्र्याची प्रेरणा कशी मिळली ?

## २.९ संदर्भ


- आवटे, लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.
- गाडगीळ, पां. वा. रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१.
- डॉ. आठल्ये, वि.भा., आधुनिक जगाचा इतिहास, नागपुर, २०१०.
- प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग,नागपुर, जून २००५.
- डॉ.वैद्य सुमन, आधुनिक जग,नागपुर, २००२.
- डॉ. काळे, म. वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २००१.
- प्रा. जोशी,पी.जी.,अर्वाचीन यूरोप,नांदेड, २००८.
- डॉ.जैन,हुकमचंद,डॉ.माथुर, कृष्णचंद्र, आधुनिक जगाचा इतिहास,पुणे, २०१९.
- डॉ. कठारे,अनिल,आधुनिक जगाचा इतिहास,जळगांव, २०१५
- Carr. E. H. The Bolshevik Revolution, 3 Vols., London, 1961-64.


*****

# ३

# फ्रेंच राज्यक्रांती (१७८९)

**घटक रचना**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

३.३ फ्रेंच राज्यक्रांतीचा घटनाक्रम

३.४ घटनेची निर्मिती

३.५ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

३.६ सारांश

३.७ प्रश्न

३.८ संदर्भ

## ३.० उद्दिष्ट्ये

फ्रेंच राज्यक्रांती या घटकच्या अभ्यासामधे आपण-

१] फ्रेंच राज्यक्रांतिची राजकिय, सामाजिक, आर्थिक कारणे नोंदविता येतिल.

२] क्रांतिसाठी सामान्य जनतेचे प्रबोधन करणऱ्या तत्वज्ञाचे कार्य स्पष्ट करता येईल.

३] क्रांतिनंतर अस्तित्वात आलेल्या राष्ट्रिय सभेची कार्य नोंदविता येतील.

४] नव्या विधिमंडळचे कार्य व दहशतवादी राजवटीचे स्वरुप स्पष्ट करता येईल.

५] क्रांतिच्या नेत्यांचे योगदान व कार्य नोंदविता येतील.

## ३.१ प्रस्तावना

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झालेली फ्रान्समधील राज्यक्रांती ही जगाला आधुनिकतेकडे नेणारी एक महत्त्वपूर्ण घटना मानल्या जाते. फ्रेंच जनतेने अन्यायाविरुद्ध एक होऊन प्रचलित राजवटीला शह दिला. फ्रान्समधील राजेशाही, सरंजामदार वर्ग, धर्मगुरू वर्ग यांच्या अस्तित्वालाच या फ्रेंच राज्यक्रांतीने तडा दिला होता. त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या आधारावर समाजरचना स्थापन करण्याचा प्रयत्न केला गेला. सन १७८९ पासून हा लढा चालू झाला. तो सन १८१५ पर्यंत चालुच होता. तो एक दोन वर्षात शमणारा लढा नव्हताच. तो लोकलढा होता. फ्रेंच क्रांती हे विश्व इतिहासातील महान परिवर्तनवादी घटना म्हणून समजले जाते. फ्रेंच क्रांतीने फ्रान्सचा कायापालट तर घडवून आणलाच, पण त्याचबरोबर युरोपातल्या अंध:कारमय युगाचा अंत करून, त्यास आधुनिकतेकडे नेणारी

घटना फ्रेंचक्रांती होती. निरुपयोगी राजसत्ता, कालबाह्य झालेली कायदे, सामाजिक संस्था आणि त्यात न सामावणारे सामाजिक जीवन, निरर्थक धर्माचरण व विचारवंतांचे जीवंत तत्त्वज्ञान ह्यात पडलेल्या दरीमुळे फ्रेंच क्रांती घडून आली. मदोन्नत राज्यकर्ते, अत्याचारी उमराव, भ्रष्ट धर्मगुरू आणि सामाजिक विषमता, आर्थिक विपन्नावस्था व विचारवंताची प्रेरणा ह्याच बाबी फ्रेंच जनतेला क्रांतीसाठी उद्युक्त करणाऱ्या ठरल्या. फ्रान्स व युरोपातील मध्ययुगीन व्यवस्था उद्ध्वस्त करून अर्वाचिन युगाचा आरंभ करण्याचे सामर्थ्य फ्रेंच क्रांतीत होते. फ्रेंच क्रांतीने जगाला मानवी हक्काचा जाहीरनामा बहाल केला आणि स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा मूलमंत्र दिला. क्रांतीसमयी युरोपची स्थिती फ्रान्सप्रमाणेच असतांना, तेथील अत्याचारी उमरा व विचारवंताच्या प्रेरणेमुळे क्रांती घडून आली. फ्रान्समधील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती बरीच क्रांतीला कारणीभूत ठरली. या घटकाच्या अभ्यासामध्ये आपण फ्रेंच राज्यक्रांती बद्दल सविस्तर माहिती अभ्यासणार आहोत.

## ३.२ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

### ३.२.१ राजकीय परिस्थिती :

फ्रान्सचे प्राचीन नाव गॉल हे होते. तो युरोप खंडातील प्रमुख देश होता. 2,1200 चौ. मैल असलेल्या फ्रान्स या देशाची लोकसंख्या अडीच कोटी होती. फ्रान्सच्या पश्चिमेस अटलांटिक समुद्र, दक्षिणेस स्पेन व भूमध्य समुद्र, पूर्वेस जर्मनी व इटाली आणि उत्तरेकडे इंग्लंड व इंग्लिश खाडी पसरलेले होती. सेन, लुआर, र्होन व वाल्मी ह्या प्रमुख नद्या होत्या. सुपीक जमीन, भरपुर जंगले, मुबलक लोखंडाचे साठे व मोठमोठ्या बंदरामुळे मध्ययुगात फ्रान्सची आर्थिक भरभराट झालेली होती. लॅटिन, फ्रेंच भाषा वापरत असून, कॅथलिक व प्रोटॅस्टंट पंथाचा प्रभाव होता. क्रांतीसमयी फ्रान्सवर ब्यूरबॉन घराणे राज्य करीत होते.

munotes.in

### ३.२.१.१ सामर्थ्यशाली ब्यूरबॉन घराणे :

प्राचीन काळात गॉलवर रोमन साम्राज्याचे ५०० वर्षे ( इ.स.पू. ५१-४५०)प्रभुत्व होते. त्यानंतर आशियातील रानटी रानटी टोळ्या व इ.स. ४८१-७५१ पर्यंत मेरोव्हिंजीअन व इसवी सन ७६८-८१४ पर्यंत कॅरोलिंजीअन घराण्याच्या राजवटी फ्रान्समध्ये प्रस्थापित झाल्या. त्यानंतरच्या पाचशे वर्षात वेगवेगळ्या प्रकारची सरंजामी राजे उदयाला आली. हा अस्थिरतेचा कालखंड होता. परंतु ही परिस्थिती नाहीशी करून फ्रान्सला वैभवशाली बनविण्याचे महान कार्य नंतरच्या ब्यूरबॉन घराण्याने पार पाडले. तथापि पंधराव्या व सोळाव्या लुईच्या अत्याचारी धोरणामुळे ब्यूरबॉन राजवटीतच क्रांतीचा उद्रेक झाला होता.

पहिला ब्यूरबॉन राजा चौथ्या हेन्रीने इ.स. १५५३-१६१० पर्यंत राज्य केले. त्यानंतर क्रमाने तेरावा लुई (१६१०-४३) चौदावा लुई (१६४३-१७१५) पंधरावा लुई (१७१५-७४) राजपदावर स्थानापन्न झाले.परंतु लुई राजांनी वैयक्तीक स्वार्थ व महत्वाकांक्षेसाठी फ्रेंच समाज व राष्ट्राला वेठीस धरले व हे संपन्न राष्ट्र अधोगतीला पोहचले. त्यासाठी पंधरा व सोळाव्या लुईची कारकीर्द मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरली.

चौदाव्या लुईने व्हर्सायाच्या राजवाड्याचे खर्चिक बांधकामपूर्ण झाले होते.'मीच राज्य आहे' या उदगारातून त्याचा उन्नतपणा, अहंकार व अत्याचारी व्रुत्ती स्पष्टपणे दिसून येते. फ्रेंच जनतेच्या दुर्दशेला व असंतोषाला चौदाव्या लुईच्या कारकीर्दीपासूनच आरंभ झाला.त्यानंतर पंधरावा लुई (१७१५-१७७४) च्या कळात इंग्लंड बरोबर झालेल्या सप्त वार्षिक युध्दात फ्रान्सचा जबरदस्त पराभव झाला. त्याचा खर्च जनतेवर भरमसाठ कर लावून वसूल करण्यात आला. राजवाड्याचा खर्चही वाढविला. प्रजा पंधराव्या लुईच्या राजवटीमुळे आणखीनच संतप्त झाली होती.

### ३.२.१.२ सोळावा लुई (१७७४-१७९३) :

क्रांतीसमयी हा फ्रान्सचा सम्राट असून तो सामान्य व्यक्तिमत्वाचा व कर्तुत्वशून्य राज्यकर्ता म्हनुन त्याची ख्याती होती. स्वतंत्र बुद्धीने राज्यकारभार करण्याची त्यांच्यात धमक नव्हती. सोळावा लुई मंदबुद्धीचा, लहरी, अकार्यक्षम, भ्याड, स्त्रीलंपट, खर्चिक, हट्टी, विश्वासघातकी, एकलकोंडा, चैनी, विलासी व राजकारणाचीघृणा असणारा सम्राट होता. त्याला कुलपे दुरुस्त करण्याचा व शिकारीचा छंद होता.हा अक्षरशत्रू होता आणि त्याला कोणत्याही प्रकारचे शिक्षण देण्यात आले नाही. सुंदर व धूर्त असणाग्रामेरी ॲटाइनेशी त्याचा विवाह झाला होता. फ्रान्स- ऑस्ट्रिया या देशातील राजकीय संबंध सलोख्याचे राहावेत, या उद्देशाने हा विवाह संपन्न झालेला होता. तिला फ्रेंच जनतेबद्दल कुठलीही आत्मीयता,तळमळ नव्हती.ती अतिशय खर्चिक व उधळपट्टी करणारी असल्याने तिला 'तुटीची राणी' म्हणून ओळखल्या जाते. राजकारणातील तिचा हस्तक्षेप राज्याला घातक असाच ठरला.जनकल्याणासाठी त्याने कोणतेही प्रयत्न केले नव्हते. उलट त्याने पत्नी व उमरावाच्या सल्ल्याने क्रांती सुरू झाल्यानंतर ती नष्ट करण्याचे आटोकाट प्रयत्न केले.

आर्थिक विपन्नाव्यवस्थेतुन फ्रान्सला बाहेर काढण्यासाठी सोळाव्या लुईने आधीच्या मंत्र्यांना पदमुक्त करून अर्थखाते तूर्जो,नेकर व केलॉनकडेसोपविले होते. परंतू काही सुधारना राबवित असतानाराणी मेरी ॲटोईन, सरदार वर्ग, पुरोहित वर्ग, जमीनदार वर्ग , वरील आर्थमंत्र्यावर नाराज झाला. राणीपुढे राजाचा नाईलाज झाला व त्यानेतूर्जो, नेकर व केलॉनकडेअर्थमंत्री पदावरून काढून टाकले.

### ३.२.१.३ निरंकुश राजसत्ता :

फ्रान्समध्ये अडीचशे वर्षापासून ब्यूरबॉनघराण्याची अनियंत्रित राजेशाही राज्य करीत होती.ब्यूरबॉन राजाने सत्तेची सर्व सूत्रे एकहाती केंद्रीत केली होती. त्यांनी उमरावांना असलेले विशेष अधिकार कमी केले,चर्च धर्मगुरूचे अधिकार स्वतःकडे ठेवले, काही प्रांतातील इस्टेट जनरल नावाच्यालोकसभाचे अधिकार कमी केले, तसेच कायदा करण्याचे सर्व हक्क राजाकडेच आल होते. युद्ध, तह, संरक्षण व विस्तार ह्या परराष्ट्रीय धोरण आदी बाबी राजाकडे होत्या. राजाचा शब्द म्हणजे कायदा होता. थोडक्यात राजा हा कायदा करी, कर लावी, युद्ध करी, विनाचौकशी तुरुंगात टाकी, शिक्षा देई, न्यायदान करीव मन मानेल तसा खर्च करी. सर्व अधिकार राजसत्तेच्या हाती एकवटल्यामुळे सत्तेचे अमर्याद केंद्रीकरण झालेले होते. अशा रीतीने फ्रान्समधील राजसत्ता अनेक कारणामुळे आणि तिच्या जुलमी वरवंट्याखाली फ्रेंच जनता चिरडल्या गेल्याचे समजते.

### ३.२.१.४ कायदा व न्यायव्यवस्था :

फ्रान्समध्ये प्राचीन रोमन, जर्मन कायदे प्रचित होते.राजाचा शब्द म्हणजे कायदा अशी अवस्था निर्माण झाली होती. या सर्व चमत्कारिक कायद्याचे पालन आम जनता करीत होती व तसेच हे कायदे लोकांना अनभिज्ञ असलेल्या लॅटीन भाषेत होते. एका मेन प्रांतात १२५ कायदा पद्धती होत्या. फ्रान्समध्ये केवळ कायदे सहिता ४०० होत्या. संपूर्ण देशात एकच कायदेपद्धती नव्हती. सर्वांनासमान कायदे नव्हते व कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान नव्हत्या. थोडक्यात फ्रान्समधील कायदे जुल्मी, विषम, संदिग्ध, अलिखित, रानटी व लोकविरोधी होते. म्हणूनच व्हाल्टेअरने असे म्हटले की,'फ्रान्समध्ये प्रवास करताना जेवढी घोडी बदलावी लागतात, तितक्या कायदा पद्धती बदलाव्या लागतात'. थोडक्यात, फ्रान्समध्ये तत्कालीन न्यायव्यवस्था पक्ष;पाती, अमानूष, अत्याचारी, अन्यायकारक व जनविरोधी होती.

### ३.२.१.५ युद्धखोर धोरणे व आर्थिक उधळपट्टी :

सन १७४८-६० पर्यंत भारतात इंग्रज-फ्रेंच लढा चालू होता आणि त्यात फ्रान्सचा पराभव झाला. इंग्लंड व फ्रान्स मध्ये 'सप्तवार्षिक युद्ध' (१७५६-६३) झाले आणि फ्रान्सला भीषण पराभव पत्करावा लागला. युध्दाचा खर्च वसूल करण्यासाठी राजाने प्रजेवर अमाप कर लावले. थोडक्यात लुई राज्यकर्त्यांची चुकीची परराष्ट्र धोरणे, अव्यवहारी महत्त्वाकांक्षा, पराभवाची नामुष्की व युद्धाचा अतोनात खर्च देशाच्या अधोगतीला कारणीभूत ठरला. १६ व्या लुईची पत्नी मेरी अँटाईनेट जास्तच खर्चिक होती.चौदाव्या लुईने ७५,००,००,००० लिव्हर्स प्रचंड खर्च करून व्हर्साया येते वैभवशाली राजवाडा बांधला. असेच इतर १२ राजवाडे वेटबिगारीने बांधले. फ्रान्समधील ९० टक्के लोक केवळ उपासमारीने मरत असताना, राज्यकर्ते मात्र वैभवात लोळत होते. सहाजिकच जनता राजा विरुद्ध खवळून उठली.

### ३.२.१.६ प्रशासनातील गोंधळ कारभार :

फ्रान्समध्ये ४० प्रांत व ३६ जनरॅलिटीजममध्ये विभागणी केली. पुन्हा त्याचे डिस्ट्रिक्ट, पॅरिश व कम्यून (खेडे) या उपविभागात विभाजन केले होते. यापैकी बरीच पदे ही वंशपरंपरागत होती. फ्रान्सचे राष्ट्रीय सैनिक होते. त्यात ३५,००० अधिकारी असून प्रत्यक्षात अडीचशे लोक काम करत होते. सैन्यात बेशिस्त, अकार्यक्षमता व भ्रष्टाचार होता. न्यायालयात हजारो न्यायाधीशांच्या नियुक्त्या करून देखिल ते कामावर हजर होत नव्हते. सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका स्वतः राजाच करीत असल्याने सत्तेचे केंद्रीकरण झालेले होते.अशा रीतीने एकीकडे राजसत्ता ,अधिकारी, उमरावाचा जुलूम सहन करीत असताना, त्यांचे जनतेला अन्यायाविरुद्ध दाद मागण्याची सोय नव्हती.थोडक्यात भ्रष्ट प्रशासन, जुलमी आधिकरी ,लोकमतचा अभाव व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रुटीमुळे फ्रान्समध्येक्रांती घडली.

### आपली प्रगती तपासा

१] फ्रेंच क्रांतीसाठी १६ वा लूई जबाबदार होता स्पष्ट करा?

### ३.२.२ सामाजिक परिस्थिती :

#### ३.२.२.१ श्रेणीबद्ध समाजरचना :

फ्रेंच समाजात असलेली श्रेणीबद्ध समाज रचना ही भारतातील वर्णव्यवस्था प्रमाणेच होती. क्रांती समयी फ्रान्सची लोकसंख्या २,५०,००,००० होती. त्यात १,४०,००० उमराव, १,३०,००० धर्मगुरू, ५,३०,००० अधिकारी व मध्यमवर्गीय, १,५६,००,००० भिकारी व सामान्यजन होते. एक टक्का असलेल्या उमराव- धर्मगुरूच्या हातात देशातील ६५% जमीन व उत्पन्नाची साधने होती. संपूर्ण उत्पन्नापैकी केवळ २०% संपत्तीवर ९९% समाज जगत होता.स्थूलमानाने फ्रान्स समाज दोन गटात विभागला गेला होता. राज्यकर्ते, मंत्री, प्रांताधिकारी, न्यायाधीश, लष्कराधिकारी,कर्मचारी, उमराव व धर्मगुरूंनी मिळून बनलेला समाज घटक संपन्न, प्रतिष्ठित, शोषक व विशेष हक्क असलेला होता. त्यांची संख्या सहा लाखापेक्षा जास्त नव्हती. हाच वर्ग उर्वरित बहुजन समाजाची पिळवणूक करीत होता. उद्योगपती,व्यापारी, शेतकरी, कारागीर,भूदास, मजूर, अधिकारी व सामान्य जनांचा दुसरा मोठा समाजघटक होता. तो लोकसंख्येच्या ९८% होता.बहुजन समाजाला 'तृतीय श्रेणी'अशी संज्ञा दिल्या गेली होती. तो निर्धन ,हक्क नसलेला व वरिष्ठ वर्गाच्या शोषणाला बळी पडलेला होता. शोषक-शोषित, गरीब-श्रीमंत, प्रतिष्ठित व अप्रतिष्ठित, अत्याचारी-सहनशील,समर्थ-दुर्बल, सुखी-दुखी, बेफिकीर-जागृत आणि हक्क असणारा व हक्क नसणारा असे. सामाजिक विषमतेचे चित्र निर्माण झाले होते.वरिष्ठ वर्गाच्या अत्याचारामुळे बहुजन समाज पेटून उठला व त्यास जागरूक मध्यमवर्गाने क्रांतीला प्रेरित करीत होता.

**आपली प्रगती तपासा :**

१] श्रेणीबद्ध समाजरचनेमधे'तृतीय श्रेणी' वर्गाच्या परिस्थितीचे वर्णन करा ?

### ३.२.३ आर्थिक परिस्थिती :

क्रांती समयी फ्रान्सची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली होती.बेकारी, दारिद्र्य, विषमता, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार, शोषण व सरंजामदारी ह्या विविध संकटांनी वेढलेली होती. समाजातील गरीब व श्रीमंत यांमधील अंतर वाढत गेले होते. लुई राज्यकर्ते, उमराव, धर्मगुरूने प्रजेचे अमर्याद शोषण केले होते. एका लेखकांच्या मतानुरुप 'क्रांतीच्या मुळाशी आर्थिक कारणे होती. तंत्रज्ञानामुळे दारूगोळा ठासून भरला होता, परंतु त्याचा भडका आर्थिक परिस्थितीमुळे उडाला'हे विश्लेषण अतिशय तंतोतंत लागू पडते.

#### ३.२.३.१ सरंजामशाही अर्थव्यवस्था :

जमिनदारी प्रथेमुळे फ्रान्समधील कृषी उद्योगाची अतिशय दुर्दशा झालेली होती.जमीनदारांनी शेतीकडे दुर्लक्ष केल्याने, पडीक जमिनीचे क्षेत्र वाढत गेले होते . राज्यकर्त्यांनी शेती सुधारण्याचे कोणतेच प्रयत्न केले नाही. विविध प्रकारचे शोषण व अत्याचारामुळे शेतकऱ्यांची शेती विषयी आस्था राहिली नाही. या सर्व परिस्थितीचा दुष्परिणाम म्हणून राजसत्ता,उमराव, भूदास व शेतकऱ्यांची शेती व्यवसायाकडे अमर्याद दुर्लक्ष झाले आणि शेतीचे उत्पन्न दिवसें दिवस घटत गेले होते.

### ३.२.३.२ व्यापार उद्योगांची स्थिती :

ब्यूरबॉन घराण्याच्या लुई राजांनी व्यापार व व्यवसायावर असंख्य बोजड कर लावले होते. कारागिरांच्या संघटनावर उमरावांचे वर्चस्व होते. त्यामुळे १८ तास काम करूनही त्यांना दारिद्र्यात खितपत पडावे लागले. थोडक्यात फ्रान्समधील व्यापारी, उद्योगपती, व्यावसायिक व कारागिर देशाची भरभराट करीत होते आणि लुई राज्यकर्ते व उमराव ती उद्ध्वस्त करत होते.

### ३.२.३.३ कर व्यवस्था :

शासन, उमराव व धर्मगुरुवरवेगवेगळे कर होते. या करांच्या ओझ्याखाली फ्रेंच जनता विनाकारण चिरडल्या जात होती. लुईराजाचे नातलग, मंत्री, अधिकारी, उमराव व धर्मगुरू हा वरिष्ठ वर्ग जवळजवळ करमुक्त होता आणि त्यांच्यावर आकारलेले कर अतिशय नगण्य स्वरूपाचे होते. उदा. एखादा उमराव २५,०० फ्रँकऐवजी ४०० किंवा ५०० फ्रँकऐवजी फक्त ८० फ्रँक (१६%) कर देत होता. त्यातही अनेकाकडे करांची थकबाकी होती. उलटपक्षी सर्वसामान्य माणूस ७० फ्रँकऐवजी ७६० फ्रँक किंवा १४ फ्रँकसाठी १५२ फ्रँक कर्ज देत होता. राज्याच्या नातेवाईकाकडे २५ लक्ष फ्रँक कर असतांना ते फक्त दोन लक्ष फ्रँकच कर देत होता. ही करव्यवस्थेमधील सर्वात मोठी विषमता होती. स्थूलमानाने फ्रेंच माणूस कार्वी १५%, टाईथ ही धर्मपट्टी १०%,गॅबल हा शासनाचा मिठावरील कर,व्हिजेटिन हा ५% शेतकऱ्यावरील उत्पन्न कर, स्टॅम्प, ड्युटी, अबकारी कर व चाळीस वेळा चुंगी व्यापाऱ्यांना द्यावी लागत असे. त्याचबरोबरउमराव प्रजेकडून शेती, जंगले कुरणे, रस्ते, दिवाबत्ती, पाणवठा कर जमा करीत असे. विषमता, बोजडपणा ,अत्याचार ही करव्यस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणून गणल्या गेली. उमराव, शासन अधिकारी अमानुषपणे कर वसूल करीत होती.

### ३.२.३.४ राज्यकर्त्यांची आर्थिक धोरणे :

फ्रान्सच्या आर्थिक दुर्दशेला ब्यूरबॉन राजांनी देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी भरमसाठ खर्च वाढविला होता. युद्धखोर धोरणे, राजवाड्यांचा खर्च व परराष्ट्र कर्ज,पंधराव्या लूईच्या काळात इंग्रज-फ्रेंच युध्दे भारतात व इंग्लड-फ्रान्समधील सप्तवार्षिक युध्दे झाली. या दोन्ही युद्धात फ्रान्सचा दारुण पराभव झाला आणि भरमसाठ युद्धखर्च फ्रान्सला सोसाव्या लागणा-या खर्चाची उणीव भरून काढण्यासाठी राजाने प्रजेवर बोजड कर आकारले होते. हा प्रचंड खर्च भागविण्यासाठी राजांनी वेगवेगळ्या देशाकडून कर्जे घेतली होती. अशा राष्ट्रीय कर्जाची रक्कम तीनशे कोटी फ्रँक्स होती. राज्यकर्ते आर्थिक दिवाळखोरीमुळे फ्रान्स दारिद्र्याच्या खाईत लोटला गेला.

### आपली प्रगती तपासा :

१] विषम कर व्यवस्थेबद्दल सविस्थर माहीती लिहा ?

munotes.in

**३.३.४ विचारवंताचे कार्य :**

**३.३.४.१ हॉल्टेअर (१६९४-१७९८):**

हॉल्टेअरने आपल्या 'कँडिड' ग्रंथाद्वारे फ्रान्समध्येच नव्हे तर संपूर्ण युरोपात खळबळ उडवून दिली होती. तो स्वतः कवी, इतिहासकार, नाटककार म्हणून प्रसिद्ध होता. तत्कालीन फ्रान्समध्ये सर्वसामान्य जनता जुलमी सत्तेच्या वरवंट्याखाली चिरडली जात होती. स्वत: हॉल्टेअरला त्याचा जबरदस्त फटका बसून दोन वेळेस त्याला तुरुंगवास भोगावा लागला होता. म्हणूनच तो व्यक्तीस्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता बनला होता. जनतेवरील जुलुमांना वाचा फोडणे हे त्यांच्या लिखाणाचे उद्दिष्ट होते.तत्कालिन जुलमी न्यायव्यवस्था, कायदा प्रणाली इत्यादीवर त्यांनी कठोर प्रहार केले.हॉल्टेअरच्या मते, प्रचलित राजसत्ता अत्यंत जुलमी असून तिने जनकल्याणाकडे पूर्णत: दुर्लक्ष केलेले आहे, कायदा लष्कर, अर्थव्यवस्था, अधिकारी, सरंजामदार व धर्मगुरूकडून होणाऱ्या अत्याचारास, अन्यायास हीच राजसत्ता जबाबदार आहे, सोळावा लुई तर अत्यंत अपात्र व अकार्यक्षम आहे म्हणून ब्यूरबॉन घराण्याची अनियंत्रित राजसत्ता नष्ट करून, कल्याणकारी नियंत्रित राजसत्तेची पुनर्स्थापना करावी ही प्रेरणा हॉल्टेअरने दिली. त्याचा फार मोठा संताप चर्च व धर्मगुरूवर होता. धर्मगुरु नीतिभ्रष्ट बनले आहेत, चर्च ही अनाचाराचे अड्डे बनले आहेत. पुरोहित कर्तव्यपराडमुख झाले आहेत, ते चैन व विलासाच्या बाबतीत राजा व उमरावासी स्पर्धा करतात, संन्यासी म्हणवणारे हे धर्मगुरू चर्चेच्या कोट्यावधी मालमत्तेची नीतिभ्रष्ट जीवन जगण्यासाठी धुळधान करीत आहेत. त्यासाठी त्याने धर्मसुधारणेची निकड स्पष्ट केली. गुन्हेगारांना दिलेल्या शिक्षा उपयुक्त ठरल्या पाहिजेत, त्यांना फाशी देण्याऐवजी तुरुंगात काम देणे हे देशाला फायदेशीर ठरेल, कर उत्पन्नाच्या प्रमाणात असावे, समाजात धर्मभोळेपणा नाहीसा झाल्यास तो सुधारू शकेल. असंस्कृत, अशिक्षित व अपात्र लोक सत्तेत आल्यास समाज व राष्ट्राचा ह्रास होईल, असा त्यांचा अंदाज होता.

**३.३.४.२ रुसो (१७१२-१७७८) :**

जॅझॅक रूसो हा जिनेव्हा जिनेव्हा (इटाली) येथील महान राजकीय विचारवंत होता. नंतरच्या काळात तो फ्रान्समध्ये येऊन स्थायिक झाला. रुसोने आत्मचरित्र, कादंबरी, शिक्षणशास्त्र हे ग्रंथ लिहीले. क्रांतीचे बायबल ठरलेला त्याचा 'सोशल कॉन्ट्रॅक्ट' (Social Contract) हा ग्रंथ जगप्रसिद्ध झाला. रुसो हा व्यक्तिस्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता व नियंत्रित राजेशाहीचा समर्थक होता.मनुष्य हा जन्मताच स्वतंत्र व समान आहे. परंतु राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक संस्थामुळे तो बंदिस्त होतो. प्राचीन काळी व्यक्तीसमूह व राजा ह्या दोघात अधिकार कर्तव्याचा करार होऊन अशा सामाजिक कराराद्वारे राजसत्तेची निर्मिती झाली. त्यामुळे व्यक्तीने आपले नैसर्गिक अनिर्बंध स्वातंत्र्य गमावले, आणि त्या मोबदल्यात त्यास नागरी हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य व वस्तूंची कायदेशीर मालकी प्राप्त झाली. मात्र अशा हक्काचे रक्षण रक्षण सामाजिक व आर्थिक समता असेपर्यंतच होत असते, विषमतेमुळे ते नष्ट होतात. लोकइच्छेमधून जन्माला आलेल्या राजेशाहीत लोकमताचे सार्वभौमत्व सर्वश्रेष्ठ असते. म्हणून समाज नियंत्रणासाठी केलेले कायदे लोकप्रतिनिधीमार्फत व त्यांच्या इच्छेनुसारच झाले पाहिजेत, कायद्यामधून जनक कल्याणाचे, लोक रक्षणाचे, लोकमताचे प्रतिबिंब उमटले पाहिजे, राजा, शासन व समाजाचे व्यवहार अशा लोकप्रतिनिधीं निर्मित कायद्यानेच पार पाडले पाहिजेत, जनमताचे सार्वभौमत्व व लोक निर्मित कायद्याच्या पार्श्वभूमीवर

लोकांवरती, लोकसत्ताक शासन पद्धतीचा आग्रह रुसोने धरला होता. तो नियंत्रित राजेशाहीचा समर्थक होता. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास लोकशाही मूल्याधिष्ठित, कल्याणकारी, नियंत्रित राजेशाही रुसोंना अभिप्रेत होती.फ्रान्समधील तत्कालीन जुलुमी राज्यवस्था, सरंजामशाही, धार्मिक भ्रष्टाचार, आर्थिक विषमता व पारतंत्र्य या बाबी वर त्याने कडाडून टीका केली होती. व्यवस्थेचा विरोध करण्याऐवजी त्याजागी नवीन मूलगामी व्यवस्था निर्माण करणे जास्त श्रेयस्कर होईल अशी रुसोची परिवर्तनवादाची भूमिका होती. उघड-उघड रुसोने क्रांतीचीच प्रेरणा दिली होती.रुसोचे हे अलौकिक सामर्थ्य लक्षात घेऊनच नेपोलियन बोनापार्टने असे म्हटले आहे की, 'रुसो झाला नसता तर फ्रेंच क्रांती झालीच नसती' असे गौरवोद्गार काढले होते.

### ३.३.४.३ मॉन्टेस्क्यू (१६८९-१७५५):

आधुनिक लोकशाहीचा उद्गाता म्हणून मॉन्टेस्क्यूचा उल्लेख केला जातो. मॉन्टेस्क्यूने प्रजासत्ताक लोकशाही शासन पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला.मॉन्टेस्क्यूचा जन्म एका बड्या उमराव घराण्यात झाला तरीही तो उदारमतवादी होता. तो प्रशासनात न्याय खात्याचा अधिकारी होता. त्याने सन १७४८ साली LEspritdeslois (Spirit of the laws) कायद्याचे मर्मस्थान हा राज्यशास्त्रावरील महत्वाचा ग्रंथ लिहिला. राज्यशास्त्र, इतिहास, कायदा व समाजशास्त्राचा तो मोठा व्यासंगी होता. सत्ता विभाजन, संसदीय पद्धती व व्यक्ती स्वातंत्र्य ही त्याचे मुख्य प्रतिपाद्य विषय होते. तसेच त्याने तत्कालीन नीतिभ्रष्ट धर्मावरही टीका केली. तो वास्तववादी विचारवंत होता. फ्रान्समधील प्रचलित राजेशाहीत अमर्याद सत्तेचे केंद्रीकरण झालेले असल्यामुळे सामाजिक व धार्मिक विषमता निर्माण झाली, समाज व राष्ट्र हिताकडे दुर्लक्ष झाले. व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट झाले. कायदा व न्याय व्यवस्था दुबळी पडली आणि राजसत्तेला सर्व प्रकारची जुलूम करण्याची संधी मिळाली. ईश्वरी वरदानाचा सिद्धांत आणि त्यास खतपाणी घातले. त्यादृष्टीने सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे, असे त्यांचे स्पष्ट प्रतिपादन होते. म्हणूनच मॉन्टेस्क्यूने आपल्या 'स्पिरिट ऑफ दी लॉज'ह्या ग्रंथात सत्तेच्या विभाजनाचा सिद्धांत मांडला. मॉन्टेस्क्यू राजा विरहित राज्य असलेल्या शुद्ध लोकशाहीचा पुरस्कर्ता होता आणि ती फ्रान्समध्ये यावी अशी त्यांची प्रबळ इच्छा होती. मॉन्टेस्क्यूने उघड उघड प्रचलित राजेशाही उलथवून प्रजासत्ताकाची स्थापना करण्यासाठी व क्रांतीसाठी जनतेला उद्यूक्त केले होते.

munotes.in

### ३.३.४.४ इतर विचारवंत:

सैबेस्तिया द व्होवा (१६३३-१७०७) हा फ्रान्समधील सर्वांत पहिला विचारवंत होता. उत्पन्नाच्या प्रमाणात कर बसवावे (सरंजामदारवही) हा आर्थिक समतेचा क्रांतिकारी विचार व्होवा ने मांडला.पहिला ऐतिहासिक कोश 'पिअरबेलने'तयार केला.'सॅपिएर'हा दुसरा महत्त्वाचा विचारवंत होऊन गेला. पित्याची मालमत्ता सर्व मुलांना सारख्या प्रमाणात मिळावी, मुला-मुलींना सार्वत्रिक शिक्षण दिले जावे, उत्पन्नावर कर आकारावावेत, सरकारी अधिकारपदाची खरेदी विक्री व कंत्राटदारी थांबवावी इत्यादी आधुनिक विचार त्याने मांडले. 'हेल्वेटियसक्काड' (१७१५-१७७१) आध्यात्मिक व भौतिकवादी विचारवंत होता.'द स्पिरिट' (The spirit) 'चैतन्य ह्या ग्रंथात त्यानी आपले विचार व्यक्त केले.कोंदाँसे (१७४३-

१७९४) हा विचारवंत क्रांतीच्या वेळी हयात होता. तो गणितीतज्ञ व लोकशाहीनिस्ठ तत्ववेत्ता होता. 'मानवी मनाची प्रगती' या ग्रंथात त्यांनी भविष्यकालीन सद्गुणी समाजाचे वैभवशाली चित्रण रंगविले होते.डेनिस डिडेरॉट (१७१३-१७८४) नेकला व शास्त्राचा Encyclopedea of Art and Science हा कोश तयार केला. ह्यात त्याने मॉन्टेस्क्यू,व्हॉल्टेअर व रुसोचे विचार एकत्रित करून जागतिक वैज्ञानिक विचारांची चिकित्सा केली. हॉलबॉच (१७२३-८९) हा अधिभौतिक व विचारवंत होता. तो शुद्ध धर्माचा उपासक असल्याने त्यांने प्रचलित भ्रष्ट पुरोहित व धार्मिक स्थितीवर टीका केली. त्याने आपले विचार 'निसर्ग पद्धती'ह्या ग्रंथात मांडलेली होते. सेंट जुस्त (१७६७-१७९४) हा जहाल क्रांतिकारी विचारवंत, कायदेपंडित, जेकोबिन पुढारी, रॉबेस्पिअरचा मित्र आणि दहशतवादी राजवटीतील कार्यकर्ता होता. समाजातील गोरगरीब वर्ग सामर्थ्यवान झाला पाहिजे, सरकारला जाब विचारण्याचा त्यांना अधिकार असायला पाहीजे, राजे लोकांनी जागृत जनतेची गंभीर दखल घ्यावी, राज्य म्हणजे खाजगी मालमत्ता असे त्यांनी मानू नये, राजाने प्रजेच्या हितासाठी राज्य करावे. असे कल्याणकारी राज्याचे विचार सेंट जुस्तने मांडले.

कामिया देमूल (१७६२-१७९४) हा धाडसी पत्रकारनेस्वातंत्र्य ही परमेश्वराची देणगी आहे, स्वातंत्र्य म्हणजे नाटकातील जलदेवता, लाल टोपी किंवा कापडाचा फाटका तुकडा नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे सुख, समता, न्याय व विवेकबुद्धी होय. देमूलने स्वातंत्र्याचा व्यापकपणे विचार मांडलेला होता.ॲडमस्मिथ ह्यूम,प्रिस्टले,हॉवर्ड, वॉशिंग्टन, थॉमस पेन, पॅट्रिक हेन्री, जेफर्सन व बेंजामिन फ्रँकलिन ह्या इंग्लंड अमेरिकेतील विचारवंताचा प्रभाव फ्रेंच जनतेवर पडलेला होता.

अशाप्रकारे, फ्रेंच तत्त्ववेत्त्यांनी केवळ फ्रान्समधीलच नव्हे तर जगात ठिकठिकाणी होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली व तेथील जनतेला क्रांतीसाठी प्रवृत्त केले. विचारवंताचे फार मोठी जागतिक ऐतिहासिक कार्य होते.फ्रेंच लेखकांनी देशातील राजकीय,सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीचे वास्तव चित्रण केले व असहाय्य,असंतुष्ट जनतेला क्रांतीसाठी उद्यूक्त केले.

**आपली प्रगती तपासा :**

१] आधुनिक लोकशाहीचा उद्गाता म्हणून मॉन्टेस्क्यूचे विचार स्पष्ट करा ?

### ३.३.५ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध (१७७६-१७८३) :

अमेरिकन वासाहतिक जनतेनीब्रिटिशाची जुलमी राजवट, उलथुन पाडली होती. या लढ्यासाठी सोळाव्या लुईने 'लाफायते' यांच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठवून मदत केली होती. त्यांनी आपल्या पराक्रमाची माहिती फ्रेंच जनतेला दिली होती. पूर्वीच असंतुष्ट व जागरुक झालेल्या फ्रेंचावर या घटनेचा विलक्षण परिणाम झाला. अमेरिकन जनता इंग्रजांची दडपशाही राज्य नष्ट करू शकत असेल तर आपणही लुईची सत्ता का उलटून टाकू शकणार नाही ? हा क्रांतिकारी विचार अमेरिकन स्वातंत्र्य लढ्यामुळे त्यांच्या डोक्यात थैमान घालू लागला होता.

### ३.३.६ इस्टेट जनरलची सभा (१७८९): तत्कालीन कारण :

इस्टेट जनरल ही फ्रान्समधील जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची (लोकसभा) संस्था होती. लुई राजाने तिची १७५ वर्षे बैठकच भरविली नाही. मात्र सोळाव्या लुईने लोकसभेचे बैठक बोलावल्यामुळे जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राजाने मात्र नवीन कर लावण्यासाठी, अधिवेशन भरविले होते. ह्या वेळी तृतीय श्रेणीचे सभासद जास्त होते. त्यांचे राजा, उमराव, धर्मगुरुंशी तीव्र मतभेद निर्माण झाले व त्याचे पर्यवसान शेवटी संघर्षात झाले.

**आपली प्रगती तपासा :**

१] फ्रेंच क्रांतिसाठी मॉन्टेस्क्यूचे विचार अधोरेखीत करा?

## ३.४ फ्रेंच क्रांतीचा घटनाक्रम

### ३.४.१ राष्ट्रीय सभेची कामगिरी :

सोळाव्या लुईला पैशाची चणचण भासू लागल्यामुळेव त्याने प्रजेवर नवीन कर लावून पैसा उभा करण्यासाठी इस्टेट जनरलची सभा बोलाविण्याचे ठरविले होते. या नवीन लोकसभेत उमरावांचे २८५, धर्मगुरूंचे ३०८ व तृतीय श्रेणीचे ६२१ असे एकूण १२१४ प्रतिनिधी निवडून आले होते. ह्या नवनिर्वाचित इस्टेट जनरलची सभा दि. ५ मे १७१९ रोजी पॅरिस जवळील व्हर्सायाच्या राजवाड्यात सुरुवात झाली होती. सभागृहात उमराव, धर्मगुरू व तृतीय श्रेणीचे सभासद वेगवेगळे बसून चर्चा करण्याची प्रथा होती. तृतीय श्रेणीतील सभासदांनी ह्या सदोस प्रथेस विरोध केला व एकत्रित बसून चर्चात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. अर्थात ही मागणी धर्मगुरु, उमराव व राजाने फेटाळून लावली. शेवटी १७ जून १७८९ रोजी तृतीय श्रेणीच्या सभासदांनी स्वतःला राष्ट्रीय सभा म्हणून घोषित केले व तिच पुढे फ्रेंच क्रांतीची राष्ट्रीय संघटना बनली.अशा रीतीने राजा व लोकप्रतिनिधींच्या सुप्त संघर्षाला प्रारंभ झाला व त्याचे रूपांतर शेवटी क्रांतीत झाले.

### ३.४.२ क्रांतीचा शुभारंभ-बॅस्टिलचा विजय :

सोळावा लुईनेजनप्रतिनिधीनि चालविलेली चळवळ नेस्तनाबुत करण्यासाठीलष्कराला पाचारण केले होते.त्यावर स्वसंरक्षणासाठी राष्ट्रीय सभेने जनतेचे सैन्य उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार लाफायतच्या नेतृत्वाखाली 'राष्ट्रीय सैन्य'उभारण्यात आले. राष्ट्रीय सभेच्या कार्यकर्त्यांनी १४ जुलै १७८९ रोजी कुप्रसिद्ध बॅस्टीलच्या तुरुंगावर हल्ला केला आणि तिथूनच फ्रेंच क्रांतीची खरी सुरुवात झाली. संतप्त राष्ट्रीय सभासदांनी टेनिस कोर्टची शपथ घेतली होती. दिवसेंदिवस दोहोतील तणाव वाढतच गेला.

### ३.४.३ ऑगस्टची सामाजिक क्रांती :

फ्रेंच जनतेवर जास्तीत जास्त आत्याचार संरजामदारांनी केल्यामुळे क्रांतिकारकांनी त्यांच्या वाड्यावर हल्ले केले. जमिनी व अधिकाराची सर्व कागदपत्रे जाळली आणि असंख्य उमराव यांचे खून पाडल्या गेले होते. क्रांतीकारकांचे प्रमुख लक्ष्य सरंजामदार होते. विशेष आश्चर्याची बाब म्हणजे कनिष्ठ व उदारमतवादी उमराव क्रांतीत सामील झाले होते. अशा प्रतिकूल


munotes.in

परिस्थितीत फ्रान्समधील उमरावांची भव्य सभा ४ ऑगस्ट १७८९ रोजी संपन्न झाली होती. तिला सनातनी व मवाळ उमराव उपस्थित होते. आश्चर्याची बाब म्हणजे अनेकांनी आपल्या अधिकारत्यागाचे आश्वासन दिले व त्यानंतर त्याच सभेत उमरावांचे कर, जमीनदारी, वेठबिगारी, भूदास प्रथा, टाईथ, विषमता व सर्व विशेष हक्क नष्ट झाल्याचा ठराव उमराव सभेने पास केला. 'एका रात्रीत सरंजामशाही नष्ट करणारी सामाजिक क्रांती'असे या घटनेचे वर्णन केले जाते.

### ३.४.४ स्त्रियांचा मोर्चा व राजा-राणी कैद :

फ्रेंच राज्यक्रांती चिरडण्याच्या हीन मनोवृत्तीचा निषेध करण्यासाठी हजारो स्त्रियांचा मोर्चा ५ ऑक्टोबर १७८९ रोजी व्हर्सायच्या राजवाड्यावर गेला. सोळावा सुई,राजा-राणी अँटोइनेटला पकडून व बेकरीवाल्याच्या गाड्यावर बसून, पॅरिस पर्यंत त्यांची मिरवणूकीत धिंड काढण्यात आली आणि राजधानीच्या जुन्या राजवाड्यात त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले.

### ३.४.५ मानवी हक्कांचा जाहीरनामा :

राष्ट्रीय सभेने क्रांतीकार्याला आरंभ केल्यानंतर २६ ऑगस्ट १७८९ रोजी 'मानवी हक्काचा जाहीरनामा' घोषित केला होता. हारुसोच्या सिद्धांतावर मानवी हक्कांचा जाहीरनामा आधारलेला होता. त्याचा मसुदा तयार करण्याचे काम लाफायतने केले होते. त्यातील महत्त्वाचा भाग पुढील प्रमाणे आहे.

१) प्रत्येक व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आहे.

२) स्वातंत्र्य, सुरक्षितता, संपत्ती प्राप्त करणे इत्यादी मानवाचे हक्क आहेत. त्यांचे रक्षण करणे शासनाचे आद्यकर्तव्य आहे.

३) प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य आहे.

४) बेकायदेशीरपणे कोणालाही अटक करता कामा नये , तसेच तुरंगात टाकता कामा नये.

५) संपत्ती मिळविणे प्रत्येकाचा हक्क आहे आणि तो हिरावून घेता येणार नाही. मात्र लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक भासल्यास कायद्याचे नुकसान भरपाई देऊन संपत्ती ताब्यात घेण्याचा अधिकार शासनाला आहे.

६) देशाच्या अर्थकारणावर नियंत्रण ठेवण्याचा जनतेला हक्क आहे.

७) स्वातंत्र्याचा उपभोग घेताना इतरांचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ नये.

८) कायदा म्हणजे जनतेच्या इच्छांची अभिव्यक्ती होय. त्यामुळे कायदा निर्माण पद्धतीत प्रत्येक जण स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत भाग घेऊ शकतो.

९) शासनाचे सर्व अधिकारी जनतेप्रती जबाबदार आहेत.

१०) सार्वभौमत्व राष्ट्रात सामावलेले आहे. त्यामुळे राज्यातर्फे तसा अधिकार दिल्याशिवाय कोणतीही व्यक्ती अथवा संस्था त्याचा वापर करू शकत नाही.

munotes.in

जाहीरनाम्यात प्रत्यक्षात १७ कलमे होती. फ्रान्समधील मानवी हक्काच्या जाहीरनाम्याचे वैशिष्ट्य म्हणजे पुढील काळात बहुतेक देशांनी आपल्या घटना तयार करताना या जाहीरनाम्याचा आधार घेतलेला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१] मानवी हक्काचा जाहीरनामा संदर्भात थोडक्यात माहीती लिहा ?

## ३.५ घटनेची निर्मिती

सन १७८९ मध्ये राष्ट्रीय सभेने घटना तयार करावयास प्रारंभ केला होता. ते कार्य सन १७९१ मध्ये पूर्ण झाले होते. ही राष्ट्रीय सभेची महत्त्वपूर्ण कामगिरी होती. घटनेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे होती-

### ३.५.१ राजसत्ता :

नवीन घटनेप्रमाणे राजपद कायम ठेवण्यात आले. परंतु त्याच्या अधिकारात बदल करण्यात आला होता. घटनात्मक, लोकानुवर्ती, नियंत्रित राजेशाहीची निर्मिती करण्यात आली. राजा हा जनतेचा व राष्ट्राचा प्रतिनिधी होता. राजावर प्रजेचे नियंत्रण होते. आता तो निरंकुश व जुलमी राहिला नाही. राजाला वारसा नसेल तर तो नियुक्त करण्याचा अधिकार लोकसभेला देण्यात आला. राजाने देशद्रोह केल्यास त्यास पदच्युत करण्याचा हक्क विधिमंडळालाकडेच ठेवले.वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या नेमणुका तो करणार होता , मात्र परराष्ट्रीय संबंधासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली होती. राजाचा न्यायाधीशांच्या नेमणुका करण्याचा हक्क रद्द केला. राजाच्या मदतीसाठी मंत्रिमंडळाची निर्मिती करण्यात आली होती. मंत्र्यांची नियुक्ती व बडतर्फी राजा करीत असला तरीही हे मंत्रिमंडळ कायदेमंडळाला जबाबदार होते. भ्रष्ट मंत्रालयावर खटला भरण्याची तरतूद होती. मंत्रिमंडळाच्या खर्चावर आणि कार्यावर लोकसभेचे नियंत्रण होते. कायद्याच्या फक्त अंतिम मंजुरीचा अधिकार राजाला होता. तथापि नवीन घटनेने राज्याची स्थिती सर्कशीतल्या शिंहा प्रमाणे करून टाकली होती.

### ३.५.२ विधीमंडळ :

घटनेप्रमाणे एकग्रुही कायदे मंडळाची स्थापना करण्यात आली होती. हीच संस्था नवीन शासनाचा केंद्रबिंदू होती. तीन ते दहा लिव्हर्स किंवा ठराविक वेतन कर भरणाऱ्या व्यक्तीला मताधिकार देण्यात आला. ह्या पद्धतीच्या नवनिर्वाचित प्रतिनिधींचे एकग्रुही कायदे मंडळ तयार केले. त्याचा कालावधी दोन वर्षाचा होता. मे महिन्याच्या पहिल्या सोमवारी अधिवेशन भरविण्याची तरतूद होती. कायदा निर्मितीचे संपूर्ण अधिकार ह्या कायदेमंडळाला होते. बहुमताने विधेयक मंजूर करून राजाच्या अनुमती नंतर कायदे तयार केले जात होते. थोडक्यात राजा, मंत्रिमंडळ, धर्मसत्ता, अर्थव्यवस्था व न्याय क्षेत्रावर नियंत्रण ठेवणारे प्रभावी विधिमंडळ नवीन घटनेनुसार तयार करण्यात आले होते.

### ३.५.३ कायदा व न्यायव्यवस्था:

सर्व देशात एकच कायदा पद्धती लागू करण्यात आली होती. पूर्वीचे संदिग्ध व लॅटिन भाषेतील कायदे नष्ट केले होते. लोकांनी निवडून दिलेल्या कायदे मंडळामार्फत कायदे निर्मिती करण्यात आली. चर्च, उमरावांचे न्यायालय बरखास्त करण्यात आले. न्यायक्षेत्रातील लाचखोरी, छळवणूक व क्रूर शिक्षा बंद केल्या. प्रत्येक जिल्हा व प्रांतात नवीन न्यायालय व एक सर्वोच्च न्यायालय स्थापन केली. गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय शिक्षा न देण्याची सोय केली. संशयावरून बेकायदेशीरपणे तुरुंगात डांबणे बंद केले. गुन्हेगाराचा छळ कमी केला. मात्र बेड्या घालणे व देहदंडाच्या शिक्षा कायम ठेवल्या. योग्य, कार्यक्षम व निपक्षपाती न्यायाधीशांच्या नियुक्त्या लोकनियुक्त शासनातर्फे करण्यात आल्या. राष्ट्रीय सभेने न्यायाचे राज्य निर्माण केले होते.

**आपली प्रगती तपासा :**

१] नवीन घटना निर्मितीनुसार विधिमंडळासंदर्भात महीती लिहा ?

### ३.५.४ राष्ट्रीय सभेची इतर कामगिरी :

प्रांतीय सुधारनामध्ये राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये नवीन पद्धतीची समान क्षेत्रफळाचे ८३ डिपार्टमेंट (प्रांत) निर्माण करण्यात आले होते. त्याचे पुन्हा डिस्ट्रिक्ट (जिल्हा), पेरिष (Parish- तालुका), कॉम्युन्स (Communes- ग्राम) असे उपविभागात पाडण्यात आले होते. डिपार्टमेंटचा कारभार चालविण्यासाठी लोकनियुक्त ३६ सभासदांचे कौन्सिल स्थापन करण्यात आले होते. त्यातूनच आठ सदस्यांचे संचालक मंडळ निर्माण करण्यात आले. त्याचा कालावधी दोन वर्षाचा होता आणि संचालकांना वेतन दिले जाई. संचालक मंडळावर नियंत्रण ठेवण्यासाठी सिंडीकेट नावाचा अधिकारी होता. उद्योगधंदे, व्यापार, बांधकामे, शिक्षण, तुरूंग, शेती, महसूल व कर गोळा करणे ही कामे संचालक मंडळाकडे होती. प्रांतात शांतता, सुव्यवस्था, न्यायदानासाठी मॅजिस्ट्रेट होते. प्रत्येक गाव व शहराच्या व्यवस्थेसाठी एक मेयर व अधिकार होते. त्यांची निवड गावातील मतदाराकडुन दोन वर्षासाठी होत असे. पॅरिस कॉम्युनची नवी व्यवस्था वैशिष्ट्यपुर्ण होती व तेथील काम्युनला विशेष महत्त्व होते. कर, महसूल, न्याय, कायदा,शांतता-सुव्यवस्थेची कामे पार पाडावी लागत असे.

राष्ट्रीय सभेने सरंजामदारी प्रथा नष्ट करून उमरावांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. चर्चच्या जमिनी व मालमत्ता जप्त केली. या जमिनी भूमिहीनांना वाटल्या आणि शेती सुधारण्याचे प्रयत्न केले. शेतकऱ्यावरील बोजड कर कमी केले. चर्चच्या मालमत्तेचा समाज कल्याणासाठी वापर केला. परदेशी व्यापार उद्योगधंद्याच्या वृद्धीसाठी प्रयत्न केले. शेतकरी,मजूर व आर्थिक दुर्बल घटकांची आर्थिक स्थिती सुधारण्याचे अनेक उपाय योजले. युध्द राजदरबार, सरंजामदार, धर्मगुरू, प्रशासन अधिकार यावर होणारा अनाठायी खर्च कमी केला.राष्ट्रीय सभेने अल्पकाळात राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व प्रशासनिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले.

munotes.in

### ३.५.५ राष्ट्रीय परिषद व दहशतवादी राजवट :

सन १७९१ मध्ये राष्ट्रीय सभा बरखास्त करण्यात येऊन नवीन घटनेप्रमाणे फ्रान्सचा राज्यकारभार सुरू झाला. परंतु क्रांतीपर्व संपले नाही. इ.स. १७९३-१७९५ पर्यंत दहशतवादी राजवट अस्तित्वात आली. नवीन राजवटीतील मवाळ्यांची असमर्थता, परकीय आक्रमण व जहाल क्रांतीकारांचा उदय या घटना क्रांतिकारी दहशतवादास कारणीभूत ठरल्या.अंतर्गत यादवी वर मात करण्यासाठी विधिमंडळाने दोन हुकूम काढले. पहिला हुकुम बंडखोर धर्मगुरूंना जन्मठेपेची शिक्षा देऊन ती भोगण्यासाठी हद्दपार करण्याबाबत होता. तर दुसरा हुकुम पॅरिसच्या संरक्षणासाठी सैन्य उभारण्याबाबत होता. राजाने नकाराधिकाराचा वापर करून हे दोन्ही हुकुम रद्द केले आणि १३ जून १७९२ रोजी मंत्रिमंडळ बरखास्त केले. सोळावा लुईचा वध जॅकॉबीन पक्षाच्या दृष्टीने राजाचा वध आवश्यक होता. राजद्रोहाच्या आरोपावरून खटला भरला. राजावरील हा खटला म्हणजे न्यायदानाची क्रूर विटंबना होती ३८७ विरुद्ध ३३४ मताने राजद्रोहाचा आरोप सिद्ध झाला. याचा अर्थ थोड्या बहुमतानी राजाला सुळावर चढविण्याचा निर्णय घेण्यात आला. २१ जानेवारी १७९३ रोजी राजवाड्यासमोरील चौकात पंधराव्या लुईच्या पुतळ्याशेजारी वधस्तंभ उभारला.

### ३.५.६ दहशतवादाचे राज्य :

ह्यानंतर जॅकॉबीन पक्षाने राजेशाहीच्या समर्थकांना ठेचून ठार मारणे सुरु केले होते. त्यासाठी गिलोटीन नावाच्या यंत्राचा वापर केला जात होता. ऑक्टोबर १७९३ मध्ये मेरी अँटाईनेट हिला ठार करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय सभेचे पहिले अध्यक्ष बेली यांचाही वध करण्यात आला. जॅकोबिन्सने अशा प्रकारे केवळ राजेशाहीच्या समर्थकांना ठार केले असे नव्हे तर त्या नावाखाली आपल्या विरोधकांना मारणे सुरु केले. त्यामुळे फ्रान्समध्ये प्रचंड भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले. एकट्या पॅरिसमध्ये पाच हजार लोकांना कंठस्नान घातले गेले.

२८ जुलै १७९४ रोजी विरोधकांनी रॉबेस्पायरला पकडून डान्टनच्या मार्गाने पाठविले. रॉबेस्पायरच्या मृत्यूने फ्रान्समध्ये दहशतीचा कालखंड समाप्त झाला. त्या काळात जवळजवळ ६०,००० क्रांतीविरोधकांना ठार मारण्यात आले होते. त्यामुळे मारात, डान्टन व शेवटी रॉबेस्पायरचा बळी गेल्याने जनतेने मुक्ततेचा आनंद लुटला. सर्वत्र शांतता निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले. गिलोटिन उखडून फेकण्यात आले. जँकोबिन शाखा बंद करण्यात आल्या.

**आपली प्रगती तपासा :**

१] राष्ट्रीय सभेची थोडक्यात महत्वपुर्ण कामगीरी अधोरेखीत करा ?

### ३.५.७ संचालक मंडळाचा कारभार :

फ्रान्समधील दहशतवादाचा कालखंड समाप्त झाल्यावर घटना निर्मितीच्या कार्याला वेग येऊन सन १७९५ मध्ये प्रजासत्ताक फ्रान्सची घटना अस्तित्वात आली. त्यानुसार द्विगृही कायदे मंडळाची रचना करण्यात आली. वरिष्ठ सभागृह २५० सदस्यांचे होते. सदस्य

बनण्यासाठी विवाहित असणे आणि वय ४० वर्षांहून अधिक असणे, या अटी होत्या. कनिष्ठ सभागृहात ५०० सदस्यांचे बनवण्यात आले आणि त्यासाठी वयोमर्यादा किमान ३० वर्षे ठेवण्यात आली. मतदार असण्याकरीता पूर्वीसारखीच किमान मालमत्तेची आठ होती.

घटनेनुसार ५ सदस्यांचे संचालक मंडळ निर्माण करण्यात आले. तेथेही ४० वर्षे किमान वय असण्याची अट होती. एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता दिली तर तो हुकुमशहा बनण्याची शक्यता होती. त्यापासून धडा घेऊन नव्या घटनेत पाच सदस्यीय संचालक मंडळाची तरतूद होती. कॅर्नोट, लेतॉर्नी, लार्वेलियर, रिबेल आणि बर्रास अशा त्यांची नावे होती. नवी घटना प्रजासत्ताकाची असली तरी त्यातील काही तरतुदीमुळे जनता विशेषत: पॅरिस वासिय नाखुष होती. नव्या कायदेमंडळाची २/३ सदस्य विद्यमान जुन्या कायदेमंडळाचे असावेत, या तरतुदीमुळे लोक खवळले होते. परिणामी तयारीच्या जनतेने बंड पुकारले रिझल्टच्या राजमहाला वर हल्ला करण्याची त्यांची योजना होती. पण फ्रेंच लष्करातील तरुण अधिकारी नेपोलियन बोनापार्ट याने बंडखोराचा धुवा उडविला होता.

शिवाय ह्या काळात रोमन कॅथलिक यांचा छळ सुरू झाल्याने संचालक मंडळ जनतेच्या नजरेतून उतरून लागले अशा एकूण वातावरणात ९ नोव्हेंबर १७९९ रोजी संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले आणि त्या जागी तीन सदस्य कॉन्सुलची नियुक्ती केल्या गेली. त्यात नेपोलियन प्रथम कॉन्सल होता.

## ३.६ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

फ्रेंच क्रांतीचे फ्रान्सवर राजकीय, सामाजिक व धार्मिक इत्यादी सर्वच क्षेत्रात खोलवर परिणाम झालेले दिसतात. नेपोलियन सन १८१५ पर्यंत फ्रान्सचा सम्राट होता आणि ह्या काळात त्यांची युरोपमध्ये युध्दे सुरू होती. त्यामुळेच फ्रेंच क्रांती फ्रान्स पुरतीच मर्यादित न राहता तिच्या तत्त्वांचा युरोपमध्ये प्रसार झाला होता. फ्रेंच क्रांतीमध्ये तत्त्वांची प्रेरणा होती. त्या दृष्टीने या क्रांतीचे महत्त्वपूर्ण परिणाम पुढील प्रमाणे आहेत.

### ३.६.१ राजकीय परिणाम :

१) फ्रेंच क्रांतीने सर्व जुनी राज व्यवस्था बदलून टाकली. वादळाचा प्रभाव समुद्रातील लाटावर पडतो आणि त्यांचे रौद्ररूप दिसून येते. फ्रेंच राज्यक्रांतीने देखील असेच युरोपला प्रभावित केले. रॅम्से म्यूर या इतिहासकाराच्या मते, फ्रेंच राज्यक्रांती ही विश्व क्रांती होती तिचा प्रारंभ १७८९ मध्ये झाला. पण लवकरच ती युरोपात आणि त्या पाठोपाठ संपूर्ण जगात प्रभावित झाली होती.

२) इंग्लंडमधील प्रसिद्ध तत्त्वज्ञ एडमंड बर्क याने सन १७९० मध्ये "Reflection on the French Revolution"हे प्रसिद्ध पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी म्हटले होते की, 'ही क्रांती आपल्याबरोबर भयंकर असा रक्तपात घडवून आणेल. त्याचा शेवट सन १८१५ मध्ये वॉटरलूच्या लढाईत नेपोलियनच्या पतनाने झाला होता.

३) राजकीय संदर्भात थॉमस पेनने लिखाण केले की, 'फ्रेंच राज्यक्रांतीने संपूर्ण युरोपास एक संदेश दिला आहे. फ्रान्समधील जुने प्रशासन समाप्त करण्यासाठी यशस्वीरित्या फ्रेंच राज्यक्रांतीने प्रयत्न केला. फ्रान्समध्ये शतकानुशतके भ्रष्ट शासनापायी जनता भरडली गेली होती. तो अन्याय व अत्याचार क्रांतीच्या रूपाने जनतेने मुळापासून उखडून टाकला.

४) सर्वसाधारण जनतेला शासन करण्यासाठी स्वातंत्र्य,समता, बंधुत्व या त्रयीने नवदिशा दाखविली. या तीन सूत्रांच्या आधारे सर्वसाधारण जनतेने फ्रेंच समाजातील पहिल्या दोन वर्गांना म्हणजे,राजपरिवार, सरदार अमीर-उमराव तसेच धर्मगुरूंना प्रखर विरोध करून नवीन शासन व्यवस्था लागू केली. राजाच्या दैवी अधिकाराच्या सिद्धांताला झिडकारले. राजा हा जनतेचा प्रतिनिधी आहे. आपले मन मानेल तसे शासन करण्यापेक्षा त्यांनी सर्वसाधारण जनतेचे हित, कल्याण नजरेसमोर ठेवून शासन करावे हे शिकविले.

५) फ्रान्समध्ये क्रांतीच्या काळात इतर युरोपीय राष्ट्रांनी त्या देशावर आक्रमण केले. तेव्हा आपल्या देशाचे संरक्षण करावयास हवे ही भावना अगदी तळागाळापर्यंत निर्माण झाली होती. राष्ट्रीय भावनेने प्रेरित झाल्याने जनतेत एक्य निर्माण झाले.

६) फ्रेंच राज्यक्रांतीमुळेच नेपोलियन बोनापार्टचा उदय होऊ शकला. एका सर्वसाधारण घरात जन्मलेल्या नेपोलियनला फ्रान्सचा सम्राट बनण्यास फ्रेंच क्रांतिकारक ठरली. वास्तविक स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्त्वासाठी लढा देणाऱ्या फ्रेंच समाजाने नेपोलियन बोनापार्टचे अधिपत्य पत्करले. आपल्या राष्ट्रास तारणारी योग्य व्यक्ती म्हणजे नेपोलीयन आहे, अशी खात्री झाल्यानेच जनतेने त्याला सम्राटपद बहाल केले होते.

**आपली प्रगती तपासा :**

१] फ्रेंच राज्यक्रांतीचे कोणतेही दोन राजकिय परिणाम लिहा.

### ३.६.२ आर्थिक परिणाम :

समाजातील सर्व वर्गावर समान कर योजना राबविण्यात आले होते. ठेक्याने कर वसूल करण्याची पद्धत बंद करण्यात आली. वेठबिगार तसेच इतर अमानुष परंपरा रद्द करण्यात आल्या. शिवाय सर्वत्र सारखी वजन-मापे राहावेत म्हणून दशमान पद्धतीला प्रारंभ करण्यात आला. हळूहळू तिचा प्रसार संपूर्ण जगात झाला.

### ३.६.३ सामाजिक परिणाम :

१) समानतेचे तत्व स्वीकृत करण्यात आल्यामुळे विविध राज्यांमध्ये जे वेगवेगळे कायदे प्रचलित होते ते रद्द करण्यात येऊन त्यात एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. नॅशनल कन्व्हेन्शनने त्याप्रमाणे अगोदरच सुरुवात केली होती, पण ती पूर्ण होऊ न शकल्याने अखेर नेपोलियन बोनापार्टने ते पूर्ण केले.

२) क्रांतीने समानतेचे तत्त्व स्वीकृत केल्यामुळे सर्व समाजात समानता आणण्याच्या दृष्टीने उच्चवर्गीयावरही कर बसविण्यात आले होते. पहिल्या वर्गाचे विशेषाधिकार रद्द करण्यात आले.

३) फ्रान्समध्ये प्रजासत्ताक स्थापन झाल्यापासून नवीन कॅलेंडर सुरू करण्यात आले होते. ३० दिवसाचा एक महिना. तर दहा दिवसाचा एक आठवडा ठरविण्यात आला होता. महिन्यांना नावेही पशु, निसर्गाची देण्यात आली होती. वर्षाच्या शेवटी पाच दिवस अतिरिक्त ठरविण्यात आले होते.

४) फ्रान्समध्ये राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देण्यावर भर देण्यात आला होता. डान्टनने राष्ट्रीय शिक्षण देण्यास सुरुवात करावी, अशी कल्पना मांडली होती. त्याप्रमाणे तंत्र विद्यालय, कायद्याचे शिक्षण, वैद्यकीय विद्या, कला क्षेत्र इत्यादी शिक्षणावर भर देण्यात आला होता.

५) रुसने समानतेचा सिद्धांत मांडला होता. त्यातून समाजवादाला प्रारंभ झाला. गरीब-श्रीमंत असा भेदभाव नसलेला नवसमाज रोबेस्पियरला निर्माण करावयाचा होता.

**आपली प्रगती तपासा :**

१] फ्रेंच राज्यक्रांतीचे कोणतेही दोन सामजिक परिणाम स्पष्ट करा ?

### ३.६.४ धार्मिक परिणाम :

फ्रेंचक्रांतीनंतर श्रीमंत धर्मगुरूचे सर्व अधिकार समाप्त करण्यात आले. चर्चची इस्टेट जप्त करण्यात आली. त्यांचे धार्मिक कर रद्द करण्यात आले.फ्रेंच राज्यक्रांतीमुळे आता धर्मगुरूवर फ्रान्स या राष्ट्राचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्यांना राज कोषातून सरळ पगार मिळू लागल्यामुळे त्यांना आपल्या राष्ट्राशी प्रामाणिकपणे राहू अशी शपथ घ्यावी लागे. धार्मिक क्षेत्रातील हे फार मोठी परिवर्तन होते.

### ३.६.५ नेपोलियन बोनापार्टचा उदय :

नेपोलियन बोनापार्टला 'क्रांतीचे अपत्य'म्हणून संबोधले जात होते. कारण क्रांतीनंतरच्या अराजक व अपयशामधूनच नेपोलियनचा उदय झाला होता. दहशतवादी राजवटीमुळे प्रचंड हिंसाचार घडून आला होता. युरोपीय राष्ट्रांनी फ्रान्सवर आक्रमण केले. अशा स्थितीत घटना परिषदेच्यावतीने संचालक मंडळाची स्थापना करण्यात आली. या दुबळ्या मंडळचा फायदा घेऊन नेपोलियन बोनापार्ट १७९९ मध्ये सत्ता हस्तगत केली. सुई राजवटीपेक्षाही त्यांने मोठ्या प्रमाणात सत्तेचे केंद्रीकरण केले होते. ज्या लोकशाही मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी क्रांतीने ऐवढा आटापिटा केला, ती मुल्येच नेपोलियनच्या उदयाने नेस्तनाबुत झाली. हे क्रांतीचे मोठे अपयश होते.

### ३.६.६ फ्रेंच क्रांतीचा जागतिक प्रभाव :

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, समाजवाद, मूलभूत हक्क, प्रजासत्ताक शासन पद्धती आणि जनमताचे सार्वभौमत्व व सत्ता विभाजन ह्या क्रांती मूल्याचा नंतर जगभर प्रसार झाला. जर्मनी, इटली, स्पेन, पोर्तुगाल, पोलंड, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम व बालकंन प्रदेशातील राष्ट्रवादी लढ्याला फ्रेंच क्रांतीची मोठी प्रेरणा मिळाली होती. आशिया-आफ्रिकेतील राष्ट्रीय

चळवळीलाही प्रोत्साहन मिळाले. अन्यायाविरुद्ध प्रतिकार ,मूलभूत हक्काचे रक्षण व समुपदेशन प्रस्थापना या महत्त्वपूर्ण बाबी फ्रेंच क्रांतीने जगाला दिल्या आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१] नेपोलियन बोनापार्टला 'क्रांतीचे अपत्य'म्हणून संबोधले जाते, थोडक्यात माहीती लिहा.

## ३.७ सारांश

फ्रेंचक्रांतीने राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण परिवर्तन घडविल्याचे हे अभ्यासाअंती लक्षात येते. फ्रेंचक्रांतीने फ्रान्सचा कायापालट केला आणि क्रांती विचारांचा युरोप व जगात प्रसार झाला. या घटनेमुळे असंख्य राष्ट्रवादी लढ्याला प्रेरणा मिळाली. फ्रेंचक्रांतीमुळे जगात फार मोठे विचार मंथन सुरू झाले व त्यामुळे जुनी व्यवस्था मोडीत निघाली. मानवी इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना होती. विचारवंताचे भक्कम अधिष्ठान तिच्या मुळाशी होते. तिने नवीन मुले व विचारांची रुजवणूक केली. विविध क्रांतिकारी नेत्यांनी केलेले भाषण चिंतनीय ठरते. व्हॉल्टेअरने मध्ययुगीन व्यवस्थेवर कोरडे ओढले. रुसोने सामाजिक कराराचा सिद्धांताद्वारे जनमताच्या सार्वभौमत्वाचे महत्त्व विषद केले. मॉन्टेस्क्यूने सत्ता विभाजनाच्या तत्वाचा पुरस्कार करून लोकशाही मूल्यांची रुजवणूक केली. मूलभूत हक्काच्या जाहीरनाम्याने तर मानवतावादाचा आदर्श जगासमोर ठेवल.

## ३.८ प्रश्न

१) फ्रेंच राज्यक्रांतिची कारणे लिहा.

२) फ्रेंच राज्यक्रांतीच्या विविध घटनाबद्दल सविस्थर माहीती लिहा.

३) इस्टेट जनरल सभेची कमगिरी लिहा.

४) नेपोलियन बोनापार्ट बद्दल माहीती लिहा.

५) फ्रेंच राज्यक्रांतिचे विविध परिणाम लिहा.

## ३.९ संदर्भ


- आवटे लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.
- गाडगीळ  पां. वा. रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१.
- डॉ. आठल्ये वि.भा. आधुनिक जगाचा इतिहास, नागपुर, २०१०.
- प्रा. दीक्षित नी.  सी., पाश्चिमात्य जग, नागपुर, जून २००५ .
- डॉ.वैद्य सुमन, आधुनिक जग, नागपुर, २००२.
- डॉ. काळे म. वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २००१.

- प्रा. जोशी पी. जी.,अर्वाचीन यूरोप,नांदेड, २००८.
- डॉ. जैन हुकमचंद, डॉ. माथुर, कृष्णचंद्र, आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०१९.
- डॉ. कठारे अनिल, आधुनिक जगाचा इतिहास, जळगांव, २०१५.
- Carr. E. H. The Bolshevik Revolution, 3 Vols., London, 1961-64.

*****

munotes.in

# ४

# रशियन राज्यक्रांती

**घटक रचना**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ पार्श्वभूमी

४.३ रशियन राज्यक्रांतीची कारणमीमांसा

४.४ कृषी व उद्योगधंदे

४.५ साम्यवादी तत्वज्ञान

४.६ रशिया-जपान युद्ध (इ.स. १९०४-१९०५)

४.७ इ.स. १९०५ चीक्रांती

४.८ १९०५ च्या क्रांतीचे महत्व

४.९ ऑक्टोबर घोषणा ( ३० ऑक्टोबर १९०५)

४.१० पहिले महायुद्ध व रशियातील झारशाहीचा शेवट

४.११ बोल्शेव्हिक राज्यक्रांती १९१७

४.१२ हंगामी सरकार

४.१३ नोव्हेंबर क्रांती (इ. स. १९१७)

४.१४ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम

४.१५ सारांश

४.१६ प्रश्न

४.१७ संदर्भ


munotes.in

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

१) १९०५ ची क्रांती का झाली हे समजेल.

२) १९०५ या क्रांती मागची कारणे व परिणाम या विषयी माहिती मिळेल.

३) १९१७ च्या बोल्शेविक क्रांतिविषयी माहिती मिळेल.

४) १९१७ च्या क्रांती मागची कारणे समजतील.

५) १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीतील लेनिनची भूमिका या विषयी माहिती मिळेल.

## ४.१ प्रस्तावना

पॅसिफिक समुद्रापासून ते थेट बाल्टिकसमुद्र व काळया समुद्रापर्यंत पसरलेले रशियन राष्ट्र हे एका सार्वभौम सत्तेखाली जगातील सर्वात मोठे राष्ट्र म्हणून समजल्या जाते. जगाच्या भूपृष्ठाचा १/६ भाग व्यापणारा रशिया हा देश इतर देशापेक्षा प्रादेशीक दृष्ट्या विशाल आहे.

रशियाच्याच नव्हे तर संपूर्ण विश्व इतिहासाला कलाटणी देणारी क्रांती रशियात सन १९१७ साली घडली. परंतु त्यापूर्वी कित्येक वर्ष या क्रांतीची पार्श्वभूमी रशियामध्ये तयार होत होती. सामाजिक असंतोषाचा उद्रेक सशस्त्र उठावाच्या रुपाने होत होता. मात्र त्या उठावाची कुठल्याही प्रकारे वैचारिक प्रेरणा नव्हती.

पहिल्या महायुद्धाच्या अंतीम कालखंडात रशियात साम्यवादी क्रांती घडून आली होती. आधुनिक जगाच्या विश्व इतिहासात सन १९१७ च्या या रशियन क्रांतीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. तर त्यातील राज्यसंस्थेत अर्थ रचनेत व समाज व्यवस्थेत त्यामुळे आमूलाग्र बदल घडून आले आहेत. एवढेच नव्हे तर पाश्चिमात्यांची संस्कृती व जीवन मुले त्यांची आर्थिक रचना, शासन प्रणाली आणि राजकीय व सामाजिक संस्था या सर्वांना जबरदस्त आव्हान रशियन क्रांतीने दिले आहे. अतिरिक्त मूल्य, अधिकाधिक उत्पादन आणि आर्थिक मंदी यांचे दुष्टचक्र आणि कामगार वर्गाच्या हुकूमशाहीद्वारा निर्माण व्हायचा वर्गविरहित समाज, असे नवे विचार प्रवाह या रशियन क्रांतीने प्रस्तूत केले आहे. मानवी जीवनातील असंतोषाची व दुःखांची अगदी निरनिराळ्या स्वरूपाची तर्कशुद्ध अशी कारणमीमांसा जगापुढे ठेवून त्या दुःखांच्या परिमार्जननार्थ नवा मार्ग या क्रांतीने जगापुढे घालून दिला आहे. राजकीय हक्क व राजकीय स्वातंत्र्य याद्वारा मानवी दुःखांचे निराकरण होऊ शकेल, ही तत्कालीन कल्पना फोल ठरून समता व सहकार्य यावर आधारित विश्वबंधुत्वाचा नवा आदर्श या क्रांतीने मानवापुढे ठेवला आहे. विचारांची नवी दालने खुली केली आहे. या क्रांतीला आधारभूत ठरली तत्वप्रणाली. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपातील राष्ट्रात व पैरात्य प्रदेशात, चीनमध्ये साम्यवाद आता रुजलेला असून आफ्रिका व आशिया खंडातील नवोदित राष्ट्र व ही साम्यवादी तत्त्वप्रणालीचा पगडा आज दिसून येत आहे. त्या दृष्टीने या क्रांतीची प्रक्रिया आजही चालूच आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. विश्व इतिहासाला अगदी निराळे वळण लावण्याच्या दृष्टीने रशियातील क्रांती, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती यापेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रभावी ठरली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून पश्चिम युरोपातील उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे आणि फ्रेंच क्रांतीमागील विचार प्रवाहांचे लोन रशियन बुद्धिजीवी वर्गात पसरू लागले होते. ते विचार दडपून टाकण्याचा झारने प्रयत्न केला होता. पण तो सफल झाला नाही. नवे विचार साहित्याच्या माध्यमातून मध्यम वर्गापर्यंत पोहोचू लागले होते. झारच्या दडपशाहीला आणि प्रतिगामी धोरणाला प्रत्युत्तर म्हणून सळसळत्या रक्ताच्या काही सुशिक्षित तरुणांनी झार विरुद्ध शस्त्र उचलेले. रशियात दहशतवादी चळवळ सुरू झाली. परंतु मुठभर अधिकाऱ्यांची अगर झारची हत्या करून पुन्हा रशियातील समस्या सुटणार नाहीत, याची जाणीव काही विचारवंताना झाली. काही विचारवंत पश्चिम युरोपात प्रचलित असलेल्या स्वप्नाळू समाजवादाकडे आकृष्ट झाले होते. या शतकाच्या अखेरीस काही

विचारवंताना स्वप्नाळू समाजवाद ही रशियाच्या दृष्टीने तोकडा वाटला आणि ते मार्क्सप्रणीत साम्यवादाच्या आधारे रशियाचे प्रश्न सोडवता येतील. परंतु त्यासाठी रशियातील कामगार व शेतकरी ह्या दोन मोठ्या शोषित वर्गात साम्यवाद विचार करून, त्यांना क्रांतीला प्रेरित करावे लागले. अशा ठाम मताचे बनले. या वैचारिक जाणिवेतून रशियन क्रांतीची ज्योत पेटल्या गेली. रशियातील कामगार वर्गात क्रांतिकारी विचार कसे प्रवृत्त झाले, त्यातील तरुणांनी कसा लढा दिला, याबद्दलचे चित्रण मॅक्झिम गॉर्की ह्या जगप्रसिध्द कादंबरीकारांच्या 'मदर'या जगप्रसिद्ध कादंबरीत केलेले आढळते. रशियातील ह्या क्रांतिकारी विचारांच्या वाटचालीचा आढावा आपण या घटकात घेणार आहोत.

## ४.२ पार्श्वभूमी

रशियात सामाजीक, आर्थिक विषमता अजून झार घराण्याची राजकीय सत्ता होती. ते चैनी, विलासी जीवन जगत असून लोकांच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे झारविरूद्ध सर्वत्र वातावरण निर्माण झाले. लोनिनच्या नेतृत्वाखाली रशियन राज्यक्रांती १९१५ मध्ये घडून आली त्याची विविध कारणे आहेत.

## ४.३ रशियन राज्यक्रांतीची कारणमीमांसा

### ४.३.१ सामाजिक कारणे :

रशियामध्ये दोन वर्ग अस्तित्वात होते. एक शेतकरी म्हणजे नरोद. हा वर्ग ९०% होता. दोन अमीर-उमराव, जमीनदार, व्यापारीवर्ग, वगैरे हा वर्ग मूठभर असून रशियाची संपूर्ण सत्ता त्यांच्या ताब्यात एकवटली होती. रशियात गुलामीची पद्धत अस्तित्वात होती. तेथे शेती जुन्या पारंपारिक पद्धतीने करीत. जमीनदाराची सेवा करणे व त्यांची शेती करणे हेच गुलामाचे महत्त्वपूर्ण काम समजल्या जात होते. जमीनदार वर्ग गुलामावर जुलम करू लागले होते. त्यामुळे शेतकरी (गुलाम) पलाईन करू लागले होते. अशा पलाईन करणाय्रा शेतकरी विरुद्ध कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येऊ लागली. भूदासाचे दोन प्रकार होते. एक सरकारी जमिनीवर राहणारे भूदास. दोन अमीर-उमराव यांच्या जमिनीवर राबणारे भूदास. दोघांचेही जीवन कष्टमय व श्रमप्रधान होते. सरकारी अधिकारी व अमीर-उमराव दोघेही भूदासांना आपलीच मालमत्ता समजत होते. फक्त जिवंत राहण्यासाठी त्यांना खायला अन्न दिल्या जात होते. शेतात कष्ट करणे आणि उमरावांचे गुरेढोरे राखणे, परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करणे इत्यादी भूताचे काम होते. आठवड्यातील चार ते सहा दिवस भूदास जमीनदाराच्या शेतावर काम करीत होता. त्यामुळे त्यांच्या वाटेला जो काही जमिनीचा तुकडा असे त्यावर काम करण्याची ताकद त्यांच्यात राहत नसे. तो उपाशी राहण्याची कित्येकदा त्यांच्यावर वेळ येत असे. तसेच त्याला जमीनदाराच्या मालकीच्या खाणीवरही काम करावे लागत होते. जमीनदार त्यास अमाणूस मारहाण करीत होते. त्याची खरेदी विक्री करीत होता. स्वतःच्या झोपड्या गुलाम वर्ग स्वतः उभारी तसेच स्वतःचे कपडे ही तो स्वतः विनीत असे. समाजातील दुसरा वर्ग अमीर उमरावाचा होता. चैन-ऐष-आरामात त्याचा काल व्यतीत होत असे. राजा म्हणेल ती पूर्व दिशा अशी परिस्थिती निर्माण झाली

होती. कायदा करणे, त्यात बदल करणे, न्यायविषयक बदल करणे, इत्यादी सर्व त्यांच्याच हातात एकवटले होते. राजाला राज्यकारभार करण्यासाठी स्टेट कौन्सिल ही एक महत्त्वपूर्ण संस्था रशियामध्ये होती. झार अलेक्झांडर पहिल्याने सन १८०१ मध्ये तिची स्थापना केली होती. स्टेट कौन्सिल मध्ये सर्व निर्णय झार घेत असे. रशियामधील शासन विषयक दुसरी संस्था म्हणजे सिनेट ही होती. ती पिटर इ. ग्रेट या झारने स्थापन केली होती. त्यात खास खटलेही चालविण्यात येत होते. इ. स. १८०२ मध्ये पहिल्या अलेक्झांडरने मंत्री मंडळ ही संस्था स्थापन केली होती. प्रत्येक मंत्री झारला जबाबदार ठरवण्यात येत असे. धर्मसभा प्रमुखाला मंत्र्याचा दर्जा मिळाला होता. तथापि एकूणच या शतकाच्या मध्यात चर्च ही ही श्रीमंत संस्था राहिली नव्हती. कारण चर्चच्या ताब्यातील बरीच मालमत्ता इतरत्र वळविण्यात आली होती. सरकारकडून चर्चला जो पैसा मिळत होता, त्यातून चर्चचा खर्च भागविला जात नव्हता. त्यामुळे परगण्यातील धर्मगुरुला लोकांकडून मिळालेल्या पैशावरच गुजराण करावे लागत होते. त्यामुळे भ्रष्टाचार होऊ लागला होता.

### ४.३.२ आर्थिक कारणे:

रशियातील आधुनिकतेच्या अभावामुळे दर एकरी उत्पादन हे इंग्लंड, डेन्मार्कपेक्षा १/४ ही नव्हते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रशियात औद्योगिक क्रांती झाली होती. औद्योगिकरणाच्या समस्या रशियालाही भेडसावू लागल्या होत्या. मॉस्को, सेंटपिटर्सबर्ग वगैरे शहरांमध्ये अधिक औद्योगिकरण झाल्यावर, खेड्यांमधून मजुरांचा लोंढा या वरील शहरांमध्ये कामा निमित्त स्थलांतरीत होऊ लागला होता. त्यावेळी भांडवलदारांनी त्यांना पिळून काढले होते. आधीच दारिद्र्य त्यात पुन्हा नव्याने जीवन जगण्यासाठी आलेल्या या मजूर वर्गाला कारखानदारांनी अन्यायाने कामाला जुंपल्यामुळे कामगार वर्गाची स्थिती अतिशय हलाखीची बनली होती. त्यांना संप करण्याचा देखिल अधिकार नव्हता. त्यांच्या आरोग्याकडे, शिक्षणाकडे, सुख-सुविधाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते. त्यामुळे सहाजिकच कामगार वर्गात असंतोष निर्माण होणे अपरिहार्य होते. सन १८६१ मध्ये झार अलेक्झांडर दुसरा याने भुदासांची मुक्ती करण्यासंबंधीचा कायदा पास केला होता. त्यानंतर १३जानेवारी, १८६४ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था संबंधित झेम्सत्वो हा कायदा पास केला. सन १८७० मध्ये स्थानिक शासन पद्धतीची पुनर्रचना करण्यात आली होती. शैक्षणिक क्षेत्रातही झार अलेक्झांडर दुसरा यांने सुधारणा घडून आल्या होत्या. पण तरीही रशियातील प्रश्न सुटले नाहीत. झार अलेक्झांडर दुसऱ्याच्या काळात दहशतवादी संघटना निर्माण झाल्या होत्या.

### ४.३.३ राजकीय कारणे :

रशियामध्ये शासन व्यवस्था पार पाडण्यासाठी रशियाचे पुढील सहा विभाग करण्यात आले होते.

१) रशिया, २) फिनलंड, ३) बाल्टिक राज्ये, ४) पोलीस प्रदेश, ५) कॉकेशस प्रदेश, ६) सैबेरिया, या प्रत्येक विभागातील शासन पद्धती ही भिन्न भिन्न होती. सरकारी अधिकारी वर्ग सामान्य जनतेला तुच्छ समजत होते. तशीच त्यांची वर्तणूक होती. याच सुमारास रशियात बुद्धीवादी विचारसरणीचा प्रभाव पडू लागला होता. युरोपातील साहित्यिकांच्या लेखनावरून काही विचारवंतांनी रशियाला आधुनिकतेकडे नेण्याचा कसोटीने प्रयत्न केला

होता. रशियातील जुनाट विचार, परंपरा, रूढी नष्ट करून आधुनिकतेचा पाया घालण्याचा सर्वतोपरी प्रथम प्रयत्न मायकेल बाकूनीन याने केला होता. बाकुनिन हा जहालवादी विचारसरणीचा होता. हळू हळू निहिलिस्टांवर मायकेल बाकुनिनचा प्रभाव पडू लागला होता. त्याचाच परिणाम म्हणजे इ.स. १८६६ मध्ये झार अलेक्झांडर दुसऱ्याच्या खुनाचा प्रयत्न झाला होता. त्यामुळे रशियात राजकीय,सामाजिक, वैचारिक व क्रांतिकारक धरपकड सुरू झाली होती. त्यामुळे बरेच निहीलिस्ट देशाबाहेर स्थलांतरित झाले होते. तर बऱ्याच लोकांना सैबेरियात पाठविण्यात आले होते. झारची दडपशाही मोडून काढण्यासाठी त्याचा खून करण्याचा प्रयत्नही सन १८७९ ते १८८० या वर्षी झाले होते. सन १८९१ मध्ये त्यात क्रांतिकारकांना यश मिळाले होते.

### ४.३.३.१ तिसरा अलेक्झांडर (१८८१-१८९४) :

झार अलेक्झांडर दुसऱ्याचा वध झाल्यानंतर झार अलेक्झांडर तिसरा हा रशियाचा झार बनला होता. त्याने रशियातील दहशतवाद चिरडून टाकण्याचे ठरविले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही फ्रेंच राज्यक्रांतीची देणगी रशियातही पकड घेण्याचा प्रयत्न करत होती. तथापि अलेक्झांडर तिसऱ्याने तिच्याविरोधात एककेंद्री शासनव्यवस्थेवर भर दिला. रशियात राजसत्ता मजबूत करण्याचे धोरण झार अलेक्झांडर तिसऱ्याने आखले होते. दुसऱ्या अलेक्झांडरने जनताभिमुख स्वीकृत केलेली घटना त्याने रद्द केली होती. दहशतवाद्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली होती. रशियातील क्रांतिकारकांची संघटना "विल ऑफ दि पीपल" चिरडून टाकली. पुन्हा जमीनदार वर्गाला महत्त्व देण्यावर भर देण्यात आले होते. सन १८९० मध्ये "झेम्स्त्वो" मध्ये जमीनदाराचा भरणा करण्यात आला. सर्वत्र रुसिकरण करण्याचे धोरण राबविले. पोलीस राष्ट्रवाद्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. ज्यूंवर निर्बंध घालण्यात आले. ज्यूंनी ठराविक ठिकाणीच राहावे, ग्रामीण भागात राहू नये, असे नियम करण्यात आले होते. एवढेच काय ज्यूंच्या शिक्षणावर सुद्धा आकडेवारी ठरवून देण्यात आली. झार अलेक्झांडर तिसऱ्याच्या या दडपशाही धोरणामुळे लोकांमध्ये, जनतेमध्ये तथापि सुशिक्षित मध्यमवर्गामध्ये क्षोभ कमी न होता उलट तो अधिक अधिकच वाढत गेला. परिणामी रशियन क्रांतीला सुरुवात करण्यास मदत झाली.

### ४.३.३.२ झार निकोलस दुसरा (सन १८९४ ते १९१७) :

झार निकोलस दुसऱ्याचा विवाह डार्मस्टाटची राजकन्या ॲलिक्स हिच्याशी झाला होता. विवाह बंधनानंतर ती झारिना अलेक्झांड्रा फेट्रोहना म्हणून प्रसिद्धी पावली होती. ती इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया यांच्या मुलीची मुलगी होती. हिच्या कारकिर्दीची सुरवातच सर्वसामान्यांना दुःखद ठरली. राज्यरोहनाच्या प्रसंगी हजारो नागरिक राजवाड्यासमोर गेले असताना, तेथे झालेल्या चेंगराचेंगरीत २०० माणसे मृत्यू पावली होती. असे असतानाही राजवाड्यात मात्र शाही मेजवानी भरवण्यात आली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात जनतेचा मृत्यू झाल्यानंतर, हे राजा-रानी नृत्य-गायनात मग्न व्हावे, जनतेच्या भावनाकडे लक्ष देऊ नये, ही गोष्ट लोकांना निश्चितच खटकली होती. निकोलस दुसऱ्याच्याही काळात राजा म्हणेल ती पूर्व दिशा हे पूर्वीपासून चालत आलेले धोरण राबविण्यात आले होते. क्रांतिकारकांना दडपून टाकण्यात विशेष भर देण्यात आला होता. शिक्षण क्षेत्रात सरकारचे नियंत्रण ठेवण्यात आले होते. झेम्स्त्वोचे अधिकार कमी करण्यात आले होते. नैसर्गिक

आपत्तीच्या काळासाठी झेम्स्त्वो धान्यसाठा करीत असे. तो अधिकार तिच्या हातातून काढून घेण्यात आला होता. झारला अनुकूल असणाऱ्या लोकांचा सार्वजनिक क्षेत्रात भरणा करण्यात आला. धार्मिक बाबतीतही ज्यूंचा छळ करण्यात येऊ लागला. ज्यूंचा राहण्याच्या ठिकाणावर रशियात हल्ले होऊ लागले. त्यामुळे अनेक ज्यूंनी रशिया सोडला व ते अमेरिकेत स्थलांतरित झाले.

**आपली प्रगती तपासा**

१] रशियन क्रांतीस राजकिय कारणे कारणीभुत ठरली, स्पष्ट करा.

## ४.४ कृषी व उद्योगधंदे

झार अलेक्झांडर दुसऱ्याने जरी भूदास मुक्ततेचा कायदा पास केला असला तरीही, शेतकऱ्यांची दयनीय अवस्था संपली नव्हती. अनेक जमीनदारांनी आपापल्या जमिनी विकून ते शहरात राहू लागले होते. त्यामुळे त्यांच्या जमिनी सट्टेबाजारांच्या ताब्यात जाऊ लागल्या. जमिनीचा उपयोग शेतीशिवाय इतर कारणासाठी करण्यात येऊ लागला. लोकसंख्यावाढीमुळे शेतकऱ्यांचे उठाव ठिकठिकाणी होऊ लागले होते. इ. स. 1890 नंतर रशियातील औद्योगिककरण्यास गती मिळाली होती. औद्योगिकरणाच्या समस्या भेडसावू लागल्या होत्या. जुने हस्तव्यवसाय ठप्प झाले. खेड्यांमधून मनुष्याचा लोंढा शहराकडे स्थलांतरित होऊ लागला होता. ते कारखान्यांमध्ये अतिशय तुटपुंज्या पगारावर काम करू लागले होते. कामगारांना राहण्यासाठी घराऐवजी खुराडे तयार करण्यात आली. मजुरांच्या आरोग्याची, शिक्षणाची दखल भांडवलदारांनी कधीच घेतली नाही. परिणामी भांडवलदाराविरुद्ध संघटना स्थापन होऊ लागल्या. सन १८९७ पर्यंत रशियातील २०लाखांहून अधिक लोकांनी खेड्यांचा त्याग केला होता. ते शहरात स्थलांतरित झाले. राष्ट्रीय उत्पादन, बाजारपेठा तसेच वस्तूंच्या किमती निश्चितच वाढल्या होत्या. त्याच्यावर सरकारचे कुठल्याही प्रकारचे नियंत्रण राहिले नव्हते. सरकारने त्यांच्या संबंधित काही कायदे केले नव्हते. कामगारांची पिळवणूक मोठ्या प्रमाणात होऊ लागली होती. त्यांना मिळत असलेल्या तुटपुंज्या पगारामुळे स्त्रिया, मुले कारखान्यात काम करू लागली होते. साधारणत: ११ ते १४ तास मजूर वर्ग काम करीत असे. रशियात संपाना बेकायदेशीर ठरविण्यात आले होते. सरकारने कामगारवर्गाची टिकठिकांनी पोलिसांना पेरून ठेवले होते. सरकारच्या दडपशाहीचा वरवंटा सर्वत्र होऊ लागल्याने कामगारांच्या गुप्त संघटना प्रस्थापित झाल्या होत्या.

## ४.५ साम्यवादी तत्वज्ञान

रशियन राज्यक्रांतीला कार्लमार्क्सच्या साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाने तात्त्विक बैठक दिली होती. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती सर्वप्रथम झाल्यावर, तेथे मजुरांची दैनावस्था झाली होती. कारखानदार वर्ग मजुरांची पिळवणूक करू लागला होता. समाजात भांडवलदार वर्ग व मजूर वर्ग हे दोनच वर्ग निर्माण झाले. या दोघांमध्ये दोन ध्रुवा एवढे अंतर होते. इंग्लंडच्या

पाठोपाठ रशियातही तीच स्थिती औद्योगिकरण झालेल्या युरोपियन राष्ट्रांमध्ये निर्माण झाली. तेव्हा सर्वप्रथम या क्रांतिकारी विचारवंताने आपले विचार मांडले. त्यात सामाजिक क्षेत्रात खाजगी मालमत्ता नष्ट करून समानता प्रस्थापित करण्याचा विचार व्यक्त करण्यात आला होता. सर्वप्रथम बँवूफ या क्रांतिकारी विचारवंतांने आपले विचार मांडले. तसेच बँवूफ प्रमाणेच सेंट सीमाँ, रॉबर्ट ओवेन, लुई ब्ला इत्यादी विचारवंतांनी समाजवाद आणण्यास हातभार लावला होता.

### **४.५.१ कार्ल मार्क्स** :

रशियन राज्यक्रांती घडवून आणण्यास कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान कारणीभूत ठरले. कार्ल मार्क्सने समाजवादाचे सखोल अध्ययन करून लिखाण केले. कार्ल मार्क्स हा मूळचा ज्यू होता. त्याचा जन्म इ.स. १८१८ मध्ये जर्मनीत झाला होता. बर्लीन व बॉन विद्यापीठात शिक्षण झालेल्या कार्ल मार्क्सने अर्थशास्त्र विषयात पीएचडी मिळविली होती. त्याचे विचार अत्यंत जहाल असल्यामुळे लवकरच त्याची जर्मनीतून हकालपट्टी करण्यात आली म्हणून तो फ्रान्समध्ये गेला. तेथुनही त्यांची हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर तो लंडन तेथे गेला. तेथे त्याने ब्रिटिश म्युझियममध्ये अध्ययन करण्यात काळ घालविला. इंग्लंड व जर्मनीतील कामगार वर्गाचे जीवन अत्यंत हलाखिचे आहे हे त्याने जवळून पाहिले होते. त्यातून कार्ल मार्क्सने मार्ग काढण्यासाठी त्याने इ.स. १८४८ मध्ये आपला "कम्युनिस्ट मॅनिफेस्टो" जाहीर केला. त्याने सर्व कामगारांना संघटित होण्याचे आवाहन केले. त्यानंतर इ.स. १८६७ मध्ये "दास कॅपिटल" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात त्याने वर्गसंघर्ष,वर्ग विहीन समाज या कल्पना मांडल्या होत्या. सृष्टीच्या प्रारंभापासूनच समाजात दोन वर्ग आहेत. १) शासित. २) शोषित. शासित वर्ग नेहमीच शोसितांवर जुलूम करीत असतो. प्राचीन काळी राजा व प्रजा असा वर्ग होता. मध्ययुगात जमीनदार,सरंजामदार, रयत असे तिचे रूपांतर झाले. औद्योगीकरण झाल्यावर भांडवलदार-मजूर असा संघर्ष निर्माण झाला. भांडवलदार वर्ग मजुरांवर अन्याय,जुलूम, पिळवणूक करीत असतो. त्यामुळे मजूर हा दिवसेंदिवस दरिद्री बनतो. तर त्याच्याच भरवशावर भांडवलदार वर्ग मात्र श्रीमंत बनतो. त्यासाठी वर्गविहीन समाज निर्माण करणे आवश्यक आहे. विरोधविकासाद्वारे त्यांनी हे तत्त्व मांडले. ज्या समाजात उच्च-नीच्च असे दोन गट राहणार नाही, शासक-शोषित असा भाग राहणार नाही,अशा वर्ग वर्गविहीन समाजाची आवश्यकता आहे. जगातील सर्व कामगार, मजूर जोपर्यंत संघटित होणार नाही, तोपर्यंत असा वर्गविहीन समाज होणे शक्य नाही असे मत कार्ल मार्क्सने मांडले.

रशियामध्ये मार्क्सच्या क्रांतिकारी विचारांचा लवकरच प्रभाव पडू लागला. इ.स. 1898 मध्ये रशियात समाजवादी लोकशाही मजूर पक्षाची (Russian Social DemaocraticLabour Party) स्थापना झाली.

### **४.५.२ व्लादिमिर इलिच उल्यानोव्ह लेनिन (इ.स.१८७०-१९२४)**:

लेनिन जन्मला आला नसता तर रशियन राज्यक्रांती झालीच नसती. असे लेनिन बद्दल म्हटले जाते. लेनिनचा जन्म इ.स. १८७० मध्ये एका उच्च कुटुंबात झाला होता. लेनिनरशियाचे क्रांतीकारी नेते व विचारवंत होते. यांचे मूळ नांव व्लादिमिर इलिच

उल्यानोव्ह असे होते. सोवियेत संघाच्या पहिल्या सरकारचे अध्यक्ष असलेले लेनिन सोवियेत सोशालिस्ट बोल्शेविक पार्टीचे (नंतरच्या सोवियत कम्युनिस्ट पार्टीचे) नेते होते. रशियन राज्यक्रांतीनंतर इ.स. १९१७ रोजी त्यांनी सत्ता हस्तगत केली होती. कम्युनिस्ट विचारसरणीमध्ये त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा मृतदेह रशियाच्या लाल चौकात जतन केला आहे. लेनिन हे कुशाग्र बुद्धिमत्तेचे साम्यवादी विचारवंत होते. त्यांचे कार्य विश्व इतिहासात खरोखरच अतुल्य व नेत्रदीपक आहे.

लिनिनचे कुटुंबीय जहालवादी विचारसरणीचे होते. सन १८८१ मध्ये झार अलेक्झांडर द्वितीयच्या खुनाच्या आरोपावरून लेनिनच्या भावाला फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. लेनिनलाही विद्यार्थ्यांची चळवळ केल्याबद्दल महाविद्यालयातून हद्दपार करण्यात आले होते. तेंव्हा त्याने दुसग्रा महाविद्यालयातून कायद्याची पदवी घेतली होती. या काळात त्याने "दास कॅपिटल" चे वाचन केले. लेनिनला सहा भावंडे होती. त्यात त्याचा तिसरा नंबर होता. त्याच्या वडिलांची नोकरी वरिष्ठ दर्जाची होती. शाळेत तो हुशार म्हणून नावाजलेला होता. इ.स. १८८६ मध्ये त्याच्या वडिलांचा मृत्यू झाल्यावर दुसऱ्याच वर्षी म्हणजे इ.स. १८८७ मध्ये त्याचा भाऊ अलेक्झांडर याला फाशीची शिक्षा झाली. त्यावेळी तो कजाग विद्यापीठात दाखल झाला होता. कायदा व अर्थशास्त्र हे त्याने विषय घेतले होते. तेथे त्याने आपल्या भावाच्या फाशीच्या शिक्षा विरोधात आंदोलन केले म्हणून त्यांची महाविद्यालयातून हकालपट्टी करण्यात आली. तरीही महाविद्यालयात क्रांतिकारकांचा भाऊ म्हणून त्याला प्रवेश मिळाला नाही. शेवटी खाजगी विद्यार्थी म्हणून पीटर्सबर्ग विद्यापीठातून परीक्षेस बसण्यास त्याला मंजुरी मिळाली. परीक्षेत तो प्रथम क्रमांकाने पास झाला.

त्यातील प्रचलित राज्य व्यवस्था उलथून टाकण्यासाठी लेनीन ने इसवी सन १९२० मध्ये रशिया बाहेर पडला. बाहेर राहून त्याने क्रांतिकार्य केले होते. रशियामधील लोकांमध्ये त्याने समाजवादाचे तत्त्वज्ञान रुजविले होते. लेनिनवर मार्क्सवादाचा विलक्षण प्रभाव पडला होता. रशियाला मार्क्सवादच तारेल, ही त्याची खात्री झाली होती. तशा प्रकारच्या लिखाणास इ.स. १८९३ पासून त्याने सुरुवात केली. त्याचे लेखन अत्यंत जहाल स्वरूपाचे होते. इ.स. १८९५ मध्ये तो युरोपातून रशियात परतला. एक वृत्तपत्र चालविण्याची त्याची योजना होती. पण नंतर त्याला अटक झाली. इ.स. १८९७ मध्ये त्याला सैबेरियात हद्दपारही करण्यात आले. तो शिक्षा भोगत असताना, कृप्सकाया नामक स्त्रीशी त्याची भेट झाली होती. सन १८९८ मध्ये त्याने कृप्सकायाशी विवाह केला होता. सन १९०० नंतर त्याने रशिया बाहेर स्वित्झर्लंड येथे राहण्याचे ठरविले. तेथे 'इस्क्रा' (ठिणगी) नामक वृत्तपत्र सुरू केले. इ. स. १९०३ मध्ये सोशल डेमोक्रॅटिक पक्षात फूट पडली. १) बोल्शेविक २) मेन्शेविक. लेनिनने बोल्शेविकांचे नेतृत्व केले. वक्तृत्व हा त्याच्यातील एक महत्त्वाचा गुण होता. मार्क्सच्या विचारसरणीचा त्याच्यावर जबरदस्त प्रभाव पडला होता. इ.स. १९०५ मध्ये तो रशियात परतला. परंतु इस १९०६ मध्ये पुन्हा रशिया बाहेर पडला. सन १९१७ पर्यंत तो रशिया बाहेरच होता.

**आपली प्रगती तपासा**

१] लेनिन जन्मला आला नसता तर रशियन राज्यक्रांती झालीच नसती,स्पष्ट करा.

## ४.६ रशिया-जपान युद्ध (इ.स. १९०४-०५)

मांचूरिया-कोरियावरून रशिया जपान यांच्यात सतत मतभेद वाढत होते. रशियाचा कोरियावर पहीले पासून डोळा होता. हे दिसून येताच इ.स. १९०३ च्या शेवटी जपानने रशियाविरुद्धच्या युद्धाची तयारी सुरू केली होती. जपानने ८ फेब्रुवारी १९०५ रोजी रशियाच्या नौदलावर हल्ला केला. त्यानंतर दोनच दिवसांनी जपानने रशिया विरुद्ध युद्ध पुकारले होते. युद्धात जपानने रशियाचा एकामागोमाग एक असा दारुण पराभव केला. शेवटी ऑगस्ट १९०५ मध्ये अमेरिकेतील 'पोर्टस्माऊथ'येथे तह झाला. पोर्टस्माऊथ तहानुसार रशियाने पोर्टआर्थर, लिओत्तुंग द्वीपकल्पावरील आपल्या अधिकारांना तिलांजली दिली. पोर्टआर्थर ते चांगचूंगपर्यंतचा 'चायनीज ईस्टर्न रेल्वे मार्ग'सकालीन बेटे यावरील आपला अधिकार रशियाने सोडून दिला. रशियाचा दणदणीत पराभव झाला होता.

## ४.७ इ. स. १९०५ ची क्रांती

इस १९०४ मध्ये रशिया-जपान युद्ध झाले. त्यात रशिचा दारूण पराभव होऊ लागल्यामुळे असंतोष वाढतच गेला होता. जपान विरुद्ध लढा तडकाफडकी बंद करणे रशियाला आवश्यक वाटले होती. त्याचे प्रमुख कारण १९०५ मध्ये रशियात झालेली क्रांती होय. झार निकोलसच्या रुसीकरण्याच्या धोरणामुळे अल्पसंख्यांक प्रजा सरकारला तीव्र विरोध करू पाहत होती. एक केंद्री, अकार्यक्षम व लोकाभिमुख झारशाही विरुद्धचा असंतोष, मार्क्सप्रणित समाजवादी तत्त्व प्रणालीचा प्रचार व प्रभाव राजकीय व सामाजिक, आर्थिक सुधारणांची मागणी, क्रांतिकारकांनी सुरू ठेवलेले दहशतवादी सत्र, सरकारी अधिकाऱ्यांच्या हल्यामुळे १९०५ क्रांतीला वातावरण पोषक झाले. सन १९०५ मध्ये सेंट पीटर्सबर्ग मध्ये हजारो कामगारांचा संप घडवून आणण्यात आला होता. संपामुळे उद्योगधंद्यावर खूप परिणाम घडून आले होते. कामगारांच्या मागण्या पुढील प्रकारच्या होत्या-

१) कामगारांच्या कामाचे ८ तास हवे,

२) मजुरांना किमान वेतनमान देण्यात यावे,

३) कामगारांना भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य देण्यात यावे,

४) घटनासमितीचे आयोजन करण्यात यावे.

पण कामगारांच्या मागण्या दडपून टाकण्यात आल्या. त्यांचा स्पोट २२ जानेवारी १९१५ रोजी झाला. हा दिवस रशियाच्या इतिहासात रक्तरंजित रविवार म्हणून पाळला जातो.राज्यशासन खिळखिळी झाली. संपवाल्यानी आणि फादर गँपोन यांच्या नेतृत्वाखाली निकोलसला आपल्या मागण्यासंबंधी अर्ज केला. शांततेने आलेल्या या मोर्च्यावर झारच्या राजवाड्यापाशी बेफाम गोळीबार झाल्याने शेकडो लोक मरण पावले होते. या रक्तरंजित रविवारची बातमी देशभर पसरताच सर्व संप आणि राजकीय निदर्शने यांना ऊत आला. देशात माजलेला प्रचंड सार्वत्रिक प्रक्षोभ, जपान युद्धात झालेल्या पराभवामुळे, रशियाच्या साम्राज्यवादाला धोका निर्माण झाल्यामुळे, झारशाहीला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी



munotes.in

काहीतरी करणे भाग होते. झार दुसरा निकोलसने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारात वाढ केली. वैयक्तिक स्वातंत्र्याचा हमी दिली. अशा जुजबी सुधारणा देऊ केल्या. पण यामुळे कोणत्याच गटाचे समाधान झाले नाही. प्रत्येक क्षेत्रातील कामगार संप करू लागला. जमीनदारावर हल्ले होऊ लागले. धान्याची दुकाने लुटली जाऊ लागली. या सर्व वादळामुळे पुढे नमते घेण्याची निकोलसने ठरवले.

**आपली प्रगती तपासा**

१] इ.स. १९०५ च्या क्रांतीचे थोडक्यात वर्णन करा.

## ४.८ १९०५ च्या क्रांतीचे महत्व

१९०५ क्रांतीच्या अपयशास अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या होत्या. प्रभावी नेतृत्वाचा अभाव, लष्कराचे क्रांतिकारकका बरोबर असहकार्य, झार शाहीचा प्रभाव, क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचा मनात तीतका न झालेला प्रसार, यामुळे १९०५ ची क्रांती अपयशी झाली असली तरी संघटित होण्याचे महत्त्वही क्रांतिकारकांना कळले. सोविएतच्या रूपाने कामगारांचे संघटन नेतृत्व उदयास आले. क्रांतीचा अनुभव कामगारांना मिळाला. जनतेच्या क्रांतीसाठी उपयुक्त ठरला. झारचा कर्मठपणा बाजूला सारत जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले. लोकप्रतिनिधीगृह म्हणजे ड्यूमा स्थापण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला होता. झारचे वर्चस्व जरी पूर्वीप्रमाणेच कायम राहिले तरी रशियन जनतेत जागृती घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या क्रांतीमुळे झाले. सन १९१७ च्या क्रांतीची जणू ही रंगीत तालीमच ठरली आणि यामुळेच रशियाच्या इतिहासात या क्रांतीला महत्व प्राप्त झाले आहे. शेकडो वर्षे राज्य करणाऱ्या निरंकुश झारशाहीची या घटनेनंतर शेवटाकडे वाटचाल सुरू झाली.

### ४.८.१ फादर गपोन :

याने सन १९०३ -०५ या काळात कामगार वर्गात जागृती निर्माण केली. त्यांच्यात सुधारणा घडून यावी म्हणून ११ एप्रिल १९०४ रोजी कामगार सोसायटीची स्थापना करण्यात आली. गपोन तिचा अध्यक्ष बनला. लवकर त्याला कामगाराचा पाठिंबा मिळाला होता. ११ जानेवारी १९०५ रोजी पुतिलोव फॅक्टरीतील कामगार संपावर गेले. त्यांच्या मागोमाग इतरही कारखान्यांमध्ये संप झाला. सुमारे ९३ हजार कामगार २० जानेवारी रोजी संपावर गेले. लोकांनी आपल्या मागण्या झारपर्यंत नेण्याचे ठरविले. झार आपल्या मागण्यावर विचार करेल असे कामगारांना वाटत होते. अशातच जपानने रशियाचा पराजय केल्याची वार्ता कानी पडताच, लोकांमधील असंतोष उफाळून आला.

## ४.९ ऑक्टोबर घोषणा (३० ऑक्टोबर १९०५)

रक्तरंजित रविवार घटनेनंतर रशियात सर्वत्र संपना सुरुवात झाली होती. ऑक्टोबर महिन्यात रेल्वे कामगारांनी देशव्यापी संप केल्यामुळे रशियाचे दळणवळण ठप्प झाले होते.

munotes.in

त्याचबरोबर सरकारने आपले दमनचक्र सुरू केले. रशियातील नावीक दलाने उठाव केला. बंड पुकारले. सैनिकांनी सरकार विरुध्द बंड पुकारले. त्यामुळे सरकारला काळजी वाटू लागली होती. कारण सैनिकांनीच सरकारला विरोध केला होता. त्यांना जर क्रांतिकारक सामील झाले असते तर देशाचे भवितव्य अंधातरी राहिले असते. त्यामुळे झारने ३० ऑक्टोबर रोजी एक जाहीरनामा काढला. त्यात सैनिकांच्या भत्यात वाढ करण्यात येईल असे त्यांना आश्वासन देण्यात आले. ऑक्टोबर घोषनेमध्ये जनतेला अन्न,वस्त्र,निवारा हे मूलभूत अधिकार देण्यात आले. जनतेला मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. ड्यूमाला (रशियातील वरिष्ठ सभागृह) कायदे करण्याचे अधिकार देण्यात आले होते. तिला राज्यकारभारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देण्यात आला. मुद्रण स्वातंत्र्य,भाषण स्वातंत्र्य, देण्यात आले होते. ऑक्टोबर घोषणे नंतर नोव्हेंबर १९०५ मध्ये रशियात पुन्हा दुसरा सार्वत्रिक संप पुकारण्यात आला. परंतु पहिल्या संपाच्या मानाने या वेळेच्या संपाची तीव्रता कमी होती. झारने नुकतीच ऑक्टोबर घोषणा केल्याने हा संप विशेष यशस्वी झाला नाही. डिसेंबर १९०५ मध्ये मास्को येथे पुन्हा उठाव करण्यात आला. या संपात सोशल डेमोक्रॅटिक पक्ष व सोशल रिव्हॅल्युएशन पक्ष सामील झाले होते. क्रांतिकारकांनी उघड लढा सुरू केला होता. त्याचबरोबर सरकारने सैनिकांना जनतेवर गोळीबार करण्याचा आदेश दिला. गोळीबार करू नये म्हणून क्रांतिकारकांनी सैनिकांना विनंती केली होती. पण यावेळी मात्र सैनिकांनी सरकारला पाठिंबा दिला. अखेर क्रांतिकारकांना शरणागती पत्करावी लागली.

**आपली प्रगती तपासा**

१) 'ऑक्टोबर घोषणा' या संदर्भात सविस्थर माहीती लिहा.

## ४.१० पहिले महायुद्ध व रशियातील झारशाहीचा शेवट

झारशाहीच्या कठोर दडपशाहीमुळे शेकडो क्रांतिकारकांना, विरोधकांना, मृत्युदंडाच्या शिक्षा दिल्या जात होत्या. काही क्रांतिकारक रशिया सोडून परदेशात स्थलांतरित झाले होते. तर दुसरीकडे जहाल विरोधकांनी सरकार उलथून पाडण्याकरिता काट-कारस्थाने रचण्यात येत होते. सरकारी अधिकाऱ्यांचे खून करण्याचे सत्र चालू ठेवले होते. राजकीय,धार्मिक, सामाजिक उद्दिष्टांच्या पुरततेकरिता सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा कामगार वर्गात अविरत व प्रभावी प्रचार चालूच होता.

संप व राजकीय हत्या मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्या. सन १९११ मध्ये प्रधानमंत्री स्टोलिपिनही मारला गेला. राजधानीचे वातावरण क्रांतिकारक संपानी व रस्त्यारस्त्यावर घडणाऱ्या उघड चकमकींनी प्रक्षुब्ध झाले होते. मोर्चे, निदर्शने, सभा, घोषणा यांना ऊत आला होता. सन १९१४ मध्ये पहिले महायुद्ध भडकले नसते तर क्रांतीचा डोंब जो पुढे सन १९१७ मध्ये उसळला, अगोदर सन १९१५ च्या पूर्वार्धात कोसळला असता. बाल्कन प्रदेशातील साम्राज्यविस्ताराच्या अपेक्षेने रशियाने सैबेरियाला पाठिंबा देऊन पहिल्या जागतिक युद्धात पदार्पण केले होते. परंतु सुरुवातीचे काही दिवस विजयाचे सोडले तर सर्वत्र पराभवाला तोंड देण्याची नामुष्की आली होती. मुळातच युद्ध खेळण्याची ताकद व

सामर्थ्य रक्षण सैन्यात नसल्यामुळे जर्मनीकडून रशियाला युद्ध आघाडीवर पराभवा मागून पराभव पत्करावे लागले होते. सर्वच आघाड्यांवर रशियाची पीछेहाट झाली होती. यातच झारने नवीन लष्करी भरती सुरू करुन हजारो शेतकरी व कामगारांना लष्करात भरतीची शक्ती केली. परिणामी कृषी उत्पादनात घट होऊन जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती. शेतकरी व कामगारांना लढाईचे प्रशिक्षण नसल्यामुळे हकनाक त्यांचा बळी पडू लागला होता. पहिल्या महायुद्धात जवळजवळ १७ लक्ष रशियन सैन्य ठार झाले तर ५० लक्ष जखमी झाले होते. युद्धात कोट्यवधी रुबल्सची आर्थिक हानी झाली होती. याच बरोबर जर्मनीकडून युध्दात होत असलेल्या प्रभावामुळे जागतिक राजकारणात रशियाची नामुष्की झाली होती. सहाजिकच युद्धातील या नामुष्कीला झार निकोलस दुसऱ्याची अकार्यक्षमता व दुर्बलता कारणीभूत आहे, अशी भावना रशियन जनतेत वाढीस लागली होती. या संधीचा फायदा घेणारा लेनिन सारखा कुशल नेता नियतीने रशियाला दिला आणि लवकरच लेनिनने क्रांतीचे नेतृत्व स्वीकारून योजनाबद्ध १९१७ मार्चची क्रांती घडउन आणली होती. परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर १५ मार्च १९१७ रोजी झारने सत्ता त्याग केला. परंतु क्रांतिकारकांनी झार निकलोस दुसरा व त्याच्या कुटुंबियांना सैबेरियातील उरल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या तोबोल्कस येथील तुरुंगात रवाना केले. रशियातील ही राज्यक्रांती होऊन ३०० वर्षापासून सत्तेवर असलेल्या रोमँनोव्ह घराण्याची राजवट अस्तास गेली. झार व त्याच्या कुटुंबियांना तुरुंगात ठेवणे धोकादायक वाटल्याने १६ जुलै १९१८ रोजी त्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आले. झार व त्याच्या कुटुंबीयांची हत्या केल्याने रशियातील झारची सत्ता संपुष्टात येऊन नवीन प्रजासत्ताकाचे युग रशियात सुरू झाले.

## ४.११ बोल्शेव्हिक राज्यक्रांती १९१७

झारशाही विरुद्धची १९०५ मध्ये झालेली पहिली क्रांती अयशस्वी ठरली होती. मात्र झारशाहीला मूळापासून हलविण्याचे काम या क्रांतीने केली होते. या नंतरच्या कालखंडात राजेशाहीचा जनमानसावरील प्रभाव कमी होत गेला. दुसरीकडे कार्ल मार्क्स व इतर तंत्रज्ञानाच्या विचारांचा रशियात प्रसार झाला. बदलत्या परिस्थितीचे भान नसणाऱ्या झारांनी कुलरच्या अनेक गोष्टी चुकत गेल्या. अखेरीस १९१७ मध्ये क्रांती होऊन झारशाही संपुष्टात आली. किंबहूना जनतेने ती नष्ट केली. अर्थात ही अचानक घडलेली घटना नव्हती. अनेक गोष्टींचा तो परिपाक होता. या राज्यक्रांतीचा परिणाम केवळ रशिया पुरताच मर्यादित नव्हता, तर तो जागतिक होता.

फेब्रुवारी १९१७ मध्ये पेट्रोग्राड येथे कामगारांनी संप केला होता. त्यामुळे सर्वत्र अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. ब्रेड मिळविण्यासाठी लांबच लांब रांगा लागू लागल्या होत्या. ९ मार्च १९१७ रोजी पोलिसांनी ब्रेडच्या रांगेत उभ्या असलेल्या निष्पाप नागरिकावर बेछूट गोळीबार केला. पाहता पाहता ही बातमी सर्वत्र पसरली. त्याचबरोबर सर्वत्र संप पुकारण्यात आले होते. लोक आता रस्त्यावर उतरले. त्यांत लष्करी गणवेशातील सैनिकही शामिल झाले होते. लोकांनी शस्त्रागार आपल्या ताब्यात घेतला व शस्त्रास्त्रे वाटून घेतली. यावेळी रोडजिअँकीने झारला तार करून परिस्थितीवर ताबडतोब उपाययोजना करण्यास सांगितली. हे जर केले नाही तर राजघराने संपुष्टात येईल, असा इशाराही दिला

होता. पण झार निकोलसने कोणतेही पाऊल उचललेले नाही. कौन्सिल ऑफ स्टेटची २२ सदस्यांनी निकोलसला अंतर्गत धोरणात बदल करण्यास सांगणारी तार केली. झारणे ताबडतोब कायदे मंडळाचे अधिवेशन घ्यावे, सध्याचे मंत्रिमंडळ बरखास्त करून लोकप्रतिनिधीचे मंत्रिमंडळ बनवावे असे कळविण्यात आले होते. तरीही झारणे त्याकडे लक्ष दिले नाही. ही सर्वात मोठी शोकांतिका ठरली.

## ४.१२ हंगामी सरकार

पेट्रोगार्डमध्ये उठाव सुरू झाल्यावर १० मार्च रोजी झारने "ड्यूमा" तसेच कौन्सिल ऑफ स्टेट बरखास्त करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु ड्यूमाने तो निर्णय मानला नाही व ड्यूमाची अनौपचारिक बैठक घेण्याचे सदस्यांनी निर्णय घेतला होता. ड्यूमाला जनतेचा तसेच सैनिकाचा पुर्ण पाठिंबा होता. १२ मार्च रोजी रोडझिअँकी यांच्या अध्यक्षतेखाली एक हंगामी कार्यकारी समिती स्थापन करण्यात आली होती. १० मार्च रोजी कामगार, सैनिक वर्गाचे तसेच जहाल मवाळ गटाचे प्रतिनिधी ड्यूमाच्या इमारतीत एकत्र आले होते. त्यांनी कामगार प्रतिनिधीचे सोव्हिएत स्थापन केली. त्यात १००० कामगारामागे एक प्रतिनिधी, १००० कामगारापेक्षा कमी असलेल्या प्रत्येक कारखान्याचा एक प्रतिनिधी, प्रत्येक सैनिकी तुकडीचा एक प्रतिनिधी, सोव्हियत वर पाठवावे असे ठरले. झारने मात्र त्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्यामुळे क्रांती थोपविण्यासाठी आपल्या हातात शासन सूत्रे घेण्याचे ठरविले. ड्यूमला समितीनेही पाठिंबा दिला. राजकैद्यांची सुटका करावी, जनतेला धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य देण्यात यावे, स्थानिक सरकार स्थापन करण्यासाठी निवडणुका घेण्यात याव्यात, वगैरे अटी घालण्यात आल्या होत्या. त्या अटी स्वीकृत केल्यावर सोव्हिएतची कार्यकारी समिती व ड्यूमाची कार्यकारी समिती यांच्यात एकमत झाले व हंगामी सरकार स्थापन करण्यात आले.

१५ मार्च रोजी प्रिंस ल्योव्ह यांच्या नेतृत्वात हंगामी सरकार स्थापन करण्यात आले. सोशल रीव्होल्युशनरी पक्षाचा नेता अलेक्झांडर केरेन्सी याला न्याय खाते देण्यात आले. त्याला हंगामी सरकारात सहभागी होण्यास सोव्हिएतने परवानगी दिली. परंतु सोव्हिएत मात्र प्रत्यक्ष सामील झाले नव्हते. जोपर्यंत हंगामी सरकारचे धोरण लोकहिताला पोषक राहणार, तोपर्यंत सोव्हिएतचा पाठिंबा हंगामी सरकारला राहील असे सोव्हिएतने जाहीर केले होते. रशियातील या हंगामी सरकारला इंग्लंड- फ्रान्स राष्ट्रांनी ताबडतोब मान्यता दिली होती. राजसत्ता संपुष्टात आल्याने रशियात उदारमतवादाचा प्रभाव राहिल, अशी त्या राष्ट्रांना वाटले होते. अशा परिस्थितीत झार निकोलसने रशियातील ही क्रांती दडपून टाकण्यासाठी त्याचे खास सैनिक पेट्रोग्राडकडे पाठविले. तो स्वतः प्स्कोव येथे येऊन पोहोचला. पण त्याला यश मिळू शकले नाही. त्याला लष्करी अधिकाऱ्यांनी सल्ला दिला की झारने अता राजत्याग करावा, एकंदर परिस्थितीचे आकलन झाले होते. पण वेळ निघून गेली होती. त्याने रोडझिअँकीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण काही उपयोग झाला नाही. ड्यूमाचे दोन सदस्य प्स्कोव येथे झारला भेटले. त्यांनी झारला सांगितले की झारने राजत्याग करावा. १५ मार्च रोजी नाइलाज झाल्याने झारणे राज त्यागाच्या कागदपत्रावर सही केली. पण त्याच बरोबर आपला भाऊ ग्रँड ड्यूक माईकेल याला राज पदावर

munotes.in

बसविण्यात यावे, असे त्यांनी आवाहन केले. २० मार्च रोजी हंगामी सरकारने झार निकोलस दुसरा याला अटक करण्याचा आदेश जारी केला. अर्थात ती मागणी सोयीची होती. त्यामुळे आपणास इंग्लंडमध्ये राहता यावे म्हणून झारने इंग्लंडशी बोलणी सुरू केली. ती सोव्हिएतला आवडली नाही. त्यांच्या सांगण्यावरून हंगामी सरकारने आदेश काढला की झार व झारींना देश सोडता येणार नाही.

परराष्ट्र मंत्री मिल्यूकोव याने ग्रँड ड्यूक माईकेल याला रीजंट म्हणून जाहीर करताच, त्याचा सर्वत्र निषेध होऊ लागला. रशियाचे मुखपत्र 'इझवेस्तिया'यांनी निषेध व्यक्त केला होता. राजसत्ताचा विरोध करण्यासाठी लोक राजवाड्या समोर जमले होते. त्यामुळे घटनात्मक राजसत्ता ही सूचनाही तशीच राहिली.

ड्यूक माईकेल यालाही त्यामुळे फेरविचार करावा लागला. गुप्त मतदान पद्धतीद्वारे माईकेला जर अनुकूल मत पडले तरच तो पद स्वीकारेल अन्यथा नाही असे त्याने घोषित केले. अशाप्रकारे रशियातील राजसत्ता व घटनात्मक राजसत्ताही संपुष्टात आली.

## ४.१३ नोव्हेंबर क्रांती (इ. स. १९१७)

प्रिंस ल्योव्हच्या नेतृत्वातील हंगामी सरकार आणि सोव्हिएट्स यांच्यात पदोपदी मतभेद निर्माण होऊ लागले. सोव्हिएतने राजकैद्यांच्या सुटकेसाठी आग्रह धरला होता. त्यामुळे सैबेरियात शिक्षा भोगत असलेला स्टॅलिन परत रशियात आला. रशिया बाहेर असलेले लेनिन कामेनेव, रादेक, ट्राटस्की हे सर्व क्रांतिकारक रशियात परतले. त्यांना लेनिनचे नेतृत्व मिळाले. प्रिन्स ल्योव्हच्या सरकारला दोस्त राष्ट्राशी सहकार्य करावे असे वाटत होते. याउलट शेतकरी कामगरी वर्गाला ते मान्य नव्हते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या कल्याणार्थ रशियात राज्यघटना यावी असे त्यांना वाटत होते. सरदार अमीर-उमराव यांची सत्ता नष्ट करून सर्वसामान्यांना जमिनीचा अधिकार प्राप्त व्हावा असे त्यांना वाटत होते. हंगामी सरकार या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहे ,असे दिसून येताच शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला. लेनिनला सर्वसामान्यामधील हा असंतोष दिसत होता. त्यामुळे त्याने ताबडतोब जर्मनीशी युद्धबंदी करण्याचे ठरविले. तसेच जमीनदाराच्या हातून जमिनी काढून त्या सर्वसामान्यांमध्ये वाटून देण्याचे त्यांनी आपले धोरण जाहीर केले. त्याचबरोबर हंगामी सरकार लवकरच अप्रिय झाले. त्याने आपल्या पक्षाचा जाहीरनामा जाहीर करताना पुढे तत्त्वावर भर दिला.

१) जर्मनीशी ताबडतोब युद्धबंदी करणे व तह करणे,

२) कारखान्यांच्या कामकाजात कामगारांना प्रतिनिधित्व देणे,

३) उत्पादन व वस्तूंच्या वितरणावर सरकारने नियंत्रण स्थापित करणे.

अशाप्रकारे हंगामी सरकारने जुलै १९१७ मध्ये जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले. पण विदारक अशाच पराजय झाला. एवढेच नव्हे तर वित्त व मनुष्यहानी ही फार मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे लोकांचा बोल्शेविकावर विश्वास बसला. बोल्शे◌ेविकांचा प्रभाव वाढत आहे असे

munotes.in

दिसून येताच हंगामी सरकारने जुलै १९१७ मध्ये बोल्शेविकांवर आरोप केला की त्यांनी जर्मन व शत्रू राष्ट्राची गुप्तपणे हातमिळवणी केली. परंतु त्याच सुमारास जनरल कार्निलोव याने जमीनदाराच्या पाठिंब्याने सत्ता बळकावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा करेन्स्कीला नाईलाजास्तव बोल्शेविकांची मदत घ्यावी लागली. त्याबरोबर बोल्शेविकांचा राजकारणात प्रभाव वाढला. तसेच लेनिनने आपल्या कार्यक्रमात सर्वसामान्यांच्या कवर अधिक भर दिला. त्यामुळे सर्वसामान्याचाही त्याला पाठिंबा मिळाला होता. आर्थिकक्षेत्रात जो गोंधळ निर्माण झाला त्याला पाठिंबा मिळाला होता. त्याचाही बोल्शेविकांनी फायदा घेतला. रशियातील ही स्थिती निर्माण होण्यास हंगामी सरकार कसे जबाबदार आहे हे त्यांनी जनसामान्यांना पटवून दिले. त्यामुळे बहुसंख्य असलेला शेतकरी वर्ग बोल्शेविकांना येऊन मिळाला. सप्टेंबर पर्यंत बोल्शविकांचा बराच प्रभाव वाढल्यावर २४ ऑक्टोबर १९१७ रोजी पेट्रोग्राड येथे बोल्शेविकांनी हंगामी सरकारवर सशस्त्र हल्ला करण्याचा ठराव पास केला. ६ नोव्हेंबरला रात्री झारचा विंटर पॅलेस, रेल्वेस्टेशन, टपाल व तारायंत्रे, बँका, शासकीय कार्यालयाचा बोल्शेविकांनी ताबा घेतला. हंगामी सरकारच्या मंत्र्यांना कैद करण्यात आले. हा सर्व गोंधळ पाहून केरेन्स्कि भूमिगत झाला. त्याच रात्री ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोवियेतचे अधिवेशन घेण्यात आले. त्यात मंत्रिमंडळाचा अध्यक्ष म्हणून लेनिनची नियुक्ती करण्यात आली. ट्राटस्किला परराष्ट्र खाते देण्यात आले. तर स्टॅलिनला गृहमंत्री पद देण्यात आले. अशाप्रकारे रशियातील बोल्शेविकांची क्रांती यशस्वी झाली.

**आपली प्रगती तपासा**

१) नोव्हेंबर क्रांती (इ. स. १९१७) या संदर्भात सविस्तर माहीती लिहा.

## ४.१४ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम

१) रशियन राज्यक्रांतीमुळे रशियातील झारशाहीचा शेवट झाला. त्यानंतर मध्यमवर्गीय आणि भांडवलदारांचे हंगामी सरकार अस्तित्वात आले. नोव्हेंबर १९१७ च्या क्रांतीने हंगामी सरकार समाप्त झाले आणि रशियात समाजवादी प्रजासत्ताक अस्तित्वात आले. यानंतर रशिया Union Of Soviet Socialist Republic (U.S.S.R.) या नावाने ओळखला जाऊ लागला.

२) रशियन राज्यक्रांतीमुळे रशियाने खऱ्या अर्थाने आधुनिक युगात प्रवेश केला. राजकारण, उद्योग विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रात प्रगती घडून आली. यामुळे थोड्याच कालावधीत रशिया हे जगातील आघाडीचे राष्ट्र म्हणुन ओळख निर्माण झाली. अमेरिकेच्या बरोबरीने महासत्ता म्हणून रशियाचा उल्लेख केला जाऊ लागला.

३) रशियन राज्यक्रांतीमुळे रशियात वर्ग विहीन समाज रचना निर्माण झाली. झारशाही बरोबरच सरंजामदार वर्गही नष्ट झाला. राष्ट्रीयकरणाच्याद्वारे इथल्या सर्व जमिनी सरकारने स्वतःच्या ताब्यात घेतल्या. उद्योगपती त्याचबरोबर भांडवलदारांचा वर्ग नष्ट करून, चर्चेच्या मालमत्ता जप्त केल्या. विशेषतः वर्ग विरहित समाज रचनेसाठी येथे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. डॉक्टर, इंजिनिअर, संशोधक, तत्वज्ञ, लेखक, कारागीर, कलावंत असा समावेश असलेल्या मध्यम वर्गास यामुळे महत्त्व प्राप्त झाले.

munotes.in

कामगार वर्गाची होणारी पिळवणूक थांबली. उत्पादनाची साधनेही सरकारच्या मालकीची झाली. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे काम आणि योग्य तो मोबदला मिळाल्यामुळे बेकारी आणि दारिद्र्याचे प्रमाणही कमी झाले.

४ ) रशियाचे औद्योगीकरण नियोजनबद्धरीत्या करीत असताना, आर्थिक विकास घडवून आणताना लेनिन- स्टॅलिन यांनी उद्योगधंद्याकडे विशेष लक्ष दिले. वीज, लोखंड, कोळसा, पेट्रोलियम, सिमेंट, शस्त्रास्त्रे यांच्या उत्पादनाबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही खुप मोठी प्रगती केली. अगदी कमी कालावधीत रशियाने अवकाश संशोधनात मोठी झेप घेतली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचे स्थान पठकाविले.

५ ) साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रसार झाल्यामुळे रशियाने आर्थिक क्षेत्रात प्रगती साधली. अनेक मागासलेल्या शोषित आणि पारतंत्र्यात असलेल्या राष्ट्रांना रशियाने स्वतःच्या रूपाने एक नवा मार्ग दाखविला. यानंतरच्या काळात रशियाचा आदर्श समोर ठेवत अनेक राष्ट्रांमध्ये साम्यवादी क्रांती घडून आली. जगभरात साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार होत गेला. पोलंड, रुमानिया,बल्गेरिया, हंगेरी, पूर्व जर्मनी, क्युबा अशी अनेक राष्ट्रे साम्यवादी बनली. जागतिक पातळीवर या तत्त्वज्ञानाला विशिष्ट स्थान मिळाले. या तत्वज्ञानाने भांडवलशाही समोर मोठे आव्हान उभे केले.

६) रशियाने पहिल्या महायुद्धात माघार घेतल्यामुळे पाश्चिमात्य राष्ट्रे त्यांच्यावर नाराज झाली होती. तसेच रशियात समाजवादी विचारसरणीवर आधारित सरकार आल्यामुळे पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रांना धक्का बसला होता. आपल्याही राष्ट्रांमध्ये समाजवादी सत्ता स्थापन होते की काय ? अशी त्यांना धास्ती वाटू लागली होती.

७) रशियन राज्यक्रांती हे रशियातील साम्यवादी विरोधी गटाला  मान्य नव्हती. त्यांनी रशियात प्रतिक्रांती करण्यास सुरुवात केली. पण त्यांचा तो प्रयत्न अयशस्वी ठरला. रशियातील क्रांती भांडवलदारांच्या विरोधात होती. तसेच चर्चच्या विरोधात होती. त्यामुळे युरोपातील राष्ट्रीय क्रांती विरुद्ध गेली. त्यांनी रशियातील प्रतिक्रांतीवाद्यांना पाठिंबा दिला आणि क्रांती दडपून टाकण्याचा कसोटीने प्रयत्न केला पण तो असफल ठरला.

८) क्रांतीनंतर रशियात साम्यवादी हुकूमशहाचा उदय झाला. सन १९१७ च्या राज्यक्रांतीने निरंकुश झारशाही उलथवून लावली. मात्र रशियात बोल्शेव्हिकांची हुकूमशाही सुरू झाली. क्रांती यशस्वी करण्यासाठी लेनिन यांनी अनेक निर्णय जनमताचा विचार न करता घेतले होते. जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली. विरोधकांचा बीमोड करण्यासाठी लेनिन आणि त्यानंतर सत्तेवर आलेल्या स्टॅलीनने दहशतीच्या मार्गाचा वापर केला. विरोध करणाऱ्या अनेकांना तुरुंगात टाकले तर काहींना फासावर लटकविले होते. परिणामी झारशाही नष्ट झाली पण रशियाला साम्यवादी हुकूमशाहीला सामोरे जावे लागले.

९) रशियन राज्यक्रांतीमुळे रशियातील स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा झाल्या. क्रांतीपूर्व रशियातील स्त्रियांची परिस्थिती अत्यंत दयनीय होती. घराच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या स्त्रियांना सामाजिक रूढी परंपरांचे पालन करावे लागत असे. बोल्शेविक

munotes.in

सरकार सत्तारूढ झाल्यावर त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. राज्यघटनेत स्त्रियांना पुरुषा बरोबरीचे समान हक्क दिले. शिक्षणाबरोबरच नौकरी करण्याची मुभा देण्यात आली. काम करणाऱ्या स्त्रियांना अनेक सवलती देण्यात आल्या. या सर्वांमुळे सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. त्याचबरोबर डॉक्टर, तंत्रज्ञ, म्हणूनही स्त्रिया काम करू लागल्या. रशियन राज्यक्रांतीमुळेच हे बदल शक्य झाले होते.

१०) रशियात क्रांती झाल्यावर आपल्याही देशात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून भांडवलशाही राष्ट्राने मजूर- कामगाराकडे विशेष लक्ष दिले. कामगार व मजुरांच्या कल्याणासाठी विविध योजना आखण्यात आल्या. ह्या सर्व सुधारणा रशियन क्रांतीमुळे घडू शकल्या हे नाकारता येत नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) रशियन राज्यक्रांतिचे कोणतेही चार परिणाम लिहा.

## ४.१५ सारांश

रशियातील झारची राजेशाही उलथून टाकणारी साम्यवादी क्रांती ही रशियाप्रमाणेच जगाच्या राजकीय, आर्थिक व वैचारिक क्षेत्रांत फार मोठा प्रभाव पाडणारी ही क्रांती ७ नोव्हेंबर १९१७ रोजी घडून आली. रशियन दिनदर्शिकेप्रमाणे मात्र ही क्रांती २४ ऑक्टोबर १९१७ रोजी झाल्याने ती ऑक्टोबर राज्यक्रांती म्हणून ओळखली जाते. या क्रांतीमुळे रशियात इ.स. १४८० सालापासून चालत आलेल्या झारच्या राजेशाहीचा शेवट झाला आणि तेथे बोल्शेव्हिक कम्युनिस्टांची सत्ता स्थापन झाली. जगाच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीइतकेच रशियन राज्यक्रांतीला देखिल महत्त्व आहे. या रशियनराज्यक्रांतीने वर्तमान जागतिक राजनीतीला अत्यंत संघर्षात्मक रूप दिले आहे. रशियन क्रांतिच्यावेळी शेतकरी जमीनदाराच्या तावडीतून सुटला; पण तो ग्रामीण अर्थव्यवस्थेशी बांधला गेला. स्थानिक स्तरावर शासनाला लोकांचा सहभाग हवा होता; पण राष्ट्रीय स्तरावर एकतंत्री कारभार कायम ठेवायचा होता. साहजिकच जनसामान्यांचा असंतोष वाढत गेला. अराज्यवादी तसेच दहशतवादी लोकनेतृत्व करू शकले नाहीत. पण रशियन अस्मितेवर भिस्त ठेवणारा जो गट होता, त्यातूनच समाजवादी क्रांतिकारक पुढे आले; तर पश्चिमीकरणाकडे आकृष्ट झालेल्या गटातून मार्क्सवादी अग्रेसर झाले. या दोन्ही गटांनी झार सत्तेविरुद्ध असंतोष भडकत ठेवला. या दोन्ही गटांपैकी मार्क्सवादी बोल्शेव्हिक अखेर यशस्वी ठरले. रशियन राज्यक्रांती ही पहिली साम्यवादी क्रांती होती. जगभरातील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास ती कारणीभूत ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही या क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे. इ.स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात पेट्रोग्राड येथे कामगारांनी संप पुकारला. ही रशियन राज्यक्रांतीची नांदी ठरली. त्यानंतर राजधानीतील सैनिकांनीही कामगारांना पाठिंबा दिला. हे या राज्यक्रांतीचे पहिले पर्व होते. स्वित्झर्लंडमध्ये अज्ञातवासात असलेला

बोल्शेव्हिक नेता लेनिन इ.स. १९१७ च्या एप्रिलमध्ये रशियात परतला, तेंव्हा या राज्यक्रांतीचे दुसरे पर्व सुरु झाले.

अर्थात, रशियातील क्रांती हे सहज मिळालेलं यश नव्हतं. फेब्रुवारी क्रांतीविरोधात जनरल कोर्निलोव्हनी ऑगस्ट २०१७ मध्ये केलेल्या प्रतिक्रांतिकारी कारवायांनंतर पुढंही सेनाधिकाऱ्यांनी सैनिकी-हुकूमशाही क्लृप्त्या करून क्रांती अपयशी व्हावी यासाठी प्रयत्न केले. परंतु सैन्य विखुरल्यामुळं प्रतिक्रांतीच्या या कारवाया निष्प्रभ ठरल्या आणि नंतर मोठ्या संख्येनं सैनिक क्रांतिकारी दलांमध्ये सामील झाले. क्रांतिकारी 'रेड आर्मी'विरोधात प्रतिक्रांतिकारी शक्तींच्या 'व्हाइट आर्मी'नं सुरू केलेल्या यादवी युद्धात आधी उल्लेख केलेल्या महासत्ता प्रतिक्रांतीला खतपाणी घालत होत्या. 'रशियात हस्तक्षेप करू नका' असा संदेश देणाऱ्या काही चळवळी युरोपातील कामगार वर्गाच्या पक्षांनी सुरू केल्या, त्यामुळं पश्चिमेतील महासत्तांना 'व्हाइट आर्मी'ला शेवटपर्यंत आधार देणं शक्य झालं नाही. आपल्याच देशात सोव्हिएत निर्माण होतील, अशी भीती या सत्तांच्या मनात निर्माण झाली आणि आपण आधीच रशियात पाठवलेल्या सैनिकांमध्येही बंड होण्याची शक्यता त्यांच्या भयग्रस्ततेत भर घालणारी ठरली.

## ४.१६ प्रश्न

१) रशियन राज्यक्रांतिवर एक निबंध लिहा.

२) रशियन राज्यक्रांतीची प्रमुख कारणे लिहा.

३) १९१७ च्या रशियन क्रांतिचा घटनाक्रम लिहा.

४) रशियात झालेल्या १९०५ च्या क्रांतिची पार्श्वभूमी स्पष्ट करुन, महत्व विषद करा.

५) रशियन राज्यक्रांतिसाठी लेनिनचे विचार अधोरेखित करा.

## ४.१७ संदर्भ


- आवटे लीला, *रशियातील समाजवादी राज्यक्रांती*, मुंबई, १९६७.
- गाडगीळ पां. वा. *रशियन राज्यक्रांती*, पुणे, १९६१.
- डॉ. आठल्ये वि.भा., आधुनिक जगाचा इतिहास, नागपुर, २०१०.
- प्रा. दीक्षित नी. सी., पाश्चिमात्य जग,नागपुर, जून २००५.
- डॉ. वैद्य सुमन, आधुनिक जग,नागपुर, २००२
- डॉ. काले म. वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २००१.
- प्रा. जोशी पी.जी.,अर्वाचीन यूरोप,नांदेड, २००८.
- Brower, D. R. Ed. *Russian Revolution : Disorder or New Order, London,* 1979.

- Carr. E. H. *The Bolshevik Revolution, 3 Vols.,* London, 1961-64.
- Deutscher, Isaac, *The Unfinished Revolution : Russia-1917-67.* London, 1967.
- Fitzpatrick, Sheila, *The Russian Revolution, 1917-32,* New York, 1984.
- Footman, David, *The Russian Revolution,* London, 1962.
- Moorehead, Alan, *The Russian Revolution,* London, 1967.
- Roy. M. N. *The Russian Revolution,* Calcutta, 1949.
- Trotsky, Leon, *History of the Russian Revolution, 3 Vols.,* London, 1934.
- Wolfe. B. D. *An Ideology in Power : Reflections on the Russian Revolution.*
- London, 1969.
- Black, C. E. Rewriting Russian History (1962).
- Ellison, H. J. History of Russia (1964).


*****

munotes.in

# ५

# वसाहतवादाच्या विस्ताराची नीती, शोध मोहिमा व उद्देश

**घटक रचना**


५.० उद्दिष्टये

५.१ प्रस्तावना

५.२ वसाहतवाद

५.३ महादेशक क्षेत्र

५.४ वसाहतीकरण

५.५ शोधांचे युग (Age of Discovery)

५.६ कोलंबस ची शोधक मोहीम

५.७ वास्को-द-गामा ची शोध मोहीम

५.८ गुलामांचा व्यापार

५.९ युरोपातील लोकांचे स्थलांतर

५.१० अमेरिकेतील वसाहतवाद

५.११ वसाहतवादाच्या शहाला सुरुवात

५.१२ निर्वसाहतीकरण

५.१३ वसाहतवादाचे स्वरूप

५.१४ सारांश

५.१५ प्रश्न

५.१६ संदर्भ


## ५.० उद्दिष्टये

१. वसाहतवाद आणि साम्राज्यवाद संकल्पना समजून घेणे.

२. वसाहतवाद आणि साम्राज्यवाद: आशिया आणि आफ्रिकेतील विस्तार जाणून घेणे.

३. आशिया आणि आफ्रिका देशामध्ये झालेला परिणाम समजून घेणे.

४. वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांचा तत्कालीन जगावर आणि समकालीन जगावर उमटलेला प्रभाव तुलनात्मकरित्या अभ्यासणे.

munotes.in

## ५.१ प्रस्तावना

प्रबोधनाच्या चळवळीमुळे संपूर्ण जगात परिवर्तन घडून आले. नवीन भूमीचा शोध लागल्यामुळे, नवीन सागरी आणि भूमार्गाच्या शोधामुळे दळणवळण वाढले. तंत्रज्ञान वाढल्यामुळे औद्योगिक विकास होऊन व्यापारवाद निर्माण झाला. प्रगत देशांच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे देशाबाहेरील कच्च्या मालाची आणि बाजारपेठांची गरज निर्माण झाल्यामुळे आपल्या देशाबाहेरील नवीन भू प्रदेश संपादन करण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच कायम स्वरूपी स्थिर वसाहती स्थापन करण्यात येऊ लागल्या आणि वसाहतवाद ही विचारधारा उदयास आली. सुरुवातीला स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, फ्रांस या देशांनी वसाहती स्थापन करण्यास सुरवात केल.

## ५.२ वसाहतवाद

**वसाहतवादाचा अर्थ:** 'वसाहतवाद म्हणजे एखाद्या प्रबळ सत्तेने दुसऱ्या दुर्बल सत्तेच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन व्यापारी व आर्थिक दृष्टीकोनातून आपले वर्चस्व निर्माण करणे. त्यांचा प्रदेश आपली वसाहत म्हणून वापरणे.'

प्रबोधन काळात लागलेल्या नव्या भूमीच्या शोधामुळे व व्यापारी क्रांतीमुळे वसाहतवादाने जोर धरला. व्यापारी क्रांतीने नवीन वाणिज्य सिद्धांत मांडला आणि देशाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय्य समोर ठेऊन वसाहती अधिक प्रमाणावर मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले. कालानुरूप या वसाहतवादाने स्पर्धेचे तीव्र स्वरूप धारण केल्याने साम्राज्यवाद निर्माण झाला

या शब्दाला भिन्न अर्थ आहेत आणि या शब्दाची व्याख्या भिन्न प्रकारे केली जाते. एका देशातील काही लोकांनी दुसऱ्या भूप्रदेशातील एका विशिष्ट भागात वसती करून राहणे व आपल्या मातृभूमीशी निष्ठा ठेवणे, असा या संज्ञेचा सरळ (सर्वसाधारण) अर्थ आहे. स्वयंशासनाचा अधिकार नसणारा, दुसऱ्या देशाच्या प्रभुत्वाखाली असणारा प्रदेश म्हणजेच वसाहत होय. सामर्थ्यशाली प्रगत देशातील एका लोकसमूहाने दुसऱ्या अविकसित वा मागासलेल्या भूप्रदेशात व्यापार वा अन्य कारणांसाठी स्थापन केलेली वसती म्हणजे वसाहत. वसाहतीच्या स्थापनेत सोने-चांदी, मसाल्याचे पदार्थ तसेच कच्चा माल यांबरोबरच हवामान हाही एक महत्त्वाचा घटक ठरला आहे. त्यामुळे समशीतोष्ण हवामान असलेल्या भूप्रदेशात वसाहती स्थापन करण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली. या दृष्टीने उत्तर अमेरिका खंड, हिंदुस्थान हे भूप्रदेश वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

वसाहतवाल्यांनी अमेरिकेतील रेडइंडियनांना हाकलून देऊन तेथे आपले बस्तान बसविले. अतिथंड व अतिउष्ण अशा प्रदेशांत तुलनात्मक दृष्ट्या फार थोडया वसाहती स्थापन झाल्या. अशा ठिकाणी वसाहतवाल्यांनी स्थानिक लोकांवर नियंत्रण ठेवून राज्यकर्त्याची भूमिका बजाविली. उदा., बेल्जियन काँगो, जिब्राल्टर, हॉंगकाँग, सिंगापूर या लघुवसाहती

munotes.in

होत्या भारत, बेल्जियन काँगो, कॅनडा इ. प्रादेशिक वसाहती होत्या तर ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड ह्या इंग्रजांच्या कायम वस्ती करण्याच्या प्रस्थापित वसाहती होत्या. वसाहतीकरणाच्या विकासक्रमामध्ये वसाहतीचे राजकीय स्वरूप व दर्जा भिन्न होता. मुख्यतः बाजारपेठ काबीज करण्याच्या उद्देशाने सोळाव्या शतकापासून यूरोपातील सागरी दृष्ट्या सामर्थ्यवान देशांनी जगाच्या विविध भागांमध्ये वसाहती स्थापन केल्या. पुढे त्या प्रदेशांवर राजकीय वर्चस्व स्थापून ते आपल्याच देशाचे भाग बनवून टाकले. पहिल्या महायुद्धानंतर काही वसाहतींना अंतर्गत स्वायत्तता देण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळेच वसाहतींची अधीन राज्य, रक्षित राज्य, महादेशक क्षेत्र व विश्वस्त स्वाधीन प्रदेश, अशी विभिन्न स्थित्यंतरे झालेली आढळतात.

सामाजिक, राजकीय व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वसाहती स्वतःचे शासन चालविण्यास असमर्थ असल्याचे कारण देऊन त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार दिला जात नसे. त्यावेळी ज्या राष्ट्राची ती वसाहत असेल, त्याचेच शासन त्या वसाहतीवर लादले जाई आणि वसाहतीसाठी ते राष्ट्रच कायदे करीत असे व त्यांची अंमलबजावणी आपल्या नियुक्त अधिकाऱ्यांमार्फत करी. अशा प्रकारची अधीन राज्यव्यवस्था फ्रेंच-पोर्तुगीज वसाहतींमधून प्रामुख्याने आढळते. वसाहतीचे रक्षित राज्य हे समर्थ संरक्षक राष्ट्राच्या प्रदेशाचा अविभाज्य भाग नसते. अशा वसाहतीच्या संरक्षणाची जबाबदारी संरक्षक राज्य घेते. अशा वसाहतीस काही प्रमाणात अंतर्गत स्वायत्तता मिळते परंतु आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजनैतिक संबंध यांबाबत त्या वसाहतीस स्वातंत्र्य नसते. वसाहत स्वतंत्र होण्याच्या मार्गातील ती प्राथमिक अवस्था म्हणावी लागेल कारण नायजेरिया, युगांडा, न्यासालॅंड, मोरोक्को, ट्युनिशिया या वसाहती इंग्लंड-फ्रान्सची रक्षित राज्ये म्हणून सुरुवातीस उल्लेखिल्या जात.

## ५.३ महादेशक क्षेत्र

राष्ट्रसंघाच्या बाविसाव्या अनुच्छेदानुसार प्रस्थापित झालेली ही विश्वस्तपद्धती होती. पहिल्या महायुद्धात जर्मनी व तुर्कस्तान यांचा पराभव झाला, तेव्हा त्यांच्या वर्चस्वाखालील वसाहतींच्या शासनव्यवस्थेसाठी राष्ट्रसंघाने एक योजना कार्यान्वित केली. तीनुसार अ, ब व क असे तीन वर्ग पाडण्यात आले आणि जेत्या राष्ट्रांपैकी ग्रेट ब्रिटन, फ्रान्स इत्यादींची अधीक्षक राष्ट्रे म्हणून नेमणूक करण्यात आली. अ वर्गात इराक, पॅलेस्टाइन, ट्रान्स-जॉर्डन, सिरिया व लेबानन ह्या तुर्की साम्राज्यांतर्गत वसाहतींचा समावेश करण्यात आला आणि त्यांची शासनव्यवस्था ग्रेट ब्रिटन वा फ्रान्सकडे अस्थायी स्वरूपात सुपूर्त करण्यात आली. ब वर्गात आफ्रिकेतील जर्मनीच्या सर्व वसाहतींचा अंतर्भाव होता आणि क वर्गात नैर्ऋत्य आफ्रिका आणि जर्मनीच्या ताब्यातील पॅसिफिक महासागरातील लहान भूप्रदेशांचा समावेश करण्यात आला होता परंतु पुढे राष्ट्रसंघ अधीक्षक राष्ट्रांवर योग्य ती देखरेख ठेवण्यात अयशस्वी झाल्याने ही राष्ट्रे केवळ अधीक्षक न राहता प्रत्यक्षात सत्ताधारी म्हणूनच वसाहतींचा कार्यभार पाहू लागली. म्हणजेच वसाहतींचा परतंत्र दर्जा कायम राहिला, राज्यकर्ता देश बदलला एवढेच.

## ५.४ वसाहतिकरण

प्राचीन संस्कृतींच्या काळात वसाहतीकरणाची प्रक्रिया इ.स.पू. तिसऱ्या सहस्त्रकापासून अस्तित्वात होती. लष्करी दृष्ट्या समर्थ सत्तेने प्रतिष्ठा, प्रदेशविस्तार, व्यापारवृद्धी, वांशिक आकांक्षा यांसाठी कमकुवत वा दुर्बल राज्यशासन असलेल्या भूप्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रवृत्तीतून वसाहतीकरणाची प्रक्रिया निर्माण झाली.

परक्या प्रदेशांमध्ये जाऊन संपन्न संस्कृतींचे लोक वसती करून राहू लागले. तेथे ते आपले सांस्कृतिक वर्चस्व स्थापन करीत. अर्थात या सर्व वसाहतींवर मूळ सत्ताधाऱ्यांची नाममात्र मालकी वा अधिसत्ता असे आणि केंद्रीय सत्तेचा फारसा वचक नसे. या बहुतेक सर्व वसाहतींत स्वयंशासित कारभार असून त्या स्वतंत्रच होत्या, मात्र मातृदेशांशी त्यांचे भावनात्मक व धार्मिक बाबतींत संबंध असत. प्रसंगोपात अशा वसाहतींनी मातृदेशाविरुद्ध शत्रूला मदत केल्याचीही काही उदाहरणे आढळतात.

प्रत्यक्षात अशी साम्राज्ये फार थोडी होती आणि यूरोपीय सागरपार वसाहती स्थापन होण्यापूर्वी ती जवळजवळ संपुष्टात आली होती. या प्राचीन वसाहतींचे स्वरूप आधुनिक वसाहतवादापेक्षा पूर्णतःभिन्न होते मात्र प्राचीन व अर्वाचीन वसाहतीकरणामागील प्रेरणा कमी-अधिक प्रमाणात त्याच होत्या आणि त्यांत साम्राज्यविस्तार व वांशिक आकांक्षा यांबरोबर धर्मप्रसार, व्यापारवृद्धी, व्यापारवाद व सीमा सुरक्षितता यांची भर पडली.
आता आपण वसाहती साठी हाती घेतल्याला शोध मोहिमेचा विचार करू. सर्वप्रथम कोलंबस च्या शोध मोहिमेचा आढावा घेऊ.

## ५.५ शोधांचे युग (Age of Discovery)

शोधांचे युगे नवीन-नवीन शोधांचे व जलपर्यटनाचे युग होते. युरोपियन खलाशी आफ्रिका, अमेरिका व आशियाच्या शोधात मोठी मोठी जहाज घेऊन निघाले होते. शोधे युगांमध्ये जास्त सहभाग पोर्तुगीज व स्पेनमधील खलाशांचा होता. ते भारतामध्ये, अमेरिकेमध्ये येण्यासाठी नवीन व्यापारी मार्गाच्या शोधात होते, जेणेकरून युरोपातील नवीन युग व जुन्या जगामध्ये समन्वय शोधला जाईल.

अकराव्या व बाराव्या शतकांत युरोप व अरब राष्ट्रात धर्मयुद्ध झाली. या धर्मयोद्धा तून ख्रिश्चन चर्च ही धर्म संस्था राजा पेक्षाही जास्त प्रबळ झाली.१३४६ ते १३५३ मध्ये युरोपमध्ये प्लेगची साथ आली होती. ही सर्वात मोठी महामारी आफ्रिका ,युरोप खंडामध्ये वेगाने फैलावली. त्यामुळे पंच्याहत्तर ते दोनशे कोटी लोक मृत्युमुखी पडली. चौदाव्या शतकाच्या सुरुवातीला प्लेगच्या साथी मधून युरोप बाहेर पडत होता. युरोपची लोकसंख्या वाढत होती. पंधराव्या शतकामध्ये युरोपियन समाजाचे पुनरुज्जीवन होत होते. पश्चिम युरोप मधील लोकांना आशिया मधून येणाऱ्या वस्तूंची माहिती होती. धर्म युद्धामुळे आशिया चा भाग त्यांना परिचयाचा झाला होता. व्यापारासाठी युरोप त्याकाळी मध्यस्थी करणाऱ्या

दलालांच्या भरोशावर होता. त्यांना कमिशन द्यावे लागत असल्यामुळे वस्तूंच्या किमती वाढत होत्या. म्हणून युरोपियन खलाशी व शोधक नवीन सुखकर मार्गाच्या शोधात होते जेणेकरून आशिया व आफ्रिकेमधील देशांत पर्यंत पोहोचणे सोपे होईल व दलालांचे कमिशन बंद झाले की पूर्ण नफा आपल्यालाच होईल. या हेतूने युरोपमधील शोधक प्रवासी नवीन मार्गाच्या शोधात निघाले. वर उल्लेख केल्याप्रमाणे पोर्तुगालचा राजा हेनरी द नेविगेटर ने आफ्रिका खंड शोधायला जहाजे पाठवली व स्पेनचा राजा फर्डिनंड व राणी इसाबेल्ला ने क्रिस्तोफर कोलंबसला आशियाच्या शोधात पाठवले. याचा प्रसार करणे व संपत्ती मिळवणे हे दोन उद्देश या मोहिमे मागे प्रमुख होते. शिवाय स्पेनच्या राणीला पोर्तुगालला हरवून साम्राज्यवादी स्पर्धेत पुढे जायचे होते.

## ५.६ कोलंबसची शोध मोहीम

कोलंबसने आपल्या मोहिमेची योजना इंग्लिश, इटली व पोर्तुगालचा राजा समोर मांडली होती. पण या राष्ट्रांनी त्याच्या योजनेत काहीही स्वारस्य दाखवले नाही. त्यानंतर तो स्पेन चा राजा राणी कडे पोहोचला. त्यांनी त्याच्या योजनेला संमती दिली कारण त्यांना वाटले की कोलंबस एखादा खंड शोधेल आणि त्यांच्या वसाहत वादाला ला सुरुवात होईल. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना पोर्तुगाल बरोबर वसाहतवादाच्या शर्यतीत उतरायचे होते. कोलंबसने ३ ऑगस्ट १९४२ रोजी नीना, पिंट्टा व सांतामारिया या तीन जहाजा बरोबर आशिया खंडाच्या शोधाला निघाला. पाच आठवड्यानंतर कोलंबस साल्वादोर म्हणजे आताच्या बहामास पर्यंत पोहोचला. या शोध मोहिमेमध्ये त्यांनी क्युबाच्या पूर्व किनाऱ्याचा शोध लावला व पुन्हा स्पेनला परतला.. त्याच्या या शोधांची बातमी पूर्ण युरोपभर वणव्यासारखी पसरली. त्यांनी अजून तीन मोहिमा हाती घेतल्या. १४९३ ते १५०४पर्यंत तीनदा अमेरिका खंडात जाऊन आला. दुसऱ्या मोहिमेमध्ये त्याने कॅरेबियन द्वीपसमूहातील एका बेटाचा शोध लावला. त्याने त्या बेटाचे नाव डोमिनिका असे ठेवले. तिसऱ्या मोहिमेमध्ये तो त्रिनिदाद, वेनुनझुएला, साउथ अमेरिकेपर्यंत पोहोचला. शेवटच्या मोहिमेमध्ये त्यांनी सेंट्रल अमेरिकेमधील होंडा रुस, निकाराग्वा, कोस्टारिका व पनामा या देशाचा शोध लावला.

या देशांच्या शोधानंतर स्पॅनिश सरकारने त्या बेटांचा गव्हर्नर म्हणून कोलंबस ची नेमणूक केली. कोलंबस हा क्रूर गव्हर्नर होता , त्याने स्थानिक लोकांना गुलाम बनविले व त्यांच्या संपत्तीची चोरी केली. जो कोणी त्याला सोने देत नसेल त्याचे हात तोडण्याची धमकी कोलंबस देत असे. स्पेन वरून सैनिकी व लढाऊ लढाऊ जमातींना बोलून ची स्थानिक संस्कृतीची व मालमत्तेची प्रचंड लुटालुट कोलंबसने केली.

## ५.७ वास्को-द-गामा ची शोध मोहीम

१४९५ मध्ये पोर्तुगालचा राजा मॅन्युअल ने पोर्तुगीज शोधक मोहीम ठरवली. त्याचा उद्देश होता की मुस्लिम व्यापाऱ्यांची अधिकारशाही मोडीत काढणे व आशिया पर्यंत पोचण्याचा

सोप्पा मार्ग शोधणे. या शोध मोहिमेसाठी त्याने वास्को द गामा ची निवड केली. वास्को द गामा ८ जुलै १४९७ रोजी पोर्तुगाल वरून निघाला. त्याच्याबरोबर तीन दुभाषे होते. त्याच्यातील दोघेजण अरबी भाषा बोलणारे होते. मार्च १४४२ रोजी आफ्रिकेमधील मोझांबिक याठिकाणी तो पोहोचला मोझांबिक च्या सुलतानला वास्को द गामा मुस्लीम वाटला व त्यांनी प्रवासासाठी आपले दोन खलाशी मदतीला दिले. त्याच्यातल्या एका खलाशांना जेव्हा कळलं की वास्को-द-गामा ख्रिश्चन आहे त्यावेळी तो जहाज सोडून निघून गेला.

एप्रिल ७ रोजी वास्को-द-गामा मुंबासा म्हणजे आताच्या केनियाला पोहोचला आणि तिकडे १४ एप्रिल पर्यंत त्यांनी वास्तव्य केले. तिकडे त्याची ओळख एका गुजराती व्यापाराशी झाली व त्या गुजराती व्यापाराच्या मदतीने तो २० मेला भारतातील कालिकत येथे पोहोचला. कालिकतला पोहोचल्यावर पोर्तुगाल वरून आणलेले स्तंभ त्याने तेथे उभारले. कालिकत चा राजा झामोरीन ने प्रथम त्याचे स्वागतच केले पण त्याने आणलेल्या भेटवस्तू पाहून झामोरीनचा हिरमोड झाला. वास्को-द-गामा झामोरीन बरोबर काहीही करार करू शकला नाही कारण भारतामध्ये असलेल्या मुस्लिम व्यापाऱ्यांचा विरोध व त्याने आणलेल्या स्वस्त, निरुपयोगी भेटवस्तू. त्याने आणलेल्या वस्तू ना भारतात मागणी नव्हती. शिवाय पोर्तुगीज लोकांनी मोठी चूक केली होती ती म्हणजे ते भारतीयांना ख्रिश्चन समजले होते. वास्को द गामा चे झामोरीन राजाशी काही पटले नाही. तणावाचे वातावरण निर्माण झालेले पाहून व पुढे व्यापाराची संधी मिळेल की नाही या संभ्रमात असताना त्यांनी ऑगस्टमध्ये पोर्तुगालला जायचा निर्णय घेतला. मनोरंजक गोष्ट अशी की जाताना पाच ते सहा हिंदूना घेऊन गेला. त्याचा उद्देश होता की राजा मॅन्युअल ला हिंदू रीतीरिवाज समजवण्यासाठी या हिंदूंची मदत होईल.



**वास्को-द-गामा चे लिस्बन मधील चित्र**



munotes.in

त्याने परत जाण्यासाठी निवडलेली वेळ पावसाची होती त्याला बऱ्याच अडचणीचा सामना करावा लागला. तो जेव्हा पोर्तुगाल वरून निघाला होता तेव्हा त्याच्याबरोबर बरोबर १७० माणसे होती पण जेव्हा तो पोर्तुगालला पोहोचला त्या वेळी फक्त पंचावन्न माणसे होती. पोर्तुगालला पोहोचल्यावर भव्य स्वागत करण्यात आले.त्यानंतर दोन वेळा पुन्हा तो भारतात आला .राजा मॅन्युअल च्या मृत्युनंतर राजा जॉन तृतीय ने १५२४ मध्ये त्याला भारतातील गव्हर्नर नेमले तो सप्टेंबर १५२४ मध्ये गोव्याला पोहोचला पण तो इकडे जास्त दिवस काढू शकला नाही व डिसेंबर १५२४ मध्ये कोचीन मध्ये त्याचा मृत्यू झाला.

## ५.८ गुलामांचा व्यापार

मध्ययुगीन युरोपमध्ये गुलामांचा व्यापार जवळजवळ नव्हताच .त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे काम पोतुंगीज राजपुत्र हेनरी ने केले. १४४२ मध्ये त्यांनी आफ्रिकेच्या कॅपे व्हर्दे मधून गुलाम पोर्तुगाल मध्ये आणले. सोळाव्या शतकात मधील कॅनेरी द्वीपा वर साखरेचे व मद्याचे उत्पादन सुरू केले. साखरेचे उत्पादन करण्यासाठी लागणारा कामगार वर्ग पोर्तुगाल वरून नेणे शक्य नव्हते. म्हणून मग त्यांनी पश्चिम आफ्रिकेवर काम करण्यासाठी गुलाम पकडून आणले. कॅनेरी बेटावर त्यांनी आपला नाविक स्थळ स्थापन स्थापन केला व नौसैनिकच्या मदतीने आफ्रिकन लोकांना पकडून आणले मग गुलाम म्हणून वापरले.

स्पॅनिश पहिले युरोपियन होते पकडून आणलेल्या आफ्रिकन लोकांना अमेरिकेत शोधलेल्या नवीन द्विपा वर गुलाम म्हणून पाठविले. ज्याप्रमाणे पोर्तुगिजांचे प्रभाव क्षेत्र वाढू लागले त्या प्रमाणात गुलामांची संख्या पण वाढू लागली. ब्राझील , कॅरेबियन द्वीप समूहामध्ये गुलामगिरी वर आधारित अर्थव्यवस्था निर्माण झाली.

मालाने भरलेली जहाजे युरोपच्या किनाऱ्यावरून पश्चिम आफ्रिकेकडे निघायची. त्या मालाच्या मोबदल्यात पकडलेल्या गुलामांना युरोपियन जागांमध्ये भरायचे. आफ्रिकेमधील सुदृढ व तरुणांना गुलाम म्हणून युरोप मध्ये पाठवले जायचे. जहाजाच्या छोट्याशा कोनात त्यांनाजागा दिली जायची. अतिशय कठीण परिस्थितीत त्यांच्या प्रवासाला सुरुवात होई. कित्येक आफ्रिकन गुलाम या प्रवासामध्ये मृत्युमुखी पडायचे. एका अंदाजानुसार १७९० पर्यंत ४ लाख ८० हजार गुलाम इंग्लंडच्या वसाहतींमध्ये काम करीत होते.



गुलाम व्यापाराचा मार्ग

munotes.in

## ५.९ युरोपातील लोकांचे स्थलांतर

अठराव्या शतकामध्ये अजून एक अशी घटना घडली ज्यामुळे वसाहत वादांची पाळेमुळे रुजण्यास मदत झाली. या घटकाकडे बऱ्याचशा प्रमाणात दुर्लक्ष झाले आहे तो म्हणजे युरोपियन लोकांचे वसाहतीमध्ये झालेले स्थलांतर.१८२० नंतर ५५ लाख युरोपियन नागरिकांनी आपले देश सोडले. त्याची दोन प्रमुख कारणे होती:-१) स्थानिक देशांमध्ये आलेली आर्थिक मंदी २) नोकरीचे आमिष, वसाहतीमध्ये जमीन मिळवण्याची प्रबळ इच्छा, प्रवासी जहाजांवर काम करण्याची संधी, पसे कमावून परत आल्यानंतर वाढलेली आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठा. इतर कारणांमध्ये धार्मिक स्वातंत्र्य, स्थानिक देशात असणारे अनिवार्य सैनिकि शिक्षणा पासून मुक्तता व सरकारच्य जुलमी धोरणांत पासून स्वातंत्र्य. अठराशे मध्ये अनेक लोक इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे बेरोजगार झाली होती. रोजगार मिळवण्यासाठी त्यांनी स्थलांतर केले. जर्मनीमध्ये शेती च्या क्षेत्रामध्ये सुधारणा झाल्यामुळे छोट्या जमिनी असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची उत्पादन क्षमता कमी झाली. आधुनिक शेतीच्या तंत्रा पुढे ते टिकू शकले नाही व त्यांनी स्थलांतर केले . बटाट्याच्या उत्पादनावर आलेल्या किड्या मुळे आयरिश लोकांच्या शेतीचे नुकसान झाले. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. त्यामुळे इंग्लंड, जर्मनी व आयर्लंडच्या नागरिकांनी जास्त प्रमाणात स्थलांतर केले. या स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांचा ववसाहतवादी राष्ट्रांनी वसहतीवर वर्चस्व मिळवण्यासाठी करून घेतला.

## ५.१० अमेरिकेतील वसाहतवाद

स्पेनने विद्यमान अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि लॅटिन अमेरिकेचा काही प्रदेश व्यापला. कोलंबसने क्यूबाचा शोध लावल्यानंतर त्याने स्पेनसाठी बहामा, हिस्पेनिआ यांचा शोध घेतला. पुढे स्पॅनिश दर्यावर्दी पनामाची संयोगभूमी (इस्थमस ऑफ पनामा) आणि ब्राझील यांवर हक्क सांगू लागले. फर्डिनंड मॅगेलन ह्या पोर्तुगीज समन्वेषकाने स्पेनच्या झेंड्याखाली दक्षिण अमेरिकेचा काही भाग आणि पॅसिफिकमधील काही बेटांचा शोध लावला. यातून स्पेनला वेस्ट इंडीजची बेटे मिळाली. त्यांतून अमाप सोने-चांदी मिळाली. परिणामतः स्पेनने दक्षिणेत चिलीपासून उत्तरेकडे मेक्सिकोपर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीसच डचांनी नाविक क्षेत्रात प्रगती करून इ.स. १६०२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली आणि व्यापाराच्या निमित्ताने पौर्वात्य जगतात एक छोटे साम्राज्यच निर्माण केले. तेव्हा त्यांच्या आधिपत्याखाली बटेव्हिया (जाकार्ता) जावा, माले हे प्रदेश होते. तेथून त्यांनी चीन, जपान, हिंदुस्थान, श्रीलंका, इराण यांबरोबर व्यापारी संबंध जोडले. याच सुमारास इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली (१६००). तिने अमेरिकेनंतर आशिया खंडाकडे लक्ष दिले. फ्रान्सचा सॅम्यूएल द शांप्लेन हा प्रथम कॅनडाला गेला (१६०३) आणि त्याने क्वीबेकचा शोध लावला (१६०८) परंतु फ्रेंच वसाहतीकरणाच्या शर्यतीत तसे एकूण संथच होते. सतराव्या शतकात डच, इंग्रज, फ्रेंच यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील आशियाई व्यापारावर नियंत्रण मिळविले. डचांनी इंडोनेशिया आणि इंग्रजांनी हिंदुस्थान येथे आपले बस्तान बसविले. याशिवाय डच, इंग्रज व फ्रेंच यांनी

लॅटिन अमेरिकेतील काही भूप्रदेशांवर वर्चस्व मिळविले. इंग्रज व फ्रेंचांनी कॅनडाचा काही भाग व्यापला. डच, फ्रेंच व इंग्रजांनी विद्यमान अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांवर आपले अधिकार वेगवेगळ्या भूभागांवर प्रस्थापित केले. तेथे इंग्रजांनी प्रथम तेरा वसाहती स्थापन केल्या. इ.स. १६२४ मध्ये डचांनी न्यू नेदर्लंड्समध्ये असलेल्या प्रदेशावर ताबा मिळविला, त्यात चार वसाहती होत्या. इंग्रजांनी त्या १६६४ मध्ये घेतल्या. फ्रेंच व इंग्रज यांमधील युद्धातून इंग्रजांचे वर्चस्व वाढले. इंग्रजांनी फ्रेंचांच्या बहुतेक सर्व वसाहती घेतल्या. या वसाहतींचा इंग्लंडमध्ये प्रशिक्षित झालेल्या अधिकाऱ्यामार्फत राज्यकारभार चालत असे.

## ५.११ वसाहतवादाच्या शहाला सुरुवात

अमेरिकेतील पहिल्या तेरा वसाहतींनी स्वातंत्र्य युद्धाद्वारे (१७७५-८३) इंग्लंडपासून स्वातंत्र्य मिळविले, त्यानंतर लॅटिन अमेरिकेतील वसाहतींनी स्वातंत्र्यासाठी लढा देऊन १८००-१९०० दरम्यान स्वातंत्र्य मिळविले. एकोणिसाव्या शतकात स्पेनच्या दक्षिण व मध्य अमेरिकेतील बहुतेक सर्व वसाहती संपुष्टात आल्या आणि १८९८-९९ मध्ये अमेरिकेबरोबरच्या युद्धानंतर त्यांपैकी काही अमेरिकेला मिळाल्या. त्यामुळे अमेरिकेतील यूरोपीय वसाहतवादाला शह बसला. इंग्लंडने ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथे स्थायी स्वरूपाच्या वसाहती स्थापन करून तेथे ग्रेट ब्रिटनमधून अनेक इंग्रज लोकांना नेले. या वसाहती ग्रेट ब्रिटनमधील बहुसंख्य उत्प्रवासी लोकांनी वसविल्यामुळे तेथील लोकसंख्या पूर्णतः ब्रिटिश झाली. औद्योगिक क्रांतीनंतर कच्च्या मालाची गरज वाढली. साहजिकच पक्क्या तयार मालासाठी व्यापारपेठांची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे वसाहतवादाला चालना मिळाली. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या चतुर्थकात जर्मनी, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, बेल्जियम, इटली व जपान ह्या आर्थिक दृष्ट्या संपन्न व लष्करी दृष्ट्या सामर्थ्यशाली असलेल्या राष्ट्रांनी प्रदेश-विस्ताराच्या चढाओढीत सहभाग घेतला. रशिया हासुद्धा त्यात आला. त्याने सायबीरिया, अतिपूर्वेकडील भाग, कॉकेशस आणि आशिया खंडातील कोरियन साम्राज्यालगतचा प्रदेश व्यापला, पण रशिया-जपान युद्धानंतर (१९०५) रशियाने काढता पाय घेतला. अमेरिकेने फिलिपीन्स व हॉलंडने (नेदरलंड्स) ईस्ट इंडीज बेटे घेतली. पॅसिफिक बेटांविषयी पाश्चात्त्य राष्ट्रांत चढाओढ सुरू झाली. इंग्लंडने हिंदुस्थान, सीलोन (श्रीलंका) घेऊन साम्राज्य दृढतर केले. इतर यूरोपीय राष्ट्रांनी अफूच्या युद्धांद्वारे चीन विभागून घेतला. आफ्रिका खंडास नवसाम्राज्यवादाने धुमाकूळ घातला. आफ्रिकेतील भूप्रदेशाचे १८८० पर्यंत फारसे वसाहतीकरण झाले नव्हते परंतु त्यानंतर १९०० पर्यंत यूरोपीय राष्ट्रांनी इथिओपिया व लायबीरिया हे प्रदेश वगळता उर्वरित आफ्रिका खंड आपापसांत वाटून घेतले. याची सुरुवात फ्रान्सने अल्जीरिया घेऊन झाली. नंतर ब्रिटिशांनी ट्रान्सव्हाल, टांगानिका, दक्षिण आफ्रिका आदी प्रदेश घेतले. पहिले महायुद्ध आणि दुसरे यांतील सु. वीस वर्षांच्या काळात वसाहतीकरणास शीघ्र गती मिळाली, तद्वतच काही वसाहतींमधून राष्ट्रीय चळवळींनी जोर धरला व उठाव झाले.

## ५.१२ निर्वसाहतिकरण

यूरोपीय राष्ट्रे सततच्या संघर्षाने-युद्धाने-लष्करदृष्ट्या कमकुवत बनत चालली होती. एतद्देशीयांच्या वसाहतवादाविरुद्धची चळवळ हळूहळू क्रांतीचा पवित्रा घेऊ लागली होती. आशिया आणि आफ्रिका खंडांतील देशांतून राष्ट्रीय भावना जागृत होऊन स्वयंशासनाची मागणी पुढे येऊ लागली. याच सुमारास अनेक विचारवंत वसाहतवाद ही संकल्पनाच अन्यायकारक आहे, असे मत प्रतिपादन करू लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानच्या साम्राज्यविस्तारास आळा बसताच ग्रेट ब्रिटननेसुद्धा आपले वसाहतीविषयीचे धोरण सौम्य करून साम्राज्य आटोपते करण्यास प्रारंभ केला व भारत आणि पाकिस्तान या दोन देशांना स्वातंत्र्य दिले (१९४७). त्यानंतर आफ्रिकेतील काही वसाहतींना स्वातंत्र्य देण्यात आले (१९५६). सायप्रस, मॉल्टा हे देश स्वतंत्र झाले (१९६०). ग्रेट ब्रिटनने इराणच्या आखातामधून १९७१ मध्ये सैन्य काढून घेतले. त्याचवर्षी ब्रिटनने सिंगापूरमधूनही सैन्य काढले. काही वसाहतींनी शांततामय मार्गांनी स्वातंत्र्य मिळविले. फ्रान्सला याबाबत युद्धाला तोंड द्यावे लागले तरीसुद्धा फ्रेंच इंडोचायना, मोरोक्को, ट्युनिशिया आणि अल्जीरिया हे देश स्वतंत्र झाले. १९८० पर्यंत जवळजवळ बहुतेक वसाहती परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त झालेल्या होत्या.

ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने यांच्या अद्यापि कुठेतरी तुरळक प्रमाणात वसाहती आहेत तथापि ही राष्ट्रे अधिकृतरित्या त्यांना वसाहती म्हणून संबोधीत नाहीत. ग्रेट ब्रिटन त्यांना परावलंबी प्रदेश म्हणतो, सामोआ, ग्वॉम आणि काही पॅसिफिक बेटे तसेच व्हर्जिन बेटे, प्वेर्त रीको इ. देश अमेरिकेच्या कच्छपी आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व यूरोपातील काही देशांवर सोव्हिएट रशियाने अप्रत्यक्ष वर्चस्व स्थापन केल्यामुळे शीतयुद्धाच्या काळात त्यांना काही वेळा वसाहती म्हणून सोव्हिएट विरोधकांकडून गणले जाई. १९८५ नंतर सोव्हिएट धोरणात बदल होऊन सर्व पूर्व यूरोपीय देश सोव्हिएट वर्चस्वातून मुक्त झाले आहेत.

## ५.१३ वसाहतवादाचे स्वरूप

वसाहतीकरणानंतर वसाहतीतील प्रजेवर मातृदेशातील लोकांनी, विशेषतः सत्ताधीशांनी, आपली जीवनपद्धती तेथील लोकांवर लादण्याचा सातत्याने प्रयत्न केला आणि त्यांनी असा आभास निर्माण केला की, आपली संस्कृती वसाहतीतील मूळ संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहे. काही वसाहतवाल्यांनी वसाहतीतील मूळ लोकांवर धर्मांतराची सक्ती केली. या संदर्भात पोर्तुगालचे उदाहरण अगदी बोलके आहे. काही पाश्चात्त्य राष्ट्रांनी वसाहतीतील लोकांवर आपल्या भाषेची सक्ती केली. वसाहतींच्या भौतिक विकासासाठी वसाहतवाल्यांनी रेल्वे आणली, जुने रस्ते दुरुस्त केले, नवीन रस्ते खोदले, भव्य वास्तू बांधल्या आणि कारखाने सुरू करून वसाहतीत औद्योगिकरणास उत्तेजन दिले शाळा काढून शिक्षणप्रसारास प्रोत्साहन दिले दवाखाने उघडून लोकांच्या औषधोपचारांची व्यवस्था केली. या सर्व सुधारणांमागे त्यांचा हेतू मूलतः वसाहतीतील सामान्य लोकांची सहानुभूती मिळवून

राजकीय सत्ता दृढतर करणे, हा होता. तीच बाब आर्थिक धोरणात त्यांनी प्रत्यक्ष कृतीत आणली. लोकांचे कल्याण व्हावे, यापेक्षा संपत्तीचा ओघ मातृदेशात कसा जाईल, यावर त्यांची दृष्टी खिळली होती. म्हणून वसाहतीतील मजुरांचे श्रम ते जवळजवळ वेठबिगारीने घेत.

औद्योगिक क्रांतीनंतर वसाहतवादाची झपाट्याने वाढ झाली आणि नव-साम्राज्यवादाबरोबर यूरोपमध्ये व्यापारवाद (मर्कटिलिझम) ही आर्थिक पद्धत रूढ झाली. या पद्धतीनुसार पाश्चात्त्य राष्ट्रे आपल्या वसाहतींतील अर्थव्यवस्था आपल्या व्यापाराला कशी उपयुक्त होईल, या दृष्टिकोनातून पाहू लागली आणि त्यानुसार आर्थिक संयोजन करू लागली. ग्रेट ब्रिटनने या दृष्टीनेच अठराव्या-एकोणिसाव्या शतकांत आपल्या व्यापारास अनुकूल असे अनेक कायदे वसाहतींत केले. त्याला अनुसरूनच वसाहतींनी कच्चा माल पुरवावयाचा आणि तयार झालेला पक्का माल विकत घ्यावयाचा, अशी पद्धत रूढ झाली. जणू हा विधिलिखित संकेतच ठरला. परिणामतः वसाहती या हक्काच्या व्यापारपेठा बनल्या. गुलामगिरी हाही यातील एक फार मोठा भाग होता. म्हणून दक्षिण अमेरिकेतील वसाहतीत यूरोपियनांनी प्रथम तेथील इंडियन लोकांना कापसाचे उत्पन्न वाढविण्यासाठी व इतर कच्च्या मालाकरिता विविध मळ्यांवर (प्लॅटेशन्स) कामास सक्ती केली. पुढे त्यांनी आफ्रिकेतून काही गुलाम या कामासाठी आणले. त्यातून एकोणिसाव्या शतकात गुलामगिरीविरुद्ध चळवळ उभी राहिली. पुढे ब्रिटिशांच्या हे लक्षात आले, की प्रचलित व्यापारवादामुळे काही धंद्यांवर विपरीत परिणाम होतो. तेव्हा त्यांनी मुक्त व्यापाराचे धोरण अवलंबिले. त्यामुळे आपाततःवसाहतीतील व्यापारावरील निर्बंध शिथिल करण्यात आले. ग्रेट ब्रिटनचे अनुकरण अन्य काही पाश्चात्त्य राष्ट्रांनी केले परंतु या धोरणामुळे आफ्रिका-आशिया खंडांतील वसाहतीकरणास आळा बसला नाही व कच्चा माल पुरविणे आणि तयार माल विकत घेणे, ही अवस्था तशीच काही प्रमाणात चालू राहिली. याशिवाय यूरोप खंडातील धनाढ्य लोक, उद्योगपती, बॅंका यांनी वसाहतींतील खाणी, कारखाने, चहा-कॉफीचे मळे, निळीचा उद्योग, रेल्वे उद्योग, जहाजबांधणी उद्योग इत्यादींत भांडवल गुंतवून त्यांतून नफा मिळविण्यास प्रारंभ केला. त्यामुळे साहजिकच वसाहतींतील पैशाचा ओघ मातृदेशाकडे वाहत राहिला.

वसाहतींतील राजकारणात वैविध्य आढळते. काही अधिसत्ता गाजविणाऱ्या राष्ट्रांनी वसाहतींना स्वातंत्र्य दिले तर काहींनी वसाहतीचे स्वराज्य (डोमिन्यन स्टेटस) मान्य केले. प्रत्येक यूरोपीय राष्ट्राची याबाबतची भूमिका भिन्न होती.

वसाहतवादाचे काही बरेवाईट परिणाम वसाहतींवर झालेले आढळतात. सत्ताधाऱ्यांनी वसाहतींतील आर्थिक साधनसामग्रीचे शोषण केले आणि सत्ताधारी राष्ट्रे श्रीमंत-सधन बनली आणि लष्करी दृष्ट्याही ती सामर्थ्यशाली झाली, ही वस्तुस्थिती आहे. त्याबरोबरच वसाहतींत काही विकासाची कामे झाली. राज्यकर्त्यांनी लोकांचे जीवनमान सुधारले आणि वाढविले. याच सुमारास इंग्रजी भाषा, शिक्षणपद्धती, प्रशासन-पद्धती, पोस्ट-तार सेवा, रेल्वे, औद्योगिक विस्तार या बाबी आल्या. लोकशाहीची आणि आपल्या अस्मितेची जाणीव वसाहतीतील जनतेला झाली. आधुनिक पाश्चात्त्य तंत्रज्ञानाची ओळख वसाहतिक देशांना

झाली. त्यामुळे तांत्रिक ज्ञान वाढून औद्योगिकीकरणास चालना मिळाली. वैद्यकीय सोयी उपलब्ध झाल्या आणि प्रागतिक संशोधनास प्रोत्साहन मिळाले. शिक्षणप्रसारामुळे लोकशाही तंत्राच्या कल्पना रुजल्या व सुशिक्षित माणूस विचार करू लागला. तथापि सत्ताधाऱ्यांनी राज्य करण्यास योग्य असे फारसे शिक्षण मूळ रहिवाशांना दिले नाही. उलट काही सत्ताधीशांनी आपल्या संस्कृतीची, धर्माची, भाषेची जबरदस्ती केली. त्यामुळे मूळ रहिवासी व वसाहतवाले यांत अखेरपर्यंत एक दरी राहिलीच. वसाहतवादामुळे स्थानिक संस्कृतींचे खच्चीकरण झाले आणि वसाहतिक प्रदेशांवर याचे खोलवर प्रतिकूल परिणामही झाले, हे लक्षात ठेवले पाहिजे. या सर्व गुणावगुणांची चिकित्सक व साक्षेपी चर्चा केल्यानंतर अनेक इतिहासकार हे मान्य करतात की, वसाहतवादामुळे मूळ लोकांना पाश्चात्त्य प्रगत ज्ञानाची ओळख होऊन विविध क्षेत्रांत प्रगती झाली. तसेच शिक्षणप्रसाराने राष्ट्रीयत्वाची भावना जागृत होऊन शासनाला विरोध होऊ लागला. त्याचप्रमाणे वसाहतींचे दीर्घकाल आर्थिक शोषण झाले. वसाहतींच्या आजच्या आर्थिक दुर्बलतेचे ते एक मुख्य कारण आहे. त्यामुळे वसाहतींची वसाहतवादामुळे प्रगती झाली, असे मानण्यापेक्षा वसाहतवादामुळे सांस्कृतिक व आर्थिक मानहानी व दौर्बल्य आले, असे मानणेच वस्तुनिष्ठ ठरेल.

वसाहतवादाचा सर्वत्र तत्त्वतः आज अंत झाला असला, तरीसुद्धा सधन-सामर्थ्यशाली राष्ट्रांनी वसाहतिक देशांवरील आपले वर्चस्व अन्य मार्गांनी प्रस्थापित केले आहे. त्यातून 'नववसाहतवाद' या संकल्पनेचा उगम झाला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बहुसंख्य वसाहतिक देशांनी राजकीय स्वातंत्र्य मिळविले असले, तरी ते अद्यापि विकसनशील वा मागास या अवस्थेतच गणले जातात. त्यामुळे अशा देशांना भौतिक प्रगती करण्यासाठी सुसंपन्न असलेल्या धनाढ्य देशांवर अवलंबून रहावे लागते. साहजिकच प्रगत भांडवलशाही देशांचे आर्थिक व सांस्कृतिक वर्चस्व अजूनही या वसाहतिक देशांवर आहे. त्यामुळे विकसित देश विकसनशील वा अविकसित देशांच्या अंतर्गत व्यवहारावर अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याचा (आर्थिक कोंडी) प्रयत्न करतात. या परावलंबित्वामुळे विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्राच्या कमकुवतपणाचा गैरफायदा घेतात आणि तेथील राजकीय परिस्थितीवर वर्चस्व गाजवितात किंवा आपल्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींना सत्तास्थानी आणण्याचा प्रयत्न करतात किंवा दबाव आणतात. प्रत्यक्षात राजकीय वर्चस्व प्रस्थापित न करता संस्कृती विचार, तंत्रज्ञान, शिक्षण व आधुनिक शस्त्रास्त्रे यांची निर्यात करून वसाहतिक देशांवर आपले वर्चस्व कायम ठेवतात. जागतिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था आपल्या मर्जीप्रमाणे ही पाश्चात्त्य प्रगत देशांची महत्त्वाकांक्षा दिसते. आंतरराष्ट्रीय आर्थिक यंत्रणांच्या मार्फत आपल्याला अनुकूल अशी आर्थिक धोरणे हे देश अप्रगत देशांवर लादतात. याशिवाय पाश्चात्त्य सांस्कृतिक मानदंड प्रमाण मानणे, पाश्चात्त्यांचे अनुकरण करणे इ. स्वरूपातही प्रगत देशांचे छुपे वर्चस्व व्यक्त होते. या परिस्थितीचे वर्णन नववसाहतवाद असे केले जाते. हा नवा वसाहतवाद नष्ट करण्यासाठी आर्थिक सुबत्तेएवढेच स्वसंस्कृतीच्या अभिमानालाही महत्त्व आहे. विविध रूपांमध्ये देशीवाद व्यक्त होतो, तो या नववसाहतवादावरील प्रतिक्रियाच होय.

## ५.१४ सारांश

इतिहासकार या सगळ्या पैलूंचा चर्चा करतच राहतील पण या वसाहतवादाच्या विस्ताराचे जगावर झालेले परिणाम भयानक आहेत. जगामध्ये दोन गट पडले एक गट आहे आधुनिक विश्वामधील पहिल्या राष्ट्रांचा जना आपण फर्स्ट वर्ल्ड म्हणतो. ज्यामध्ये सगळ्या सुखसुविधा आहेत. उदाहरणार्थ ब्रिटन ,अमेरिका, जर्मनी व अन्य युरोपियन राष्ट्रें. तिथल्या नागरिकांचे राहणीमान उच्च दर्जाचे व सगळ्या सुविधांनी युक्त आहे. दुसरे जग आहे ते जगातील देशांचे जिथे आफ्रिकेमधील राष्ट्र व आशिया मधील गरीब राष्ट्रे भारत, पाकिस्तान व इतर. वसाहतवादी राष्ट्रांनी वसाहतींमधील पैसा नेऊन त्यांच्या देशात गुंतवला व ती राष्ट्रे श्रीमंत बनली. भारतासारखे राष्ट्र जुनी ही विकासाच्या वाटेवरच आहे. वसाहतींची अवस्था अजूनही बिकट आहे साम्राज्यवादी राष्ट्र मात्र त्यांनी स्थापन केलेल्या वसाहतींची फळे अजूनही चाखत आहेत

## ५.१५ प्रश्न

१) वसाहतवादाचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करा ?

२) साम्राज्यवादाची उद्दिष्टये स्प्ष्ट करून त्यांच्या प्रसार नीतीचे अवलोकन करा ?

३) कोलंबस व वास्को-दि-गामाने काढलेल्या शोध मोहीमा विषयी सांगा ?

४) अमेरिकेतील वसाहतवादी नितीविषयी थोडक्यात सांगा.

## ५.१६ संदर्भ


- Ann saviour, The voyages of the discovery. The Illustrated History, A and F publication, London,२००१.
- David Edergton, Rise and fall of the British Nation,, , Allen lane publication,२००१
- Parks H.B. History of America, first edition १९३६.
- प्रमोद कुमार, आधुनिक युरोप का इतिहास, पर्सन इंडिया पुब्लिकेशन, २०१६


*****

# ६

# वसाहतवादाचे स्वरूप : आशिया आणि आफ्रिका खंड

**घटक रचना**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ आशिया खंडातील ब्रिटिश वसाहतवाद

- ६.२.१ हिंदुस्थान
- ६.२.२ ब्रह्मदेश
- ६.२.३ मलाया-सिंगापूर
- ६.२.४ थायलंड
- ६.२.५ डच वसाहतवाद: ईस्ट इंडीज बेटे किंवा इंडोनेशिया
- ६.२.६ फिलिपाईन्स
- ६.२.७ फ्रेंच वसाहतवाद :इंडोचायना किंवा व्हिएतनाम
- ६.२.८ चीन

६.३ आफ्रिका खंडातील युरोपियन वसाहतवादाचे स्वरूप

- ६.३.१ बेल्जियमचा वसाहतवाद
- ६.३.२ आफ्रिका खंडातील इंग्लंडचा वसाहतवाद
- ६.३.३ इजिप्तमधील वसाहतवाद
- ६.३.४ सुदानमधील वसाहतवाद
- ६.३.५ फ्रान्सचा आफ्रिकेतील वसाहतवाद
- ६.३.६ इटलीचा आफ्रिकेतील वसाहतवाद
- ६.३.७ जर्मनीचा आफ्रिकेतील वसाहतवाद
- ६.३.८ पोर्तुगालचा आफ्रिकेतील वसाहतवाद

६.४ सारांश/मूल्यमापन

६.५ प्रश्न

६.६ संदर्भ

## ६.० उद्दिष्ट्ये

१. युरोपचे आशिया खंडातील वसाहतवादाचे स्वरूप समजून घेणे.
२. युरोपचे आफ्रिका खंडातील वसाहतवादाविषयी अधिक माहिती मिळविणे.

munotes.in

## ६.१ प्रस्तावना

आशिया आणि आफ्रिका खंडातही युरोपियन लोकांनी आपला वसाहतवाद निर्माण केला. लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या दोन्ही दृष्टीकोनातून आशिया खंड मोठा होता. राजकीय संघटना, औद्योगिक व्यवस्था आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आशियातील देशांना स्वतःची एक परंपरा आणि विशिष्ट मूल्य असल्याने आफ्रिका खंडाच्या तुलनेत आशियाई देशांमध्ये राष्ट्रवादाचादेखील लवकरच उदय झाला.


आशिया आणि आफ्रिका खंडात युरोपियन देशांना वसाहतवाद प्रस्थापित करण्यास पुढील कारणे जबाबदार ठरली :

१. आशिया, आफ्रिका खंडातील देश व प्रगत व मागास होते.

२. युरोपियन देशांकडे प्रगत साहित्य आणि प्रशिक्षित लष्कर होते.

३. आशिया व आफ्रिकेतील देशांमध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा होता आणि राज्यकर्त्यांमध्ये आपसात दुही, फितुरी होती.

१४९८ मध्ये वास्को-द-गामा  याने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत या बंदरावर पाऊल ठेवल्यानंतर आशिया आणि युरोप खंडामध्ये पुन्हा व्यापार सुरु झाला.अनेक युरोपीय देशांना याचा फायदा घेतला आणि आशियायी देशात वसाहतवाद निर्माण केला आणि स्वतःच्या देशाची प्रगती केली. आशिया खंडात इग्लंड, फ्रांस, पोर्तुगाल, हॉलंड या देशांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. वसाहतवाद हा प्रामुख्याने आर्थिक वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतूने झाला. व्यापाराच्या निमित्ताने नव्या जलमार्गाने भारतात येणाऱ्या युरोपियनांचा क्रम पोर्तुगीज, डच इंग्रज आणि शेवटी पोर्तुगीज असा आहे या वसाहतवादाच्या स्पर्धेतून अनेक संघर्ष  देखील झाले. या वसाहतवादाच्या स्पर्धेत स्पेन, पोर्तुगाल थोडे मागे पडले आणि फ्रांस आणि इंग्लंड यांच्यात पुढे संघर्ष होत राहिले पण या स्पर्धेत इंग्लंडने आपले वर्चस्व वसाहतींवर ठेवले आणि त्या प्रदेशांचे दीर्घकाळ आर्थिक शोषण केले.




**संदर्भ : आंतरजाल**

**आशिया खंडातील युरोपियन वसाहतवादाचे स्वरूप हे पुढीलप्रमाणे होते :**

## ६.२ आशिया खंडातील ब्रिटिश वसाहतवाद

**ब्रिटिश वसाहती :**

इंग्लंड हा देश भौगोलिक दृष्ट्या आकाराने जरी लहान असला तरी या देशाने अशिया आणि आफ्रिका खंडात अनेक वसाहती स्थापन केल्या. हिंदुस्थान, ब्रह्मदेश, मलेशिया इत्यादी देशांमध्ये इंग्लंडने आपले प्रभुत्व प्रस्थापित करून वसाहती निर्माण केल्या

### ६.२.१ हिंदुस्थान:

आशिया खंडात ब्रिटिशांनी ज्या वसाहती स्थापन केल्या त्यात भारत हा देश खूप महत्वाचा आहे. ३१ डिसेंबर १६०० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया या कंपनीची स्थापना झाली.या कंपनीला राणी एलिझाबेथने भारत आणि पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचे अधिकार पत्र दिले. राजा जेम्स पहिला याच्या काळात कॅप्टन हॉकिन्स (१६१२) आणि सर टॉमस रो (१६१५ ) यांनी भारतात येऊन मुगल सम्राट जहांगीरची भेट घेऊन काही व्यापारी सवलती मिळविल्या. त्यानंतर इंग्रजांनी त्यांनी १६१६ मध्ये सुरत,१७३७ मध्ये मद्रास येथे आपल्या वखारी निर्माण केल्या. पोर्तुगीजांनी मुंबई हे बेट इंग्रजांना दिले तसेच पुढे त्यानी कलकत्ता येथे आपली वसाहत निर्माण केली. भारतात आपली सत्ता निर्माण करण्यासाठी फ्रेंच आणि ब्रिटिश यांच्यात १७४० ते १७६३ पर्यंत कर्नाटकात तीन युद्धे झाली आणि त्यात ब्रिटीशांचा विजय झाला. ब्रिटिश आणि मराठे यांच्यात देखील १७७६ ते १८१८ यादरम्यान तीन युद्धे झाली आणि १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली आणि मराठी सत्तेचा अस्त झाला.

१७५७ च्या प्लासीच्या युद्धानंतर भारतामध्ये ब्रिटिशांनी आपल्या सत्तेचा पाया घालून साम्राज्याची सुरुवातच केली. १७६४ च्या बक्सारच्या युदुधाने बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतावर वर्चस्व प्रस्थापित करण्यात त्यांना यश आले. १८४३मध्ये पंजाब प्रांत जिंकून घेतला. लॉर्ड डलहौसीच्या काळात संस्थाने विलीनिकरणाचे तत्व अमलात आणल्याने साम्राज्यात वाढच झाली तसेच तैनाती फौजेचे तत्व लॉर्ड वेलस्लीने अमलात आणून अनेक प्रदेश साम्राज्याला जोडले. लॉर्ड डलहौसी दत्तक वारस नामंजूर करून झाशी, सातारा, जयपुर, संबलपुर, उदयपूर ही संस्थाने खालसा केली आणि आपल्या साम्राज्यात वाढच केली सहाजिकच ब्रिटिशांची संस्था सत्ता अधिक विस्तारित झाली. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षाच्या काळात ब्रिटीशांची भारत वसाहत बनला आणि कच्चा माल पुरविणारी आणि पक्का माल विकत घेणारी हक्काची बाजारपेठ बनला. भारताचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण करण्यात आले. आशिया खंडात भारताशिवाय ब्रह्मदेश, मलाया, चीन या प्रदेशांवर इंग्रजांनी आपली सत्ता निर्माण केली.

दीव, दमण, गोवा, चौल, वसई आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेशांवर पोर्तुगीजांनी वर्चस्व निर्माण केले तर श्रीलंका आणि मसाल्याची बेटे डचांनी ताब्यात घेतली. फ्रांसने इंडोचायनाला आपली वसाहत बनविले.



### ६.२.२ ब्रह्मदेश:

आशिया खंडातील ब्रह्मदेशामध्ये इंग्लंडने आपला वसाहतवाद निर्माण केला ब्रह्मदेश जिंकण्यासाठी ब्रिटिशांनी १८२४ ते१८२६ मध्ये पहिले ब्रिटिश ब्रह्मदेश युद्ध केले आणि त्यानुसार ब्रिटिशांना ब्रह्मदेशातील आरोकन व ते तेनासारीन हे प्रदेश मिळाले दुसरे ब्रिटिश ब्राह्मी युद्ध १८४८ ते १८५२ या काळात केले आणि दक्षिण ब्रह्मदेश ब्रिटिशांनी जिंकला तर १८८५ मध्ये तिसरे ब्रिटिशब्राह्मी युद्ध करून उत्तर ब्रह्मदेश ब्रिटिशांनी जिंकला आणि ब्रह्मदेश ब्रिटीशांची वसाहत बनला.

### ६.२.३ मलाया-सिंगापूर:

मलाया ब्रिटीशांची आग्नेय आशियातील महत्वाची वसाहत असून मलेशिया हे द्वीपकल्प व्यापारी मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण होते. ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापित केल्यानंतर मलायाकडे आपले लक्ष वळविले आणि मलायाच्या दक्षिणेस असलेले सिंगापूर बेट ताब्यात घेऊन तेथे आरमारी तळ उभारले. ब्रिटिशांनी सिंगापूरला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ बनवले तर मलायाचे दीर्घकाळ शोषण केले आणि या वसाहतींचा पूर्णपणे आर्थिक फायदा घेतला.

### ६.२.४ थायलंड:

थायलंड किंवा सयाम या देशाच्या पश्चिमेकडे ब्रिटिश साम्राज्य व पूर्वेला फ्रेंच साम्राज्य होते. सगळ्यांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची इच्छा इंग्लंड व फ्रान्स यांना होती. या दोन्ही देशांमध्ये या प्रदेशाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न झाल्याने तेथे परकीय सत्ता प्रस्थापित झाली नाही पण चीनप्रमाणेच पाश्चात्त्यांनी या देशाकडून अनेक व्यापारी सवलती मिळविल्या आणि आर्थिक शोषण केले.

### ६.२.५ डच वसाहतवाद :ईस्ट इंडीज बेटे किंवा इंडोनेशिया:

पॅसिफिक महासागराच्या दक्षिण भागात असणाऱ्या बेटांना ईस्ट इंडीज बेटे असे म्हणतात. येथे मात्र जावा, सुमात्रा, बोर्निओ सेलीबीज, न्यू गिनी ही महत्त्वाची बेटे होती. सोळाव्या शतकामध्ये पाश्चात्त्यांचे लक्ष या बेटांकडे गेले आणि सुरुवातीला व्यापार करण्यासाठी

पोर्तुगिजांनी प्रयत्न केले पण हॉलंडमधील डच लोकांनी येथे आपले साम्राज्य उभे केले. १६०२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करून त्यांनी या भागामध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली. डचांच्या इंडोनेशियामधील वसाहतवादी कारकिर्दीचे प्रामुख्याने पुढील भाग पडतात.

अ) व्यापार कालखंड (१६०० -१८०० )

ब) लागवड कालखंड (१८००-१८७०)

क) प्रशासन कालखंड (१८७०-१९४१ )

व्यापारी कालखंडाच्या काळात त्यांनी मसाल्याच्या पदार्थावर लक्ष केंद्रित केले तर लागवड कालखंडाच्या काळात इंडोनेशियातील डच सरकारने शेतकऱ्यांना जमिनीपैकी काही ठराविक भागात व्यापार करण्यास योग्य असलेली पिके पिकविण्यासाठी सक्ती केली . उदाहरणार्थ साखर, कॉफी आणि तंबाखू आणि मसाल्याचे पदार्थ. यामुळे त्यांचा प्रचंड फायदा झाला. सहाजिकच वसाहतवादाच्या काळात इंडोनेशियन जनतेचे प्रचंड आर्थिक शोषण करण्यात आले.

### ६.२.६ फिलिपाईन्स:

हे देखील बेटांचा समूह असलेल्या देशातील एक राष्ट्र असून पोपने जगाच्या केलेल्या वाटणीनुसार फिलिपाईन्स प्रदेश पोर्तुगालच्या प्रभावक्षेत्र खाली येत असल्याने येथे इतर राष्ट्रांना युद्ध करावी लागली. १५६४ पासून फिलिपाइन्सवर स्पेनचे वर्चस्व प्रस्थापित झाले आणि १५७१ मध्ये मॅनीला हे शहर वसविले. वसाहतवादाचे स्वरूप व्यापारी व धार्मिक स्वरूपाचे होते. येथे त्यांनी शैक्षणिक विकास न करता वंश श्रेष्ठत्वाच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. तंबाखूच्या उत्पादनाची सक्ती केल्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यामुळे सामान्य जनता खूपच त्रस्त झाली. १८९८ मध्ये झालेल्या स्पेन-अमेरिका युद्धामध्ये स्पेन पराभूत झाला आणि अमेरिकेने फिलिपाईन्स वर ताबा मिळविला अमेरिकेने येथील लोकांना स्वयंशासनाचे अधिकार देऊन शैक्षणिक व सामाजिक प्रगती साधली.

### ६.२.७ फ्रेंच वसाहतवाद :इंडोचायना किंवा व्हिएतनाम:

आशियातील या प्रदेशात भारतीय संस्कृती आणि चिनी संस्कृती यांचा प्रभाव पडल्याने त्या प्रदेशाला इंडोचायना हे नाव पडले. इंडो चायना मध्ये कोचीन ,कंबोडिया, लाओस हे प्रदेश होते. फ्रान्सने इंडो-चीनमध्ये आपला वसाहतवाद निर्माण केला .या देशामधून मधून कोळसा, लोखंड चुनखडी, जस्त कथील या वस्तूंची लूट केली. ठिकठिकाणी खाणी खोदून तेथील उत्पन्न आपल्या ताब्यात घेतले. मीठ, अल्कोहल यांचा व्यापार देखील फ्रेंचांच्या ताब्यात होता. इंडोचायना लोकांचे मोठ्या प्रमाणात फ्रेंच भांडवलदारांनी शोषण केले. तसेच फ्रेंचांना व्यापाराचा व ख्रिश्चन धर्माच्या प्रचाराचा अधिकार मिळाला तेव्हापासून ख्रिश्चन धर्मप्रसाराला देखील येथे गती प्राप्त झाली.

### ६.२.८ चीन:

आशियातील चीन या देशाला स्वतःची संस्कृती आणि परंपरा याचा प्रचंड अभिमान होता त्यामुळे त्यांनी पाश्चात्त्यांना आपल्या देशात अधिक काळ ढवळाढवळ करू दिली नाही.१६४४ ते १९११ या कालखंडात चीनमध्ये मांचू घराण्याची राजवट होती.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला मात्र येथील चित्र बदलून युरोपीय व्यापाऱ्यांनी चीनमध्ये अफूच्या विक्रीला प्रारंभ केला. अफूच्या प्रश्नावरुन १८३९ मध्ये इंग्लंड आणि चीन यांच्यात पहिले अफूचे युद्ध झाले आणि चीनचा पराभव झाला. त्यानंतर नान्किंगच्या झालेल्या तहानुसार चीनने  इंग्लंड आणि इतर युरोपीय देशांना अनेक सवलती दिल्या. अफूच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांशी १८५६-१८६० या काळात दुसरे अफूचे युद्ध झाले. या युद्धानंतर टिएन्स्टीन (१८१८ )आणि १८६० मध्ये पेकिंग चा चा तह झाला आणि यानंतर पाश्चात्त्य राष्ट्रांचे वर्चस्व चीनवर  प्रस्थापित झाले. १८५० ते १८६४ या काळात झालेल्या तैपिंगच्या बंडानंतर मांचु राजवट डळमळीत झाली.हे बंड मोडून काढण्यासाठी चीनी राज्यकर्त्यानी परकीय सत्तांची मदत घेतली आणि त्याबदल्यात व्यापारी सवलती दिल्या. याचा आर्थिक फायदा युरोपीय सत्तांना झाला.

१८८५ मध्ये  मध्ये फ्रान्सने व्हिएतनाम जिंकला आणि या भागातील कोचीन, चीन कंबोडिया, लाओस हे प्रदेश फ्रान्सने स्वतःच्या ताब्यात घेतले. ब्रिटनने देखील पहिल्या व दुसऱ्या अफूच्या युद्धातील तरतुदीनुसार चीनमध्ये खूप सवलती मिळविल्या. चीन मध्ये पाश्चात्त्यांचा वसाहतवाद अधिक मोठ्या प्रमाणावर पसरला.




संदर्भ :फडके,गायकवाड,कोलारकर.,**अर्वाचीन जगाचा इतिहास,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर ,१९७९, पृ .२२९.

## ६.३ आफ्रिका खंडातील युरोपियन वसाहतवादाचे स्वरूप

युरोप खंडाच्या जवळ असणारा  आफ्रिका खंड अज्ञात खंड किंवा काळा खंड या नावाने ओळखला जात असे. तेथील निग्रोंचा वापर हा युरोप वअमेरिकेमध्ये गुलाम म्हणून प्रामुख्याने केला जात असे. दरवर्षी लाखोंच्या संख्येने मध्ये निग्रो हे जहाजांमध्ये वरून अमेरिकेत वयुरोपात पाठविले जात असत. पुढे वास्को-द-गामा च्या पर्यटनामुळे खऱ्या अर्थाने आफ्रिकेच्या विस्तृतपणाची कल्पना युरोपला आली  आणि युरोपमध्ये विविध प्रदेश शोधून काढण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. इंग्लंडच्या  रॉयल जिओग्राफीकल सोसायटीने नाईल नदीचा उगम शोधून काढण्याचे ठरविले. त्यातच इंग्लंडचा पर्यटक मंगोपार्क नायजर

नदी शोधून काढली. लिविंगस्टन याने झांबेझी नदीचा शोध लावला.हेन्री स्टॅनले याने 'थ्रू द डार्क कॉन्टिनेन्ट' (Through the Dark Continent) हा प्रवास वृत्तांत लिहिला सहाजिकच या खंडाविषयी अधिकच उत्सुकता वाढत गेली. आफ्रिकेच्या कांगो खोऱ्याची अधिक माहिती लिविंगस्टन आणि स्टॅनले यांनी गोळा केली आणि खोऱ्यात सत्ता प्रस्थापित करण्यासाठी ही बेल्जियम या देशाने प्रयत्न केले.

### ६.३.१ बेल्जियमचा वसाहतवाद:

आफ्रिकेमध्ये वसाहती स्थापन करण्यासाठी बेल्जियम या देशातील लिओपोल्ड द्वितीयने आफ्रिकेमध्ये वसाहती स्थापन करण्यासाठी विशेष लक्ष दिले आणि आफ्रिकेची माहिती मिळविण्यासाठी त्यांनी जगातील भूगोल तज्ञांचे एक संमेलन सुद्धा १८७६ मध्ये ब्रुसेल्स येथे आयोजित केले होते . लिओपोल्डचे लक्ष कांगो प्रदेशाकडे आकर्षित होऊन त्याने कांगो फ्री स्टेट हा प्रदेश १८८५ मध्ये आपल्या ताब्यात घेतला आणि हा प्रदेश त्याची खाजगी संपत्ती होती. त्याच्या यशामुळे अनेक युरोपीय देशांचे प्रतिनिधी आफ्रिका खंडाच्या आंतरभागात शिरले आणि येथील जमातींच्या प्रमुखांशी करार केले. आफ्रिकेतील वसाहतींच्या प्रश्नावरून युरोपियन देशांमध्ये कटुता येऊ नये यासाठी १८८४ मध्ये बर्लिन येथे एक परिषद घेण्यात आली आणि पुढील निर्णय घेण्यात आले .

१. युरोपियन देशांनी बेल्जियमचे कांगोवरील वर्चस्व मान्य करावेत आणि हा प्रदेश लिओपोल्डच्या सार्वभौमत्वाखाली द्यावा.

२. कांगोतील सर्व जलमार्ग, व्यापार सर्व राष्ट्रांना खुला करावा.


३. आफ्रिकेतील कोणताही प्रदेश युरोपातील कोणत्याही राष्ट्राने ताब्यात घेतल्यास त्याची माहिती इतर युरोपीय देशांना द्यावी.

४. गुलामांचा व्यापार बंद करण्याकरिता युरोपातील राष्ट्रांनी एकमेकांना सहकार्य करावे. १८८४ च्या बर्लिन परिषदेनंतर आफ्रिकेचे विभाजन जलद गतीने झाले व पहिल्या जागतिक महायुद्धापर्यंत इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली, जर्मनी या सर्व युरोपियन देशांनी आपल्या वसाहती आफ्रिका खंडात स्थापन केल्या.पण १९०८ मध्ये बेल्जियम सरकारने कांगोचा प्रदेश स्वतःकडे घेतला. लिओपोल्ड द्वितीयने कांगो फ्री स्टेट प्रदेश घेतल्यापासूनच खऱ्या अर्थाने अनेक युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकेतील प्रदेश ताब्यात घेतल्यास सुरुवात केली आणि अगदी कमी वेळात होत संपूर्ण आफ्रिका खंड युरोपच्या ताब्यात आला. आफ्रिकेच्या विभाजनाच्या प्रक्रियेत सर्वाधिक लाभ हा फ्रांस आणि इंग्लंडचा झाला.

**आफ्रिका खंडातील वसाहतीचे स्वरुप: संदर्भ : आंतरजाल**



munotes.in





१८७० पर्यंत युरोपीय राष्ट्रांच्या अंमलाखालील आफ्रिकन प्रदेश

**संदर्भ :**फडके,गायकवाड,कोलारकर.,**अर्वाचीन जगाचा इतिहास,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर ,१९७९ ,पृ .२१७ .




**संदर्भ :**फडके,गायकवाड,कोलारकर.,**अर्वाचीन जगाचा इतिहास,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर,१९७९, पृ २१९ .




**संदर्भ :**फडके, गायकवाड, कोलारकर.,**अर्वाचीन जगाचा इतिहास,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर ,१९७९ ,पृ .२२२ .

### ६.३.२ आफ्रिका खंडातील इंग्लंडचा वसाहतवाद:

इंग्लंडने आफ्रिका खंडात अनेक वसाहती मिळविल्या. त्याच्या ताब्यात केनिया, युगांडा सुदान, नायजेरिया, गोल्ड कोस्ट इत्यादी प्रदेश होते. प्रामुख्याने दक्षिण आफ्रिका आणि इजिप्त या प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी इंग्लंडला खूप लढा द्यावा लागला. दक्षिण आफ्रिका खंडात सर्वात जास्त वसाहती स्थापन केल्या. आफ्रिकेच्या दक्षिण टोकावर असणाऱ्या केप कॉलनी ही वसाहत डच सरकारकडून इंग्रजांनी खरेदी केली. १८२४ मध्ये ब्रिटिशांनी नाताळ ही वसाहत स्थापन केली आणि येथील बोअरलोक उत्तरेकडे स्थलांतरित झाले. आफ्रिकेत नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट आणि ट्रान्सवाल या वसाहती देखील स्थापन झाल्या. १८८१ एक मध्ये इंग्लंडने ट्रान्सवाल ला स्वातंत्र्य दिले पण ट्रान्सवाल मध्ये सोन्याच्या खाणी सापडल्याने दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहत वाले पुन्हा आकर्षित झाले आणि केप कॉलनीच्या सोसिल ऱ्होडेस या पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी ट्रान्सवालवर आक्रमणे केली. ब्रिटीशांचा विजय झाल्याने ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेटवरील ब्रिटिशांचे सार्वभौमत्व मान्य करण्यात आले. १९१० मध्ये केप कॉलनी, ऑरेंज फ्री स्टेट, ट्रान्सवाल व नाताळ या चार राज्यांचा आफ्रिका संघ स्थापन झाला दक्षिण आफ्रिका वइजिप्त या शिवाय आफ्रिकेतील सुदान, ब्रिटिशपूर्व आफ्रिका, युगांडा गोल्ड कोस्ट, नायजेरिया येथेही ब्रिटिशांनी वसाहती स्थापन केल्या.

### ६.३.३ इजिप्तमधील वसाहतवाद:

हा देश आफ्रिकेच्या उत्तर टोकावर तुर्की साम्राज्याचा भाग जरी होता तरी एकोणिसाव्या शतकात तुर्की सुल्तानाचे नियंत्रण कमी झाले होते. इजिप्तमध्ये फ्रान्सने आर्थिक हितसंबंध प्रस्थापित केले. इजिप्तमधील शासकांनी भूमध्य समुद्र आणि लाल समुद्र यांना जोडणारा सुएझ कालवा फ्रेंच तंत्र विशारद फर्डिनांड दि लेसेक्स यांच्या देखरेखीखाली बांधण्यास घेतला सहाजिकच इजिप्तमध्ये फ्रान्सचे लक्ष वेधले. इजिप्तवर राज्य करणारा इस्माईल पाशा हा उधळ्या स्वभावाचा असल्याने तो कर्जबाजारी झाला आणि १८७५ मध्ये सुएझ कालव्याचे शेअर्स त्याने विक्रीस काढले व इंग्लंडचे पंतप्रधान दिझ्राय्ली डीझरायली यांनी ते खरेदी केल्याने इंग्लंडचे वर्चस्व सुएझ कालव्यावर निर्माण झाले. इजिप्तमधील लोकांनी परकीय सत्तेविरुद्ध १८८२ मध्ये उठाव केला हा उठाव इंग्लंडने मोडून काढला वआपले वर्चस्व कायम ठेवून तेथे नियंत्रण ठेवले आणि १९०४ मध्ये सुद्धा झालेल्या मैत्री करारानुसार फ्रान्स नाही इजिप्त वरील इंग्लंडच्या एकछत्री नियंत्रणाला मान्यता दिली.

### ६.३.४ सुदानमधील वसाहतवाद:

इजिप्तच्या दक्षिण दिशेला नाईल नदीचा खोऱ्याचा विस्तृत प्रदेश सुदान होता. इजिप्तवर आपले सार्वभौमत्व असल्यामुळे सुदान वरही आपला अधिकार आहे असे मत इंग्लंडने मांडले. सुदान इंग्रजांच्या ताब्यात जाऊ नये म्हणून फ्रान्सने देखील प्रयत्न केले. इंग्रजांच्या दृष्टीने सुदान आफ्रिकेची गुरुकिल्ली होती. १८९९ मध्ये इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांनी सुदान जिंकण्यासाठी फौजा पाठविल्या पण नंतर या दोन्ही देशांनी आपसा मध्ये करार

करून ब्रिटनने पश्चिम आफ्रिकेत फ्रान्सला काही सवलती दिल्या आणि त्या बदल्यात फ्रान्सने सुद्धा सुदान वरील ब्रिटनचे वर्चस्व मान्य केले.

### ६.३.५ फ्रान्सचा आफ्रिकेतील वसाहतवाद:

इंग्लंडनंतर आफ्रिकेत वसाहत वाद निर्माण करण्यामध्ये फ्रान्सचा दुसरा क्रमांक लागतो. १८२४ ते १९१४ या काळात फ्रान्सने आफ्रिकेच्या ३५ लक्ष चौरसमैलाच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली होती.१८३० मध्ये फ्रान्सने आफ्रिकेतील अल्जेरिया मध्ये लष्कर पाठवून आपला वसाहतवाद निर्माण केला. अल्जेरियाच्या दक्षिणेस असलेल्या सहारा वाळवंटावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. १८९६ मध्ये त्तर आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या मादागास्कर बेटावर तसेच १८८१ मध्ये उत्तर आफ्रिकेत अल्जेरियाच्या पूर्वेला असणाऱ्या ट्युनिशिया या प्रदेशावर त्यांनी आपली सत्ता स्थापन केली. १९२१ मध्ये मोरोक्कोचा प्रदेश जिंकून घेतला, फ्रान्सने नायगर नदीचे खोरे, सेनेगालचे खोरे, मिनिकोस्ट व हे प्रदेश ताब्यात घेतले आणि आपला वसाहतवाद आफ्रिकेत वृद्धिंगत केला.

### ६.३.६ इटलीचा आफ्रिकेतील वसाहतवाद:

१८७१ मध्ये इटलीचे एकीकरण झाले आणि इटलीने देखील आफ्रिकेतील काही प्रदेश आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. १८८३ मध्ये इरिट्रिया आणि १८८९ मध्ये सोमालीलॅंड आपल्या ताब्यात घेतले तसेच इथोपिया आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला पण त्यात फार यश आले नाही. उशिरा का होईना पण आफ्रिका खंडामध्ये आपल्या वसाहती स्थापन करण्यास इटली या देशानेही कसूर केली नाही.

### ६.३.७ जर्मनीचा आफ्रिकेतील वसाहतवाद:

इटली प्रमाणेच जर्मनीचे एकीकरण १८७१ मध्ये पूर्ण झाले आणि या देशाने देखील आफ्रिकेतील वसाहती मिळविण्याचा प्रयत्न केला. कामेरून आणि टोगोलँड हे प्रदेश जर्मनीने प्राप्त केले. जर्मनीच्या उदयोन्मुख वसाहतवादाला आफ्रिकेशिवाय अन्य प्रदेश नव्हता.आफ्रिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावरील विस्तीर्ण प्रदेश आपला वसाहतवादाखाली आणण्यात यश मिळविले होते. जर्मन पूर्व आफ्रिका जर्मन वायव्य आफ्रिका या नावाने हे जर्मन व्याप्त प्रदेश ते ओळखले जात होते.

### ६.३.८ स्पेन, पोर्तुगालचा आफ्रिकेतील वसाहतवाद:

स्पेन या देशांने मोरोक्कोवर आपले वर्चस्व निर्माण केले त्याशिवाय कॅनरी बेटे, गिनी येथील बेटे, रीओ डी ओरो,रिओ मुनी येथेदेखील त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या.

आफ्रिकेचा शोध लावण्यात **पोर्तुगाल** या देशाने बराच प्रयत्न केला होता पण त्या तुलनेत पोर्तुगालच्या वाट्याला आफ्रिकेतील प्रदेश वसाहतींच्या स्वरूपात कमी प्रमाणात मिळाला.

munotes.in

अंगोला व मोझँबिक येथे पोर्तुगिजांच्या वसाहती असून पश्चिम किनाऱ्यावरील गिनी ही पोर्तुगीजांची वसाहत होती.पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत दक्षिण मध्य आफ्रिकेत पोर्तुगीज वर्चस्व मात्र निर्माण करता आले नाही. एकंदरीतच आफ्रिका आणि आशिया खंडात युरोपीय देशांनी आपला वसाहतवाद यशस्वी रित्या राबविला आणि स्वतःची आर्थिक प्रगती केली . या देशांनी वसाहतीमध्ये प्रचंड दडपशाही केली.'फोडा आणी झोडा' ही राजनीती स्वीकारली. संपूर्ण वर्चस्व निर्माण करण्याच्या वृत्तीमुळे साम्राज्यवादास सुरुवात झाली आणि यातूनच जगात दोन जागतिक महायुद्धे घडून आली.१९१४ मध्ये पहिले महायुद्ध झाले आणि १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध झाले .

## ६.४ सारांश/मूल्यमापन

१९३९ मध्ये सुरु झालेले दुसरे जागतिक महायुद्ध १९४५ मध्ये संपले आणि या महायुद्धानंतर जगात वेगळी परिस्थिती निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवादी राष्ट्रांच्या धोरणात बदल घडून आला आणि त्यांनी आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशांबाबतचे वसाहतवादी धोरण सोडून दिले. यास 'निर्वसाहतवाद' असे म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतःच्या वसाहतींवर नियंत्रण ठेवणे साम्राज्यवादी राष्ट्रांना कठीण जाऊ लागले. वसाहतीमध्ये राष्ट्रवादाची भावना अधिक प्रबळ होऊन राष्ट्रवादी चळवळी प्रखर झाल्या होत्या. अटलांटिक सनदेनंतर समानता,समान संधी,मित्रत्वआणि मानवी अधिकार याबाबत विचार होऊ लागला आणि साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशाना स्वातंत्र्यदेण्याचे धोरण स्वीकारले त्या मुळे साम्राज्यवादाचे आणि वसाहतवादाचे समाप्ती झाली. आशिया आणि आफ्रिका खंडातील स्वतंत्र झालेला पहिला देश म्हणजे भारत होय. यानंतर आशिया आणि आफ्रिका खंडात साम्राज्यवाद विरोधी जबरदस्त लाट निर्माण होऊन १९४९ मध्ये इंडोनेशिया १९५७ मध्ये मलाया स्वतंत्र झाले . दुसऱ्या महायुद्धानंतर फिलिपाईन्स मुक्त करण्याचे आश्वासन अमेरिकेने दिले आणि त्यानुसार फिलिपाईन्स स्वतंत्र झाला. आफ्रिका खंडात इंग्लंडने देखील आपल्या नियंत्रणाचा त्याग केला. फ्रान्सच्या वर्चस्वातून १९५६ मध्ये मोरोक्को व ट्युनिशिया स्वतंत्र झाले तर १९५७ मध्ये इंग्लंडच्या ताब्यातील गोल्ड कोस्ट स्वतंत्र झाले. १९६० मध्ये १३ फ्रेंच वसाहती स्वतंत्र झाल्या तसेच १९६० मध्ये बेल्जियमच्या ताब्यातील कांगो प्रदेश स्वतंत्र झाला आणि १९४५ ते १९६० या कालखंडात म्हणजेच जवळ-जवळ अवघ्या पंधरा वर्षांमध्ये वसाहतवाद तसेच साम्राज्यवाद देखील संपुष्टात आला.

## ६.५ प्रश्न

१. आशिया खंडातील युरोपीय वसाहतवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. चीन मधील युरोपीय वसाहतवादाचे विवेचन करा .

३. आशियातील इंग्लंडमधील वसाहतवादाचे स्वरूप लिहा.

४. भारताचा विशेष संदर्भ देऊन इंग्लंडच्या आशिया खंडातील वसाहतींची माहिती लिहा.



munotes.in

५. आशिया खंडातील भारत आणि चीनच्या संदर्भात युरोपीय खंडाचा वसाहतवाद स्पष्ट करा.

६. आफिका खंडातील युरोपीय वसाहतवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

७. युरोपीय देशांनी आफिकेत केलेल्या वसाहतींचे स्वरूप स्पष्ट करा.

८. वसाहतवाद म्हणजे काय हे स्पष्ट करून आफ्रिकेत युरोपच्या वसाहती कशा स्थापन झाल्या ते स्पष्ट करा.

## ६.६ संदर्भ


- कोलारकर श. गो.,**पाश्चिमात्य जग** ,श्री मंगेश प्रकाशन , नागपूर ,२००५.
- कुलकर्णीअ.रा, देशपांडे, प्र .न ,अ .म.देशपांडे., **आधुनिक जगाचा इतिहास**, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९७८.
- गाठाळ एस. एस., **आधुनिक युरोपचा इतिहास**, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद,२००५.
- जाधव हरिदास, चव्हाण कल्याण, **आधुनिक जगाचा इतिहास**, अक्षरलेण प्रकाशन, सोलापूर ,२००६.
- दीक्षित नी. सी, **पाश्चिमात्य जग १५व्या शतकाचा मध्य ते द्वितीय महायुद्ध**, पिंपळापूरे अँड कंपनी पब्लिशर्स,नागपूर,२००५.
- फडके, गायकवाड, कोलारकर., **अर्वाचीन जगाचा इतिहास,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर ,१९७९ .
- वैद्य सुमन, **आधुनिक जग**, पायल प्रकाशन, नागपूर,१९७६ .


*****

munotes.in

# ७

# साम्राज्यवादाचे सिद्धांत व यंत्रणा

**घटक रचना**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ साम्राज्यवादाचा सिद्धांत
७.३ साम्राज्यवादाची परंपरा
७.४ होबासोन चा साम्राज्य वादाचा सिद्धांत
७.५ गैर - आर्थिक सिद्धांत
७.६ साम्राज्य वादाची हेतू किंवा कारणे
७.७ साम्राज्य वादासाठी राबवलेली यंत्रणा(Mechanism)
७.८ आफ्रिकेमधील साम्राज्य विस्तार
७.९ आफ्रिकेचे साम्राज्यवादी राष्ट्रांनी विभागून घेतलेले प्रदेश १९०० पर्यन्त
७.१० आशियामधील साम्राज्यविस्तार
७.११ युरोपियन देशांच्या साम्राज्यवादी नीतीचे परिणाम
७.१२ आशियाई राष्ट्रावरील परिणाम
७.१३ सारांश
७.१४ प्रश्न
७.१५ संदर्भ

## ७.० उद्दिष्ट्ये

१) साम्राज्यवादीच्या नीतीचा विचार करणे.

२) वसाहत वादाचा प्रसार कसा झाला या विषयी शिकणे.

३) आशिया आणि आफ्रिकेमध्ये वसाहतवादाची पाळेमुळे कशी रुजली.

४) साम्राज्यवादी नीतीचे काय परिणाम झाले.

## ७.१ प्रस्तावना

**साम्राज्यवादाचे सिद्धांत व यंत्रणा:**

आपण प्रकरणांमध्ये साम्राज्यवादाचे स्वरूप त्यासाठी झालेले शोध ,आशिया व आफ्रिका खंडात साम्राज्य वादाची सुरुवात शिकत आहोत पण याच बरोबर महत्वाचे आहे की

munotes.in

साम्राज्यवाद कोणत्या सिद्धांतावर आधारित होता, व त्याला प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी कोणती यंत्रणा राबवण्यात आली हे शिकणे पण महत्त्वाचे आहे.

## ७.२ साम्राज्यवादाचा सिद्धांत

साम्राज्यवादाच्या सिद्धांतामध्ये भांडवलशाहीचा उदय, जगातील देशांच्या अविकसित पणा, प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेची पायाभूत मूल्य, या सगळ्या गोष्टींचा विचार करणे अपरिहार्य आहे. मुळातच साम्राज्यवाद म्हणजे दुसऱ्या देशात जाऊन सत्ता काबीज करणे व सत्ता स्थापन करून देशाला आर्थिक दृष्ट्या दुर्बल करणे. खरंतर साम्राज्य वादाचा सिद्धांत बहुतेक वेळा काल मार्क्स च्या सिद्धांताशी जोडला जातो पण केवळ मार्क्स च्या सिद्धांताचा विचार न करता इतर काही सिद्धांतांचा सुद्धा अभ्यास करूया.

## ७.३ साम्राज्यवादाची परंपरा

साम्राज्यवादाची ची परंपरा जाणून घेण्यासाठी आपण मार्क्स च्या आधी लेनिनने लिहिलेल्या साम्राज्यवादाच्या व्याख्येचे अध्ययन करू. .त्याने लिहिलेल्या" Lenin's Imperialism: the highest stage of capitalism' या पुस्तकात तो साम्राज्यवादाची पाच प्रमुख वैशिष्ट्ये सांगतो.

१) उत्पादनाच्या व भांडवलाच्या केंद्रीय करणामुळे एकाधिकारशाही निर्माण झाली . आर्थिक व्यवस्थेमध्ये ही एकाधिकारशाही लोकांमध्ये आपले वर्चस्व निर्माण करते.

२) बँका व मोठे मोठे उद्योग घराणे आपले भांडवल एकत्र आर्थिक करून आर्थिक कुलीन शाही निर्माण करतात व वर्चस्व गाजवतात.

३) उत्पादनाच्या एवजी जागी भांडवलदार आपले भांडवल निर्यात करतात.

४) आंतरराष्ट्रीय भांडवलदारांची मक्तेदारी विश्वावर आपले आधिपत्य स्थापन करतात व जगातील देश ते साम्राज्य स्थापन करण्यासाठी आपसात वाटून घेतात.

५) अशा प्रकारे जगातील शक्तिशाली राष्ट्रे अविकसित खंडावर प्रभुत्व स्थापन करतात व साम्राज्य वादाला सुरुवात होते.

आता आपण कार्ल मार्क्स च्या सिध्दांत चा विचार करूया. खरं पाहता कार्ल मार्क्स ने कधीही आपल्या लिखाणामध्ये साम्राज्यवाद हा शब्द वापरलेला नाही. त्याने कोणताही सिद्धांत साम्राज्यवादाला धरून लिहिलेला नाही. पण कार्ल मार्क्स लिखाणाचे विश्लेषण करणाऱ्या अनेक तत्त्वज्ञानानि त्याच्या सिद्धांताचा संबंध साम्राज्यवादा शी जोडला आहे. मार्क्सने आपले पुस्तक कॅपिटलटलच्या तेराव्या प्रकरणात टी आर पी एफ म्हणजे Tendency of the rate of profit to fall चा उल्लेख केला आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर कार्ल मार्क्स च्या मते काही विशिष्ट काळा नंतर उत्पादनातून मिळालेला नफा कमी होत जातो. यासाठी मार्क्स विविध कारणे देतो उदाहरण कामगारांची काम करण्याची क्षमता कमी होते. मग भांडवलदार नवी नवी साधने शोधू लागतात जेणेकरून उत्पादनातून

munotes.in

होणाऱ्या नफ्याची क्षमता वृद्धिंगत होईल. म्हणून मग ते राजकारण्यांशी संबंध जुळवून घेतात, दुसरे  देश गुंतवणुकीसाठी शोधायला लागतात व साम्राज्यवादाची सुरवात होते.

ते खरं तर औद्योगिक क्रांतीमुळे मागासलेल्या देशांचा विकास व्हायला हवा पण तसे होत नाही कारण भांडवलदार व साम्राज्यवादी राष्ट्रांना तसे होणे परवडणारे नाही. भारताचा औद्योगिक क्रांतीमुळे फायदा न होता नुकसान झाले कारण इंग्लंडला भारतीयांच्या स्थितीत बदल घडवून आणायचं नव्हते. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला राहणेच त्यांच्या फायद्याचे होते.

## ७.४ होबासोन चा साम्राज्य वादाचा सिद्धांत

लेनिन प्रमाणेच मार्क्स च्या विचारांचा प्रभाव इंग्लंडचा प्रसिद्ध अर्थतज्ञ ज. अ. होबासोन वर होता. होबासोन एकोणीशे दोन मध्ये" साम्राज्यवाद  एक अभ्यास 'नावाचा निबंध लिहिला. या निबंधामध्ये त्याने प्रतिपादन केले आहे आहे की मक्तेदारी मुळे लोकांच्या हाती पैसा राहतो पण हे लोक पैसा वाचवण्यासाठी गुंतवणूक करत नाही. गुंतवणूक न केल्यामुळे उत्पादनक्षमता वाढत नाही व नवीन रोजगार व बाजारपेठांची निर्मिती होत नाही. अशावेळी नवीन नवीन बाजारपेठा शोधल्या जातात व त्या शोधण्यासाठी आपल्या सरकारांवर ही मूठभर लोक दबाव टाकून साम्राज्यवादी स्पर्धेला सुरुवात करतात. होबासोन च्या मते साम्राज्य वादामुळे इंग्लंडचा फायदा न होता नुकसानच झाले आहे. साम्राज्यवाद लोकशाहीसाठी विनाश कारक आहे. नैतिक दृष्ट्या सुद्धा साम्राज्यवाद विनाशकारी आहे. साम्राज्य वादामुळे ब्रिटिश सत्ता आधिकारी व थोडीफार भांडवलदार वगळता सामान्य लोकांना त्याचा काहीच फायदा झाला नाही.

होब्सन  व लेनिन यांच्या मते भांडवल शाही अर्थ व्यवस्थेच्या देशात परकीय देशांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी त्या देशातील सरकारांवर प्रचंड दबाव टाकण्यात आला .म्हणूनच १८७० नंतर साम्राज्य वादी स्पर्धेला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली. रोझा लक्झेंबर्ग पोलिश अर्थशास्त्रज्ञ च्या मतेसाम्राज्यवादी स्पर्धेला खरी सुरवात १८९५ मध्ये झाली कारण भांडवलशाहीचा प्रसार त्यावेळी जगभरात झाला होता. तिने १९१३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात-- पुस्तकाचे नाव आहे ॲक्युमुलेशन ऑफ कॅपिटल यामध्ये ती लिहिते की भांडवल शाळेच्या प्रसारामुळे जगात स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. जगातला कोणता कोपरा भांडवल शाही  पासून वाचला आहे याचा शोध घेऊन तिथपर्यंत पोहोचण्याची घाई जगातल्या प्रबळ राष्ट्रांना झाली. तिच्या मते नवीन युगाची सुरुवात अठराशे १८९५ मध्ये झाली जेव्हा जर्मनीने इंग्लंडच्या नाविक सामर्थ्याला आवाहन दिले. ज्याची परिणीती १९१४ च्या प्रथम महायुद्धात झाली.

निकोलाय बुखाराइत या  रशियन बोलशेविक नेता च्या मते प्रत्येक राष्ट्र स्वतःचे सामर्थ्य वाढवण्यासाठी दुसऱ्याच्या आयात केलेल्या मालावरील जकातीचे दर वाढू लागला व निर्यात करताना मात्र स्वतःचे दर कमी ठेवू लागला. जेव्हा ही राष्ट्र एकमेकांबरोबर स्पर्धेत

गुंतली गेली तेव्हा ती स्पर्धा सोडवण्यासाठी युद्ध हा एकच पर्याय त्यांच्यासमोर उरला. वसाहतीमधून आलेला अमाप पैसा त्यांनी युद्धासाठी वापरला व पैशातून आपल्या कामगारांचे वेतनही वाढवले.

## ७.५ गैर आर्थिक सिद्धांत

आपण वरती सांगितल्याप्रमाणे आता इतर काही सिद्धांतावर वर भाष्य करूया जे अर्थ कारणावर आधारित नाही.

प्रथम सिद्धांत पाहूया डी. के. फिल्डहाऊस यांचा डेव्हिड फिल्डहाऊस हे ब्रिटिश साम्राज्याचा अभ्यास करणारे इतिहासकार आहेत. त्यांच्यामध्ये विसाव्या शतकातील नव साम्राज्यवाद हा झुंजार व प्रखर राष्ट्रवादाचा परिणाम आहे. प्रखर राष्ट्रवादाची सुरुवात बिस्मार्क यांच्या" रक्त आणि लोह" या नीतीने झाली. अठराशे सत्तरच्या युरोप मध्ये मध्ये दोन गट पडले दोन्ही गट शस्त्रास्त्र स्पर्धेमध्ये भाग घेऊ लागले. अविश्वास, एकमेकांवर संशय असे वातावरण होते. आफ्रिकेमध्ये या युरोपातील सगळे राष्ट्र एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात होते. त्यामुळे डेव्हिड फिल्डहाऊस यांच्यामते. या स्पर्धेमुळेच राज्य वादाचा पाया आफ्रिकेत रोवल गेला.

दुसरा सिद्धांत आर रोबिन्सन आणि ज. गॅलिघर यांचा आहे. त्यामध्ये आपण कमावलेल्या साम्राज्य टिकवण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला साम्राज्यवादी धोरणाची गरज होती. उदाहरणार्थ सुएझ कालव्याचा रस्ता भारताकडे येण्यासाठी इंग्लंडला उपयोगी होता. म्हणून इंग्लंडने इजिप्त मध्ये सैन्य ठेवण्याचा निर्णय घेतला त्यांच्या या कृतीचा परिणाम लगेच झाला इतर युरोपियन देशांनी सुद्धा आता आपले साम्राज्य टिकवण्यासाठी सैन्य पाठवण्यास सुरुवात केली.

तिसरा सिद्धांत आहे पी.जे.केन व पी. जे. हॉपकिन्स यांचा. त्यांनी साम्राज्यवादाच्या प्रसाराला संस्कृतीचा नवा आयाम दिला. त्यांच्या सिद्धांतानुसार समाजातील सभ्य घटकांनी म्हणजे सरंजाम दार, सरदार, चर्चमधील अधिकाऱ्यांनी आपल्या फायद्यासाठी भांडवल शाही निर्माण केली. त्यांच्या राजघराण्याची असलेल्या संबंधामुळे ते सरकारला आपल्या मता कडे वळू शकले. त्यांनी पैशासाठी व आपल्या आरामासाठी साम्राज्यवादाचा उपयोग केला. देशात जाऊन सेवांचा लाभ करून घेणे विशेषतः नोकर चाकर सेवेचा लाभ करून घेण्याची त्यांची इच्छा होती. उदाहरण द्यायचे झाले आपल्या देशात एका अंग्रेज अधिकाऱ्या मागे १० नोकर असायचे.

## ७.६ साम्राज्यवादाचे हेतू किंवा कारणे

**१) बाजारा साठी स्पर्धा:** औद्योगिक क्रांतीमुळे युरोपियन देश अतिरिक्त उत्पादन निर्मिती करत होता. एकमेकांच्या बाजारपेठेमध्ये आयात होणाऱ्या उत्पादनावर चढाओढीने शुल्क

munotes.in

लावत होता. अशावेळी आपले उत्पादन विकण्यासाठी नवी बाजारपेठ हवी होती. या बाजारपेठेच्या स्पर्धेमध्ये साम्राज्यवादाची ची निर्मिती झाली.

**२) संचार माध्यमातील क्रांती:** १८७० नंतर दूर संचार माध्यम म्हणजे टेलीग्राम, वाफेवरील जहाज, आगगाडी शोध लागला. सैन्य दलाचे दळणवळण करणे सोपे जाऊ लागले. त्यामुळे साम्राज्यवाद पसरण्यास मदत झाली.

**३) वसाहतीमधील उत्पादनांना मागणी:** भारतामधील कापूस, कांगो मधील रबर, नारळ, कॉफी, चहा, साखर या वस्तू ना पाश्चात्त्य देशात जबरदस्त मागणी होती. चीन मधून धातू, अफु, ट्रान्सवाल मधील सोने यासाठी इंग्लंड आफ्रिका व आशिया पर्यंत आले होते. या वस्तूंवर ताबा मिळवण्यासाठी साम्राज्यवादाची सुरुवात झाली.

**४) अतिरिक्त भांडवल:** एकोणिसाव्या शतकात अतिरिक्त भांडवल जमा झाल्यावर युरोपियन देशांनी कर्जाच्या स्वरूपात इतर देशांना दिले. हा एक नफेखोरीचा धंदा झाला होता. दिलेले कर्ज वसूल करण्यासाठी साम्राज्यवादी देशांनी आपले सैन्य पाठवून साम्राज्य सुरक्षित ठेवायचे प्रयत्न केले.

**५) माझे राष्ट्र बरोबरच ही संकल्पना:** एकोणिसाव्या शतकात राष्ट्रप्रेम व राष्ट्र गर्व ही संकल्पना रुजू झाली. काहीही झाले तरी आपला देश चुकणार नाही व देशाची चूक झाली तरी आम्ही ती मान्य करणार नाही. या मानसिकतेमुळे च साम्राज्य वादी स्पर्धेचा अंत पहिल्या महायुद्धात झाला.

## ७.७ साम्राज्यवादासाठी राबवलेली यंत्रणा (Mechanism)

साम्राज्य वादासाठी राबवलेल्या यंत्रणेमध्ये दोन प्रकार येतात. प्रथम अनोपचारिक प्रकारे राबवलेला साम्राज्यवाद व दुसरा औपचारिक प्रकारे राबवलेला साम्राज्यवाद.

**१) अनौपचारिक प्रकार:**
या प्रकारामध्ये मुक्त व्यापार, आपल्या राष्ट्राचा प्रभाव वाढवणे प्रभाव क्षेत्राचा विस्तार करणे हे प्रकार येतात. अठराशे सत्तावन नंतर आफ्रिकेमध्ये या प्रकाराने साम्राज्यवादाचा प्रसार करण्यात आला. या प्रकाराचे उत्तम उदाहरण म्हणजे चीनमध्ये पाश्चात्य राष्ट्रांनी केलेल्या संघर्ष. अफूच्या व्यापारावर नियंत्रण मिळवण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स व इतर युरोपियन राष्ट्रे चीनमध्ये आपले प्रभाव क्षेत्र विस्तारित करत होते.

**२) औपचारिक प्रकार किंवा पूर्णपणे देश ताब्यात घेणे:**
या प्रकारामध्ये वसाहत पूर्णपणे आपल्या कब्जात घेणे. वसाहतीमध्ये रेल्वे, डाक सेवेची सुरुवात करून आक्रमक मार्गांनी देशावर नियंत्रण स्थापन करणे. वसाहतींवर वर कायदा व सुव्यवस्थेचे राज्य प्रस्थापित करणे. आफ्रिका व आशियामध्ये याच प्रकाराने साम्राज्य उभारण्यात आली.



munotes.in

आता आपण औपचारिक प्रकार अंतर्गत किती प्रकारांचा वापर करून साम्राज्य स्थापन करता येईल हे पाहूया.

**१) प्रभावक्षेत्र वाढवणे:**

या प्रकारामध्ये पाश्चात्त्य देशांना मर्यादित आर्थिक फायद्यासाठी वसाहतींवर अधिकार हवा होता. त्यांना त्या देशाच्या राजकारणामध्ये काही स्वारस्य नव्हते. त्यांना अधिकार केवळ वसाहतींच्या आर्थिक क्षेत्रा पुरतेच हवे होते. उदाहरण द्यायचे झाले तर आपण कोरिया, चीन या दोन राष्ट्रांचे घेऊ. कोरिया व चीन मध्ये जपान, इंग्लंड ,फ्रान्स या सगळ्यांना मर्यादित प्रभावक्षेत्र हवे होते. त्या देशांमध्ये असलेली खनिज संपत्ती व व अफूच्या उत्पादनातील हिस्सा या देशांना हवा होता. म्हणून त्यांनी आपले प्रभावक्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न केला.

**२) पूर्णपणे नियंत्रण:**

पूर्णपणे नियंत्रण म्हणजे आपली सत्ता स्थापन करून वसाहतींवर नियंत्रण मिळवणे. देशावर कायदा व सुव्यवस्था, त्या देशातील परकीयांचे संरक्षण व व या देशात प्रशासन व्यवस्था प्रस्थापित करणे. या प्रकारामध्ये आपल्याला भारताचे उदाहरण देता येईल. ब्रिटिशांनी भारतावर प्रशासन व्यवस्थेच्या जोरावर पूर्णपणे नियंत्रण मिळविले.

**३) वसाहतवाद:**

वसाहती स्थापन करताना त्या देशाचे भौगोलिक वातावरण, आर्थिक दृष्टीने त्या देशाचे महत्त्व व त्या देशाचे धोरणात्मक महत्त्व लक्षात घेतले जायचे. उदाहरणासाठी आपण ब्रिटिश आणि बोर लोकांचे साउथ आफ्रिकेमधील वास्तव्य घेऊ शकतो.

**४) प्रबळ सत्तेच्या संरक्षणाखाली असलेला प्रदेश:**

सतराव्या शतकातील भारतातील वसाहतवाद प्रकारामध्ये मोडतो. प्रबळ कंपनीचे वा प्रबळ देशाचे त्या वसाहतींना मिळणारे संरक्षण. ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील राज्यांना दिलेले संरक्षण या प्रकारात मोडते. पण या प्रकारामध्ये कंपनीला व सरकारला मिळालेले अधिकार मर्यादित होते कारण त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय कायद्याचे बंधन होते. ईस्ट इंडिया कंपनीवर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण होते त्यांच्या अधिकारावर मर्यादा यायची.

स्थानिक लोकांना दिलेल्या संरक्षणाच्या मोबदल्यात या कंपन्या आपल्याला हव्या त्या सुविधा प्राप्त करून घेत असत. महत्वाचा मुद्दा असा येतो की करारावर स्वाक्षरी करताना दोन्ही बाजूंना एकमेकांची भाषा कळत नसे. मग करारावर सही कशी करायची. तर या सत्तांनी त्याच्यावर पण मार्ग शोधून काढला होता. स्थानिक राजांनी फक्त करारावर × असे चिन्ह काढायचे व करार अस्तित्वात येत असे.

**५) भाडे तत्वा वर क्षेत्रांवर प्रभाव स्थापित करणे:**

प्रभाव क्षेत्राखाली वाहतुकीसाठी असणारी बंदरे आपल्या ताब्यात घेणे व त्याद्वारे साम्राज्यवाद प्रस्थापित करणे. उदाहरणार्थ चीने ने हॉंगकॉंग हे बंदर ९९ वर्षासाठी



munotes.in

इंग्लंडला भाडे तत्वावर दिले होते. जर्मनी व फ्रान्स  ने आफ्रिकेमधील बंदरावर अशाप्रकारे आपले नियंत्रण स्थापित केले.

**६) ख्रिश्चन मिशनरी व शोधकाचा प्रभाव:**

पाश्चात्त्य देशांनी आपला या वसाहत वादाचे स्पष्टीकरण करण्यासाठी नवीन नवीन आयाम शोधून काढले. रुडयार्ड किप्लिंग या लेखकाने" White man's burden" ही संकल्पना आणली. त्याच्या मते मागासलेल्या देशांना विकसित करण्याची जबाबदारी देवाने प्रगत असलेल्या पाश्चात्त्य देशांना दिली आहे. त्यामुळे साम्राज्य प्रस्थापित करून पाश्चात्त्य देशांनी या लोकांना सुसंस्कृत व सुशिक्षित केले पाहिजे.

या मागासलेल्या देशांना सुसंस्कृत व प्रगत करण्याची जबाबदारी ख्रिश्चन मिशनरी ना देण्यात आली. फ्रेंच व पोर्तुगीज राष्ट्रांचा साम्राज्यवाद याच तत्वांवर आधारित होता. फ्रान्सने अल्जेरिया, पश्चिम आफ्रिका, इंडोचायना व पोर्तुगालने भारतामधील गोवा, आफ्रिकेमधील अंगोला, गिनी, मोझांबिक या देशांमध्ये वसाहतवाद स्थापन करण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी चे सहाय्य घेतले. या देशांनी आपण आपल्या संस्कृतीचा व धर्माचा प्रसार करून मागासलेल्या देशांना विकसित करत आहोत असा पवित्रा घेतला.

शोधक प्रवासी व ख्रिश्चन मिशनरी नि साम्राज्यवादाला खतपाणी घालण्याचे काम केले. ते ज्या देशातून आले होते त्या देशाचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. ख्रिश्चन मिशनरी यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याला विज्ञानाचा प्रसार असे गोड नाव देण्यात आले. ख्रिश्चन मिशनरी नि गुलामगिरीचा अंत, स्थानिकांचा उद्धार व धर्माचा प्रसार ही उद्दिष्टे ठरवली. मिशनरी ज्या देशातून आल्या होत्या त्या आपल्या राष्ट्राच्या हितांचे रक्षण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. साम्राज्यवादाच्या पहिल्या लाटेमध्ये ख्रिश्चन मिशनरी आपल्या राष्ट्राचा ध्वज घेऊनच धर्मप्रसार करीत होत्या. म्हणून त्यांना म्हटले जायचे "" flag follows the gospel".

ख्रिश्चन मिशनरी च्या कार्यामुळे गैर युरोपियन लोकांचा फायदाच होणार आहे. म्हणून बळाचा वापर करून सुद्धा साम्राज्य स्थापित केले तरी चालणार आहे अशी युरोपियन देशांची भावना होती.  वसाहतीमधील संस्कृती मागासलेली असून तिकडे राहणारे लोक बुरसटलेल्या विचारांचे आहेत व त्यांना सुधारण्यासाठी साम-दाम-दंड-भेद यांचा वापर केला तरी चालेल अशी युरोपियन राष्ट्रांची भावना होती. त्यांना सुधारण्यासाठी आपण आपल्या सैन्याचा ही वापर करू शकतो कारण त्यांच्या भल्यासाठीच आहे.

डेव्हिड लिविंग स्टोन यांच्यामते व्यापार व ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामुळे आफ्रिकेसारख्या मागासलेल्या खंडाला सुद्धा मुक्ती मिळू शकते. एम एम स्टॅन्ली यांनी कांगो चा शोध लावला व त्यांनी काँगो वर अधिपत्य गाजवण्यासाठी त्या देशावर इंग्लंडचे राज्य येणे कसे गरजेचे आहे हे त्या वेळच्या वर्तमान पत्रात लिहिले. स्टॅनली नी राजा लिओपल्ड कडे त्यानंतर कांगो खोऱ्याचा विकास करण्याचा प्रयत्न केला. आफ्रिका व आशिया खंडातील खनिज


munotes.in

समृद्ध प्रदेशाच्या बातम्या विविध युरोपियन शहरातील वर्तमानपत्रात छापून येत होत्या त्या बातम्या वाचून कितीतरी शोधक प्रवासी आफ्रिका व आशियाच्या प्रवासाला निघाले होते.

## ७.८ आफ्रिकेमधील साम्राज्य विस्तार


युरोप आणि आफ्रिका खंडाचा संबंध पंधराव्या शतकापासून सुरू झाला. मालवाहू जहाज इंधन भरण्यासाठी आफ्रिकेतील बंदरांवर थांबायची. आफ्रिकेमध्ये जे वादा ची खरी सुरुवात केप ऑफ गुड होपच्या शोधानंतर झाली. १४४८ मध्ये बर्ट लोमु डायस पोर्तुगीज शोधकाने केप ऑफ गुड होप चा शोध लावला. त्याला कॅप ऑफ स्ट्रोम्स नाव दिले पण पोर्तुगालचा राजा जॉन द्वितीय ने त्याचे नाव बदलून केप ऑफ गुड होप असे ठेवले कारण आता भारतामध्ये येण्याचा मार्ग सुकर झाला होता.

आफ्रिका खंड नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध होता. आफ्रिकेमध्ये साम्राज्यवाद प्रथम पोहोचला कारण युरोप मधून आफ्रिकेमध्ये यायला सोपे होते.१८७० पर्यंत आफ्रिकेच्या समुद्र किनाऱ्याच्या भागावर युरोपियन राष्ट्रांनी आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करून ठेवले होते. त्यांनी आफ्रिकेचा बराचसा मोठा भूभाग १८९५ पर्यंत आपल्या अभ्यास घेतला होता पण पण राजकीय वर्चस्व निर्माण केले नव्हते.



**साम्राज्यवाद दर्शविणारे व्यंगचित्र**

munotes.in





## ७.९ आफ्रिकेचे साम्राज्यवादी राष्ट्रांनी विभागून घेतलेले प्रदेश १९०० पर्यन्त

आफ्रिकेमधील व्यापारात हस्तिदंताच्या वस्तू, धातु, कॉफी, कोको, रबर या वस्तूंचा व्यापार होत असे. या वस्तू व्यतिरिक्त गुलामांचा व्यापार सुद्धा आफ्रिके मधून होत असे. हळूहळू व्यापाराच्या व धर्मप्रसाराच्या नावाने युरोपियन देशांनी आफ्रिका खंडाच्या विविध भागांवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. इंग्लंडने आफ्रिकेमधील सुदान, केनिया, इजिप्त, घाना, लेसोथो, गांबिया, नायजर या देशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इंग्लंडने आपल्या साम्राज्याची सुरुवात अनोपचारिक प्रकाराने केली होती. पण जेव्हा स्थानिक लोक उठाव करू लागले तेव्हा ब्रिटिशांनी आपले सैनिक तिथे पाठवले.

आफ्रिकेतील साम्राज्यवाद १८८४ च्या बर्लिन परिषदेमुळे उच्च शिखरावर पोहोचला. १८८४ मध्ये १४ युरोपियन देशांनी आफ्रिका खंडातील देश आपसापसात ते विभाजित

करायचे, नैसर्गिक साधन संपत्ती कशी वाटून घ्यायची हे ठरवण्यासाठी बर्लिन परिषद बोलावण्यात आली होती. या परिषदेमध्ये फ्रान्स, जर्मनी इंग्लंड, व पोर्तुगाल हे देश प्रमुख होते. ज्या परिषदेमध्ये आफ्रिका खंड विषयीचे निर्णय होत होते, आफ्रिका खंडाचा एकही प्रतिनिधी नव्हता. परिषदेमध्ये जनरल ॲक्ट ऑफ बर्लिन समंत करण्यात आला. या कायद्यानुसार आफ्रिकेतील कांगो खोऱ्यातील व्यापारावर पूर्णपणे नियंत्रण आणणे व आफ्रिका खंड युरोपियन राष्ट्रांमध्ये विभाजित करणे याविषयी एकमत झाले.१८९० पर्यंत आफ्रिका पूर्णपणे युरोपियन देशांच्या नियंत्रणाखाली होता आणि त्यासाठी त्यांना युद्धाची किंवा संघर्षाची गरज पडली नाही. आफ्रिकेतील लोकांच्या भवितव्याची ब त्यांना होणाऱ्या नुकसानाचे फिकीर न करता पूर्ण आफ्रिका खंड युरोपियन देशांनी आपसात वाटून घेतला होता.



munotes.in

**१९१४ मधील आफ्रिका**

## ७.१० आशियामधील साम्राज्यविस्तार

आशिया व आफ्रिकेमधील साम्राज्य विस्तारात फरक आहे. सर्वप्रथम जितक्या वेगाने युरोपियन देशांना आफ्रिकेमध्ये बस्तान बसवता आले तसे आशियाई देशांमध्ये बसवता आले नाही. दोन्ही खंडांच्या परिस्थितीत फरक होता. आशियातील देशांची संस्कृती प्राचीन व विकसित होती, ते आफ्रिका खंडातील लोकां इतके मागासलेले नव्हते. त्यामुळे त्यांनी

युरोपियन साम्राज्यवादाच्या विस्ताराला विरोधच केला. जपान ने तर युरोपियन देशांना आपल्या दरवाजा पर्यंत पोहोचूच दिले नाही . जपान स्वतः एक साम्राज्यवादी देश बनला.

बाराव्या शतकात युरोपियन प्रवासी चीन पर्यंत आले होते. पण चीन व्यतिरिक्त इतर देशांमध्ये ते पोहोचले नव्हते. चीन ने युरोपियन राष्ट्रांनी मधून येणाऱ्या ख्रिश्चन मिशनरी ना आपल्या देशात येऊ दिले नव्हते कारण ते त्या संस्कृतीला श्रेष्ठ समजत होते. भारतामधील काही भागांमध्ये व्यापारासाठी व धर्म प्रसारासाठी युरोपियन लोकांचे आगमन झाले होते. पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी कालिकत मध्ये व अंग्रेज व्यापाऱ्यांनी सुरत मध्ये आपले बस्तान बसविले होते.

चीन ने युरोपीयन शक्तींना विरोध केला तरीसुद्धा त्यांची सैनिकी शक्ती युरोपियन राष्ट्रांच्या सैनिकी शक्तीपेक्षा कमी होती.१८४२ चा अफिम च्या युद्धानंतर चीनची व्यापारी बंदरे व्यापारासाठी इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, बेल्जियम आणि नेदरलँड साठी खुली झाली. तेथे प्रत्येक राष्ट्र व्यापारी सुविधांसाठी एकमेकांशी संघर्ष करू लागला. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस युरोपियन शक्ती व जपान सुद्धा चीनचे विघटन करण्याच्या प्रयत्नात होते. पण ते कसे करावे हे त्यांना कळत नव्हते. शेवटी अमेरिकन सेक्रेटरी जॉन मे याच्या नेतृत्वाखाली१८९९ मध्ये रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स व जपान यांनी चीन मध्ये मुक्तद्वार नीती चे धोरण स्वीकारले व स्वतःचे प्रभावक्षेत्र वाढवले. एकोणिसाव्या शतकापर्यंत चीन मधील व्यापार,१४ मालवाहतुकीची बंदरे, दोन तृतीयांश जमीन प्रभावित क्षेत्र म्हणून युरोपियन राष्ट्रांनी वाटून घेतली. ट्रान्स सायबेरियन रेल्वे रशियाच्या अधिपत्याखाली होती.

इंडोनेशियामध्ये डच लोकांचे साम्राज्य होते. ब्रिटिश, डच आणि जर्मन राष्ट्रांनी न्यू गिएना मध्ये स्वतःचे क्षेत्र विस्तारीत करून घेतले. जर्मनीने इंडोनेशिया च्या आजूबाजूच्या बेटांवर कब्जा केला ब त्याच द्वीपसमूह ला बिसमार्क अर्चप्लेजो असे नाव दिले. इंग्लंडने सोलोमोन, टोगा, व गिल्बर्ट द्वीप समूहावर आपले नियंत्रण स्थापित केले. फ्रान्स सुद्धा साम्राज्यवादाच्या स्पर्धेत पुढे होता.१८८७ मध्ये फ्रान्सने टोन किंन, अमान, कोचीन चायना व कंबोडिया हे प्रदेश मिळवून इंडोचायना चा प्रदेश आपल्या सामर्थ्या खाली आणला. रशियाने तुर्कस्तान व तुर्कीच्या बअसारबिया व अर्मेनिया हे प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणले.



## ७.११ युरोपियन  देशांच्या साम्राज्यवादी नीतीचे परिणाम

युरोपियन राष्ट्रांमधील साम्राज्यवादी स्पर्धेमुळे आशिया आणि आफ्रिका खंडावर तर परिणाम झालाच पण युरोप मध्ये सुद्धा या नीती चे परिणाम झाले. स्पर्धेच्या वातावरणामुळे प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडे संशयाने पाहू लागला. अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. प्रथम महायुद्धाच्या कारणाचा विचार करता आपण सांगू शकतो की साम्राज्यवादी नीतीमुळे  निर्माण झालेल्या तणावामुळे, संशयामुळे, द्वेषामुळे युरोपियन राष्ट्रांमध्ये दोन तट निर्माण झाले. एका  समूहामध्ये जर्मनी, ऑस्ट्रिया- हंगेरी, तुर्की व बल्गेरिया चा समावेश होता. दुसऱ्या समूहामध्ये फ्रान्स व इंग्लंडचा. या दोन्ही समूहा मधील साम्राज्यवादी धोरण प्रथम महायुद्ध सुरू करण्यास कारणीभूत ठरले.

**१९१४ च्या महायुद्धानंतर दोन नवीन व्यवस्था निर्माण झाल्या:- १) लीग ऑफ नेशन्स ने दिलेले सहमती पत्र**(Mandate System) **२) नव साम्राज्यवाद**.

लीग ऑफ नेशन्स मध्ये केलेल्या जिंकलेल्या देशांना पराभूत झालेल्या देशांची व साम्राज्याची जबाबदारी देण्यात आली. देशातील लोकांच्या हिताचे रक्षण करणार असे वचन विजेत्या राष्ट्रांनी दिले. नवं साम्राज्य वादामध्ये विसाव्या शतकात प्रभुत्व स्थापन करण्यासाठी आपल्या देशाच्या संस्कृती द्वारे, आर्थिक मदती द्वारे व शैक्षणिक गरजा भागवून आपले प्रभाव क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला गेला. प्रबळ राष्ट्र आपल्या संस्कृती द्वारे व आर्थिक बळा द्वारे नवं साम्राज्यवाद उभारू लागले. उत्तम उदाहरण आहे अमेरिका.

## ७.१२ आशियाई राष्ट्रांवरील परिणाम

आशिया मधील राष्ट्रावर फार गंभीर परिणाम  झाले. दोन्ही देशातील पारंपरिक जीवनशैली व संस्कृतीचा ऱ्हास झाला.  युरोपियन राष्ट्रांना स्थानिक संस्कृतीशी व जीवन शैलीशी काही देणं-घेणं नव्हतं. त्यांना स्थानिक लोकांविषयी आत्मीयता नव्हती. साम्राज्यवाद्यांनी त्यांच्या फायद्यासाठी उत्तमोत्तम जमिनी चा  वापर केला व पडीक जमीन स्थानिकांसाठी ठेवली. ज्या प्रदेशात चांगले उत्पन्न असेल तिकडे आपल्या लोकांना आणून ठेवले व त्यांच्या वसाहती वाढवल्या. उदाहरण द्याचे झाले तर साऊथ आफ्रिके मध्ये ब्रिटिश लोकांनी आपल्या फायद्यासाठी वास्तव्य केले. आफ्रिके मध्ये त्यांनी आपल्या मालकीच्या खनिज कंपन्या काढल्या व स्थानिक आफ्रिकन लोकांना कमी रोजंदारीवर कामावर ठेवले. भारतातील कच्चा माल कमी किमतीत  नेऊन पक्का माल  तयार करून चढ्या भावाने विकला.

शेतीचे  उत्पादन होत नसल्यामुळे पाश्च्यात्त  देशांनी कब्जा केलेल्या जमिनीवर आफ्रिकन मजदुरांना काम करावे लागले. वेठबिगार श्रमिकांची संख्या वाढायला लागली. गावां मध्ये काम करण्याऱ्या पुरुषांची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली. शेतीचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे लोकांना दुष्काळाचा सामना करावा लागला. त्यातच इंग्लंड ने आशिया मधून

मजदूर आणण्यास सुरुवात केली. स्थानिक व परदेशी मजदुरां मध्ये तणाव वाढून संघर्षाची स्थिती निर्माण झाली. साम्राज्य वादी राष्ट्रांना वसाहतींना स्वयंपूर्ण करण्यात स्वारस्य नव्हते. औद्योगिक रित्या प्रगत करण्याची तर मुळीच इच्छा नव्हती. ते आफ्रिका व आशिया मधील कच्चा माल घेऊन पक्का माल तयार करून परदेशी बाजारपेठां मध्ये विकत असत. त्यातून मिळणारा फायदा कधीच स्थानिक लोकांपर्यत पोहोचला नाही. आफ्रिके मध्ये तर पारंपरिक जीवन शैली नष्ट झाली व विविध आदिवासी जमाती मध्ये संघर्ष लावून तिथली शांती भंग केली.

## ७.१३ सारांश

साम्राज्यवादामुळे काही चांगल्या गोष्टी पण घडल्या. वैद्यकीय सेवा, शिक्षण, दळण - वळणाची साधने यूरोपीन राष्ट्रांनी स्वतःच्या फायद्यासाठी आणली. पण त्याचा उपयोग स्थानिक लोकां साठी झाला. ख्रिस्ती मिशनरींनी मोफत वैद्यकीय सेवा आफ्रिकेतील लोकां प्रयन्त पोहोचवली. भारतामध्ये शिक्षण संस्था उभारण्यास मदत केली. त्यामुळेच वसाहती मधील लोक आपल्या अधिकारांसाठी जागृत झाली. आपले हक्क त्याना कळले व ते मिळवण्यासाठी जागरूक झाले. याचा परिणाम म्हणजे भारतीय स्वन्त्रता चळवळ ज्यामुळे भारत स्वतंत्र झाला.

## ७.१४ प्रश्न

१) साम्राज्यवादी देशांनी कसा वसाहतवादाचा प्रसार केला ?

२) वसाहत वाद प्रसाराची प्रमुख कारणे कोणती ?

३) आशिया व आफ्रिकेमध्ये साम्राज्यवाद कसा पसरला ?

४) साम्राज्यवादी नीतीचे काय परिणाम झाले ?

## ७.१५ संदर्भ


- Walter Rodney,**How Europe underdeveloped Africa**,Verso Publication, 2018
- Bennet G., **Concept of Empire** 1७74- 1947, London , 1962.
- Lenin, Imperialism- **The highest stage of capitalism**, Moscoe 1966.
- Hobson, J.P, **Imperialism – A study**, London, 1968.


*****

# ८

# जर्मनी आणि इटलीचे एकीकरण

**घटक रचना**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ जर्मन राज्यांवर नेपोलियनच्या विजयाचे परिणाम
८.३ १८४८ ची क्रांती
८.४ झोल्व्हेरिन किंवा कस्टम युनियन
८.५ बिस्मार्कचा उदय
८.६ डेन्मार्क बरोबर युद्ध १८६४
८.७ ऑस्ट्रो - प्रशियन युद्ध १८६६ (सात आठवड्यांचे युद्ध)
८.८ फ्रँको प्रशियन युद्ध १८७०-७१
८.९ इटलीचे एकीकरण
८.१० पीडमोंट मधील घडामोडी
८.११ सारांश
८.१२ प्रश्न
८.१३ संदर्भ

munotes.in

## ८.० उद्दिष्ट्ये

१) जर्मनी आणि इटलीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी समजून घेणे
२) जर्मनी आणि इटलीच्या एकीकरणाकडे नेणाऱ्या घटनांचा मागोवा घेणे
३) जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कची भूमिका जाणून घेणे
४) इटलीच्या एकीकरणात कॅव्हूरची भूमिका जाणून घेणे

## ८.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जर्मनी आणि इटली राजकीयदृष्ट्या विस्कळीत स्थितीत होते. एक देश म्हणून ते अस्तित्वात आले नव्हते व ते अनेक छोट्या अनियंत्रित सत्ताधीश

असणाऱ्या राज्यांमध्ये विभागले गेले होते. बहुतेक राज्ये ऑस्ट्रियाच्या ताब्यात होते. ऑस्ट्रियाचा पंतप्रधान मेटर्निच याने उदारमतवाद आणि सुधारणांचे सर्व प्रयत्न निर्दयपणे चिरडले. ऑस्ट्रिया व्यतिरिक्त, इंग्लंड आणि डेन्मार्कचा जर्मन राज्यांवर राजकीय प्रभाव होता. डाएट ही एक अशी राजकीय संस्था होती ज्यात सर्व राज्यांचे प्रतिनिधी होते. मात्र डाएटने जनतेच्या हितासाठी कधीही काम केले नाही. राज्यकर्त्यांनी यथास्थित परिस्थिती ठेवणे पसंत केले. त्यांनी एकीकरणाच्या प्रक्रियेबाबत कधीही विचार केला नाही. जर्मन देशभक्तांनी ऐक्यासाठी प्रयत्न केले,पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. प्रशिया या राज्यांमधील सर्वात बलवान सत्ता होती आणि जर्मन देशभक्तांना आशा होती की केवळ तीच एकीकरण चळवळीची जबाबदारी घेवू शकते.

## ८.२ जर्मन राज्यांवर नेपोलियनच्या विजयाचे परिणाम

नेपोलियनच्या प्रशासकीय ऐक्याने राष्ट्रवाद आणि एकीकरण शक्तींना प्रोत्साहन दिले. त्याने सरंजामशाही आणि गुलामगिरी दूर केली. तथापि, नेपोलियनच्या पराभवामुळे देशभक्तांच्या आशा धुळीस मिळाल्या. प्रतिगामी व विघटनकारी शक्तींनी व व्हिएन्ना येथील शांतता समझोत्याने जर्मनीला डाएटसह ३९ राज्यांच्या मोकळ्या संघात पुन्हा एकदा विभागले. ऑस्ट्रियाने पुन्हा एकदा इटली व जर्मन प्रांत विभागले. सर्व राज्यकर्त्यांनी पुन्हा हुकुमशाहीला सुरुवात केली. देशभक्तांनी केलेले बलिदान विसरले गेले. जेना विद्यापीठाने मूलगामी विचारांचे केंद्र म्हणून काम केले. विद्यापीठातीमुळे क्रांतिकारी प्रवृत्तींना प्रोत्साहन दिले असा आरोप ऑस्ट्रिया नेहमी करत असे. विद्यार्थ्यांनी गुप्त संघटना स्थापन केल्या. ऑस्ट्रियाने १८१९ मध्ये कार्ल्सबाड सनद संमत करून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कृतिंवर नियंत्रण ठेवण्यासाठी समित्या नेमल्या गेल्या. मुद्रण स्वातंत्र्यावर गदा आणली. संशयास्पद व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले.

munotes.in

## ८.३ १८४८ ची क्रांती

व्हिएन्ना काँग्रेसने लादलेल्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेबद्दल वाढत्या नाराजीमुळे जर्मन राज्यांमध्ये मार्च क्रांतीचा १८४८ मध्ये उद्रेक झाला. जर्मन राज्यांमध्ये १८४८ च्या सुमारास घडलेल्या घटना प्रामुख्याने १८४८ च्या क्रांतीचा भाग होते. जर्मन एकतेचे उद्दीष्ट असलेल्या क्रांतींने झोलवेरीन चळवळीद्वारे त्यांनी एकत्रीकरणाची इच्छा दर्शविली.

**फ्रँकफर्ट संसद १८४८-४९:**

१८ मे १८४८ रोजी फ्रँकफर्ट येथे एक राष्ट्रीय सभा बोलावली गेली. त्यामध्ये १८४८ च्या क्रांतीमध्ये समाविष्ट व उल्लेखनीय जर्मन व्यक्तींचा समावेश केला गेला. या संसदेचे अध्यक्ष हेनरिक व्हॉन गॅगर्स होते. जर्मनीच्या राजकीय एकीकरणाची योजना करणे हा त्याचा हेतू होता. प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यमने विशिष्ट जर्मन राज्यांचा संघ स्थापन करण्याचा व एक राजकीय पर्याय देण्याचा प्रयत्न केला,परंतु ऑस्ट्रियाने ओलमुत्झ (१८५०) च्या कराराद्वारे त्याच्या प्रयत्नांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. ऑस्ट्रियाने जर्मन महासंघाची

कॉन्फेडरेशनची पुनर्स्थापना केली. फ्रँकफर्ट संसदेने तयार केलेल्या संविधानाचा १८६६मध्ये उत्तर जर्मन महासंघावर प्रभाव पडला.

## ८.४ झोल्व्हेरिन किंवा कस्टम युनियन

वेगवेगळ्या जर्मन राज्यांमध्ये व्यापारासाठी वेगवेगळे नियम होते. सीमेवर कर संकलन संघ स्थापित केले गेले होते. त्यांच्यातील आंतरराज्य व्यापार करपात्र होता. ही व्यवस्था व्यापारासाठी हानिकारक होती. प्रशियाने जर्मन राज्यांचे आर्थिक एकीकरण आणण्यासाठी नेतृत्व प्रदान केले. प्रशिया व्यापार आणि व्यावसायिक बाबींबाबत परदेशी देशांशी जोडलेला होता. या घडामोडींनी जर्मन राज्यांमध्ये समृद्धी आणली. यामुळे नवीन व्यापारी आणि भांडवलदार वर्गाला जन्म मिळाला,ज्यांना बाजारपेठा विस्तृत करायच्या होत्या. हे केवळ मजबूत आणि स्थिर सरकारद्वारे शक्य होऊ शकते. हा नवा आर्थिक वर्ग शासक वर्गाला बळकट करण्यासाठी तयार होता. ज्यामुळे राष्ट्रवाद आणि देशभक्तीची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियाचा पराभव करण्यासाठी मजबूत सैन्य आवश्यक आहे हे लोकांनाही समजले. या कार्यात राजाला जर्मन एकीकरणाचे अग्रगण्य नेता ओटो व्हॉन बिस्मार्क याने पुढे मोलाची भूमिका बजावली.

## ८.५ बिस्मार्कचा उदय

बिस्मार्कचा जन्म १८१५ मध्ये प्रशियाच्या एका सुखवस्तू कुटुंबात झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो नागरी सेवेत रुजू झाला,परंतु बेशिस्तीच्या कारणावरून त्याला काढून टाकण्यात आले. तो उदारमतवाद्यांविषयी सहानुभूतीशील नव्हता आणि राजेशाहीला अनुकूल होता. त्याच्या या विचारसरणीमुळे प्रशियन राजाने त्याला राजनैतिक सेवेत घेतले. त्याने प्रथम ऑस्ट्रियाच्या प्रशासनाचा अभ्यास केला. नंतर तो रशिया आणि फ्रान्समध्ये प्रशियाचे राजदूत होता. तो दोन्ही देशांच्या कमकुवतपणा आणि शक्तींची गणना करण्यास सक्षम होता. या ज्ञान आणि अनुभवाचा त्याने नंतरच्या कारकिर्दीत उपयोग केला. संसदेचे बहुसंख्य सदस्य हे उदारमतवादी होते ज्यांनी लोकशाही प्रजासत्ताकाची बाजू घेतली. जेव्हा त्याने सैन्य बळ वाढवण्याचा प्रयत्न केला तेव्हा या सदस्यांनी राजेशाही आणि हुकुमशाहीला विरोध केला. बिस्मार्कने राजाचे मनापासून समर्थन केले आणि त्याला आश्वासन दिले की तो राजाच्या मागे समर्थपणेउभा राहून एकीकरणाची योजना प्रत्यक्षात आणेल. एकीकरण प्रक्रियेत प्रशियाच्या राजाने बिस्मार्कच्या सर्व योजनांना पाठिंबा दिला.

**बिस्मार्कचे रक्त आणि लोह निती धोरण:**

बिस्मार्कचे दोन महत्वाचे उद्देश होते. १) प्रशियाने जर्मन एकीकरणाचे नेतृत्व स्वीकारणे. २) प्रशियाने तिची ओळख जर्मनीमध्ये विलीन करू नये. त्याऐवजी प्रशियाने जर्मनी राज्ये जिंकली पाहिजे आणि प्रशियन संस्कृती आणि सभ्यतेचा प्रसार केला पाहिजे. शांततेच्या मार्गाने आपले ध्येय साध्य होऊ शकत नाही हे त्याला माहीत होते. परिणामी त्याने लोह आणि रक्त धोरण अंगिकारले. या धोरणात प्रथम प्रशियाने मजबूत सैन्य तयार करणे



munotes.in

आवश्यक होते. दुसरे म्हणजे जर्मन प्रश्नातील परकीय हस्तक्षेपाचे सर्व धोके दूर करणे अगत्याचे होते. बिस्मार्कला फ्रान्स,इंग्लंड किंवा रशियाने ऑस्ट्रियाला मदत करू नये याची काळजी घ्यायची होती. या हेतूने त्याने आपले डाव कुशलतेने खेळले. त्याने १८६३ मध्ये पोलिश विद्रोहात रशियाला प्रशियन मदत देवू केली आणि भविष्यात ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात संघर्ष झाल्यास झारकडून तटस्थतेचे आश्वासन मिळवले. त्यानंतर त्याने देशातील उदारमतवादी सदस्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून सैन्य उभे केले व जर्मन एकीकरण साध्य केले. ऑस्ट्रियाचा पराभव केल्याशिवाय ते साध्य होऊ शकत नाही याची जाणीव बिस्मार्कला होती. पण बलाढ्य ऑस्ट्रियाला आव्हान देण्यापूर्वी प्रशियन सैन्यबळाची चाचपणी करण्यासाठी त्याने डेन्मार्कशी युद्ध केले.

## ८.६ डेन्मार्क बरोबर युद्ध १८६४

बिस्मार्कने दोन हेतूंसाठी डेन्मार्कशी युद्ध केले. त्याला प्रशियन सैन्याच्या पराक्रमाची चाचणी घ्यायची होती. दुसरे म्हणजे, त्याला ऑस्ट्रिया विरूद्ध युद्ध करण्याची संधी शोधायची होती, शेलस्विग आणि होल्स्टीन हे दोन्ही प्रांत जर्मन होते, परंतु डेन्मार्कच्या शासकाद्वारे नियंत्रित होते. होल्स्टीनचे लोक जर्मन वंशज होते, परंतु शेल्सविगमध्ये बरेच डेन्मार्कचे रहिवाशी होते. १८५२ मध्ये झालेल्या करारानुसार डेन्मार्कने प्रांतांना विलीन करणे अपेक्षित नव्हते. असे असूनही डॅनिश राजाने शेल्सविग प्रांताचे विलीनीकरण घोषित केले. त्याच वेळी ऑस्ट्रियाने होल्स्टीन घेतला. बिस्मार्कने डेन्मार्कवर युद्ध घोषित केले. डेन्मार्कचा पराभव झाला. प्रशियाने शेल्सविग काबीज केला. पुढे बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी युद्धाची तयारी केली.

## ८.७ ऑस्ट्रो - प्रशियन युद्ध १८६६ (सात आठवड्यांचे युद्ध)

१८६६ मध्ये झालेलं युद्ध हे प्रशियाचा एक जबरदस्त विजय होता. नेपोलियनच्या पराभवापासून युरोपियन राजकीय परिस्थितीत आमूलाग्र बदल केला. प्रशियाची बरीच प्रतिस्पर्धी राज्ये ऑस्ट्रियाला सामील झाली होती आणि पराभूत झाली होती. या युद्धाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) झोल्व्हेरिन व्यापारासाठी फायदेशीर ठरले. ऑस्ट्रियाला त्यात सामील होण्याची इच्छा होती, परंतु बिस्मार्कने ऑस्ट्रियाला त्यात प्रवेश देण्यास नकार दिला.

२) हेसल या जर्मन राज्याच्या शासकाने नवीन संविधान दिले,पण त्यात उदारमतवादी तत्वे नसल्यामुळे लोकांनी विरोध केला ऑस्ट्रियाने लोकांचे समर्थन केले,तर बिस्मार्कने हेसेलच्या शासकाची बाजू घेतली.

३) बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीने युद्धसदृश्य स्थिती तयार केली. त्याला ऑस्ट्रियाला मुत्सद्दीपणाने वेगळे करायचे होते. इंग्लंडने प्रशियाच्या मुक्त व्यापाराला समर्थन दिले आणि ऑस्ट्रियाच्या प्रतिक्रियावादी धोरणांचा विरोध केला. बिस्मार्कने पोलिश

विद्रोहात रशियाला मदत करून झारची मर्जी संपादन केली. झार आधीच ऑस्ट्रियावर रागावला होता,कारण त्याने क्रिमियन युद्धादरम्यान झारला मदत केली नाही. फ्रान्सचा राजा नेपोलियन यालादेखील ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात युद्ध हवे होते, जेणेकरून दोन्ही देश कमकुवत होतील आणि त्याला आपले साम्राज्य वाढवण्याची संधी मिळेल. बिस्मार्कने अनेक देशांची तटस्थता निर्माण करून आपली बाजू सुरक्षित केली. मग त्याने इटलीशी करार केला आणि प्रशियाला लष्करी मदतीच्या बदल्यात इटालियन लोकांनी व्हेनेशिया मिळवण्याच्या कार्यात पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. अशा प्रकारे बिस्मार्कने ऑस्ट्रियाला राजनैतिकरित्या वेगळे केले.

४) युद्धाचे तात्काळ कारण ऑस्ट्रियाच्या अधिपत्याखाली असलेल्या होल्त्सेन या प्रांताने दिले. बिस्मार्कने आरोप केला की ऑस्ट्रियाने या क्षेत्राचे योग्य व्यवस्थापन केले नाही. तेथील जर्मन लोकांचे सरंक्षण करण्यासाठी म्हणून बिस्मार्कने ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध घोषित केले.

हे युद्ध सात आठवडे चालले. काही प्रांतांनी ऑस्ट्रियाला मदत केली,पण कोणतेही युरोपियन राज्य तिच्या मदतीला आले नाही. पहिल्या तीन दिवसात प्रशियाने ऑस्ट्रियाचा पराभव केला आणि उत्तर जर्मनीतील भाग प्रशियाला जोडला ३ जुलै,१८६६ रोजी सडोवा येथे मुख्य लढाई लढली गेली. ऑस्ट्रिया पराक्रमाने लढला, पण शेवटी लढाईत पराभूत झाला. या मोहिमेत जवळपास ४०,००० सैनिक ऑस्ट्रियाने गमावले. फ्रान्समध्ये नेपोलियन तिसरा याच्यावर ऑस्ट्रियाला मदत न केल्याबद्दल टीका झाली. युद्धानंतर एक मजबूत आणि शक्तिशाली प्रशिया तयार झाला.

**प्रागचा करार:**

हा करार बिस्मार्कच्या मुत्सद्दीपणाचे द्योतक होता. त्याने कराराच्या अटी शिथिल ठेवल्यान अन्यथा फ्रान्स हस्तक्षेप करण्याची शक्यता होती. कराराच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या -

१. जर्मन राज्यांचे कॉन्फेडरेशन रद्द करण्यात आले; अशा प्रकारे जर्मनीमध्ये ऑस्ट्रियाचा प्रभाव संपुष्टात आला.

२. ऑस्ट्रियाला युद्ध भरपाई द्यावी लागली.

३. ऑस्ट्रियाला व्हेनेशियाला इटलीला आणि होल्त्सेनला प्रशियाला सोपवावे लागले.

४. प्रशियाने जर्मन प्रांतांना एकत्रितरीत्या जोडले

५. इतर राज्ये स्वतंत्र ठेवली गेली.

करारामधून उत्तर जर्मन कॉन्फेडरेशन तयार झाले. प्रशियाचा राजा त्याचा अध्यक्ष झाला. त्यानुसार एकीकरणाची अर्धी प्रक्रिया पूर्ण झाली. हे युद्ध प्रशियासाठी अत्यंत फायदेशीर होते. त्याची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढली व त्याचे लष्करी वर्चस्व युरोपमध्ये मान्य केले गेले.

## ८.८ फ्रँको-प्रशियन युद्ध १८७०-७१

फ्रान्सवर बोनापार्ट नेपोलियनचा पुतण्या नेपोलियन तिसरा राज्य करत होता. त्याच्याकडे नेपोलियनचे तेज किंवा लष्करी कौशल्य नव्हते. चतुर राजनैतिक डावपेचांच्या आधारे बिस्मार्क नेपोलियनला प्रशियावर युद्ध घोषित करण्यास प्रवृत्त करू शकला आणि फ्रान्सच्या या आक्रमक हालचालीमुळे ब्रिटनसह इतर युरोपियन शक्तींना फ्रान्सच्या बाजूने सामील होण्यापासून रोखले. संपूर्ण जर्मनीमध्ये फ्रेंच विरोधी भावना निर्माण झाली तेव्हा बिस्मार्कने प्रशियाच्या सैन्याला युद्धासाठी सज्ज केले. हे युद्ध फ्रेंचांसाठी विनाशकारी होते. सप्टेंबर १८७० मध्ये जर्मन सैन्याने विशेषतः सेदान येथे दैदिप्यमान विजय मिळवला. या पराभवाने नेपोलियनला इंग्लंडमधील निर्वासनात त्याच्या आयुष्यातील शेवटची वर्ष घालवावी लागली.

**युद्धाची कारणे:**

१) जर्मन एकीकरण प्रयत्नात फ्रेंच हस्तक्षेपाचा धोका होता. बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीने पुन्हा एकदा काम केले. इंग्लंड आणि फ्रान्समध्ये कटुता निर्माण करून त्याने इंग्रजांची तटस्थता कायम ठेवली. बिस्मार्कने रशिया आणि इटलीला तटस्थ राहण्यास राजी केले. ऑस्ट्रिया कमकुवत झाला होता आणि फ्रान्सला मदत करणार नव्हता. या घडामोडींमुळे नेपोलियन एकाकी पडला.

२) नेपोलियन तिसरा १८६४च्या मेक्सिको मोहिमेत अपयशी ठरला. ऑस्ट्रिया-प्रशिया लढाईनंतर तो निराश झाला होता,कारण प्रशिया त्याच्या अपेक्षांविरुद्ध मजबूत बनला होता. यामुळे दोन्ही देशांमध्ये वैर निर्माण झाले.

३) नेपोलियन तिसरा महत्वाकांक्षी होता. बिस्मार्कने ऑस्ट्रो-प्रशियन युद्धादरम्यान त्याला सुमारे ८८ प्रदेश देण्याचे वचन दिले होते. पण त्याने आपला शब्द पाळला नाही. फ्रेंचांना हा वाद मिटवण्यासाठी युद्ध हवे होते.

४) युद्धास तात्काळ कारण स्पेनमुळे मिळाले. दोन्ही देशांनी स्पॅनिश उत्तराधिकार प्रकरणात हस्तक्षेप केला. दोन्ही देशांमध्ये एकमेकांविरुद्ध सार्वजनिक द्वेष होता. शेवटी युद्ध जुलै १८७० मध्ये घोषित करण्यात आले. युद्धादरम्यान १६ राज्यांनी प्रशियाला मदत केली.

प्रशियन सैन्याने फ्रान्सवर आक्रमण केले. प्रशियाने अनेक लढाया जिंकल्या आणि फ्रान्सला पराभूत केले. तिसरा नेपोलिअनने पराभव मान्य केला पण पॅरिसमधील लोक चार महिने लढत राहिले. अखेर निरुपाय झाल्याने ते प्रशियाला शरण गेले.

**फ्रान्सच्या पराभवाची कारणे:**

१) फ्रेंच अति-आत्मविश्वासू होते आणि त्यांना वाटले की त्यांना प्रशियाचा पराभव करण्यात अडचण येणार नाही. फ्रान्सला युरोपची सर्वात मजबूत लष्करी शक्ती मानली जात असे.

२) फ्रेंच लोकांनी त्यांच्या चेसपॉट रायफल्सच्या श्रेष्ठतेवर विश्वास ठेवला होता पण प्रशियन तोफखान्याच्या श्रेष्ठतेमुळे हा विश्वास कमाल दाखवू शकला नाही.

३) प्रशियन सैन्याच्या वेगवान हालचालीने फ्रेंचांना आश्चर्यचकित केले.

४) सेडानमधील आपत्तीजनक पराभव हा लष्कराप्रमाणेच मानसशास्त्रीय पराभव होता. नेपोलियन तिसरा पकडला गेला आणि फ्रेंच सैन्याचा पूर्णपणे पराभव झाला. फ्रेंच मनोबल कधीच सावरले नाही.

५) फ्रान्स राजनैतिकरित्या अलिप्त होता. बिस्मार्कने हुशारीने फ्रान्सला आक्रमक बनवले होते आणि तिला इतर कोणत्याही मोठ्या शक्तींकडून कोणतीही मदत मिळाली नाही.

फ्रंकफर्टच्या करारावर स्वाक्षरी झाली ज्यानुसार फ्रान्सला अल्सेस आणि लॉरेन या समृद्ध प्रांतांना जर्मनीला द्यावे लागले. फ्रान्सने प्रचंड युद्ध नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले. नुकसान भरपाई देईपर्यंत जर्मन सैन्याने फ्रान्सच्या एका भागावर कब्जा मिळवला. फ्रान्सला प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. युद्धादरम्यान दक्षिण जर्मन राज्ये प्रशियामध्ये सामील झाली. एक तडजोड करण्यात आली आणि राज्यांनी जर्मन युनियनमध्ये सामील होण्याचे मान्य केले. फ्रेंच-प्रशियन युद्धाच्या समाप्तीपूर्वी १८ जानेवारी १८७१ रोजी जर्मन एकीकरणाचे कार्य पूर्ण झाले. जर्मन साम्राज्य अस्तित्वात आले. प्रशियाचा राजा जर्मनीचा राजा म्हणून घोषित झाला. बर्लिनला राजधानी बनवण्यात आले. बिस्मार्कच्या चतुर मुत्सद्देगिरीमुळे जर्मनीचे एकीकरण झाले.

## ८.९ इटलीचे एकीकरण

नेपोलियन बोनापार्टने ऑस्ट्रियन राज्ये जिंकली तेव्हा एक नवीन युग सुरू झाले. त्याने अनेक राज्ये एकत्र आणली. नेपोलियनने इटलीला प्रशासनाची एकसमान व्यवस्था दिली. इटालियन लोक स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व या फ्रेंच विचारांनी प्रभावित झाले. त्यांना स्वराज्य आणि स्वातंत्र्य यासारख्या संकल्पनांची ओळख झाली. यामुळे त्यांच्या देशभक्तीची भावना तीव्र झाली. नेपोलियनच्या पराभवानंतर युरोपच्या नकाशाची पुनर्रचना करण्यासाठी १८१५ मध्ये व्हिएन्ना काँग्रेसला बोलावले गेले. इटालियन लोकांच्या राष्ट्रीय भावनांकडे दुर्लक्ष केले गेले आणि पुन्हा जैसे थे स्थिती कायम ठेवण्यात आली. इटली पुन्हा एकदा विभागली गेली. ऑस्ट्रियन आणि फ्रेंच राजांनी पुन्हा इटालियन राज्ये काबीज केली. इटलीचे विभाजन त्यानुसार केले गेले

१) फ्रेंच राजपुत्राच्या अधिपत्याखाली नेपल्स आणि सिसिलीचे राज्य

२) लोम्बार्डी आणि व्हेनेशिया ऑस्ट्रियाचे भाग बनले

३) पर्मा, टस्कनी, मडेना ऑस्ट्रियाच्या राजाच्या नातेवाईकांकडे राहिले

४) पोप अंतर्गत रोम

५) केवळ पिडमोंट हे स्वतंत्र राज्य राहिले

## ८.१० पीडमोंट मधील घडामोडी

इटलीच्या देशभक्तांनी गुप्त संस्थांची व संघटनांची स्थापना केली. त्यांचे ध्येय इटालियन एकता हे होते. यापैकी सर्वात प्रसिद्ध संघटना कार्बोनारी ही होती. त्याचे मूळ नेपल्समध्ये होते. इटलीतील सर्व असंतुष्ट घटक त्यांच्यात सामील झाले. त्यांना परदेशी लोकांना इटलीतून बाहेर काढायचे होते. कार्बोनारी या क्रांतिकारी सोसायटीने नेपल्समध्ये १८२० मध्ये राजा फर्डिनांड याच्या विरोधात बंड केले. लोकांनी उदारमतवादी राज्यघटनेची मागणी केली. राजाने सहमती दर्शविली, परंतु नंतर मागणी मोडून काढण्यासाठी गुप्तपणे ऑस्ट्रियाकडून मदत मागितली. ऑस्ट्रियन सैन्य आले आणि बंड दडपले. दुसरा विद्रोह पिडमोंटमध्ये सुरु झाला. पिडमोंटच्या राजाने त्याचा भाऊ चार्ल्स अल्बर्टसाठी सिंहासनाचा त्याग केला. पुन्हा ऑस्ट्रियाने हस्तक्षेप करून बंड मोडून काढले. १८३० च्या फ्रेंच क्रांतीचा इटालियन राज्यांवर प्रभाव पडला. मोडेना आणि पर्मा येथे बंड झाले, परंतु ऑस्ट्रियाने सर्व उठावांना चिरडले. यामुळे देशभक्तांना एक धडा मिळाला की सर्व राज्यांचा समान शत्रू ऑस्ट्रिया होता. त्यामुळे ऑस्ट्रियन प्रभाव आणि दडपशाहीपासून मुक्त होणे आवश्यक होते.

**१८४८ ची क्रांती:**

१८४८च्या क्रांतीने संपूर्ण इटालियन द्वीपकल्पात राष्ट्रवादी भावना वाढण्याचा मार्ग मोकळा केला. त्या वर्षी अनेक इटालियन शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्रोह सुरु झाला. डॉक्टर, वकील, दुकानदार यासारखे व्यावसायिक वर्ग तसेच विद्यार्थी यांनी लोम्बार्डी-व्हेनेशिया आणि मिलान येथील ऑस्ट्रियन राजवटीविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला. पिडमोंट-सार्डिनिया राज्याने बंडाला पाठिंबा देण्यासाठी सैन्य पाठवले असले तरी जुलै १८४८ मध्ये ऑस्ट्रियाच्या मदतीमुळे बंड चिरडले गेले. इटालियन बंड अपयशी ठरले आणि १८४९ पर्यंत जुन्या राजवटी पुन्हा एकदा अस्तित्वात आल्या.

**रीसोर्जीमिंटो:**

प्रचलित परिस्थितीच्या विरोधात इटलीमध्ये अनेक उठाव झाले आणि हजारो लोकांना तुरुंगात डांबण्यात आले किंवा निर्वासित करण्यात आले. स्वातंत्र्यविषयक विचार आणि भावनांनी रीसोर्जीमिंटो चळवळीला प्रेरित केले. रीसोर्जीमिंटो म्हणजे पुनरुज्जीवन किंवा पुनरुत्थान. ही चळवळ एक स्वतंत्र आणि संयुक्त इटलीच्या आदर्शांवर आधारित होती. तसेच इटालियन लोकांना त्यांच्या पूर्वीच्या महानतेची आठवण करून देत होती. ऑस्ट्रियन वर्चस्वाचा निषेध आणि एकतेची मागणी त्यांनी केली होती. ते उदारमतवादी आणि लोकशाहीवादी होते. संसदीय स्वरूपाचे सरकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, चर्चचे अधिकार कमी करणे आणि प्रजासत्ताक स्थापनेची मागणी त्यांना अभिप्रेत होती. इटलीच्या मध्यमवर्गीयांनी आर्थिकदृष्ट्या स्वतःला विकसित करण्याची इच्छा व्यक्त केली.

**जोसेफ मॅझिनी:**

मॅझिनीचा जन्म १८०५ मध्ये जिनोआ येथे झाला. त्याचे वडील जिनोआ विद्यापीठात प्राध्यापक होते. तरुण वयातच मॅझिनी कार्बोनारीचा सदस्य झाला. त्याने १८३० च्या

munotes.in

बंडात जोमाने भाग घेतला. त्यासाठी त्याला काही दिवसांसाठी हद्दपार करण्यात आले. १८३१ मध्ये सुटल्यानंतर त्याने "यंग इटली" नावाची संघटना स्थापन केली. तरुणांना राष्ट्रीय चळवळीसाठी संघटित करणे हा त्यांचा हेतू होता. युवाशक्तीवर त्यांचा अपार विश्वास होता. त्यांनी तरुणांना कारागीर,कामगार,कामगार आणि शेतकऱ्यांशी संवाद साधा आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यास सांगितले. त्याला इटलीला राष्ट्र बनवायचे होते. कार्बोनेरी संघटनाच्या कार्य पद्धतीवरील त्याचा विश्वास उडाला. त्याने एक मजबूत राष्ट्रीय कृती करण्याचे ध्येय ठेवले. त्याच्या राष्ट्रवादी प्रचाराने इटालियन लोकांचे राजकीय क्षितिज विस्तृत केले.

**काव्हूरची मुत्सद्दीगिरी:**

पिडमोंट - सार्डिनियाच्या माध्यमातून काव्हूरने इटलीच्या एकीकरणात मध्यवर्ती भूमिका बजावली. काव्हूर उदारमतवादी होता आणि मुक्त व्यापार, मतस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्ष राजवटीवर विश्वास ठेवत होता. परंतु प्रजासत्ताकवादी आणि क्रांतिकारकांचे मार्ग त्यांना पसंत नव्हते. काव्हूरने संसदेच्या चर्चेत भाग घेतला होता पण पंतप्रधान असताना त्यांनी वापरलेल्या विवादास्पद पद्धतींमुळे त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका केली गेली. त्याच्या आधुनिकीकरण प्रकल्प, विशेषत: रेल्वे आणि लष्कर आणि नौदलाच्या उभारणीवर मोठ्या प्रमाणावर खर्च केल्यामुळे राष्ट्रीय कर्ज वाढले. जेव्हा काव्हूर पंतप्रधान झाला तेव्हा पिडमोंटला ऑस्ट्रियाकडून नुकताच मोठा पराभव सहन करावा लागला होता, परंतु जेव्हा तो मरण पावला, तेव्हा व्हिक्टर इमॅन्युएलच्या द्वितीयच्या हाती युरोपच्या महान शक्तींमध्ये स्थान असलेल्या एक राज्य आले. त्यामध्ये काव्हूरचा सिंहाचा वाटा होता.

**क्रिमियन युद्ध (१८५३-५६):**

ब्रिटन आणि फ्रान्सच्या सहयोगी शक्तींनी पिडमोंट राज्याला क्रिमियन युद्धात सहभागी होण्यास सांगितले. इटलीच्या एकीकरणाच्या पिडमॉन्टच्या पुढाकाराला मित्रपक्ष पाठिंबा देतील अशी आशा असलेल्या कावूरने १० जानेवारी १८५५ रोजी ब्रिटन आणि फ्रान्सला पाठींबा दिला आणि युद्धात प्रवेश केला म्हणून सहमती दर्शविली. १९व्या शतकाच्या मध्यात ऑस्ट्रिया हे शक्तिशाली राष्ट्र होते,ज्यांच्याकडे लोम्बार्डीचा मोठा आणि समृद्ध प्रदेश होता. पिडमोंट- सार्डिनिया हे ऑस्ट्रियन लोकांना स्वतःहून पराभूत करू शकत नाही हे जाणून कावूरने १८५० च्या दशकाच्या मध्यात फ्रान्स, इंग्लंड आणि ऑटोमन साम्राज्याच्या बाजूने क्रिमियन युद्धात प्रवेश करून राजकीयदृष्ट्या फायदा उठवण्याचा प्रयत्न केला आणि तो पुरेपूर यशस्वी झाला. दरम्यान, कावूरने पिडमोंट-सार्डिनिया आणि त्याचे प्रदेश आधुनिकीकरणद्वारे सुसज्ज करण्याचा प्रयत्न केले. सार्डीनियात रेल्वेमार्ग तयार करणे आणि सैन्य प्रबलीकरण सुरु ठेवले.

ऑस्ट्रियाला नमवण्यासाठी पीडमॉन्टला प्रबळ मित्रांची गरज होती. त्याने फ्रान्सबरोबर युती करण्याचा निर्णय घेतला. फ्रेंच राजा नेपोलियन तिसरा हा पूर्वी कार्बोनारीचा सदस्य होता त्यामुळे इटालियन राज्यांबद्दल सहानुभूती बाळगणे अपेक्षितच होते. १८५५ मध्ये कावूरने क्रिमियन युद्धात इंग्लंड आणि फ्रान्सला मदत करून राजनैतिक पाऊल उचलले. त्याचे रशियाशी कोणतेही वैर नव्हते,पण त्याला आंतरराष्ट्रीय राजकारणातून फायदा घ्यायचा

होता. इटली एकीकरणात हे महत्वाचे पाऊल होते. जेव्हा इटालियन सैन्याने क्रिमीय युद्धाबद्दल तक्रारी मांडल्या, तेव्हा तो म्हणाला "क्रीमियाच्या या चिखलातून एक नवीन इटली जन्माला येईल." युद्धानंतर, कॅव्होरला पॅरिस शांतता परिषदेसाठी बोलावण्यात आले. त्याने तिथे जाऊन इटालियन राज्यांच्या समस्या मांडल्या. नेपोलियन तिसरा इटलीला मदत करण्यास तयार झाला. त्यांनी कावूरची भेट घेतली आणि तपशीलांवर चर्चा केली. ऑस्ट्रियाला लोम्बार्डी आणि व्हेनेशियामधून बाहेर काढण्यासाठी त्याने पिडमोंटला मदत करण्याचे आश्वासन दिले. त्याबदल्यात फ्रान्सला सेव्हॉय आणि नाइस प्रांत मिळणे अपेक्षित होते.

**ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध १८५९:**

फ्रान्सशी युती केल्यावर, पिडमोंट-सार्डिनियाने ऑस्ट्रियाविरुद्ध १८५९ मध्ये युद्ध घोषित केले. ऑस्ट्रियाचा विरोध करण्यासाठी कावूरने लोम्बार्डीच्या सीमेवर सैन्य तैनात केले. ऑस्ट्रियाने पिडमोंटला सैन्य मागे घेण्यास सांगितले पण कावूरने नकार दिला. त्यामुळे ऑस्ट्रियाने युद्धाची घोषणा केली गेली. करारानुसार नेपोलियन तिसरा याने वैयक्तिकरित्या फ्रेंच सैन्याला कावूरला मदत करण्यासाठी आज्ञा दिली. लोम्बार्डीवर सार्डिनियाचा ताबा प्रस्थापित झाला. जेव्हा हे स्पष्ट झाले की ऑस्ट्रिया व्हेनेशियाला गमावेल तेव्हा नेपोलियन तिसरा याने अचानक युद्ध थांबवले व तो मागे हटला. त्याने ऑस्ट्रियाबरोबर व्हिलाफ्रांकाचा करार केला. यामुळे कावूर निराश झाला आणि त्याने राजीनामा दिला. परंतु विक्टर इम्यनुएलने तो स्वीकारला नाही. इटालियन लोकांनी पर्मा,मोडेना आणि टस्कनीच्या शासकांना नाकारले. या कामात त्यांना इंग्लंडकडून नैतिक पाठींबा मिळाला. ब्रिटिश पंतप्रधानांनी जाहीर केले की लोकांना त्यांचे राजे बदलण्याचा अधिकार आहे. तीन राज्यांतील लोकांना पिडमोंटमध्ये सामील होण्याची इच्छा होती. ही एक महत्त्वाची पायरी होती. सार्डिनिया - पिडमोंट एक मोठे आणि प्रमुख राज्य बनले.

**जोसेफ गॅरीबाल्डी:**

जोसेफ गॅरीबाल्डीचा जन्म १८०७ मध्ये नाईस येथे झाला. तो मॅझिनीचा समर्थक होता आणि यंग इटलीचा सदस्य होता. त्याने रेड शर्ट नावाची त्यांच्या अनुयायांची संघटना स्थापन केली. पोपच्या अधिपत्याखालील रोमची मुक्तता करण्यासाठी त्याने रोमकडे मोर्चा वळवला. मात्र फ्रेंच सैन्याने पोपच्या बचावासाठी धाव घेतली. गॅरिबाल्डी ही लढाई हारला आणि पुन्हा अमेरिकेत निघून गेला. काही वर्षांनी तो इटलीला परतला आणि एका छोट्या बेटावर शेतकऱ्याचे आयुष्य व्यतीत करू लागला. १८५४ मध्ये कावूरने त्याला पीडमोंटचा राजा व्हिक्टर इमॅन्युएलच्या नेतृत्वाखाली एकीकरण पूर्ण करण्यासाठी त्याची मदत मागितली. गॅरिबाल्डीने प्रजासत्ताकवादाचे समर्थन केले असले तरीही, त्याने आपल्या देशाच्या एकीकरणासाठी इमॅन्युएलचे नेतृत्व स्वीकारले. उत्तर इटालियन राज्यांनी १८५९ आणि १८६० मध्ये निवडणुका घेतल्या आणि पिडमोंट-सार्डिनिया साम्राज्यात सामील होण्यासाठी मतदान केले एकीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल होते. पिडमोंट-सार्डिनिया यांनी सॅवॉय आणि नाइस हे प्रांत फ्रान्सकडे सोपवले. दक्षिणी इटालियन राज्यांना एकीकरण प्रक्रियेत आणण्यात गॅरिबाल्डी यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. १८६१ च्या

सुरुवातीला एक राष्ट्रीय संसद बोलावली आणि इटलीच्या राज्याची घोषणा केली गेली आणि त्यात व्हिक्टर इमॅन्युएल दुसरा याची इटलीचा राजा म्हणून निवड करण्यात आली.

गरीबाल्डीने आपल्या अनुयायांना १८५९ मध्ये ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध लढण्यास प्रेरित केले. १८६० मध्ये सिसिलीच्या देशभक्तांनी फ्रेंच राजा फ्रान्सिस पहिला याच्या विरोधात बंड केले. त्यांनी गॅरिबाल्डीकडे मदतीची विनंती केली. गरीबाल्डी हजार अनुयायांसह मार्सलाच्या किनाऱ्याकडे निघाला. त्याने व्हिक्टर इमॅन्युएलच्या नावाने संपूर्ण सिसिलीवर कब्जा केला. विजयानंतर,त्याने इटलीच्या मुख्य भूमीत प्रवेश केला आणि नेपल्स गाठले. गारीबाल्डीने १८६० मध्ये नेपल्सवर कब्जा केला. त्याने रोमवरील मोर्चाची तयारी सुरू केली. कॅव्हूरसाठी ही परिस्थिती धोकादायक होती. रोम हा प्रांत पोपच्या अधिपत्याखाली होता. हे फ्रान्सच्या अधिपत्याखाली होते. नेपोलियन तिसरा कॅथोलिक होता आणि पोपला त्रास होऊ नये अशी त्याची इच्छा होती. कावूरच्या ध्यानात आले की रोमवरील हल्ल्याचा अर्थ फ्रान्सशी युद्ध होईल. कावूरने गॅरिबाल्डीला थांबवण्याचे धोरण आखले. त्याने नेपोलियन तिसरा याला आश्वासन दिले की रोमवर हल्ला होणार नाही,परंतु इतर छोट्या राज्यांचा भाग व्हिक्टरने काबीज केला. लोकांनी त्याला आपला राजा म्हणून स्वीकारले. गरीबाल्डीने राजाला अभिवादन केले व संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी तो आपल्या गावी गेला व राजकारणातून निवृत्त झाला.

**व्हिक्टर इमॅन्युएलने एकीकरण पूर्ण केले:**
व्हिक्टर इमॅन्युएल हा चार्ल्स अल्बर्ट या सार्डिनिया – पिडमोंटच्या राजाचा मुलगा होता. एकीकरणाच्या कामात त्याला काउंट कावूरकडून राजकीय मार्गदर्शन लाभले. त्याने एकीकरणाचा मार्ग निर्देशित करण्यासाठी कावूरला पूर्ण अधिकार दिला. १८६१ पर्यंत व्हेनेशिया आणि रोम वगळता सर्व क्षेत्रे एकीकरणाच्या बाहेर होती. व्हेनेशिया हा प्रांत ऑस्ट्रियाच्या तर रोम पोपच्या ताब्यात होता. १८६६ मध्ये ऑस्ट्रिया आणि प्रशिया दरम्यान युद्ध झाले. व्हिक्टरने प्रशियाशी युती केली. त्यातील अटींनुसार जर इटलीने प्रशियाला ऑस्ट्रियाविरुद्ध मदत केली तर त्या बदल्यात इटलीला वेनेशिया ताब्यात घेण्यास प्रशिया मदत करेल. प्रशियाने युद्ध जिंकले आणि ऑस्ट्रियाला व्हेनेशियाला इटलीला दिले गेले. १८७० मध्ये फ्रान्स आणि प्रशिया यांच्यात युद्ध झाले. नेपोलियन तिसरा याला रोममधून फ्रेंच सैन्य मागे घेण्यास भाग पाडले गेले. व्हिक्टरने या संधीचे सोने केले. सप्टेंबर १८७० मध्ये इटालियन सैन्याने रोमच्या दिशेने कूच केले. पोपने आपले बस्तान व्हॅटिकनमध्ये हलवले. रोमच्या नागरिकांनी एकीकरणात सामील होण्यासाठी मतदान केले.

## ८.११ सारांश

१८६० पासून १८९० पर्यंत बिस्मार्कने जर्मन आणि युरोपियन राजकारणावर वर्चस्व गाजवले. शांततेच्या मार्गाने आपले ध्येय साध्य होऊ शकत नाही हे त्याला माहीत होते. त्याने लोह आणि रक्त धोरण अंगिकारले. या धोरणात प्रथम प्रशियाने मजबूत सैन्य तयार

करणे आवश्यक आणि अगत्याचे होते. राजनैतिक मार्गाने फ्रान्सला वेगळे करून आणि युद्ध जिंकून जर्मनीला एक महान राष्ट्र म्हणून स्थान मिळवून दिले. व्हीक्टर इमॅन्युएलचा राजा म्हणून स्वीकार केल्यावर इटलीचे एकीकरण पूर्ण झाले. हे इटालियन देशभक्तांच्या व्यापक प्रयत्नांमुळे होते. रोमला संयुक्त इटलीची राजधानी म्हणून घोषित करण्यात आले. मॅझिनीचा राष्ट्रवाद, कॅव्होरची मुत्सद्दीपणा, गॅरीबाल्डीचे बलिदान आणि राजा इमॅन्युएलचे शहाणपण यामुळे दीर्घ काळचे एकीकरणाचे स्वप्न साकार झाले.

## ८.१२ प्रश्न

१) १८६६ च्या ऑस्ट्रो प्रशियन युद्ध आणि १८७०-७१ च्या फ्रँको प्रशियन युद्धाचे वर्णन करा.

२) जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेची चर्चा करा.

३) जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कचे योगदान स्पष्ट करा.

४) इटलीच्या एकीकरणाकडे नेणाऱ्या घटनांची चर्चा करा.

५) इटालियन एकीकरणात ऑस्ट्रिया १८५९ विरुद्ध युद्धाची पार्श्वभूमी आणि परिणामांचे वर्णन करा.

६) जर्मनीच्या एकीकरणात कावूरची भूमिका स्पष्ट करा.

## ८.१३ संदर्भ


- कॉर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४
- कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९
- ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५
- टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड
- थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.


*****

# ९

# राष्ट्रीय अस्मितांची  निर्मिती - आयर्लंड आणि बाल्कन राष्ट्रे

**घटक रचना**


९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ आयरिश राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

९.३ बाल्कन राष्ट्रांचा उदय

९.४ सारांश

९.५ प्रश्न

९.६ संदर्भ


## ९.० उद्दिष्ट्ये

१. आयरिश राष्ट्रवादाचा उदय समजून घेणे

२. आयर्लंडमधील राष्ट्रीय अस्मिता निर्मितीचा मागोवा घेणे

३. बाल्कन प्रदेशात राष्ट्रीय अस्मिता निर्माण शोधणे

४. आयर्लंड आणि बाल्कनमधील राष्ट्रीय अस्मिता निर्मितीमध्ये इंग्लंड, रशिया, ऑस्ट्रियाच्या भूमिकेचा अभ्यास करणे

## ९.१ प्रस्तावना

आयरिश प्रश्नाचे मूळ आयर्लंड हा ब्रिटीश साम्राज्यवादी धोरणांचा बळी ठरला होता यातच होते. आयरिश लोक त्यांच्याच देशात स्वतंत्र नव्हते. आयरिश उठावांना निर्दयीपणे मोडून काढण्यात आहे आणि शतकानुशतके आयर्लंडमध्ये वंशद्वेष वाढीस लागला होता. या सर्व कालावधीत इंग्लंडच्या मोठ्या संसाधनांमुळे आयर्लंड ब्रिटीश शासनासोबत संघर्ष आणि सोबत स्पर्धा करू शकत नव्हता. या वादळी इतिहासाचा परिणाम असा झाला की आयरिश लोक त्यांच्या स्वतःच्या भूमीतील दुय्यम गणले गेले होते. आत्यंतिक द्वेषाने आणि राष्ट्रीयत्वाने भारलेले असे वातावरण आयर्लंडमधे निर्माण झाले.

munotes.in

## ९.२ आयरिश राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

**कृषी समस्या:**

चार्ल्स हेजच्या नोंदीप्रमाणे आयर्लंडच्या जमिनीवर आयरिश लोकांची मालकी नव्हती. ती जमीन एकेकाळी त्यांच्या पूर्वजांची होती. इंग्रज राज्यकर्त्यांनी आणलेल्या निरनिराळ्या योजनांमुळे जमिनीवर मोठ्या प्रमाणावर कब्जा करण्यात आला. या जमिनी इंग्रजां अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. आयरिश त्यांच्याच देशात दुय्यम नागरिक बनले. आयरिश लोक नेहमीच स्वतःला आयर्लंडमधील जमिनीचे न्याय्य मालक मनात होते. इंग्रज जमीनदारांना जमिनी हडप करणारे जमीनदार मानले गेले आणि त्या जमिनींवर ताबा मिळवण्याची त्यांची तीव्र इच्छा होती.

**धार्मिक समस्या:**

आयरिश लोक फार पूर्वीपासून धार्मिक वृत्तीचे होते. युरोपमध्ये प्रोटेस्टंट पंथ वेगात पसरत असताना आयरिश कॅथलिकच राहिले. तर इंग्रज रोमपासून वेगळे होवून प्रोटेस्टंट झाले. झाले. आयरिश अँग्लिकन चर्चला त्यांच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याने शत्रुत्व अधिकच वाढले. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस ते अँग्लिकन प्रोटेष्टंट चर्चला एक दशमांश कर देत होते तरीही ते स्वतः कॅथलिकच राहिले. त्यांनी कधीही प्रोटेस्टंट चर्चमध्ये प्रवेश केला नाही आणि जाणूनबुजून त्यांच्या स्वतःच्या चर्चचे समर्थन केले.

**राजकीय स्थिती:**

आयरिश लोकांसाठी त्यांना नियंत्रित करणारे कायदे केले नाहीत. १८०० मध्ये त्यांची डब्लिनमधील स्वतंत्र संसद रद्द करण्यात आली आणि १८०१ पासून ग्रेट ब्रिटनमध्ये लंडनमध्ये एकच संसद होती. यापुढे आयर्लंडकडे हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रतिनिधींचा कोटा असताना महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्याचा कधीही सल्ला घेतला गेला नाही. १८४५-४७चा आयरिश दुष्काळ हा एक दुःखद आपत्ती होता. त्याचे परिणाम दूरगामी होते. अनेक वर्षे लोकांना मनस्ताप झाला होता.

**होमरूल आंदोलन:**

आयरिश लोक आयर्लंडच्या अंतर्गत व्यवहाराच्या व्यवस्थापनासाठी आयरिश संसदेची पर्यायाने होमरूलची मागणी करत होते. त्यांना इंग्रजी संसदेचा आणि परदेशी लोकांचा तिरस्कार वाटत होता. आयर्लंडला इंग्लंडपासून वेगळे करण्याची त्यांची इच्छा नव्हती परंतु आयरिश लोकांसाठी स्वतंत्र संसदेची त्यांची इच्छा होती. डब्लिनमध्ये स्वतंत्र आयरिश संसदेला बोलावण्याची व देशातील स्थितीवर नियंत्रण ठेवण्याची समर्थन करणारे विधेयक मांडण्यात आले. हे विधेयक ३४३ मतांनी नामंजूर झाले.

**सॅलिस्बरी मंत्रिमंडळ:**

१८९५ च्या निवडणुकीत ब्रिटन-आर्यलंड एकतावादी गटाने बहुमत मिळवले. ते डिसेंबर १९०५ पर्यंत सत्तेत राहायचे. लॉर्ड सॅलिस्बरी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. बऱ्याच

वर्षांपासून होमरूलचा प्रश्न मागे पडला होता. आता सत्तेत असलेला पक्ष आयर्लंडमधील स्वतंत्र संसदेच्या कल्पनेला ठामपणे विरोध करत होता. १८९७ मध्ये राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाचा साठवा वर्धापनदिन हा साम्राज्याप्रती वसाहतींच्या निष्ठेचे तसेच सार्वभौम असलेल्या सार्वभौम आदर आणि आपुलकीच्या उल्लेखनीय प्रदर्शनाचे निमित्त होते. हा हीरक महोत्सव साम्राज्याच्या विविध विभागांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या संघभावनेच्या ताकदीचे,इतरांशी असलेल्या संबंधातून प्रत्येकाला मिळणारे फायदे आणि सत्तेच्या अभिमानाचे एक जबरदस्त प्रदर्शन होते.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या वर्षांत आयरिश इंग्रजी साहित्यात मोठी भर पडली होती. जॉर्ज मूर,जे.एम. सिंज,डब्ल्यू.बी., यिट्स,जॉर्ज रसेल आणि जेम्स जॉयस यांसारख्या कवी, नाटककार आणि कादंबरीकारांचा एक उत्कृष्ट गट डब्लिनमध्ये उदयास आला. दरम्यान गेलिक लीग (१८९३) ने आयरिश राष्ट्राची पहिली भाषा म्हणून गेलिक या भाषेला रूढ करण्याचा प्रयत्न केला आणि गेलिक ॲथलेटिक असोसिएशनने ब्रिटीश खेळांच्या जागी पारंपारिक आयरिश खेळ लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. डब्लिनमधील इस्टर रायझिंग घटनेनंतर (१९१६) नंतर सिन फेनने महत्वाची भूमिका बजावली. राष्ट्रवादी भावनांचा हा एक उद्रेक होता. सिन फेनचे नेते इमॉन डी व्हॅलेरा यांनी एकसंध आणि स्वतंत्र आयर्लंडसाठी केलेल्या निःसंदिग्ध मागणीने १९१८ मध्ये ब्रिटीश संसदेत १०५ आयरिश जागांपैकी ७३ जागा जिंकल्या. सिन फेनच्या संसद सदस्यांची जानेवारी १९१९ मध्ये डब्लिन येथे बैठक झाली आणि त्यांनी स्वतंत्र आयरिश संसदेची घोषणा केली. आयरिश हंगामी सरकार स्थापन झाले.

अशा प्रकारे सिन फेन (१९०५) या राष्ट्रवादी पक्षाची निर्मिती, होम रूल चळवळीचा प्रसार आणि आयरिश रिपब्लिकन आर्मी अंतर्गत लोकप्रिय राष्ट्रवादी उठाव (१८९१-१९२१) यामुळे आयर्लंडची फाळणी झाली. उत्तर आयर्लंडने ब्रिटीश राजसत्तेशी आपली निष्ठा कायम ठेवली तर उर्वरित आयर्लंडने स्वतंत्र राज्यघटनेसह प्रजासत्ताक घोषित केले.

## ९.३ बाल्कन राष्ट्रांचा उदय

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत बाल्कन द्वीपकल्पातील ख्रिश्चन लोकसंख्येमध्ये बरीच अस्वस्थता आणि असंतोष होता. रशियाने प्रोत्साहित केलेल्या बाल्कन लोकांमध्ये एक मजबूत राष्ट्रवादी चळवळ निर्माण होत होती. क्रिमियन युद्धात पराभूत झाल्यामुळे झार अलेक्झांडर द्वितीय याच्या प्रचारक धोरणांमुळे आणि रशियाबाहेरील स्लाव्ह लोकांच्या सामान्य समर्थनामुळे रशियाचा प्रभाव या लोकांवर जाणवत होता. अशा प्रकारे झार अलेक्झांडर द्वितीयला बाल्कनमधील स्लाव्ह लोकांना रशियन साम्राज्याला जोडण्याची इच्छा होती. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्य देखील बाल्कन द्वीपकल्पातून एजियन समुद्रापर्यंत विस्तारण्याची आकांक्षा बाळगू लागले. अशा प्रकारे रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यात संघर्ष अपरिहार्य झाला. तुर्कीच्या सुलतानाने आपल्या ख्रिश्चन प्रजेच्या हितासाठी राजकीय आणि धार्मिक सुधारणांचे आश्वासन पूर्ण केले नाही आणि तुर्कांकडून त्यांच्या ख्रिश्चन प्रजेवर

अत्याचार वाढले. या घटकांमुळे ऑट्टोमन साम्राज्याच्या जुलमी राजवटीविरुद्ध बाल्कन ख्रिश्चन राष्ट्रीयतेचा उदय झाला.

तुर्कीविरुद्ध बाल्कन राष्ट्रीयत्वाच्या वाढीस ऑस्ट्रिया आणि रशिया यांनी प्रोत्साहन दिले. बाल्कन द्वीपकल्पातील ऑस्ट्रियन स्वारस्य मुख्यत्वे इटली आणि जर्मनीच्या एकत्रीकरणाच्या वेळी गेलेली प्रतिष्ठा पुनर्प्राप्त करण्याच्या इच्छेमुळे होते. रशियाचे बाल्कन द्वीपकल्पात  स्वारस्य ऑस्ट्रियन हितसंबंधांमुळे तीव्र झाले होते. बाल्कन द्वीपकल्पातील विविध प्रदेश आणि डॅन्यूबच्या दक्षिणेकडील बल्गेरियन भागात झालेल्या बंडांनी ऑस्ट्रिया आणि रशियाचे लक्ष वेधून घेतले.

१८५८ मध्ये मॉन्टेनेग्रोने ग्राहोवो येथे तुर्कांना पराभूत केले. तथापि पुढील काही वर्षांमध्ये तिचे अस्तित्व तुर्की आक्रमणाद्वारे धोक्यात आले आणि रशियाने मॉन्टेनेग्रोच्या बचावासाठी पावूल टाकले. रोमानिया स्लाव्ह राज्य नसले तरी १८६१ मध्ये त्या देशाची एकता पूर्ण करण्यासाठी रशियाने सहाय्य केले. १८६७ मध्ये रशियाने बेलग्रेड आणि इतर सर्बियन किल्ल्यांमधून तुर्की सैन्य काढून टाकण्यासाठी हस्तक्षेप केला आणि अशा प्रकारे सर्बियाशी तिचा जवळचा संबंध आला. १८७० मध्ये रशियाने पॅरिस करार (१८५६) मधील काळ्या समुद्रातील कलमे रद्द केली आणि सेबॅस्टोपोलच्या किल्ल्याचा जीर्णोद्धार आणि काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर तिच्या नौदलाची पुनर्बांधणी करण्याची घोषणा केली. या घटकांनी रशियन आकांक्षांचे पुनरुज्जीवन केले आणि बाल्कनमधील स्लाव्ह लोकसंख्येला तुर्कांच्या विरोधात उठण्यास प्रोत्साहित केले.

**बोस्निया आणि हर्जेगोबीना:**

बोस्निया आणि हर्झेगोबीनामधील जनतेने तुर्कांविरुद्ध बंडाची तयारी सुरु केली. १८७४ मध्ये शेतीच्या वाईट इंगामामुळे बोस्निया आणि हर्झेगोबिना या दोन्ही देशांमध्ये बंड सुरु झाले. त्यांना सर्बिया आणि मॉन्टेनेग्रोच्या लोकांनी मदत केली. राष्ट्रवादी चळवळ संपूर्ण बाल्कन प्रदेशात पसरू लागली आणि सामान्य जनता प्रक्षोभित झाली होती. ३० डिसेंबर १८७५ रोजी ऑस्ट्रिया-हंगेरीचे परराष्ट्र मंत्री काउंट अँड्रासी यांचा एक प्रस्ताव प्रसारित करण्यात आला ज्यामध्ये बाल्कनमधील तुर्की राजवटीचा निषेध करण्यात आला आणि त्यातील अराजकता निदर्शनास आणून दिल्या गेली. तुर्की सुलतानाने पुन्हा एकदा सुराजकीय व सामाजिक सुधारणा आणण्याची तयारी दर्शवली. तरीसुद्धा ख्रिश्चन बंडखोर राष्ट्रांचा सुलतानाच्या वचनांवर विश्वास नव्हता. याच पार्श्वभूमीवर बाल्कन प्रदेशातील देश स्वतंत्र होण्याची आकांक्षा बाळगत होते. ऑट्टोमन साम्राज्याविरुद्ध बंड करण्यात ग्रीक आघाडीवर होते.

**ग्रीस:**

ग्रीक राष्ट्रवादी विचार अठराव्या शतकाच्या अखेरीस विद्वान आणि साहित्यिक गटांनी प्रसारित केला होता. रिगास फेरिओस हे राष्ट्रवादी कवी होते ज्याने राष्ट्रीय विचारांचा प्रचार केला होता. १८१४ मध्ये ग्रीक लोकांनी क्रिमियामध्ये स्वातंत्र्य चळवळीसाठी 'सोसायटी ऑफ फ्रेंड्स' स्थापन केली. त्याला मोठी आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीही मिळाली.

तरीही त्यांच्या राष्ट्रवादाला खरा पाठिंबा रशियानेच प्रदान केला. १७७० च्या सुरुवातीला रशियाने १७७४ मध्ये कुकुक कैनार्कांच्या कराराद्वारे रशियाने सुलतानला साम्राज्यातील ऑर्थोडॉक्स ख्रिश्चनांचे प्रतिनिधित्व करण्याचा सर्वसमावेशक अधिकार प्राप्त केला. पुढे राजकीय बंडखोरी बंडखोरी एजियन बेटे, अथेन्स,कॉरिंथ,थेसाली आणि मॅसेडोनियामध्ये वेगाने पसरली. ऑट्टोमन गव्हर्नर अली पाशा सुलतान विरुद्ध बंड करत होता आणि त्याचे नियंत्रण दक्षिणेकडे ग्रीसमध्ये वाढवत होता. ग्रीक राष्ट्रवादी गट आणि अली पाशा यांनी युती करून तुर्कांविरुद्ध लढा दिला.

ऑट्टोमन सरकारने प्रथम धोकादायकरित्या स्वतंत्र अशा अली पाशाचा सामना केला आणि १८२२ मध्ये त्याला फाशी दिली; परंतु ते ग्रीक राष्ट्रवादींना उठावाला रोखू शकले नाही. ग्रीक लोकांच्या अथक  प्रयत्नांमुळे संपूर्ण युरोपमध्ये १८२२ मध्ये ग्रीक स्वातंत्र्य घोषित करण्यात आले. सुलतानने आता इजिप्तचा शक्तिशाली गव्हर्नर, मुहम्मद (मेहमेट) अली, अल्बेनियन वंशाचा दुसरा याला मदतीसाठी बोलावले. जो ग्रीसमध्ये आपले क्षेत्र वाढवण्यास उत्सुक होता. रशियाने सुलतानवर ग्रीक स्वातंत्र्य स्वीकार करण्यासाठी दबाव आणला. ब्रिटन आणि फ्रान्सला रशियाच्या प्रभावाच्या वाढीची भीती वाटली. रशियन भूमध्यसागरी नौसेनेने ग्रीकांना आवश्यक बाबींचा पुरवठा केला आणि रशियाने डॅन्युबियन रियासतींद्वारे ऑट्टोमन साम्राज्यावर वर आक्रमण केले. १८२९ मध्ये ऑट्टोमनचा पराभव आणि एडिर्न (एड्रियानोपल) च्या करारानंतर अखेर ग्रीक स्वातंत्र्य स्वीकारले गेले. १८३२ मध्ये ग्रीक राज्याची स्थापना करण्यात आली होती. परंतु रशियाला रोखण्यासाठी ऑस्ट्रिया, ब्रिटन, फ्रान्स, सुलतान, अली पाशा आणि मुहम्मद अली या सर्वांनी असा एक ग्रीस प्रांत  तयार केला जो ग्रीक राष्ट्रवादीच्या स्वप्नापेक्षा किंवा आधुनिक ग्रीसपेक्षा खूपच लहान होता. रशियन प्रभावाच्या भीतीने धर्म आणि राष्ट्रीयत्वाने पूर्ण परदेशी व्यक्तीला ग्रीसच्या सिंहासनावर बसवले गेले.

**सर्बिया:**

ऑट्टोमन राज्याचा ऱ्हास,स्थानिक राज्यकर्ते आणि राष्ट्रवादी गट यांच्यातील प्रादेशिक संघर्ष आणि रशियाचा हस्तक्षेप या पार्श्वभूमीवर सर्बियन परिस्थिती बाल्कन प्रदेशातील इतर वाढत्या राज्यांप्रमाणेच होती. १८०४ ते १८१३ या वर्षांमध्ये स्थानिक शासन कॅरेजॉर्जच्या नेतृत्वाखाली कार्यरत होते. सर्बियातील राष्ट्रवादी चळवळने कारेजॉर्जच्या नेतृवाखाली युरोपियन शक्तींकडून मदत मागितली असताना फक्त रशिया सैन्यासह मदतीसाठी पुढे आला आणि सुलतानवर तुर्की नियंत्रण  ठेवण्याचे काम त्याने केले. या बंडाचे बरेचसे यश इस्तंबूल येथे जेनिसेरी बंड आणि तुर्की मधील उत्तराधिकारी निवड यातील गोंधळ यामुळे मिळाले होते. तथापि १८१३ मध्ये ओटोमन्सने सैन्याने  कारागॉर्जला परभूत केले व तो हंगेरीला पळून गेला. जिथे त्याचा सहकारी सर्बियन मिलोस ओब्रेनोविकने त्याची हत्या केली. १८१५ मध्ये मिलोसने आणखी एक बंड सुरू केले. व स्वत:ला सुलतानचा ख्रिश्चन पाशा तर १८१७ मध्ये स्वतःला वंशपरंपरागत राजकुमार घोषित केले. सुलतानाने त्याला साम्राज्यात अधीनस्थ राज्यकर्ता म्हणून स्वीकारले.

ऑट्टोमन राजवटीचे पतन, राष्ट्रवादी भावनांचे पुनर्जागरण आणि मोठ्या राजकीय शक्तींचा हस्तक्षेप यामुळे सर्बियन राज्य नंतर युगोस्लाव्हियामध्ये विस्तारले. त्यानंतर. यानंतर १८२० ते १८७० च्या दरम्यान राष्ट्रीय अस्मिता भूतकाळातील महानता,लोककथा आणि वुक कराडझिकने साहित्यिक भाषेतील सुधारणा आणि सर्बियन व्याकरण आणि शब्दकोशाची रचना यामधील नेहमीच्या ऐतिहासिक संशोधनांसह वाढीस लागली. त्यानंतरच्या रशियाने बाल्कनमध्ये सर्बियामध्ये स्वारस्य निर्माण केले. सर्बियाप्रमाणेच क्रोएशिया, बोस्निया आणि हर्झेगोव्हिना वेगळे होण्याच्या मार्गावर असताना ऑस्ट्रिया मधील हॅब्सबर्गचे राजवटीने आपले साम्राज्य अबाधित राखण्याचा प्रयत्न केला. सर्बियाचे धोरण पूर्वेकडे मॅसेडोनियामध्ये आणि दक्षिणेकडे अल्बेनियामध्ये विस्तारण्यात होते. यासाठी सर्बियन राज्यकर्त्यांनी अधूनमधून ऑटोमन्स विरुद्ध सर्ब-ग्रीक-बल्गेरियन युती करण्याचा प्रयत्न केला. ग्रीसप्रमाणे सर्बियाही प्रादेशिकदृष्ट्या असमाधानी होता परंतु ग्रीसच्या तुलनेने तिचे निदान मूळ राजवंश अद्याप अस्तित्वात होते. सर्बियामधून ऑट्टोमन सत्ता अपरिहार्यपणे मागे पडली. अशा प्रकारे १८६७ पर्यंत ऑट्टोमन साम्राज्याची सर्बियातील पाळेमुळे उखडली गेली. १८७७-७८ च्या रशिया-तुर्की युद्धात ऑट्टोमनचा पराभव झाल्यानंतर आणि १८७८ मध्ये बर्लिनच्या कॉंग्रेसच्या निर्णयानंतर सर्बिया अखेर स्वतंत्र झाला.

**रोमानिया:**

रोमानिया हा ऑट्टोमन साम्राज्याचा एक अतिशय महत्त्वाचा प्रांत होता. त्यात मोल्डेव्हिया आणि वालाचिया या दोन मुख्य विभागांचा समावेश होता ज्यांना डॅन्युबियन प्रिन्सिपॅलिटी म्हणूनही ओळखले जात होते. १८५९ मध्ये ते रोमानियाचा भाग वानले. स्थानिक धार्मिक परिस्थिती आणि करमहसूल हे ऑट्टोमन नियंत्रणाच्या अधीन राहिले. १६३४ ते १७११ दरम्यान ग्रीक राजघराण्यांने या प्रांतांवर राज्य केले. अठराव्या शतकात फनारियट ग्रीक (इस्तंबूलच्या फनार प्रदेशातील श्रीमंत ग्रीक) देशाचा कारभार करत होते. परंतु ऑट्टोमन केंद्राची सत्ता खीळखिळी झाल्यावर आणि अठराव्या शतकात रशियन सत्तेच्या हस्तक्षेपामुळे हा भूभाग रशियन संरक्षणाखाली गेला. स्थानिक राष्ट्रवाद,रशियन प्रभाव आणि ऑस्ट्रियाचा नेहमीचा हस्तक्षेप या पार्शभूमीवर रोमानियन राष्ट्राच्या उदयाला चालना मिळाली. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीय पुनर्जागरण होवून राष्ट्रवादाला बळ मिळाले. रोमानियन राष्ट्रीय इतिहासाची रचना मिहेल कोगलनिसेनू (१८४०) यांनी केली. रोमँटिक साहित्यिक व्यक्तिमत्व ग्रिगोर अलेक्झांडरेस्कू यांच्या विचारातून राष्ट्रवादाला धुमारे फुटले. पहिले रोमानियन वृत्तपत्र १८३३ मध्ये वॅलाचिया येथे बुखारेस्टमधील नॅशनल थिएटरप्रमाणेच प्रकाशित झाले. धर्मग्रंथ आणि धार्मिक ग्रंथांचे रोमानियनमध्ये भाषांतर करण्याची प्रक्रिया सतराव्या शतकात सुरू झाली आणि एकोणिसाव्या शतकात ती पूर्ण झाली. ऑस्ट्रो-हंगेरिया साम्राज्यातही रोमानियन ऑर्थोडॉक्स ख्रिश्चनांवर अधिकार देऊन १८६५ मध्ये स्वतःचे स्वतंत्र रोमानिना ऑर्थोडॉक्स चर्च अस्तित्वात आले. राजकीय राष्ट्रीय चळवळीचा सांस्कृतिक पाया रचला गेला होता. १७७४ मध्ये कैनार्काच्या करारानंतर रशियन प्रभाव झपाट्याने वाढला. १८२८ ते १८३४ या काळात रशियन राज्यपाल पावेल किसेलेव्ह यांनी आधुनिक राज्याची पायाभरणी केली. रोमानिया केवळ नाममात्र ऑट्टोमन प्रदेश राहिला परंतु रशियाचे प्रभावी नियंत्रित त्यांच्यावर होते.

इस्तंबूलच्या विरोधात उपयुक्त पण स्वत:साठी धोकादायक असलेल्या राष्ट्रवादाचा प्रचार करताना रशियाला आता विशिष्ट समस्येचा सामना करावा लागला. नेपोलियन तिसरा याच्या नेतृत्वाखालील फ्रान्सने बहु-राष्ट्रीय साम्राज्ये कमकुवत करण्याच्या आणि सौदेबाजीमध्ये काही राजकीय लाभ मिळविण्याच्या आशेने सर्वत्र राष्ट्रीय चळवळींना पाठिंबा दिला. क्रिमियन धक्क्यानंतर रशियाने फ्रान्सचा हस्तक्षेप ग्राह्य मानला आणि अलेक्झांडर कुझा यांच्या नेतृत्वाखाली रोमानियाच्या नवीन राज्यात सर्व प्रदेशांचे एकत्रीकरण स्वीकारले. अभिजात वर्गाने १८६६ मध्ये त्याला पदच्युत केले आणि होहेनझोलर्न राजघराण्यातील जर्मन राजपुत्र कॅरोलला राजा म्हणून निवडले. १८७८ मध्ये बर्लिन काँग्रेसनंतर रोमानिया स्वतंत्र घोषित करण्यात आला.

**बल्गेरिया:**

अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात बल्गेरियात स्वातंत्र्यासाठी कोणतीही चळवळ झाली नाही. क्रिमियन युद्धानंतर (१८५४-५६) बाल्कन प्रदेशातील स्वातंत्र्याच्या मागण्यांना वेग आला. राकोवास्की आणि ल्युबेन कार्वेलोव यांनी यामध्ये आघाडी घेतली. रशियाने स्लाव्हिक राष्ट्रवादाचे समर्थन केले बाल्कन प्रदेशातील आणि तुर्कांविरुद्ध ग्रीक अशा राष्ट्रवादाला प्रोत्साहन दिले. रशियाने सर्बियाकडे बाल्कनमधील तिच्या प्रभावाचा आधार म्हणून पाहिले होते. प्रिन्स मिलानच्या नेतृत्वाखाली सर्बियाचा १८७६ मध्ये युद्धात ओटोमनकडून पराभव झाला तेव्हा रशियाने बल्गेरियाकडे आपला मोर्चा वळवला. रशियाने स्लाव्हिक राष्ट्रवादाच्या भावनेतून रशियन नेतृत्वाखाली बाल्कनच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे ब्रिटिश जनमत उदारमतवादी राजकारणी आणि पंतप्रधान विल्यम ग्लॅडस्टोन यांनी १८७५ मध्ये उठलेल्या बल्गेरियनच्या दडपशाहीच्या वेळी तुर्कींच्या अत्याचाराविरूद्ध नाराजी व्यक्त केली. परिणामी १८७७-७८चे रशिया-तुर्की युद्ध पेटले.  रशियाबाबतच्या संशयामुळे १८७८ मध्ये बर्लिनच्या कॉंग्रेसने विभाजित बल्गेरिया आणि पूर्व रुमेलिया नावाचे नवीन राज्य निर्माण केले. त्यांनी बल्गेरियावर एक जर्मन राजपुत्र अलेक्झांडर ऑफ बॅटनबर्गला बसवले. युरोपियन शक्तींनी अखंड बल्गेरियाचे स्वप्न पूर्ण होवू दिले नाही. ईस्टर्न रुमेलिया सारख्या स्पष्टपणे अस्थिर राज्याच्या निर्मितीवरून हे जाणूनबुजून केले गेले हे स्पष्ट झाले. इंग्लंड मात्र आता अखंड बल्गेरियाच्या बाजूने उभा राहिला. रशियाने बल्गेरियन राष्ट्रवादाचे प्रारंभिक प्रायोजकत्व स्वीकारूनही बल्गेरिया आणि पूर्व रुमेलियाच्या एकत्रीकरणावर आक्षेप घेतला. ब्रिटनने मात्र या एकत्रीकरणाला पाठिंबा दिला. १९१२-१३च्या बाल्कन युद्धांद्वारे बल्गेरियाचा राजकीय विस्तार झाला. मात्र पहिल्या महायुद्धाती जर्मनीची सहयोगी बनल्यामुळे वर्सायच्या करारामुळे बल्गेरियाचा विस्तार आक्रसला.

## ९.४ सारांश

आयर्लंड हा ब्रिटिशांनी जिंकलेला देश होता. इंग्रज राज्यकर्त्यांनी उपयोगात आणलेल्या निरनिराळ्या उपायांनी मोठ्या प्रमाणावर कब्जा करण्यात आला. आयरिश पूर्वीपासून धार्मिक दृष्ट्या वेगळे होते. ते रोमन कथलिक पंथाचे होते. त्यांना इंग्रजी संसदेचा आणि परदेशी लोकांचा तिरस्कार वाटत होता. सुरुवातीस आयर्लंड इंग्लंडपासून वेगळे व्हावे अशी

त्यांची इच्छा नव्हती,परंतु आयरिश व्यवहारांसाठी वेगळी संसद असावी अशी त्यांची इच्छा होती. सिन फेन (१९०५) या राष्ट्रवादी पक्षाची निर्मिती,होम रूल चळवळीचा प्रसार आणि आयरिश रिपब्लिकन आर्मी अंतर्गत लोकप्रिय राष्ट्रवादी उदय यामुळे देशाची फाळणी होवून आयर्लंडला स्वातंत्र्य मिळाले. रशियाने प्रोत्साहित केलेल्या बाल्कन प्रदेशामध्ये एक मजबूत राष्ट्रवादी चळवळ सुरु झाली. झार अलेक्झांडर तिसरा ला बाल्कनमधील स्लाव्ह लोकांना रशियन साम्राज्याशी सलग्न करण्याची इच्छा होती. मात्र वाढत्या राष्ट्रवादी प्रभावामुळे युरोपियन देशांच्या राजकारणासमवेतच प्रारंभी तडजोड करून व नंतर स्वतंत्र होवून या देशांनी स्वातंत्र्य मिळवले.

## ९.५ प्रश्न

१) आयर्लंडची राष्ट्रीय ओळख निर्माण करण्याऱ्या घटकांचे परीक्षण करा

२) आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या घटनाक्रमांचा मागोवा घ्या.

३) बाल्कन प्रदेशातील वाढत्या राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीचे पुनरावलोकन करा.

४) बाल्कन राष्ट्रांच्या निर्मितीचे वर्णन करा.

## ९.६ संदर्भ


- कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४
- ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५
- टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड
- थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.


*****

# १०

# अरब राष्ट्रवाद: झिओनिस्ट चळवळ

**घटक रचना**

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ अरब राष्ट्रांचा उदय
१०.३ सुएझ युद्ध (१९५६): अरब राष्ट्रवादाचे प्रकटीकरण
१०.४ झिओनिस्ट चळवळी
१०.५ बाल्फोर घोषणा
१०.६ अरब-इस्रायल युद्ध (१९४८)
१०.७ सारांश
१०.८ प्रश्न
१०.९ संदर्भ

## १०.० उद्दिष्ट्ये

- अरब राष्ट्रवादाचा उदय समजून घेणे
- झिओनिस्ट चळवळीचा मागोवा घेणे
- अरब-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे
- अरब-इस्त्रायली संघर्षाच्या संदर्भात पश्चिम आशियाई राजकारणातील गुंतागुंत समजून घेणे

## १०.१ प्रस्तावना

समान इतिहास आणि सामुदायिक धर्माच्या स्थापनेमुळे अरबस्तानातील अनेक घराण्यांना प्रभावी राजकीय आणि लष्करी एकता प्राप्त झाली. मात्र तुर्कांच्या बलशाली साम्राज्यामुळे मध्ययुगीन काळात तुर्कांचे तर आधुनिक काळात युरोपियन देशांचे राजकीय वर्चस्व सहन करावे लागले. इजिप्त हा मध्य पूर्वेतील एकमेव अरबी भाषिक देश आहे जो स्थानिक देशभक्तीला प्रेरित करण्यात प्रभावी ठरला आहे. नेपोलियनच्या मोहिमेनंतर हा देश आधुनिक होवू लागला. फ्रेंच सत्तेने माघार घेतल्यानंतर प्रथम तुर्क आणि नंतर ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली इजिप्त गेला परंतु अल्पावधीतच त्याने अरब राष्ट्रांना एकत्र येण्याचे येण्यासाठी पार्श्वभूमी निर्माण केली. पालेस्ताइन मधे ज्यू समुदायाचे वर्चस्व वाढल्यानंतर तेथील मूळ रहिवाशी असणाऱ्या अरब समुदायावर होणाऱ्या अन्यायाचे राजकीय निराकरण

करण्याचे प्रयत्न इजिप्तने केले. त्यातूनच अरब राष्ट्रवाद व झिओनिस्ट चळवळीचा अभ्यास करता येतो.

## १०.२ अरब राष्ट्रांचा उदय

व्हर्सायच्या तहानंतर आणि पूर्वीच्या ओटोमन्सच्या प्रदेशांवरील तुर्क अंमल नाहीसा झाल्यावर विविध भागात अरबांनी प्रस्थापित ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्या विरोधात प्रतिकार केला ज्यामुळे इराक,जॉर्डन,सीरिया, लेबनॉन,सौदी अरेबिया आणि इजिप्त या अरब राष्ट्रांची निर्मिती झाली. ब्रिटिशांनी १९२० मध्ये इराकमधील अरबांचा असंतोष कमी करण्यासाठी घोषणा केली की ब्रिटिश १९३२ पर्यंत देश हस्तांतराची प्रक्रिया ही प्रक्रिया पूर्ण करेल आणि फैसलच्या राजवटीत इराकला स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित करेल. तसेच हुसेनचा मुलगा अब्दुल्ला याने १९२२ मध्ये राजपुत्र म्हणून प्रथम जॉर्डनवर राज्य केले आणि १९४६ मध्ये जॉर्डनचे स्वातंत्र्य घोषित केले. सीरिया आणि लेबनॉन फ्रान्सच्या अधिपत्याखाली होते. त्यांनी फ्रेंच राजवटीचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली परंतु फ्रान्सने त्यांना निर्दयपणे दडपले. दुसऱ्या महायुद्धानंतर सीरिया आणि लेबनॉन स्वतंत्र झाले १९३२ मध्ये, ब्रिटिशांनी इब्न सौदीच्या राजवटीत सौदी अरेबियाचे स्वातंत्र्य मान्य केले. अशा प्रकारे इजिप्तसह सर्व पश्चिम आशियाई अरब अरब राष्ट्रे म्हणून स्वतंत्र झाले.

**अरब राष्ट्रवादाचे अनेक टप्पे होते परंतु काही महत्त्वाचे टप्पे खालीलप्रमाणे होते:**

१. अरब राष्ट्रवादाच्या पहिल्या टप्प्यात ही एक आदर्शवादी चळवळ होती कारण त्यात फक्त विचारवंतांचा सहभाग होता आणि त्यांनी अरबांसाठी संविधानिक सरकार स्थापन करण्यास अनुकूलता दर्शवली होती. त्यांच्यासाठी स्वातंत्र्य आणि समता हे महत्वाचे आदर्श होते.

२. अरब चळवळीचा दुसरा टप्पा वास्तववादी होता. त्यांनी विकेंद्रीकरण आणि स्वायत्तता यासारख्या मागण्या अरब चळवळीच्या राष्ट्रवादी दृष्टिकोनातून मांडल्या.

३. तिसऱ्या टप्प्यात अरब राष्ट्रवादी चळवळ क्रांतिकारी बनली. अरबांनी ऑट्टोमन शासकांविरुद्ध त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी स्वतःला तयार केले. १९०८ च्या यंग तुर्क क्रांतीचा हा थेट परिणाम होता. कारण या तरुण तुर्कांनी फक्त अरबांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी प्रोत्साहित केले.

## १०.३ सुएझ युद्ध (१९५६): अरब राष्ट्रवादाचे प्रकटीकरण

शीतयुद्ध सुरू असताना अमेरिकाप्रणीत भांडवलदार गटाने आणि रशिया प्रणीत साम्यवादी गटाने इजिप्तचे अध्यक्ष नासर यांना आपापल्या बाजूने आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. तथापि नासेर यांना संघर्ष टाळून देशाला या दोघांपासून समान अंतरावर ठेवण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या देशासाठी जास्तीत जास्त फायदा मिळवण्याचा प्रयत्न केला. तथापि सप्टेंबर १९५५ मध्ये जेव्हा इजिप्तने चेकोस्लोव्हाकियाशी शस्त्रास्त्र कराराची घोषणा केली

तेव्हा पश्चिमेला इजिप्त साम्यवादी गटाशी जुळवून घेत आहे अशी शक्यता वाटू लागली. दरम्यान डिसेंबर १९५५ मध्ये अशी घोषणा करण्यात आली की जागतिक बँक अस्वान उच्च धरणाच्या उभारणीसाठी २० दशलक्ष डॉलर कर्ज देईल. ५६ दशलक्ष डॉलर अमेरिका तर आणि १४ दशलक्ष डॉलर ब्रिटिश देण्यास तयार होते. पण यासाठी काही अटी होत्या. नासेरने साम्यावाद्यांसोबत आपले संबंध तोडावेत ही एक महत्वाची मागणी केली होती. ही अट पूर्ण करण्यास नासेर तयार नव्हता. यामुळे अमेरिकेने वचन दिलेली मदत काढून घेतली. अमेरिकेचे उदाहरण ब्रिटनने अनुसरले. नासेरने ताबडतोब सुएझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण करून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग धरणासाठी वित्तपुरवठा करण्याच्या हेतूने केला.

कालव्याचे बहुसंख्य भागधारक ब्रिटिश आणि फ्रेंच होते. त्यांना नासेरने नुकसान भरपाई देण्याचे वचन दिले होते. अशा प्रकारे एका फटक्यात नासेरने इजिप्शियन समाजवाद, अरब राष्ट्रवाद आणि त्याच्या परराष्ट्र धोरणाचे स्वातंत्र्य अधोरेखित केले. त्याच्या कृतीला ब्रिटनने महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय जलमार्गासाठी बेकायदेशीर आणि बेजबाबदार व धोक्याची वाटचाल म्हणून पाहिले. आपल्या यशामुळे आणि रशियन समर्थनामुळे नासरने इस्रायलवरील हल्ले वाढवले आणि ऑक्टोबरमध्ये सीरिया आणि जॉर्डनसह संयुक्त लष्करी कमांड तयार केली. याच सुमारास अल्जेरियातील बंडखोरांना मिळालेल्या इजिप्शियन समर्थनामुळे संतप्त झालेल्या फ्रेंचांनी एक योजना प्रस्तावित केली. ज्याद्वारे इस्रायलने सिनाई द्वीपकल्पात प्रतिआक्रमण केले पाहिजे व ब्रिटीश आणि फ्रेंचांना आंतरराष्ट्रीय कालव्याच्या संरक्षण करण्याच्या बहाण्याने इस्रायलसोबत चढाईची योजना आखली.

ब्रिटीश आणि फ्रेंचांचा असा विश्वास होता की अशा कृतीमुळे सुएझ कालव्यावरील अँग्लो-फ्रेंच नियंत्रण पुनर्संचयित होईल आणि इजिप्तच्या पराभवामुळे नासेरची सत्ता उलथून जाईल. युद्धाची सुरुवात २९ ऑक्टोबर १९५६ रोजी इजिप्तवर नियोजित इस्रायली आक्रमणाने झाली. एका आठवड्यात इस्रायलींनी संपूर्ण सिनाई द्वीपकल्प काबीज केला होता. दरम्यान ब्रिटीश आणि फ्रेंचांनी इजिप्शियन बॉम्बहल्ले केले आणि कालव्याच्या उत्तरेकडील टोकाला पोर्ट सैद येथे सैन्य उतरवले. या हल्ल्यांमुळे उर्वरित जगाकडून टीका झाली आणि सर्व अरबांना अस्वस्थ करण्याची आणि त्यांना सोव्हिएत युनियनशी घनिष्ठ संबंध जोडण्याची भीती वाटणाऱ्या अमेरिकन लोकांनी ब्रिटनला पाठिंबा देण्यास नकार दिला. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये अमेरिकन आणि रशियन लोकांनी याप्रकरणी सहमती दर्शविली. त्यांनी शत्रुत्वाचा तात्काळ अंत करून त्वरित शांतता प्रस्थापित करण्याची मागणी केली आणि संयुक्त राष्ट्र सैन्य पाठवण्याची तयारी केली. त्यांच्याविरुद्धच्या जागतिक मतांच्या दबावामुळे ब्रिटन, फ्रान्स आणि इस्रायलने माघार घेण्यास आणि युद्ध संपविण्यास सहमती दर्शविली तर संयुक्त राष्ट्रांच्या सैन्याने इजिप्त आणि इस्रायल यांच्यातील सीमारेषेवर सुरक्षादल तैनात केले. सुएझ युद्ध हे ब्रिटन आणि फ्रान्ससाठी संपूर्ण मानहानीकारक होते. त्यांचे कोणतेही उद्दिष्ट साध्य झाले नाही आणि नासेरसाठी हा मोठा राजकीय विजय होता.

**पॅलेस्टिनी मुक्ती संघटना:**

इस्रायल आणि तिचे शेजारी अरब देश यांच्यात कटुता कायम राहिली. १९६४ मध्ये पॅलेस्टिनी लिबरेशन ऑर्गनायझेशन या संघटनेची स्थापना झाली. अल फताह (विजय) ही आणखी एक गुप्त संघटना देखील स्थापन करण्यात आली आणि गुरिल्ला गटांनी ज्यू वस्त्यांवर वाढत्या संख्येने हल्ले केले. सीरियातील राजकीय गडबडीने १९६६ मध्ये बाथ पक्षाला सत्तेवर आणले. त्यांनी अल फताह या पॅलेस्टिनी मुक्ती संघटनाला पाठिंबा दिला. ही फेदायिनपेक्षा अधिक प्रभावी संघटना होती. नासरने इस्त्रायली आक्रमण झाल्यास सीरियाला पाठिंबा देण्याचे वचन दिले. मे १९६७ मध्ये कैरो रेडिओने घोषणा केली,"सर्व इजिप्त आता संपूर्ण युद्धात उतरण्यास तयार आहे ज्यामुळे इस्रायलचा अंत होईल." यामुळे अरब राष्ट्रवाद मोठ्या प्रमाणात ढवळून निघाला. नासेरने संयुक्त राष्ट्रसंघाचे सैन्य मागे घेण्याचे आवाहन केले. सौदी अरेबिया,अल्जेरिया आणि इराककडून समर्थनाची आश्वासने मिळवली आणि जॉर्डनचा राजा हुसेन यांच्याशी करार केला. त्याने तिरानची सामुद्रधुनीही बंद केली. ज्यूंच्या निर्मूलनासाठी अरब-इस्त्रायली संघर्षात अरब जगाने नासरच्या नेतृत्वाचे अनुसरण केले. या घडामोडींनंतर अरब सैन्याने इस्रायलच्या सीमेवर आक्रमणाची तयारी केली.

**१९६७ चे सहा-दिवसीय युद्धः अरब एकतेची कसोटी:**

१८४८-४९ च्या युद्धाच्या शेवटी अरब राष्ट्रांनी शांतता करारावर स्वाक्षरी केली नव्हती कारण ते इस्रायलला अधिकृत मान्यता देण्यास तयार नव्हते. १९६७ मध्ये स्वतंत्र राज्य म्हणून इस्रायलचा नाश करण्याच्या दृढनिश्चयी प्रयत्नात ते पुन्हा एकत्र आले. या उपक्रमात इराक, सीरिया आणि इजिप्तने पुढाकार घेतला होता. इस्रायलचे पंतप्रधान लेव्ही एश्कोल यांनी १९५६ च्या सिनाई मोहिमेतील नायक जनरल मोशे दायान यांची संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती केली. बचावासाठी हल्ल्याला प्राधान्य देत मोशे दायनने इजिप्शियन वायुसेना सक्रीय होण्याआधीच असताना अचानक हल्ला करण्याचे आदेश दिले. त्यानंतर सर्व आघाड्यांवर त्वरित हल्ला केला गेला. हवाई हल्ल्याचा जबरदस्त फटका इजिप्तला बसला. अरब सैन्याने सर्व आघाड्यांवर सैन्य आणले. सहा दिवसांत इस्रायलींनी गाझा पट्टी आणि संपूर्ण सिनाई द्वीपकल्प सुएझ कालव्याच्या पूर्व किनाऱ्यापर्यंतचा जेरुसलेमचा उर्वरित भाग आणि जॉर्डनचा पश्चिम किनारा आणि सीरियाच्या गोलान हाइट्सचा ताबा घेतला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद युद्धविरामाची घोषणा करेपर्यंत अरबांचा मोठा मानसिक आणि लष्करी पराभव झाला होता आणि इस्रायली सैन्यासाठी हा मोठा विजय होता. इस्रायली लोकांसाठी सहा दिवसांचे युद्ध मोठे यश होते. यावेळी त्यांनी शेजारील अरब राज्यांकडून ताब्यात घेतलेला प्रदेश परत करण्याच्या संयुक्त राष्ट्राच्या आदेशाकडे दुर्लक्ष केले होते.. तथापि या युद्धामुळे सुमारे दहा लाख अतिरिक्त निर्वासित अरबांसाठी नवीन समस्या तयार झाली. त्यांच्यापैकी बरेच लोक १९४८ मध्ये वेस्ट बँक आणि गाझा पट्टीवर उभारलेल्या निर्वासित शिबिरांमध्ये राहत होते.

munotes.in

## १०.४ झिओनिस्ट चळवळी

पश्चिम आशियामध्ये इजिप्त, सुदान, जॉर्डन, सीरिया, लेबनॉन, इराक, सौदी अरेबिया, कुवेत, इराण, तुर्की, येमेन प्रजासत्ताक, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान यां देशांचा समावेश होतो. तुर्की आणि इराण वगळता यापैकी बहुतेक राज्यांची लोकसंख्या अरबांनी व्यापली होती. इराण हे अरब राष्ट्र नसले तरी पर्शियन अखाताच्या उत्तरेकडील भागात अनेक अरब रहात होते. पश्चिम आशियामध्ये इस्रायल हे छोटे ज्यू राज्य देखील अस्तित्वात आले. पॅलेस्टाईनमध्ये इस्रायलची निर्मिती व पॅलेस्टिनी अरबांच्या मालकीचे क्षेत्र याची पिछेहाट यामुळे जगभरातील अरबांना नाराज केले. अरबांनी यासाठी ब्रिटनला जबाबदार धरले. अरबांपेक्षा ज्यूंबद्दल ब्रिटनला अधिक सहानुभूती होती. याशिवाय त्यांनी अमेरिकेवर ज्यू राष्ट्राच्या कल्पनेचे जोरदार समर्थन केल्यामुळेही दोषारोपण केले. अरब राष्ट्रांनी इस्रायलला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देण्यास नकार दिला आणि ते नष्ट करण्याची शपथ घेतली. इस्रायल आणि विविध अरब राष्ट्रांमध्ये (१९४८-४९, १९५६, १९६७ आणि १९७३) चार छोटी युद्धे केली असली तरी अरब हल्ले अयशस्वी झाले आणि इस्रायआणखी प्रबळ झाले. इस्रायलचा नाश करण्याची अरब इच्छा फलद्रूप झाली नाही. तथापि पश्चिम आशियाई घडामोडींमधून चाललेल्या इतर दोन बाबी इस्रायलविरोधी संघर्षात दिसून आल्या: (१) अरब राष्ट्रांमध्ये राजकीय आणि आर्थिक ऐक्य साधण्याची काही अरबांची इच्छा आणि (२) अनेकांची इच्छा अशी होती की अरबांनी त्यांच्या देशांतील परकीय हस्तक्षेप थांबवावा.

दुस-या महायुद्धाच्या समाप्तीपासून इस्रायल आणि अरब देशांमधील चार युद्धे, अमेरिका आणि त्याच्या नाटो सहयोगींचा सततचा हस्तक्षेप, इराण-इराक युद्ध, वैयक्तिक अरब देशांमधील संबंध बिघडणे,गृहयुद्ध आणि सांप्रदायिक हिंसाचार या सर्व गोष्टीमुळे पश्चिम आशिया हे संकट आणि संघर्षांचे धोकादायक केंद्र बनले होते. हा प्रदेश जगातील सर्वात रक्तरंजित आणि सर्वात तणावपूर्ण क्षेत्र बनला.

**इस्रायलची निर्मिती:**

अरब-इस्त्रायली संघर्षाचे स्त्रोत परस्परसंबंधित इतिहासात शोधले जाऊ शकतात. या संघर्षाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे १९४८ मध्ये इस्रायल राज्याची निर्मिती. अरब-इस्रायल समस्येचे मूळ सुमारे २००० वर्षापूर्वीच्या इतिहासात दडले आहे. इ.स. ७१ मध्ये रोमन लोकांनी ज्यूंना पॅलेस्टाईनमधून हाकलून दिले होते. त्यावेळेस पॅलेस्टाईन त्यांची मातृभूमी होती. ज्यूंचे छोटे गट पॅलेस्टाईनमध्ये राहिले आणि पुढील १७०० ते युरोपमध्ये अनेक देशात परागंदा झाले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस युरोपमधून पॅलेस्टाईनमध्ये परत येणा-या ज्यूंची संख्या हळूहळू वाढत गेली. पॅलेस्टाईनम वाढत चाललेल्या ज्यूंच्या संख्येमुळे पॅलेस्टाईनला आपली मातृभूमी मानणाऱ्या अरबांना धोका निर्माण झाला.

**पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे पुनरागमन:**

१८९७ मध्ये युरोपमध्ये राहणाऱ्या काही ज्यूंनी स्वित्झर्लंडमधील बासेल येथे जागतिक झिओनिस्ट संघटनेची स्थापना केली. झिओनिस्ट चळवळीतील लोकांचा असा विश्वास होता की ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये परत जाणे आणि त्यांची 'राष्ट्रीय मातृभूमी' परत मिळवणे न्याय्य व नियती संमत होते. रशिया, फ्रान्स आणि जर्मनीमध्ये ज्यूंचा छळ होत होता त्यामुळे स्वतंत्र ज्यू राज्य जगभरातील ज्यूंना सुरक्षित आश्रय देईल अस त्यांना वाटत होते. समस्या अशी होती की पॅलेस्टाईनमध्ये पुष्कळ वर्षापासून अरब देखील राहत होते. ते आपली जमीन गमावण्याच्या भीतीने घाबरले होते.

## १०.५ बाल्फोर घोषणा

पॅलेस्टाईनमध्ये ज्यू राज्याची निर्मिती ब्रिटिशांनीच केली होती. ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री आर्थर बाल्फोर यांनी १९१७ मध्ये जाहीर केले की ब्रिटनने पॅलेस्टाईनमध्ये ज्यू राष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा देईल. १९१९ नंतर जेव्हा पॅलेस्टाईन ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आले तेव्हा मोठ्या संख्येने ज्यू पॅलेस्टाईनमध्ये स्थायिक होऊ लागले. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंसाठी स्वतंत्र देश निर्माण करण्याच्या ब्रिटिश योजनेला अरबांनी कडवा विरोध केला. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्थलांतर थांबवण्याची मागणी केली. अशाप्रकारे झिओनिझमची उद्दिष्टे आणि पॅलेस्टाईनमधील अरब लोकांच्या राष्ट्रीय हितसंबंधांमधील संघर्ष हे अरब-इस्त्रायली संघर्षाचे मूळ कारण होते. ब्रिटीश सरकारने १९२२ मध्ये असे सांगितले की ज्यूंनी संपूर्ण पॅलेस्टाईनचा ताबा घ्यावा आणि पॅलेस्टिनी अरबांच्या हक्कांची पायमल्ली करावी असा त्यांचा कोणताही हेतू नाही. इंग्रजांनी ज्यू आणि अरबांना एकाच राज्यात शांततेने एकत्र राहण्यासाठी प्रोत्साहन देण्याची योजना आखली. तथापि या दोघांमधील सहसंबंध समजून घेण्यात ब्रिटिशांना अपयश आले.

**पॅलेस्टाईनच्या विभाजनाचा प्रस्ताव:**

१९३३ नंतर जर्मनीतील नाझींच्या छळानंतर पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढले. १९४० च्या सुमारास पॅलेस्टाईनची अर्धी लोकसंख्या ज्यू होती. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंच्या स्थलांतराला अरबांकडून विरोध वाढत असताना ब्रिटिश सरकारने नेमलेल्या पील कमिशनने पॅलेस्टाईनचे विभाजन करून एक अरब आणि एक ज्यू अशा दोन स्वतंत्र राज्यांचा प्रस्ताव मांडला. तथापि पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची उपस्थिती नको असलेल्या अरबांनी ही कल्पना नाकारली. ब्रिटीशांनी ज्यू स्थलांतर वर्षाला १०,००० पर्यंत मर्यादित केले होते. ज्यूंनी हा प्रस्ताव नाकारला. दुस-या महायुद्धामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली. हिटलरच्या युरोपातील हजारो ज्यू निर्वासित कुठेतरी आतुरतेने आसरा शोधत होते. १९४५ मध्ये अमेरिकेने १,००,००० ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये प्रवेश देण्यासाठी ब्रिटनवर दबाव आणला. ज्यू नेत्यांपैकी एक डेव्हिड बेन गुरियन यांनी या मागणीला पाठिंबा दिला. तथापि ब्रिटिशांनी अमेरिकेच्या दबावाला नकार दिला कारण त्यांना अरबांना नाराज करायचे नव्हते.

munotes.in

**अरब आणि ब्रिटिशांवर ज्यूंचे हल्ले:**

नाझींच्या हातून दु:ख भोगलेल्या ज्यूंनी त्यांच्या स्वतंत्र अशा देशासाठी साठी लढण्याचा निर्धार केला होता. त्यांनी अरब आणि ब्रिटिशांविरुद्ध दहशतवादी कारवाया सुरू केल्या. सर्वात उल्लेखनीय घटनांपैकी एक म्हणजे जेरुसलेममधील ब्रिटिश त्यांचे मुख्यालय किंग डेव्हिड हॉटेलला स्फोट घडवून आणणे. या दहशतवादी कृत्यात ९१ जणांचा मृत्यू झाला होता तर अनेक जण जखमी झाले होते. ब्रिटीशांनी ज्यू नेत्यांना अटक करून आणि पॅलेस्टाईनमध्ये प्रवेश करण्याच्या इराद्याने ज्यूंनी भरलेली एक्झोडस सारखी जहाजे मागे वळवले.

**स्वतंत्र ज्यू राज्याची घोषणा:**

दुसऱ्या महायुद्धाच्या तणावांमुळे कमकुवत झालेल्या ब्रिटिशांना पॅलेस्टाईनमधील अरब-ज्यू संघर्षावर तोडगा काढता आला नाही. परराष्ट्र सचिव अर्नेस्ट बेविन यांनी या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांपुढे ही समस्या मांडली. नोव्हेंबर १९४७ मध्ये संयुक्त राष्ट्राने पॅलेस्टाईनचे विभाजन करण्यासाठी मतदान केले आणि स्वतंत्र ज्यू राज्य स्थापन करण्यासाठी सहमती दर्शवली. १९४८ च्या सुरुवातीला ब्रिटीशांनी पॅलेस्टाईनमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आणि संयुक्त राष्ट्रसंघाला स्वतःची योजना राबवू दिली. ज्यू आणि अरबांमध्ये आधीच लढाई सुरू असली तरी ब्रिटिशांनी पॅलेस्टाईनमधून आपले सर्व सैन्य मागे घेतले. मे १९४८ मध्ये बेन गुरियनने इस्रायलच्या नवीन राज्याच्या स्वातंत्र्याची घोषणा केली.

## १०.६ अरब-इस्रायल युद्ध (१९४८)

जेव्हा अरब राष्ट्रांच्या बलशाली युतीने नव्याने जन्मलेल्या इस्रायल राज्यावर युद्ध घोषित केले तेव्हा बहुतेक लोकांना अरबांचा सहज विजय होईल अशी अपेक्षा होती. तथापि प्रचंड प्रतिकूल परिस्थिती असूनही इस्रायलींनी त्यांचा पराभव केला आणि संयुक्त राष्ट्रांच्या विभाजनाने त्यांना दिलेल्या पॅलेस्टिनी भूमीपेक्षा जास्त जमीन ताब्यात घेतली. त्यांनी पॅलेस्टाईनचा सुमारे तीन चतुर्थांश भाग आणि लाल समुद्रावरील इलातचे इजिप्शियन बंदर मिळवले. इस्रायली प्राणपणाने लढल्याने जिंकले. अरब राष्ट्रांच्या ऐक्याच्या अभावामुळे आणि त्यांच्या आपापसांतील विभाजनामुळे ते युद्ध हरले. जॉर्डनचा राजा अब्दुल्ला याला जॉर्डन नदीच्या पश्चिमेकडील पॅलेस्टाईनचा भाग पॅलेस्टिनी अरबांना देण्यापेक्षा जॉर्डन नदीच्या पश्चिमेला जोडण्यात अधिक रस होता. युद्धाचा सर्वात दुःखद परिणाम म्हणजे निर्दोष पॅलेस्टिनी अरब युद्धाचे बळी ठरले त्यांची मातृभूमी विभागली गेली. काही अरब इस्रायलच्या नवीन ज्यू राज्यात होते, तर काही राजा अब्दुल्लाने ताब्यात घेतलेल्या भागात राहत होते. जवळपास एक दशलक्ष अरब इजिप्त,लेबनॉन,जॉर्डन आणि सीरियामध्ये पळून गेले जेथे त्यांना दयनीय परिस्थितीत निर्वासित छावण्यांमध्ये राहावे लागले. जेरुसलेमची विभागणी इस्रायल आणि जॉर्डनमध्ये झाली. युनायटेड स्टेट्स,ब्रिटन आणि फ्रान्सने इस्रायलच्या सीमारेषेच्या सुरक्षिततेची हमी दिली, परंतु अरब राष्ट्रांनी युद्धविराम कायमस्वरूपी मानला नाही. त्यांनी इस्रायलची कायदेशीरता आणि स्वातंत्र्य ओळखण्यास

नकार दिला आणि त्यांनी या युद्धाला इस्त्रायलचा नाश आणि पॅलेस्टाईन मुक्त करण्याच्या संघर्षातील फक्त पहिली फेरी मानली.

## १०.७ सारांश

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस अरब राष्ट्रवादाच्या उदयाचे प्रकटीकरण होत होते. व्हर्सायिच्या तहानंतर आणि पूर्वीच्या ओटोमनच्या प्रदेशांतील स्वतंत्र अरब देश व इज्रराइल उदयाला आल्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून पश्चिम आशिया हे संकट आणि संघर्षांचे धोकादायक केंद्र बनले. अरब-इस्त्रायली संघर्षाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे १९४८ मध्ये इस्त्रायल राज्याची निर्मिती. १९४८ च्या सुरुवातीला ब्रिटीशांनी पॅलेस्टाईनमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आणि संयुक्त राष्ट्रसंघाला स्वतःची योजना राबवू दिली. ज्यू आणि अरबांमध्ये आधीच लढाई सुरू असली तरी ब्रिटिशांनी पॅलेस्टाईनमधून आपले सर्व सैन्य मागे घेतले. मे १९४८ मध्ये बेन गुरियनने इस्त्रायलच्या नवीन राज्याच्या स्वातंत्र्याची घोषणा केली.

## १०.८ प्रश्न

१. अरब राष्ट्रवादाच्या वाढीचा मागोवा घ्या.

२. १९४८ ते १९७३ पर्यंतच्या अरब-इस्त्रायली युद्धांचा मागोवा घ्या.

३. इजिप्त आणि इस्त्रायलमधील शांतता प्रक्रियेचे परीक्षण करा.

४. इस्त्रायली आणि पॅलेस्टिनी यांच्यात शांततेसाठी केल्या गेलेल्या विविध प्रयत्नांची चर्चा करा.

## १०.९ संदर्भ


- स्टोरी रिचर्ड, जपान आणि द डिक्लाइन ऑफ द वेस्ट इन एशिया १८९४-१९४३, सेंट मार्टिन प्रेस, न्यू यॉर्क सिटी, १९७९
- हेझेन चार्ल्स, १७८९ पासून आधुनिक युरोप,एस. चांद,१९९२
- कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९
- कॅरी अल्ब्रेक्ट, डीपलोमाटीक हिष्ट्री ऑफ युरोप सिन्स कॉंग्रेस ऑफ विएन्ना, हार्पर पब्लिकेशन, न्यूयॉर्क, १९५८


*****

munotes.in

# ११

# नाझीवाद, फॅसिझम आणि लष्करवाद

**घटक रचना**

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ नाझीवादाच्या उदयाची कारणे
११.३ हिटलरच्या नाझी राजवटीचे परराष्ट्र धोरण
११.४ इटलीमध्ये फॅसिझमचा उदय
११.५ फॅसिस्ट नियम अंतर्गत परराष्ट्र धोरण
११.६ जपानमध्ये लष्करवादाच्या वाढीसाठी जबाबदार घटक
११. ७ सारांश
११.८ प्रश्न
११.९ संदर्भ

## ११.० उद्दिष्ट्ये

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबी समजण्यात सक्षम होतील

- इटलीमध्ये फॅसिझमच्या उदयाला कारणीभूत घटक
- मुसोलिनीच्या देशांतर्गत धोरण
- जर्मनीमध्ये नाझीवादाच्या उदयाची कारणे
- हिटलरचे देशांतर्गत धोरण
- हिटलरचे परराष्ट्र धोरण
- जपानमध्ये लष्करवादाचा उदय

## ११.१ प्रस्तावना

पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटन आणि फ्रान्स वगळता युरोपमधील लोकशाही सरकारे व्यवस्थित काम करू शकले नाही. युद्धाने या देशांना उद्ध्वस्त केले होते. युरोपियन लोकशाही बहुसंख्य व्यक्तींच्या इच्छेवर आधारित होती. यामुळे लोकशाही सरकारे कमजोर झाली. ते युद्धानंतर आर्थिक समस्या सोडवू शकले नाहीत आणि मजबूत आणि स्थिर सरकार देऊ शकले नाहीत. अशा प्रकारे युद्धानंतरच्या युरोपने विविध देशांमध्ये हुकूमशाहीचा उदय पाहिला. नाझीवाद ही एक राजकीय चळवळ होती जी जर्मनीमध्ये

munotes.in

१९२०च्या दशकात विकसित झाली. हुकूमशहा ॲडॉल्फ हिटलरच्या नेतृत्वाखाली नाझींनी जर्मनीवर १९३३ ते १९४५ पर्यंत नियंत्रण ठेवले.

## ११.२ नाझीवादाच्या उदयाची कारणे

**व्हर्सायचा करार:**

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव आणि नंतर झालेल्या अपमानामुळे जर्मन लोक सुडाने पेटले होते. व्हर्सायच्या करारामुळे जर्मन लोकांच्या मनावर खोल जखम झाली. त्यांच्यासाठी कोणतीही निवड करण्याचा अधिकार दिलेला नव्हता. त्यांच्या प्रतिनिधींना कराराच्या मसुद्यात भाग घेण्याची परवानगी देखील नव्हती. परंतु त्यावर स्वाक्षरी करण्यास मात्र त्यांना भाग पाडण्यात आले. युद्ध अपराधाचा संपूर्ण भार जर्मनीवर टाकला गेला आणि त्यांना आक्रमक म्हणून ओळखले गेले.

**युद्ध नुकसानभरपाई:**

कराराद्वारे जर्मनीला तिच्याकडे असलेल्या सर्व गोष्टी गमवाव्या लागल्या आणि मोठ्या प्रमाणावर युद्ध भरपाई देण्यास सहमती द्यावी लागली. कोळशाच्या खाणी पंधरा वर्षांसाठी फ्रान्सला देण्यात आल्या. जर्मनीने तिच्या शेतजमिनीचा १/६ भाग, कोळशाचा २/५,लोहाचा २/३ आणि जस्त या खनिजाचा ७/१० भाग दोस्त राष्ट्रांना द्यावा लागला. युद्ध नुकसानभरपाई ३३ अब्ज डॉलर म्हणून निश्चित करण्यात आली. मित्र राष्ट्रांना जर्मनी एवढी मोठी रक्कम इतर राष्ट्रांकडून कर्ज घेतले तरी देऊ शकणार नाही याची जाणीव होती. जर्मनी सर्व मागण्या पूर्ण करण्याच्या स्थितीत नसल्यामुळे केवळ हा करार रद्द करण्याच्या संधीची वाट पाहत होते.

**अनेक भूप्रदेश गमवावे लागले:**

जर्मनीला अनेक भूप्रदेश सोडावे लागले. त्यांनी अल्सास आणि लोरेन फ्रान्सला, माल्मेडी बेल्जियमला,  अप्पर सिलेशिया चेकोस्लोव्हाकियाला दिला तर डॅन्झिगला एक मुक्त शहर बनवले. तिच्या सर्व वसाहती काढून घेण्यात आल्या आणि चीनमधील जर्मन वसाहती जपानला देण्यात आल्या.

**असमर्थ वायमार प्रजासत्ताक:**

जर्मन नागरिक मित्र राष्ट्रांनी तिच्यासाठी उभारलेल्या वायमार प्रजासत्ताक स्वीकारण्यास तयार नव्हते. सरकार महागाई, वाढत्या किंमती आणि बेरोजगारी या समस्यांना तोंड देऊ शकले नाही. अन्नाची भीषण टंचाई होती. १९२९च्या मंदीनंतर जर्मन लोकांचा लोकशाही सरकारवरील विश्वास उडाला आणि त्यांना त्यांच्या समस्यांमधून बाहेर काढण्यासाठी कोणीतरी समर्थ व्यक्तीच्या ते शोधातच होते.

**बिकट आर्थिक परिस्थिती:**

जर्मनीतील आर्थिक समस्या अनियंत्रित झाल्या होत्या. महागाई खूप जास्त होती आणि जर्मन मार्कने त्याचे सर्व मूल्य गमावले होते. १९२३मध्ये फ्रान्सने हुर खोऱ्यावर कब्जा केला



munotes.in

कारण जर्मनीला नुकसानभरपाई देण्यात अपयश आले होते. जर्मन चलन मार्कचे मूल्य एका डॉलरसाठी ४०,००० पर्यंत घसरले.

**सशस्त्र दल आणि शस्त्रास्त्रांवर मर्यादा:**

जर्मनीला पूर्णपणे नामोहरण करण्याच्या उद्देशाने मित्र राष्ट्रांनी जर्मनीची सशस्त्र सेना मर्यादित केली होती. तिला हवाई दलाची अजिबात परवानगी नव्हती. तिचे सैन्य १,००,००० आणि नौदल १५,००० पुपर्यंत कमी करण्यात आले. युद्ध साहित्य तयार करणारे कारखाने नष्ट करावे लागले. बलाढय सैन्याचे निर्मुलन झाले. जर्मनीने या सर्व अटींचे पालन केले,परंतु तिच्या आसपास इतर देशांनी युद्ध सामग्रीचे उत्पादन सुरु ठेवले. यामुळे जर्मनी अस्वस्थ होणे हे स्वाभाविक होते. शस्त्रास्त्रांची शर्यत रोखण्यात राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) अपयशी ठरला. वॉशिंग्टन येथे आयोजित निशस्त्रीकरण परिषद यशस्वी झाली नाही. म्हणून जर्मनीने गुपचूप शस्त्रे आणि छोट्या युद्धनौका तयार करण्यास सुरुवात केली. १९३५ मध्ये ब्रिटनने जर्मनीला तिच्या नौदलाची ताकद वाढवण्याची परवानगी दिली. युद्धानंतर मित्र राष्ट्रांनी स्वत: निश:स्त्रीकरण करण्याचे धोरण पाळले नाहीत यामुळे हिटलरला व्हर्सायचा करार नाकारण्याचे निमित्त मिळाले.

**तुष्टीकरण धोरण:**

हिटलरच्या आक्रमक राष्ट्रवादाला जन्म देणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक म्हणजे ब्रिटन आणि फ्रान्सकडून जर्मनीचे तुष्टीकरणाचे धोरण. हिटलर व्हर्सायचा तह हळूहळू नाकारत असताना या देशांना त्याला रोखण्याचे धैर्य नव्हते. त्यांच्या बाजूने संयुक्त सशस्त्र हस्तक्षेप पुरेसा उपयोगी ठरला असता पण त्यांनी शांत राहणे पसंत केले. हिटलरच्या आक्रमक बाबी म्हणजे ऑस्ट्रिया,सुडेटेनलँड आणि चेकोस्लोव्हाकियावर आक्रमण आणि विलिनकरण याबाबत इतर देश कठोर भूमिका घेवू शकले नाहीत.

**साम्यवादाची विचारांचा वाढता प्रसार :**

जर्मन देशात साम्यवादी विचारांच्या वाढीबाबत इंग्लंड व फ्रांस चिंताग्रस्त होते. जर्मनीत उद्योगपतीही चिंताग्रस्त होते. जर्मन संसदमध्ये साम्यवाद्यांची संख्या वाढली होती. हिटलरचे कम्युनिस्टविरोधी दृढ विचार होते आणि त्याने जर्मनीला 'जागतिक समाजवादी क्रांतीविरूद्ध प्रबळ शक्ती' बनवण्याचे ठरवले. जर्मन उद्योगपती आणि व्यावसायिकांनी त्याला आर्थिक पाठिंबा दिला. त्याबदल्यात नाझी सैन्याने कामगार संघटना इत्यादी नष्ट करण्यास मदत केली.

## ११.३ हिटलरच्या नाझी राजवटीचे परराष्ट्र धोरण

**नाझीवादाच्या वाढीमध्ये हिटलरच्या व्यक्तिमत्वाची भूमिका:**

ॲडॉल्फ हिटलरचा जन्म २० एप्रिल १८८९ रोजी ऑस्ट्रियामध्ये झाला. ज्यूंनी वित्तीय संस्थांवर नियंत्रण ठेवल्याने व ते आर्थिक सुस्थितीत असल्याने हिटलरने त्यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण केला. तो १९१२ मध्ये म्युनिक (जर्मनी) येथे गेला आणि जेव्हा १९१४ मध्ये प्रथम महायुद्ध सुरू झाले तेव्हा तो सैन्यात भरती झाला. तो युद्धात जखमी झाला

आणि त्याच्या शौर्यासाठी त्याला आयर्न क्रॉस देण्यात आला. जर्मनीचा पराभव आणि वर्साय तहामुळे त्याला खूप मानसिक त्रास झाला. आर्थिक मंदीमुळे तो बेरोजगार राहिला. याच वेळी त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. १९१९ मध्ये त्यांनी जर्मन कामगार पक्षाची स्थापना केली. तो त्याच्याभोवती हरमन गोअरिंग आणि जोसेफ गोएबल्स सारखे प्रचारक गोळा करू लागला जे त्याचे प्रबळ समर्थक बनले.

हिटलर एक प्रभावी वक्ता होता आणि त्याने लोकांवर छाप पडण्यासाठी लोकांच्या मानसिक स्थितीचा वापर केला. आपल्या भाषणांमधून त्यांनी लोकांच्या तीव्र असंतोषावर कटाक्ष केला. त्यांनी हजारो बेरोजगारांना अन्न, रोजगार,महागाईशी लढण्यासाठी वचन दिले. यहूदीविरुद्ध प्रचार, जर्मनीवरील परदेशी जुलूम आणि व्हर्सायच्या कठोर कराराविरोधातील त्यांची भाषणे यामुळे नाझी पक्षाला लाखो मते मिळाली व लोकांचे समर्थन मिळाले.

**माईन कॅम्फ (माझा लढा): नाझीवादाचा प्रसार:**

तुरुंगात असताना त्याने **माईन कॅम्फ** नावाच्या पुस्तकात त्याच्या आठवणी व विचार लिहिले. या पुस्तकात अनेक मुद्यांवर त्याचे खोलवर रुजलेले पूर्वग्रह होते आणि त्यात राष्ट्रीय समाजवादी पक्षाच्या कार्यक्रमाची रूपरेषा होती. (१) जर्मन साम्राज्य वाढवण्याच्या त्याच्या योजना (२) व्हर्सायचा करार संपुष्टात आणण्याच्या योजना,(३) शस्त्रास्त्रांवर समानता. (४) वसाहती पुन्हा मिळवणे (५) ज्यूविरोधी धोरण (६) आर्य वंशाचे श्रेष्ठत्व (७) जमीन सुधारणा (८) कामगारांसाठी चांगली परिस्थिती

तुरुंगातून हिटलरला एका वर्षात मुक्त करण्यात आले आणि तो आपल्या पक्षाला पुनरुज्जीवित करण्यासाठी कार्य करू लागला. त्याच्या राष्ट्रीय समाजवादी पक्षाचे नाझी पक्षात रूपांतर झाले. पक्षाने तपकिरी शर्टचा गणवेश आणि स्वस्तिक हे त्याचे प्रतीक म्हणून स्वीकारले. हिटलरला फुहरर म्हणजे नेता म्हटले जात असे. १९१९ मध्ये ७ सदस्यांपासून, १९२५ मध्ये २७,११७ आणि १९२९ मध्ये १,७६,४२६ पर्यंत पक्षाची ताकद वाढत राहिली. १९२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नाझी पक्षाने ३२ आणि १९३२ मध्ये २३० जागा मिळवल्या. जानेवारी १९३३ मध्ये, नाझी पक्षाला संसदेत स्पष्ट बहुमत नसतानाही राष्ट्राध्यक्ष हिंडनबर्गने हिटलरला जर्मनीचा चान्सलर म्हणून काम करण्यास आमंत्रित केले. हिटलरने सर्व शक्तींना चिरडून टाकण्यासाठी आपल्या शक्तींचा वापर केला. १ एप्रिल रोजी, जर्मन संसदेने हिटलर सरकारला चार वर्षांच्या कालावधीसाठी आपले अधिकार देण्यासाठी मतदान केले. अशाप्रकारे लोकशाही जर्मन प्रजासत्ताक औपचारिकरीत्या संपुष्टात आले. या नवीन सरकारचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात आणि लोकप्रिय समर्थनासह केले. देशभक्तीच्या भावना भडकवण्यासाठी प्रेस, रेडिओ आणि सिनेमाचा वापर केला गेला. ज्यू आणि साम्यवाद्यांच्या विरोधात मोहिमा आयोजित करण्यासाठी हिटलरने त्याला दिलेल्या सर्वोच्च शक्तीचा वापर केला.

'नवीन जर्मनी' या लोकप्रिय घोषणेचा उद्घोष करून हिटलर आणि त्याच्या नाझी पक्षाने सर्व संभाव्य विरोधापासून मुक्त होण्याचा चंग बांधला. इतर सर्व पक्ष दडपले गेले आणि हिटलरने

जाहीर केले की जर्मनीमध्ये फक्त एकच राजकीय पक्ष असेल आणि तो म्हणजे नाझी पक्ष. १९३४ मध्ये राष्ट्राध्यक्ष हिंडनबर्ग यांचे निधन झाले आणि हिटलरला रान मोकळे मिळाले. शेवटी लोकप्रिय इच्छाशक्तीने ॲडॉल्फ हिटलर जर्मनीचा एकमेव आणि सर्वोच्च शासक बनला.

**परराष्ट्र धोरणाद्वारे नाझीवादाचे प्रकटीकरण:**

थोडक्यात हिटलरच्या परराष्ट्र धोरणाचे तीन ध्येय होते: (१) जर्मनीमध्ये स्वयंनिर्णयाच्या अधिकाराने जर्मन वंशातील सर्व लोकांचे संघटन. (२) व्हर्सायचा करार रद्द करणे (३) अतिरिक्त लोकसंख्येच्या समर्थनासाठी अधिक प्रदेश ताब्यात घेणे.

हिटलरने राष्ट्रसंघ उर्फ लीग ऑफ नेशन्सचे सभासदत्व  सोडले आणि उघडपणे सैन्य वाढवण्यास सुरुवात केली. पाठवले. व्हर्सायच्या कराराचे उल्लंघन केल्याबद्दल ब्रिटन जर्मनीविरुद्ध कारवाई करण्यास तयार नव्हता. ब्रिटनच्या सहकार्याशिवाय फ्रान्सने जर्मनीविरुद्ध कारवाई करण्याचे धाडस केले नाही. तुष्टीकरणाच्या या धोरणाने फक्त हिटलरला आणखी विस्तारवादी घोरण स्वीकारण्यास प्रोत्साहित केले.

**ऑस्ट्रियावर कब्जा:**

स्पॅनिश गृहयुद्धाच्या वेळी मित्र राष्ट्रांच्या कमकुवतपणाबद्दल हिटलरला आवश्यक ते धडे मिळाले होते. त्याला असे आढळून आले की स्पॅनिश समस्येमध्ये त्याचा हस्तक्षेपात कोणत्याही शक्तींच्या कोणत्याही प्रतिकाराला सामोरे जावे लागले नाही. त्यामुळे त्याला उघड आक्रमकतेचे धोरण स्वीकारण्याचे धैर्य मिळाले. त्याने आपले लक्ष ऑस्ट्रियाकडे वळवले. त्याने ऑस्ट्रियाच्या चॅन्सेलरला आपल्या मंत्रिमंडळात नाझी मंत्री नियुक्त करण्यासाठी धमकावले. १९३४ मध्ये जेव्हा नाझी समर्थकांनी बंड सुरू केले आणि चान्सलर डॉ. डॉल्फसची हत्या झाली. ऑस्ट्रियाचे सरकार काही करू शकले नाही त्यामुळे हिटलरने जर्मन सैन्याला त्या देशात पाठवले आणि ऑस्ट्रियावर कब्जा मिळवला. ऑस्ट्रिया जर्मनीचा भाग बनले.

**सुडेटेनलँडवर कब्जा:**

ऑस्ट्रिया नंतर हिटलरने आपले लक्ष सुडेटेनलँडकडे वळवले जेथे मोठ्या संख्येने जर्मन राहत होते. त्याने झेक सरकारवर जर्मन अल्पसंख्याकांवर अत्याचार केल्याचा आरोप केला. झेक सरकारने हे नाकारले आणि स्पष्ट केले  की त्यांनी जर्मन लोकांना सर्व विशेषाधिकार दिले आहेत. हिटलरने हे स्पष्टीकरण स्वीकारण्यास नकार दिला आणि मागणी केली की सुडेटेनलँडला जर्मनीला दिले जावे अथवा शांततापूर्ण मार्ग अयशस्वी झाल्यास तो जबरदस्तीने घेईल. या क्षणी ब्रिटन आणि फ्रान्स यांना जर्मनीची राजकीय महत्वाकांशा समजून  चुकली. हिटलरची वाढती महत्वाकांक्षा रोखण्यासाठी त्याचा अनुनय करण्याचे धोरण स्वीकारले. फ्रान्स, ब्रिटन आणि इटलीच्या नेत्यांनी ८ सप्टेंबर १९३८ रोजी जर्मनीबरोबर म्युनिक करारावर स्वाक्षरी केली. तुष्टीकरणाच्या या धोरणाने फ्रान्स आणि ब्रिटनची कमजोरी उघड केली. ते आणखी एका महायुद्धासाठी तयार नव्हते.

**रशियासोबत अनाक्रमण करार:**

हिटलरने २३ ऑगस्ट १९३९ रोजी रशियाबरोबर बरोबर अनाक्रमण करार केला आणि रशियाची तटस्थता मिळवून आपली बाजू सुरक्षित केली. म्युनिक करारात दुर्लक्ष केल्यामुळे स्टालिन ब्रिटन आणि फ्रान्सवर संतापला होता. रशियावर हल्ला करण्यासाठी जर्मनीला प्रोत्साहन दिल्याचा आरोप त्याने पश्चिम लोकशाही देशांवर केला.

**पोलंडवर हल्ला:**

हिटलर पोलंडकडे आपले लक्ष वळवेल हे जाणून ब्रिटन आणि फ्रान्सने त्या देशाला संरक्षणाची हमी दिली. हिटलरने पोलंडवर डॅन्झिग शहर परत करण्यासाठी दबाव आणला. हिटलर आणि त्याच्या युद्ध-उन्मादाच्या डावपेचांमुळे संपूर्ण जग हादरले. ब्रिटन आणि फ्रान्सचा पाठिंबा असल्याने पोलंडने हिटलरच्या मागण्यांना नकार दिला. त्यानंतर हिटलरने १ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडवर हल्ला केला. ब्रिटन आणि फ्रान्सने त्यांच्या संरक्षणाचे वचन पाळले व जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली आणि अशा प्रकारे जग दुसऱ्या युद्धात ओढले गेले.

**फॅसिझम:**

## ११.४ इटलीमध्ये फॅसिझमचा उदय

राष्ट्रीय अभिमान आणि प्रतिष्ठेची भावना युरोपियन अतिशयोक्त राष्ट्रवादाला चालना देणारा आणखी एक घटक होता. अधिक कर भरून परदेशातील साम्राज्ये सांभाळण्याचा भार लोक आनंदाने सहन करू लागले. फॅसिस्ट इटली आणि नाझी जर्मनीने राष्ट्रीय गौरव वाढवण्यासाठी विस्तारवादी धोरणाचे पालन केले. तेथे लोकशाही फार काळ टिकू शकली नाही आणि इटलीमध्ये बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली फॅसिझम उदयास आल्यानंतर लोकशाहीला धक्का बसला.

**राजकीय कारणे:**

दोस्त राष्ट्रांचा सदस्य असूनही युद्धाच्या पहिल्या वर्षी इटली तटस्थ राहिला होता. मात्र त्यानंतर इटलीने बा जर्मनी आणि ऑस्ट्रिया-हंगेरीशी लढा दिला. पण तिला तिच्या कृत्याचा पश्चाताप झाला. युद्धात इटली देशाला पराभव आणि त्रास सहन करावा लागला. पण त्याने युद्धातून माघार घेतली नाही कारण त्यांना आशा होती की युद्ध संपल्यानंतर इटलीला आणखी नवीन भूप्रदेश मिळेल. पॅरिस शांतता परिषदेत वचन दिल्याप्रमाणे काही भूभाग त्यांना सोपवण्यात आले. पण इटलीने आफ्रिकेतील जर्मन वसाहती आणि एड्रियाटिक समुद्रावरील फ्ल्यूम बंदराची मागणी केली. त्यांच्या अतिरिक्त मागण्या फेटाळण्यात आल्या. पॅरिस शांतता परिषदेत इटलीला दिलेली वागणूक पाहून सर्वसाधारणपणे निराशा पसरली. युद्धादरम्यान इटलीला प्रयत्नांची आणि बलिदानाची पुरेशी भरपाई मिळाली नाही असे अनेकांना वाटले.

munotes.in

**आर्थिक समस्या:**

युद्धानंतरची इटलीतील परिस्थिती अधिकाधिक वाईट बनली होती. आधीच दोलायमान अशा आर्थिक परिस्थितीवर युद्धामुळे आणखी प्रतिकुल परिणाम झाला. उद्योग आणि व्यापार कोसळले. शेती ठप्प होती आणि शहरांमध्ये बेरोजगारी वाढत होती. तिच्या चलनाचे मूल्य इतके घसरले होते की लोक जीवनावश्यक वस्तू विकत घेऊ शकत नव्हते. युद्धामुळे सार्वजनिक कर्ज वाढले होते आणि युद्धानंतरच्या अंदाजपत्रकामध्ये आणखी मोठी तूट दिसून आली. उत्तरेकडील काही औद्योगिक प्रदेशांमध्ये कामगारांचे संप झाले.

**लोकशाही सरकारचे अपयश:**

वाढत्या आर्थिक संकटांमुळे दुःखामुळे लोकांचा लोकशाही सरकारवरील विश्वास उडाला. राजकीय अस्थिरता हे एक सामान्य वैशिष्ट्य होते. १९१९ ते १९२२ दरम्यान सहा सरकारे बदलली. राजकारणी भ्रष्ट होते आणि प्रशासन अकार्यक्षम झाले होते.

**बेनिटो मुसोलिनी: फॅसिझमचा प्रचारक:**

मुसोलिनीने शिक्षक म्हणून काही दिवस काम केले. त्यानंतर तो समाजवादी बनला. त्यांच्या क्रांतिकारी कारवायांमुळे त्याला देश सोडण्यास सांगण्यात आले. आवश्यक सैन्य प्रशिक्षणासाठी तो इटलीला परतला पण लवकरच क्रांतिकारी कारवायांसाठी त्याला अटक करण्यात आली. नंतर तो इटालियन सोशलिस्ट पार्टीच्या अवंती या वृत्तपत्राचा संपादक झाला. मुसोलिनीचा समाजवादी पक्षाशी संबंध तोडण्याची सुरुवात युद्धातील सहभागाच्या प्रश्नावरून झाली. मुसोलिनी सामील होण्याच्या बाजूने असताना बहुसंख्य समाजवादी लोकांनी विरोध केला. तो इटालियन सैन्यात सामील झाला आणि युद्धभूमीवर लढला. तो जखमी झाल्यामुळे त्याची लष्करी कारकीर्द संपुष्टात आली. आर्थिक अशांतता आणि हिंसाचारावर नियंत्रण ठेवू न शकल्यामुळे त्याने समाजवादी पक्षावर तसेच विद्यमान सरकारवर हल्ला करण्यासाठी या परिस्थितीचा वापर केला. नवीन चळवळीसाठी त्यांना मोठ्या संख्येने माजी सैनिक, भांडवलदार आणि तरुण विचारवंतांचा पाठिंबा मिळवला. या चळवळीला त्याने फॅसिझम नाव दिले.

**फॅसिस्ट पक्ष:**

१९२१-१९२२ दरम्यान फॅसिस्ट पक्षाचा झपाट्याने उदय झाला आणि विरोधी गट कमकुवत झाले. मुसोलिनीने कम्युनिस्टांशी जोरदार मुकाबला केला. माजी सैनिक,शेतकरी आणि कामगारांची मने जिंकली. हे सर्व लोक सरकार आणि साम्यवाद्यांच्या कारखाने ताब्यात घेतल्याने वैतागले होते. फॅसिस्ट पक्षाची दोन उद्दिष्टे होती. पहिला म्हणजे सरकारचा पूर्ण अधिकार बहाल करणे. दुसरे म्हणजे इटालियन राष्ट्रवादाला प्रोत्साहन देणे. २७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधानांनी राजीनामा दिला आणि फॅसिस्ट सैन्य नेपल्समधून रोमला गेले. अधिकृत सैन्याने त्यांना रोखले नाही आणि राजा व्हिक्टर इमॅन्युएल याच्याकडे मुसोलिनीला सत्ता देण्याशिवाय आणि त्याला सरकार स्थापन करण्यास सांगण्याशिवाय पर्याय नव्हता.

munotes.in

**फॅसिझम: निरंकुश सत्ता:**

मुसोलिनीने हे जाणून होता की त्याचे विरोधक सरकार पाडण्याची वाट पाहत आहेत. त्यामुळे देशातील अराजकता आणि हिंसाचार संपवण्यासाठी त्याने एक वर्षासाठी हुकूमशाही अधिकारांची मागणी केली. त्यानंतर त्यांनी देशभरात फॅसिस्ट संघटनेचा विस्तार आणि बळकटीकरण केले. (१) मुसोलिनीकडे सत्ता असल्याने त्याने आपल्या निष्ठावंत समर्थकांना प्रशासनातील महत्त्वाच्या पदांवर नियुक्त करण्यास सुरुवात केली. (२) त्यानंतर त्यांनी विधिमंडळावर आपले सर्वोच्च नियंत्रण प्रस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित केले. त्याच्या पक्षाला १९२४ च्या निवडणुकीत कनिष्ठ खालच्या सभागृहात) २/३ जागा मिळाल्या,फॅसिस्टांना बहुमत मिळाले. त्याच सुमारास विरोधी पक्षांना धमक्या देण्यात आल्या,त्यांच्या काही नेत्यांचे अपहरण किंवा हत्या करण्यात आली. १९२८ पर्यंत क्वचितच उल्लेख करण्यासारखा कोणताही विरोधक राहिला नव्हता. देशावर आपला ताबा राखण्यासाठी त्याने इतर पावले उचलली. (३) शहरे आणि शहरांच्या नगरपालिकांनी त्यांची स्थानिक स्वायत्तता गमावली. (४) मुद्रण स्वातंत्र्यावर बंदी घालण्यात आले. (५) मुसोलिनी सर्व सशस्त्र दलांचा सर्वोच्च कमांडर बनला. (६) त्याने अनिर्बंध पद्धतीने देशावर राज्य केले. त्याचे सर्व सल्लागार सदस्य फॅसिस्ट पक्षाचे सदस्य होते. त्यांनी मंत्रिपदावर कब्जा केला,कायदे तयार केले आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर चर्चा केली. (७) सर्व शैक्षणिक संस्थांवर राज्याचे नियंत्रण होते. शिक्षण संस्थांवर फॅसिस्ट शिक्षक आणि प्राध्यापकांचे वर्चस्व होते. (८) एक गुप्त पोलिस दल तयार करण्यात आले आणि फाशीची शिक्षा पुन्हा सुरू करण्यात आली. अशा प्रकारे सर्व बाबतीत इटली हे अनिर्बंध असे हुकुमशाही राज्य बनले.

फॅसिस्ट पक्षाची यंत्रणा आणि इटालियन राज्याची यंत्रणा एकमेकांशी जवळून जोडलेली होती आणि दोघांची सर्वोच्च हाताळणी मुसोलिनी होती. तो संपूर्ण देशाचा प्रमुख होते. तो राज्याचे पंतप्रधान होता. अधिकारी नियुक्त करणे,राजाला सल्ला देणे,कायदे तयार करणे आणि इतर सर्व कामे तोच करीत असे.

## ११.५ फॅसिस्ट राजवटीअंतर्गत परराष्ट्र धोरण

**फॅसिस्ट राजवटीअंतर्गत परराष्ट्र धोरण:**

फॅसिस्टांनी लोकसंख्या वाढीस प्रोत्साहन दिले. लोकसंख्या वाढवण्याचा हेतू इटलीला एक मजबूत देश बनवणे हा होता. सहा वर्षांवरील सर्व मुलांना लष्करी प्रशिक्षण देण्यात आले. लष्कर आणि नौदलाचा विस्तार करण्यात आला. मुसोलिनीने घोषित केले की लवकरच इटली एक जागतिक शक्ती बनेल आणि भूमध्य समुद्रही त्यांच्या ताब्यात येईल. सतत वाढत जाणाऱ्या लोकसंख्येने समस्या निर्माण केल्या. अन्न उत्पादन कमी होते. नवीन वसाहती स्थापन करण्याशिवाय इटलीला दुसरा पर्याय उरला नव्हता. मुसोलिनीने जोरदार राजकीय विस्ताराचे धोरण स्वीकारले.

**अबिसिनिया (इथिओपिया) वर विजय:**

मुसोलिनीच्या यशांपैकी सर्वात नेत्रदीपक म्हणजे इथिओपियाचा विजय होता. १८९६ मध्ये इटलीच्या पराभवाचा अपमान पुसून टाकायचा होता. १९३५ मध्ये मुसोलिनीने अबिसिनिया (इथिओपिया) वर हल्ला केला. किंग हैले सेलासीने राष्ट्रसंघाला आवाहन केले. राष्ट्रसंघाने लगेच इटलीला आक्रमक घोषित केले. तथापि मुसोलिनीवर राष्ट्रसंघाच्या घोषणेचा काहीही परिणाम झाला नाही. त्याने अबिसिनिया जिंकला आणि १९३६ मध्ये राजा व्हिक्टर इमॅन्युएल तिसरा इथिओपियाचा सम्राट म्हणून घोषित केला गेला.

**फ्रँकोच्या लष्करी राजवटीला समर्थन:**

१९३६ मध्ये जेव्हा स्पॅनिश गृहयुद्ध सुरू झाले तेव्हा मुसोलिनीने याकडे साम्यवाद आणि फॅसिझममधील संघर्ष म्हणून पाहिले. त्याने जनरल फ्रँकोला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आणि इटालियन सैन्य स्पेनला पाठवले. जनरल फ्रँकोचे समर्थन करण्यासाठी त्याच्याकडे काही इतर कारणे देखील होती. त्याला समजले की मैत्रीपूर्ण स्पेन भूमध्य प्रदेशावर फ्रेंच आणि ब्रिटिश प्रभाव रोखण्यासाठी खूप मदत करेल. मग इटलीसाठी त्या प्रदेशावर नियंत्रण ठेवणे खूप सोपे होईल.

**रोम-बर्लिन-टोकियो अक्ष:**

या युद्धानंतर इटली जर्मनीच्या जवळ आला आणि फ्रान्स आणि ब्रिटनपासून आणखी दूर गेला. मुसोलिनीने हिटलरशी समझोता केला आणि त्यांनी ऑक्टोबर १९३६ मध्ये रोम-बर्लिन-टोकियो अक्ष तयार केला. एका महिन्यानंतर जर्मनी आणि जपानने रशियाच्या जगात साम्यवाद पसरवण्यासाठी स्थापन केलेल्या कोमीनटर्न संघाविरुद्ध सामुदायिक करार केला. इटली देखील या करारात सामील झाला आणि यामुळे रोम-बर्लिन-टोकियो अक्ष निर्माण झाला.

## ११.६ जपानमधील लष्करवादाच्या वाढीसाठी जबाबदार घटक

**जपान मधील लष्करवाद:**

जपानमध्ये लष्करवादाच्या वाढीसाठी अनेक घटक कारणीभूत होते. काही महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे होते.

**जपानमधील लष्करी परंपरा:**

जपानमध्ये सम्राटाचा सन्मान आणि अधिकार प्रमुख म्हणून लष्करवादाची शक्तिशाली परंपरा होती. हेयान आणि कामाकुरा राजवंशांच्या प्रदेशादरम्यान जपानी सैन्याने देशाच्या सामाजिक-राजकीय व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान व्यापले. सम्राटाने प्रभावशाली कुळातील प्रमुख योरिटिमोला शोगुन ही पदवी बहाल केली. स्वाभाविकच शोगुन जपानी सम्राटाच्या सैन्यातील सर्वोच्च नेते बनले. त्यांनी सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकातील जपानवर

munotes.in

राजकारण आणि प्रशासनावर वर्चस्व गाजवले. परिणामी जपानमध्ये लष्करवाद वाढू लागला.

**जपानमध्ये लोकशाहीवादी पक्षांचा उदय आणि त्यांचे पतन:**

पहिल्या महायुद्धात जर्मनी आणि रशिया पराभूत झाले आणि कमकुवत लोकशाही राष्ट्रे विजयी झाली. या परिस्थितीने जपानी लोकांना मोहित केले आणि त्यांना उदारमतवादी आणि लोकशाहीवादी पक्षांना पसंती दिली. दरम्यान जपानच्या सायबेरियन मोहिमेवर सर्वत्र जोरदार टीका झाली. युद्धातील लष्करी नेतृत्व कमी झाल्यामुळे जपानी राजकारणात पक्षप्रणालीचा उदय झाला. १९१८ मध्ये राजकीय पक्षाचे नेते हारा ताकाशी याने कनिष्ठ सभागृहात बहुमत मिळवले आणि त्याला जपानचे पंतप्रधान बनवले गेले. त्याने त्याच्या मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांची त्यांच्याच पक्षातून निवड केली आणि देशात अनेक सुधारणांची घोषणा केली. परंतु त्याचे राज्य फार काळ टिकू शकले नाही कारण १९२१ मध्ये त्याची हत्या करण्यात आली आणि आणखी दोन सरकारे सत्तेवर आणली जी पक्षविरहित होती आणि ज्याचे नेतृत्व ॲडमिरल काटो आणि विस्काउंट किउरा या नौदल अधिकाऱ्यांनी केले. जपानी कामगार वर्ग राजकीय पक्ष आणि कामगार संघटना तयार करू लागला. परिणामी १९२२ मध्ये जपानचा कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात आला. याच दरम्यान जपानमध्ये अनेक सर्वहारा आणि शेतकरी पक्षांची स्थापना झाली.

**झैबत्सुचा राजकीय प्रभाव:**

१९२० मध्ये झैबात्सू वर्गाच्या राजकीय प्रभावाने मित्सुई,मित्सुबिशी आणि यासुदा सुमितमो सारख्या मोठ्या कंपन्यांना चालना दिली. या कंपन्यांनी वित्त,बँक,विमा व्यवसाय यासारख्या जपानच्या एक चतुर्थांश भांडवलावर नियंत्रण ठेवले. जपानी राजकारणावरील प्रभावामुळे त्यांनी नेहमी मंत्रिमंडळाच्या निर्णयांवर प्रभाव टाकला आणि कामगार संघटनांच्या वाढीसंदर्भात विरोधी कायदे केले. राजकारणी आणि नोकरशहा दोघांनाही झैबत्सुकडून देणग्या आणि लाच मिळू लागली ज्यामुळे राजकीय आणि सामाजिक लोकशाही व्यवस्थेसाठी मजबूत आर्थिक पाया तयार करण्यात अडथळा आला. झैबात्सूच्या व्यावसायिक हितासाठी लागोपाठच्या सरकारांच्या अनुकूल धोरणांमुळे सामान्य जपानी लोकांच्या कल्याणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. या परिस्थितीमुळे पुढील बदल घडले. – १) झैबत्सुच्या विरोधात पुराणमतवादी राष्ट्रवादीचा राजकीय पक्षांना पाठिंबा. २) तरुण लष्करी अधिकारी आणि झैबत्सु यांच्यात तीव्र संघर्ष. ३) लष्करी वर्गात अशी भावना झाली की झैबत्सूने सैन्य आणि नौदलाचा विस्तार रोखला. ४) झैबत्सूच्या आर्थिक स्वातंत्र्य आणि खानदानी दर्जाबद्दल कट्टरपंथी सैन्य अधिकाऱ्यांमध्ये नापसंती. ५) राजकारणी, नोकरशहा आणि झैबत्सु यांच्याबद्दल जनमत अत्यंत प्रतिकूल झाले. म्हणून जपानी लोकांनी जपानमधील सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी सैन्याची बाजू घेतली आणि त्यामुळे जपानमध्ये लष्करवादाचा उदय झाला.

**अतिजहाल राष्ट्रवादी गटांचा उदय:**

१९२१-२२ च्या वॉशिंग्टन परिषदेनंतर जपानमध्ये अनेक अतिजहाल राष्ट्रवादी गट,कट्टरपंथी संघटना आणि दहशतवादी संघटना उदयास आल्या ज्यांनी जपानमध्ये लष्करवादाचा मार्ग मोकळा केला. त्यापैकी काही महत्त्वाचे गट पुढीलप्रमाणे होते १) जनरल

योशा २) ब्लॅक ड्रॅगन सोसायटी ३) जपान नॅशनल सोशालिस्ट पार्टी. ४) शिंटोराज्य वादी ५) साकुराकाई. या गटांपैकी पहिला गट जनरल योशा हा गेंकाईचा सागर म्हणून प्रसिद्ध होता ज्याची स्थापना १८८१ मध्ये झाली होती. विस्ताराचे धोरण स्वीकारणे,सम्राटाला राष्ट्रीय समर्पण आणि लोकप्रिय चळवळीला पाठिंबा अशी त्याची तीन उद्दिष्टे होती. अशा प्रकारे या गटाने जपानमध्ये सैन्यवादाच्या उदयास अनुकूलता दर्शविली. ब्लॅक ड्रॅगन सोसायटी या गटाने राष्ट्रीय आर्थिक स्वावलंबन आणि उत्पन्नाच्या स्त्रोतांचे न्याय्य वितरण यावर भर दिला. त्याने अमूर नदीच्या प्रदेशात जपानी साम्राज्याचा विस्तार आणि पूर्व आशियात साम्राज्य विस्तार साकार करण्याचा मनसुबा जाहीर केला.

**मांचुरियन समस्या:**

**मांचुरियात झालेल्या एका घटनेमुळे** संकटामुळे जपानमध्ये लष्करवाद वाढला. १९३१ मध्ये टोकियोमधील उदारमतवादी सरकार आणि लष्करी वर्ग यांच्यात स्पष्ट फूट पडली. सप्टेंबर १९३१ मध्ये एका रात्री मुकदेनजवळील दक्षिण रेल्वेमार्गावर बॉम्बचा स्फोट झाला. या घटनेचा जपानने राजकीय फायदा घेतला. या घटनेमुळे जपानी सशस्त्र दलांनी मंचूरियाची राजधानी मुकडेन आणि नंतर संपूर्ण मंचुरियावर नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली मांचुरियन घटनेने जपानमध्ये लष्करी नेतृत्व आघाडीवर आले आणि तिला लष्करवादाच्या धोरणांना बळ मिळाले.

**रोम-बर्लिन-टोकियो अक्ष:**

युरोपमध्ये इटली जर्मनीच्या जवळ गेला तसेच फ्रान्स आणि ब्रिटनपासून दूर गेला. मुसोलिनीने हिटलरशी संधान बांधले आणि त्यांनी ऑक्टोबर १९३६ मध्ये रोम-बर्लिन-टोक्यो या अक्षगटाची स्थापना केली. एका महिन्याच्या आत जर्मनी आणि जपानने रशियाविरुद्ध अँटी-कॉमिंटर्न करार केला. इटली देखील या करारात सामील झाला आणि यामुळे रोम-बर्लिन-टोकियो प्रबळ झाला. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यावर १९५२ पर्यंत जनरल मॅकआर्थरच्या नेतृत्वाखाली मित्र राष्ट्रांच्या सैन्याने तिचा ताबा घेतला. पहिली तीन वर्षे जपान पुन्हा कधीही युद्ध सुरू करू शकणार नाही याची खात्री करून घेण्याचे अमेरिकनांचे लक्ष्य होते. तिला सशस्त्र सेना ठेवण्यास मनाई करण्यात आली होती आणि तिला लोकशाही राज्यघटना देण्यात आली होती.

## ११.७ सारांश

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव आणि नंतर तिला झालेल्या अपमानामुळे द्वितीय महायुद्धाची बीजे पेरली गेली. व्हर्सायच्या तहामुळे जर्मन लोकांच्या मनावर खोल जखम झाली. लोकांनी हिटलरमध्ये राष्ट्र निर्माणाची आशा पाहिली. त्याने महागाईशी लढण्यासाठी हजारो बेरोजगारांना अन्न व रोजगार देण्याचे आश्वासन दिले. फॅसिस्ट इटली आणि नाझी जर्मनीने राष्ट्रीय गौरव वाढवण्यासाठी विस्तारवादी धोरण अवलंबले. त्यांनी लवकरच जपानला आपल्या गटात घेतले व ऑक्टोबर १९३६ मध्ये रोम-बर्लिन-टोकियोची स्थापना केली. नाझीवाद, फॅसिझम आणि लष्करवादाचा पराभव झाल्यानंतरच अनुक्रमे जर्मनी,इटली आणि जपानमध्ये लोकशाहीचा उदय झाला.

## ११.८ प्रश्न

१. मुसोलिनीच्या देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणाचे विश्लेषण करा.

२. इटलीमध्ये फॅसिझमचा उदय कसा झाला?

३. मुसोलिनीच्या हुकूमशाहीची ठळक वैशिष्ट्ये नमूद करा.

४. जर्मनीतील नाझीवादाच्या उदयाच्या कारणांची चर्चा करा. नाझी पक्षाचे धोरण काय होते.

५. जर्मनीमध्ये हिटलरच्या सत्तेच्या उदयाचे विश्लेषण करा.

६. हिटलरने पाळलेल्या देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणाचे परीक्षण करा.

७. जपानमधील सैन्यवादाच्या उदयामध्ये झैबात्सूची भूमिका स्पष्ट करा.

## ११.९ संदर्भ


- कॅरी अल्ब्रेक्ट, डीपलोमाटीक हिष्ट्री ऑफ युरोप सिन्स कॉंग्रेस ऑफ विएन्ना, हार्पर पब्लिकेशन, न्यूयॉर्क, १९५८
- हेझेन चार्ल्स,मोडर्ण युरोप सिन्स १७८९,एस. चांद,१९९२
- कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४
- केनेडी एम.ए, अ शोर्ट हिष्ट्री ऑफ जपान, नॉर्थ अमेरिकन लायब्ररी प्रेस १९६५
- ७ डेव्हिड एम.डी., राइज अँड ग्रोथ ऑफ मॉडर्न जपान- हिमालय पब्लिकेशन हाऊस, मुंबई १९९९.


*****

munotes.in

# १२

# मानवी शोकांतिका आणि अस्तित्ववाद

**घटक रचना**


१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रस्तावना

१२.२ जीवितहानी आणि विनाश

१२.३ युरोपियन समाजामध्ये बदल

१२.४ अस्तित्ववाद

१२.५ अस्तित्ववादाचा मागोवा

१२.६ सारांश

१२.७ प्रश्न

१२.८ संदर्भ


## १२.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबी समजण्यात सक्षम होईल

- महायुद्धात मानवी जीवनांचे नुकसान आणि विनाश
- युरोपियन समाजातील बदल
- अस्तित्ववादाचे तत्वज्ञान
- अस्तित्ववादातील तत्त्वज्ञांचे योगदान

## १२.१ प्रस्तावना

दोन महायुद्धाचे युरोपच्या इतिहासावर आणि सर्वसाधारणपणे सर्व जगावर दूरगामी परिणाम झाले. पहिल्या महायुद्धाचे राजकारण, अर्थकारण आणि समाज या सर्व क्षेत्रांत भयंकर परिणाम झाले. युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या देशांमध्ये अधिक राजकीय अस्थिरता होती कारण त्यांची सरकारे युद्धानंतरच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यात अकार्यक्षम होती. त्यामुळे युरोपातील विविध देशांमध्ये हुकूमशाहीचा उदय झाला. हुकूमशहांना युरोपियन इतिहासाचा भविष्यातील वाटचाल घडवायची होती आणि जगाला आणखी एका मोठ्या आपत्तीकडे नेले. महायुद्धाचे मुख्य परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

munotes.in

## १२.२ जीवितहानी आणि विनाश

पहिल्या व द्वितीय महायुद्धामुळे अतुलनीय असा विनाश झाला. युद्धाचा परिणाम म्हणून मागील १०० वर्षांतील सर्व युद्धांमध्ये मरण पावले त्यापेक्षा कितीतरी जास्त सुमारे दहा लक्ष सैनिक मरण पावले. सुमारे एकवीस लाख पुरुष जखमी झाले. रोग, उपासमार आणि युद्धाशी संबंधित इतर कारणांमुळे किती नागरिकांचा मृत्यू झाला हे कोणालाही माहिती नाही. काही इतिहासकार असे मत मांडतात की लष्करातील सैनिकांएवढेच नागरिक मरण पावले. युद्धखोर सरकारांनी महायुद्धातील विजयासाठी प्रचंड संपती खर्च केली. विनाशाची किंमत अगणित होती. पहिल्या व द्वितीय महायुद्धात फ्रान्स, बेल्जियम आणि इतर देशांमध्ये प्रचंड मालमत्तेचा नाश झाला. सैन्याने शेत आणि गावे यांमधून जात असताना ती उद्ध्वस्त केली. युद्धामुळे कारखाने, पूल आणि रेल्वे रुळांचा नाश झाला. तोफखाना, खंदक आणि रसायनांमुळे पश्चिम देशातील जमीन अनुत्पादक झाली.

## १२.३ युरोपियन समाजामध्ये बदल

**युरोपियन उद्योग आणि व्यापाराचे नुकसान:**

युद्धानंतरच्या वर्षांत युरोपीय राष्ट्रांसाठी जागतिक व्यापार आणि औद्योगिक उत्पादनात युरोपला युद्धपूर्व स्थितीत आणणे समस्या होती. चार वर्षांपासून युरोप जागतिक बाजारपेठांसाठी बंद होता आणि नवीन प्रतिस्पर्धी अमेरिका, जपान आणि दक्षिण अमेरिकेने तिच्या बाजारपेठांवर कब्जा केला होता. युद्धानंतर उत्पादनात भरभराट झाली आणि उद्योग आणि शहरांची पुनर्बांधणी करण्याची गरज निर्माण झाली, मूलभूत ग्राहकोपयोगी वस्तूंचा पुरवठा कमी झाला. १९२१ मध्ये तेजीला ग्रहण लागले आणि १९२९ पर्यंत मंद गतीने सुधारणा झाली असली तरी १९२९-३१ च्या जागतिक व्यापारातील मंदीने केवळ युरोपमध्येच नव्हे तर जगभरातील व्यापार आणि उद्योगांना फटका बसला. अशाप्रकारे युरोपला आंतरराष्ट्रीय व्यापार आणि औद्योगिक उत्पादनात तिचे पूर्वीचे स्थान परत मिळवता आले नाही.  युद्ध कर्जाचे ओझे, दरांची वाढ, कच्चा माल आणि खाद्यपदार्थांच्या किमतीत झालेली घसरण यामुळे विकसनशील देशांना औद्योगिक वस्तू खरेदी करण्यास अडथळा आणला, राष्ट्रीय चलनांची कमकुवतता, आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्थेची स्थिर व्यवस्था नसणे, कोळसा, लोखंड आणि पोलाद, कापड आणि जहाजे यांसारख्या युरोपातील मूलभूत औद्योगिक उत्पादनांच्या मागणीत घसरण या सर्व घटकांमुळे युरोपियन वस्तूंची निर्यात कमी आणि बेरोजगारी वाढली. युरोपीय देश कर्जपुरवठा करणारया राष्ट्रांपासून कर्जदार राष्ट्रांमध्ये बदलले होते. युद्धात सामील असलेल्या राष्ट्रांनी मिळकत कर आणि इतर करांच्या माध्यमातून युद्धासाठी पैसे जमा केले. आयकर आणि इतर करांच्या माध्यमातून बहुतेक युद्धासाठीखर्च झाले. परंतु या पैशाचा मोठा भाग कर्जातून आला होता. ज्यामुळे प्रचंड कर्जे निर्माण झाली. युद्ध रोख्यांची विपणन आणि विक्री करून सरकार नागरिकांकडून कर्ज घेतले. मित्र राष्ट्रांनीही अमेरिकाकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतले. याव्यतिरिक्त, बहुतेक सरकारांनी त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त पैसे छापले. तरीही, वाढलेल्या पैशाच्या पुरवठ्यामुळे युद्धानंतर तीव्र चलनवाढ झाली. मित्र

राष्ट्रांनी प्रथम महायुद्धानंतर जर्मनीकडून भरपाईची मागणी करून कर्ज कमी करण्याचा प्रयत्न केला. नुकसानभरपाईने पराभूत देशांच्या आर्थिक समस्या वाढल्या आणि युद्धाय विजयी देशांच्या समस्या सुटल्या नाहीत.

**युरोपियन समाजामध्ये बदल:**

पहिल्या व द्वितीय महायुद्धाने समाजात मोठे बदल घडवून आणले. युरोपच्या वाढत्या लोकसंख्येला युद्ध, त्यानंतर आलेल्या इन्फ्लूएंझा महामारी यामुळे काही प्रमाणात आळा बसला. तंत्रज्ञानाचा विकास, सुधारित पोषण आणि वैद्यकातील प्रगतीमुळे राहणीमानाचा दर्जा आणि जीवनाचा दर्जा वाढण्यास मदत झाली. अनेकांनी युद्धानंतरचे त्यांचे जुने जीवनमान सुरू न ठेवता काही नवीन मार्ग निवडले. शेतकरी शेतात करण्याऐवजी शहरांमध्ये स्थायिक झाल्याने शहरी भाग विकसित झाला. पुरुष युद्धात गेल्यानंतर स्त्रिया कार्यालये आणि कारखान्यांमध्ये काम करू लागल्या आणि युद्ध संपल्यावर त्यांचे नव-स्वातंत्र्य सोडण्यास ते तयार नव्हते. अनेक देशांनी महिलांच्या मतदानाचा हक्क मान्य केला आहे. इंग्लंडमध्ये १९१८ मध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. पहिल्या महायुद्धामुळे सामाजिक वर्गांमधील फरक पुसट होऊ लागला आणि समाज अधिक लोकशाही बनला. उच्च वर्गाने युद्धानंतर त्यांची काही शक्ती आणि विशेषाधिकार गमावले. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाने आर्थिक,सामाजिक आणि राजकीय बदल घडवून आणले. १९४५ मध्ये मध्य आणि पूर्व युरोपमध्ये सर्वात गंभीर आर्थिक आणि सामाजिक बदल झाले आणि जिथे अनेक देशांनी साम्यवादी (कम्युनिस्ट) नियंत्रणाखाली संपूर्ण आर्थिक पुनर्रचना केली. चीन,भारत,ब्रह्मदेश,मलाया आणि इंडोनेशिया या आशियाई देशांमध्ये सर्वात मोठे राजकीय बदल झाले. दुसरे महायुद्ध मानवजातीच्या इतिहासात अतुलनीय विनाशकारी ठरले. या महायुद्धाचे काही घातक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

१) या महायुद्धात बारा लाख सैनिक मारले गेल्याचा अंदाज आहे. उपासमार आणि रोगामुळे आणखी पंचवीस दशलक्ष मरण पावले. अणुबॉम्बमुळे जपानमध्ये सुमारे १,६०,००० लोक मरण पावले. अनेक वाचलेले जपानी नागरिक व मुले मुले त्वचारोग आणि कर्करोगाने ग्रस्त झाले. महिला आणि मुले मृत्यूच्या यादीत खूप जास्त होती.

२) अमेरिकेने सुमारे ३५० अब्ज डॉलर्स खर्च केले. इतर देशांनी सुद्धा एक ट्रिलियन डॉलर्स (म्हणजे १००० अब्ज) खर्च केले. युद्धाच्या शेवटी युरोप पूर्णपणे उद्ध्वस्त. जवळजवळ प्रत्येक युरोपिय देशाने जोरदार बॉम्बस्फोट अनुभवले होते. उद्योगधंदे,बंदरे,रेल्वे,पूल आणि नागरिकांची घरेही उद्ध्वस्त झाले. प्रत्येक देश दिवाळखोर झाला आणि याचा राजकीय जीवनावर परिणाम झाला. महायुद्धांमुळे युरोपीय राष्ट्रे समाजवादी आणि डाव्या विचारांनी प्रभावित झाली. उदा. युद्धानंतर लवकरच ब्रिटनमध्ये कामगार सरकार सत्तेवर आले.

३) युद्धामुळे जगभरातील लाखो लोकांना त्रास सहन करावा लागला. अन्नधान्य,रॉकेल,बांधकाम साहित्य इत्यादींचा तुटवडा होता. किंमती वाढल्या आणि जीवनमान खालावले.

४) संपूर्ण मानवतेच्या नैतिक अध:पतनाने जगातील लोक भयभीत झाले. युद्धांमध्ये इतर निष्पाप मानवांवर सर्वात वाईट क्रौर्य आणि अत्याचार केले गेले. नाझी राजवटीने

लाखो ज्यूंची अत्यंत भयंकर हत्या केली होती. हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बने हे सिद्ध केले की माणूस स्वतःची प्रजाती नष्ट करण्यास तयार आहे. यासारख्या कृत्यांमुळे नैतिक अधःपतनाची खोली दिसून आली.

५) तीन मोठ्या अक्ष शक्ती म्हणजे नाझी जर्मनी,फॅसिस्ट इटली आणि जपान पूर्णपणे चिरडले गेले. जर्मनी चार विभागामध्ये विभागले गेले आणि प्रत्येक झोन अनुक्रमे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि सोव्हिएत रशियाच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले. राजधानी बर्लिन शहर देखील चार विभागामध्ये विभागले गेले. हे क्षेत्र १९४५-४८ दरम्यान परदेशी लष्करी नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होते. इटलीने सर्व वसाहती गमावल्या. प्रथम महायुद्धात जर्मनीला युद्ध नुकसानभरपाई द्यावी लागली. जर्मनी व इटली आर्थिकदृष्ट्या कोलमडली आणि मार्शल योजनेने त्यांना सावरण्यास मदत केली. जपानने कोरिया,मंचुरिया आणि तैवानसह तिचे संपूर्ण वसाहती साम्राज्य गमावले. अमेरिकेच्या जनरल आयझेनहॉवरच्या नेतृत्वाखालील अलायड फोर्सेस (एससीएपी) जपानला सामान्य स्थितीत आणण्यासाठी राजकीय नियंत्रण मिळवले. अमेरिकेच्या मदतीमुळे लोकशाही सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या या तिन्ही देशांनी आर्थिक सुधारणा घडवून आणली आहे.

## १२.४ अस्तित्ववाद

दुसऱ्या महायुद्धाचा मानवी मनावर व त्याच्या विचारसरणीवर खोल परिणाम झाला. विश्व हे तर्कसंगत आणि सुसंगत स्थान नाही आणि मानवी मन हे बुद्धिवादी नसून भावनांच्या अधीन आहे हा विचार अधिक प्रबळ झाला. ही धारणा किंवा विचारसरणी अस्तित्ववाद म्हणून ओळखली गेली. अस्तित्ववाद हा तात्विक आणि साहित्यिक चळवळीचा संदर्भात उदयाला आला. जीन-पॉल सार्त्र (१९०५-१९८०) आणि अल्बर्ट कामू (१९१३-१९६०) यांनी प्रथम ही संकल्पना मांडली. पुढे मार्टिन हायडेगर (१८८९-१९७६) आणि सिमोन डी बुवा (१९०८-१९८६) यांसारख्या विसाव्या शतकातील तत्त्ववेत्त्यांसह या संकल्पनांचा प्रसार झाला. ब्लेझ पास्कल (१६२३-१६६२) आणि सोरेन किरकेगार्ड (१८१३-१८५५) या धार्मिक विचारवंतांकडे या विचारप्रणालीचे मूळ सापडते. या विचारवंतानी हा शब्द वापरला नसला तरी,त्यांच्या तात्विक चर्चेमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर आकार घेतलेल्या अस्तित्ववादी चळवळीचे संदर्भ सापडतात. इतर अनेक जटिल दृष्टीकोनांच्या अगदी विरुद्ध असा अस्तित्ववाद सामान्य आणि दैनंदिन मानवी अनुभवांमधून प्राप्त होतो. अस्तित्ववाद मुळात मानवाला त्यांच्या जीवनादरम्यान ज्या मूलभूत समस्यांना तोंड द्यावे लागते ते शोधण्याचा प्रयत्न करतो. अस्तित्ववाद आपल्याला स्वतःला जीवनाचे मूलभूत प्रश्न विचारण्यास भाग पाडतो. अस्तित्वाचा आधार काय आहे? मी इथे का आहे? माझ्या आयुष्याचा अर्थ काय? काही विचारवंतांनी अस्तित्ववादाला तात्विक प्रक्रिया म्हणून परिभाषित करणे अवघड असल्याचे प्रतिपादन केले आहे.

## १२.५ अस्तित्ववादाचा मागोवा

अस्तित्ववाद ही एक चळवळ किंवा प्रवृत्ती आहे ज्यामध्ये तत्त्वज्ञानाच्या अनाकलनीय प्रणालीऐवजी स्वताच्या अनुभवावरून विश्वाचा अर्थ लावणे यावर अधिक भर आहे. ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये अस्तित्ववादाचे असे वर्णन केले जाते की मानव 'मुक्त आणि अर्थ नसलेल्या जगात' त्यांच्या स्वतःच्या कृतींसाठी जबाबदार आहे. मेरियम-वेबस्टरने त्याचे वर्णन मुख्यतः विसाव्या शतकातील तात्विक चळवळ म्हणून केले आहे ज्यामध्ये विविध सिद्धांतांचा समावेश आहे परंतु अथांग विश्वातील वैयक्तिक अस्तित्वाचे विश्लेषण आणि योग्य काय आहे याविषयी कोणतीही निश्चित माहिती नसताना स्वेच्छेने आपल्या कृत्यांसाठी अंतिम जबाबदारी स्वीकारणे हा अस्तित्ववादाचा अर्थ लावला आहे.

भूतकाळातील अनेक विचारवंत रूढार्थाने अस्तित्ववादी नव्हते परंतु त्यांनी अस्तित्ववादी विचारसरणीचा पुरस्कार केला, त्याची मुलभूत तत्वे शोधून काढली आणि त्याद्वारे विसाव्या शतकात अस्तित्ववादाच्या निर्मितीचा मार्ग मोकळा केला. फ्योदोर दोस्तोयेव्स्की (१८२१-१८८१), रशियन कादंबरीकार हे विसाव्या शतकातील अस्तित्ववादाचे महत्त्वपूर्ण अग्रदूत आहेत. जीवनात असा कोणताही सुसंगत विचार अथवा तत्व नाही ज्यावर आपण विसंबून राहू शकतो ही त्यातील प्रमुख संकल्पना आहे. आणखी एक महत्वाचा विचारवंत म्हणजे काफ्का (१८८३-१९२४) हा तत्वेवेत्ता होता. १९१५ मध्ये प्रकाशित झालेल्या त्याच्या कादंबरीतील नायक ग्रेगोर साम्साची एक कथा आहे. या कथेत ग्रेगर आपल्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी यापुढे काम करू शकत नाही. त्याच्यात अपराधीपणाची भावना आहे. त्याच्यावर अत्याचार आणि उपासमार या बाबींनी परिणाम केलेले जाणवतो. त्याने 'द ट्रायल' आणि 'द कॅसल' या दोन कादंबऱ्या लिहिल्या. त्यांची बहुतेक पुस्तके अत्यंत संदिग्ध आहेत आणि त्यांच्या सर्व प्रमुख कादंबऱ्या अपूर्ण राहिलेल्या दिसून येतात. दुसऱ्या महायुद्धात जेव्हा युरोपला भौतिक आणि आध्यात्मिक विध्वंसाने तडा दिला तेव्हा अस्तित्ववादाला एक विशिष्ट परिमाण लाभले.

कर्कगार्ड (१८१३-१८५५) हा डेन्मार्कचे महान तत्त्वज्ञ आणि अस्तित्ववादाच्या निर्मितीतील प्रमुख व्यक्तिमत्त्व आहे. तो तत्त्वज्ञ,धार्मिक लेखक,व्यंगचित्रकार,मानसशास्त्रज्ञ आणि साहित्य समीक्षक होता. त्याचा जन्म कोपनहेगनमधील श्रीमंत कुटुंबात झाला. यामुळे त्याला त्याच्या विद्वत्तापूर्ण आवडींसाठी आपले जीवन समर्पित करण्याची परवानगी मिळाली आणि त्याच्या काळातील दैनंदिन धावपळीपासून स्वतःला दूर केले. कर्कगार्डने इतर अनेक तत्त्ववेत्त्यांप्रमाणे सर्वसाधारणपणे विकास व प्रगती या कल्पनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कारण उच्च तांत्रिक प्रगतीमुळे लोक उदास व हताश होतात तसेच त्यांच्या जीवनात तणाव वाढीस लागतो. त्याच्या मते तांत्रिक प्रगतीमुळे आपल्या जीवनाला धोका निर्माण होतो कारण ती वास्तविक अस्तित्वाच्या मुद्द्यांपासून आपले लक्ष विचलित करते. कर्कगार्डने विविध काल्पनिक नावाने लिहिलेल्या अनेक लहान पुस्तकांमध्ये चिंताग्रस्ततेच्या विचारांचे सर्वेक्षण केले. चिंतेची संकल्पना, जीवनाच्या वाटेवरचे टप्पे आणि आजारपण ते मृत्यूपर्यंत विचाराचा मागोवा त्याने घेतला. ख्रिश्चनांनी नास्तिक वृत्तीतून धार्मिकतेकडे जाणे आवश्यक

आहे तसेच देव हि संकल्पना आवश्यक असून त्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार असले पाहिजे असे मत त्याने मांडले.

एक जर्मन तत्वज्ञानी फ्रेडरिक नित्शे (१८४४-१९००) याने ख्रिस्ती धर्म आणि पारंपारिक नैतिकतेच्या पायालाच आव्हान दिले. सत्य, नैतिकता, भाषा, सौंदर्यशास्त्र, सांस्कृतिक सिद्धांत, शून्यवाद, शक्ती, चेतना आणि अस्तित्वाचा अर्थ यावरील त्यांच्या लेखनाचा पाश्चात्य तत्त्वज्ञान आणि बौद्धिक इतिहासावर मोठा प्रभाव आहे. नीत्शे नंतरचे प्रमुख अस्तित्ववादी तत्वज्ञानी मार्टिन हायडेगर, जीन पॉल सार्त्र, सिमोन डी बुवा आणि अल्बर्ट कामू हे होते. मार्टिन हायडेगर (१८८९-१९७६) हे विसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांच्या विचारसरणीने घटनाशास्त्र, अस्तित्ववाद, राजकीय सिद्धांत, मानसशास्त्र आणि धर्मशास्त्र अशा विविध क्षेत्रात योगदान दिले. हायडेगरच्या अस्तित्वाची चिंता वास्तववादीपणे कसे जगावे याबद्दलचे प्रश्न उपस्थित केले होते. हेडेगरला जाणवले की अस्तित्वाच्या व्यापक आकलनासाठी सर्वोत्तम सुरुवातीचा मुद्दा म्हणजे मानवाच्या दृष्टिकोनातून त्याचा विचार करणे. मन आणि शरीर, विषय आणि वस्तू यांच्यातील भेद आणि चेतना, अनुभव आणि मनाची भाषा यातील कोणताही द्वैतवाद नाकारणारे प्रगल्भ तत्त्वज्ञान त्यांनी साकारले.

'अस्तित्ववाद आणि मानवतावाद' हे १९४६ सालचे सार्त्र यांचे तत्त्वज्ञानविषयक योगदान आहे. ते म्हणतात की अस्तित्ववादाची मुख्य व्याख्या अशी संकल्पना आहे की अस्तित्व तत्वाच्या आधी येते. मग ते असा दावा करतात की व्यक्तीने आपल्या वागण्याची जबाबदारी स्वतः घेतली पाहिजे. तो सार्वत्रिक नैराश्याच्या संकल्पनेशी संबंधित असलेल्या वेदनांची व्याख्या करतो. सार्त्रने अनेक साहित्यिक पद्धतींमध्ये आपले विचार यशस्वीरित्या मांडले आहेत. त्यांची नाटके मोठ्या प्रमाणात त्यांचे तत्वज्ञान सांगण्याचे साधन म्हणून काम करतात. त्यापैकी 'नो एक्झिट' (१९४४) हे सर्वात प्रसिद्ध आहे. त्यांची पहिली प्रसिद्ध कादंबरी 'नौसा' (१९३८) मानवी जीवनातील मूर्खपणाचे वर्णन करते. त्यांनी लिहिलेली प्रमुख कथा आहे- द रोड्स टू फ्रीडम ट्रायलॉजी. त्यांनी लहानपणापासूनच अनेक लघुकथा रचल्या त्यापैकी अनेक सुप्रसिद्ध झाल्या. स्पॅनिश गृहयुद्धाच्या पार्शभूमीवर त्यांची 'वॉल' ही कथा कोणत्याही न्यायिक प्रक्रीयेविना मृत्यूदंडाची शिक्षा झालेल्या आणि पहाटेच्या वेळी फाशीची वाट पाहत असलेल्या तीन कैद्यांच्या मानसशास्त्रावर केंद्रित आहे.

सिमोन डी बुवा (१९०८-१९८६) ही एक फ्रेंच लेखिका, स्त्रीवादी, अस्तित्ववादी तत्त्वज्ञ, राजकीय कार्यकर्ता आणि सामाजिक सिद्धांतकार होती. तिने स्त्रीवादी अस्तित्ववाद आणि स्त्रीवादी सिद्धांत या दोन्हींवर लक्षणीय प्रभाव पाडला. द सेकंड सेक्स (१९४९) या तिच्या पुस्तकासाठी ती प्रसिद्ध आहे. हे पुस्तक संपूर्ण इतिहासात स्त्रियां समस्यांच्या उपचारांशी संबंधित आहे. स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचे एक प्रमुख कार्य आणि स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेचा प्रारंभ बिंदू म्हणून हे पुस्तक ओळखले जाते. समाजात महिलांकडे कशाप्रकारे पाहिले जाते ते तिने शोधून काढले व त्याचे चित्रण केले. एथिक्स ऑफ ॲम्बिग्युटी हा तिचा तात्विक निबंध आहे ज्यामध्ये तिने अस्तित्वात्मक नैतिकता विकसित केली.

अल्बर्ट कामू (१९१३-१९६०) हा फ्रेंच नोबेल पारितोषिक विजेते लेखक आणि तत्त्वज्ञ होते. जरी त्याने स्वतःला अस्तित्ववादापासून वेगळे केले असले तरी कामूने विसाव्या शतकातील सर्वात ज्ञात अस्तित्त्वविषयक प्रश्नांपैकी एक त्याच्या 'द मिथ ऑफ सिसिफस' मध्ये मांडला: "एकच गंभीर तात्विक प्रश्न आहे आणि तो म्हणजे आत्महत्या". त्याने लिहिलेल्या पुस्तकात सिसिफसला एक खडक डोंगरावर ढकलायचा होता, शिखरावर पोहोचल्यावर खडक पुन्हा खाली लोटला जाईल. असे तो सतत करेल. कामू सिसिफसला कोणतेही ध्येय नसलेला नायक म्हणून पाहतो जो संपूर्ण आयुष्य जगतो, मृत्यूचा तिरस्कार करतो आणि निरर्थक कार्यासाठी वेळ घालवतो. अशा प्रकारे कामूने जीवनातील निरर्थकता कशी वाढली आहे याचे तत्त्वज्ञान मांडले.

मॉरिस मर्लेऊ-पॉन्टी (१९०८-१९६१) हा त्या काळातील आणखी एक महत्त्वाचा आणि अनेकदा दुर्लक्षित असा  फ्रेंच अस्तित्ववादी आहे. त्याच्यावर एडमंड हसरल आणि मार्टिन हायडेगर यांचा जोरदार प्रभाव आहे. मानवी अनुभवातील अर्थाची रचना ही त्याची प्रमुख आवड होती आणि त्याने धारणा,कला आणि राजकारण यावर लेखन केले. कला,साहित्य,भाषाशास्त्र आणि राजकारण या विषयांवरच्या लेखनात त्यांनी आपली तात्विक समज मांडली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विज्ञान आणि विशेषत: वर्णनात्मक मानसशास्त्रात व्यापक सहभाग घेणारा तो एक प्रमुख घटनाशास्त्रज्ञ होता.

**कार्ल यास्पर्स :** किर्केगॉरनंतरचा अस्तित्ववादी विचारवंत म्हणजे कार्ल यास्पर्स. याच्या तत्त्वज्ञानावर किर्केगॉरच्या विचारांचा खोल पगडा असला, तरी त्याने ह्या विचारांना स्वत:चे असे एक वेगळे वळणही दिले आहे. किर्केगॉरच्या भूमिकेचे एक वैशिष्ट्य म्हणजे अस्तित्वाचे स्वरूप बुद्धिगम्य, सुव्यवस्थित नसल्याने तत्त्वज्ञान स्वभावत:च खंडित, अपूर्ण असले पाहिजे. त्याला सुव्यवस्थित दर्शनाचे स्वरूप देणे शक्य नाही व इष्टही नाही, हे त्याचे मत होय. उलट, तत्त्वज्ञान अस्तित्वाचे ग्रहण करणारे व म्हणून समावेशक असले पाहिजे, अशी यास्पर्सची भूमिका होती. यास्पर्स मानसोपचारपद्धतीकडून तत्त्वज्ञानाकडे वळला. माणसाचे व्यक्तिमत्त्व कार्यकारणनियमांना अनुसरून घडलेले असते, हे प्रचलित मानसोपचारपद्धतीमागील गृहीतकृत्य आहे. त्याचप्रमाणे जीवनातील प्रसंगांना देण्यात येणाऱ्या कित्येक प्रतिसादांना विकृत मानण्यात येते, तर कित्येक प्रतिसादांना स्वाभाविक, नॉर्मल मानण्यात येते. ह्या विभागणीमागे विश्र्वाच्या स्वरूपासंबंधीची एक कल्पना वस्तुनिष्ठ, बुद्धिग्राह्य आहे, तर इतर कल्पना म्हणजे विश्वाची विकृत दर्शने आहेत, असे गृहीतकृत्य आहे. पण यास्पर्सला मानसोपचाराच्या प्रत्यक्ष अनुभवास असे आढळून आले, की ह्या गृहीतकृत्यांमध्ये एक मोठी उणीव आहे. माणसाचे जे प्रत्यक्ष घडलेले व्यक्तिमत्त्व असते, ज्याचा उलगडा मानसशास्त्र करू पाहते, त्याच्यामागे एक मूलभूत निवड असते. तो दुसरेही काही बनू शकला असता, पण ती शक्यता सोडून तो प्रत्यक्षात जसा आहे तसे बनण्याची निवड त्याने केलेली असते. आणि ह्या निवडीबरोबरच विश्वाच्या स्वरूपाविषयीची एक कल्पनाही त्याने निवडलेली असते. ती बौद्धिक निकषांचे समाधान करते म्हणून स्वीकारलेली नसते, तर स्वतंत्रपणे निवडून स्वीकारलेली असते. विज्ञानाने आणि प्रचलित तत्त्वज्ञानाने दुर्लक्षित केलेल्या ह्या मूलभूत निवडीच्या महत्त्वावर किर्केगॉरने भर दिला आहे, हे यास्पर्सला आढळले. म्हणून किर्केगॉरचा त्याच्यावर एवढा प्रभाव पडला. माणसाच्या

दृश्य, प्रत्यक्ष व्यक्तिमत्त्वामागे ही मूलभूत निवड करणारा त्याचा जो खराखुरा स्व आहे त्याचा कित्येक सीमान्त प्रसंगांमध्ये आपल्याला प्रकर्षाने प्रत्यय येतो, असे यास्पर्सचे म्हणणे आहे

## १२.६ सारांश

पहिल्या महायुद्धामुळे अतुलनीय विनाश झाला. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि औद्यीगिक उत्पादनात युरोपला तिचे पूर्वीचे स्थान पुन्हा परत मिळवता आले नाही. पहिल्या व द्वितीय महायुद्धाने समाजात मोठे बदल घडून आले. शेतकरी शेतात करण्याऐवजी शहरांमध्ये स्थायिक झाल्याने शहरी भाग विकसित झाला. पुरुष युद्धात गेल्यानंतर स्त्रिया कार्यालये आणि कारखान्यांमध्ये काम करू लागल्या. हिरोशिमा व नागासाकी वरील हल्ल्यानंतर माणूसच माणसाचा शत्रू असल्याचे दिसून आले. अस्तित्ववाद आपल्याला स्वतःला जीवनाचे मूलभूत प्रश्न विचारण्यास भाग पाडतो. जीवनात असा कोणताही सुसंगत विचार अथवा तत्व  नाही ज्यावर आपण विसंबून राहू शकतो ही त्यातील प्रमुख संकल्पना आहे

## १२.७ प्रश्न

१. प्रथम आणि द्वितीय महायुद्धाच्या महत्त्वाच्या परिणामांची माहिती द्या.

२. मानवी शोकांतिकेसाठी जागतिक युद्धे जबाबदार आहेत यावर चर्चा करा.

३. अस्तित्ववाद आणि त्याच्या टप्प्याचे वर्णन करा

४. अस्तित्ववादातील तत्त्वज्ञांचे योगदान शोधा

## १२.८ संदर्भ


- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री, मॅकमिलन,  २००५
- टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४
- ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५
- टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड
- थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.
- मराठी विश्वकोश: अस्तित्ववाद


*****



munotes.in

# १३

# निर्वसाहतिकरणाची प्रक्रिया आणि शीतयुद्ध

**घटक रचना**

१३.० उद्दिष्टे
१३.१ प्रस्तावना
१३.२ निर्वसाहतिकरणसाठी जबाबदार घटक
१३.३ ब्रिटिश निर्वसाहतिकरण
१३.४ फ्रेंच निर्वसाहतिकरण
१३.५ स्पॅनिश निर्वसाहतिकरण
१३.६ शीतयुद्ध: व्हिएतनाम, पूर्व तिमोर आणि अंगोला
१३.७ सारांश
१३.८ प्रश्न
१३.९ संदर्भ

## १३.० उद्दिष्टे

१) निर्वसाहतिकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
२) वसाहतीतून मुक्त होण्यास कारणीभूत असलेले विविध घटक समजून घेणे.
३) निर्वसाहतिकरण झालेल्या देशांमध्ये सुरु झालेल्या शीतयुद्धाचा अभ्यास करणे.

## १३.१ प्रस्तावना

निर्वसाहतिकरण प्रक्रियेमध्ये पाश्चात्य देशांच्या वसाहती असलेल्या प्रदेशांना स्वातंत्र्य मिळाले. निर्वसाहतीकरण हा शब्द दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर स्वतंत्र झालेल्या राज्यांच्या संदर्भात वापरला गेला आहे. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाल्यावरही युरोपातील राष्ट्रांनी उर्वरित जगाच्या विशेषतः आशिया आणि आफ्रिकेतील विशाल भागावर मालकी हक्क सांगितला होता. भारत, ब्रह्मदेश, सिलोन, मलाया, आफ्रिकेतील प्रचंड भूभाग आणि सायप्रस, हाँगकाँग, वेस्ट इंडीज, फॉकलँड्स आणि जिब्राल्टर यांसारखी अनेक विविध बेटे आणि इतर प्रदेशांचा समावेश असलेले ब्रिटनचे साम्राज्य क्षेत्रफळात सर्वात मोठे होते.

## १३.२ निर्वसाहतिकरणसाठी जबाबदार घटक

**राष्ट्रवाद:**

वसाहतवादी राजवटीला अनेकदा राष्ट्रवादी चळवळीनी संघटितपणे विरोध केला. वेगवेगळ्या चळवळीनी वसाहतींमध्ये जोर धरला. राष्ट्रवादी शक्तींना परकीय शासकांपासून मुक्त होण्याची आणि आपल्याच देशातील लोकांनी चालवलेले सरकार मिळावे अशी स्वाभाविक इच्छा होती. युरोपियन शक्तींनी पाश्चात्य सभ्यतेचे व सुधारणेचे फायदे त्यांच्या वसाहतींमध्ये आणल्याचा दावा केला असला तरी वसाहतवादी लोकांमध्ये अशी भावना होती की युरोपियन शक्ती त्यांचे आर्थिक शोषण करत होते. वसाहतींचा विकास आणि समृद्धी युरोपच्या हितासाठी राबवली जात होती आणि बहुतेक वसाहतीतील लोक गरिबीत जगत होते.

**दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम:**

दुस-या महायुद्धामुळे अनेक मार्गांनी राष्ट्रवादी चळवळींना मोठ्या प्रमाणात उत्तेजन मिळाले. दुसऱ्या महायुद्धापूर्वी वसाहतवादी लोकांचा असा विश्वास होता की लष्करीदृष्ट्या श्रेष्ठ अशा युरोपियन लोकांना शस्त्रांच्या बळावर पराभूत करणे अशक्य आहे. तथापि युद्धाच्या सुरुवातीच्या काळात जपानी यशाने असे दिसून आले की गैर-युरोपियन लोकांना युरोपियन सैन्याचा पराभव करणे शक्य आहे. जपानी सैन्याने मलाया, सिंगापूर, हाँगकाँग आणि बर्मा, डच ईस्ट इंडीज आणि फ्रेंच इंडो-चीन या ब्रिटीश प्रदेशांवर कब्जा केला. दुस-या महायुद्धाने युरोपीय राज्ये कमकुवत झाली. त्यामुळे वसाहतीतील स्वातंत्र्याच्या दृढनिश्चयी लढ्याला सामोरे जाताना युरोपियन राष्ट्रे पाहिल्याप्रमाणे लष्करीदृष्ट्या मजबूत राहिले नव्हते. ब्रिटिशांनी हे सर्वप्रथम ओळखले. सर्वप्रथम त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिले (१९४७). त्यानंतर इतर देशांनादेखील लवकरच स्वातंत्र्य मिळाले.

**आंतरराष्ट्रीय दबाव:**

निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी वसाहतवादी शक्तींवर आंतरराष्ट्रीय दबाव होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी हे स्पष्ट केले की सर्व देशांच्या स्वातंत्र्यासाठीदेखील अटलांटिक चार्टर लागू होते. ट्रूमन यांनी भारतासहित इतर देशांना स्वातंत्र्य देण्यासाठी ब्रिटिश सरकारवर दबाव आणला. अमेरिकेने निर्वसाहतीकरणाला पाठींबा देण्याचे एक कारण असे होते की आशिया आणि आफ्रिकेतील युरोपियन वसाहतींना स्वातंत्र्य देण्यात कोणताही विलंब त्या भागात साम्यवादाच्या विकासाला प्रोत्साहनपर ठरला असता. आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे अमेरिकेने स्वतंत्र राष्ट्रांकडे संभाव्य बाजारपेठ म्हणून पाहिले ज्यामध्ये ते आर्थिक आणि राजकीय प्रभाव स्थापित करू शकणार होते. सोव्हिएत युनियनने साम्राज्यवादाचा सतत निषेध करून निर्वसाहतीकरणाचा प्रक्रियेला उत्तेजन दिले.

munotes.in

## १३.३ ब्रिटिश निर्वसाहतिकरण

**भारत:**

१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेसह भारतीय राष्ट्रीय चळवळ संघटित पद्धतीने सुरू झाली होती. राष्ट्रीय चळवळ १९०५ पर्यंत मवाळ आणि १९२० पर्यंत जहाल मार्गाने पुढे गेली. १९२० पासून महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्याचे सर्वोच्च नेते बनले. सत्याग्रह, असहकार आणि सविनय कायदेभंग यापद्धतींचा त्यांनी राष्ट्रीय चळवळीसाठी उपयोग केला. ऑगस्ट १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलनाच्या रूपात पुन्हा राष्ट्रीय चळवळ सुरू झाली. गांधी, नेहरू आणि त्यांच्या हजारो समर्थकांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी पारित झालेल्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याच्या तरतुदींनुसार भारत आणि पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आले.

**बर्मा:**

१८८५ पर्यंत ब्रह्मदेशावर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित केल्यानंतर ब्रिटिशांनी रंगून येथे प्रशासकीय ठिकाण हलवले. भारतातील ब्रिटिश साम्राज्याचे उपकेंद्र म्हणून ते विकसित झाले. युद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटीशांना समजून आले की ऑंग सॅनच्या नेतृत्वाखालील एएफपीएफएलची स्वातंत्र्य चळवळ वेगात पसरू लागली होती. अँटी-फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीगने अखेर बर्माचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ब्रिटनशी बोलणी केली व १९४८ पर्यंत त्यांना स्वातंत्र्य मिळाले.

**सिलोन (श्रीलंका):**

श्रीलंका अठराव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून ब्रिटिश वसाहत होती. एकोणिसाव्या शतकात सिलोनची राष्ट्रवादी चेतना सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक आघाड्यांवर प्रकट होऊ लागली. पहिल्या महायुद्धात सिलोनमधील राष्ट्रवादी शक्तींनी वेग घेतला. १९१९ मध्ये सिंहली आणि तमिळ संघटनांना एकत्र करून सिलोन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. युद्धाच्या प्रयत्नांना सहकार्य करताना पडद्यामागून दबाव आणणाऱ्या सिलोनच्या राष्ट्रवादी नेत्यांना प्रत्युत्तर म्हणून- ब्रिटिशांनी १९४५ मध्ये सोलबरी घटनात्मक आयोगाची नियुक्ती केली. त्या आयोगाने सिलोनला अंतर्गत स्वराज्य देणारे संविधान तयार केले. १९४७ मध्ये सिलोन स्वातंत्र्य कायद्याने वसाहतीला अधिराज्याचा दर्जा दिला. ब्रिटिशांनी ४ फेब्रुवारी १९४८ रोजी सिलोनला पूर्ण स्वातंत्र्य दिले.

**वेस्ट इंडीज, मलाया आणि सायप्रस:**

ब्रिटनच्या वेस्ट इंडिज समूहातील सर्वात मोठे देश जमैका आणि त्रिनिदाद होते आणि इतर छोट्या बेटांमध्ये ग्रेनेडा, सेंट व्हिन्सेंट, बार्बाडोस, सेंट लुसिया, अँटिग्वा, सेशेल्स आणि बहामास यांचा समावेश होता. १९६२ मध्ये ब्रिटनने ज्यांना स्वतंत्र व्हायचे आहे त्या सर्व बेटांना स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे १९८३ पर्यंत काही लहान बेटे वगळता ब्रिटिश वेस्ट इंडीजचे सर्व भाग स्वतंत्र झाले होते. १९६२ मध्ये जमैका आणि त्रिनिदाद आणि टोबॅगोला प्रथम स्वातंत्र्य मिळाले आणि १९८३ मध्ये सेंट किट्स आणि

munotes.in

नेविसची बेटे देखील स्वतंत्र झाली. ब्रिटिश गयानाला केवळ गयाना म्हणून ओळखले जाऊ लागले आणि ब्रिटिश होंडुरासला बेलीज हे नाव मिळाले. हे सर्व देश नंतर ब्रिटिश कॉमनवेल्थचे सदस्य झाले.

**मलाया:**

मलाया १९४५ मध्ये जपानी ताब्यापासून मुक्त झाले परंतु ब्रिटीशांना तेथून माघार घेण्यापूर्वी काही समस्यांना तोंड द्यावे लागले. मलाया एक जटिल क्षेत्र होते. त्यात प्रत्येकी राज्य असलेली नऊ राज्ये, मलाक्का आणि पेनांग या दोन ब्रिटीश वसाहती आणि मुख्य भूमीपासून एक मैलांपेक्षा कमी अंतरावर असलेले एक छोटेसे बेट सिंगापूर होते. मलायाची लोकसंख्या बहुवांशिक होती. त्यांचा सक्षम नेता टुंकू अब्दुल रहमानच्या नेतृत्वाखाली मलय पक्षाने चीनी आणि भारतीय गटांसोबत सामील होऊन स्वातंत्र्याच्या दिशेने वाटचाल केली व १९५५ च्या निवडणुकीत ५२ पैकी ५१ जागा जिंकणाऱ्या अलायन्स पार्टीची स्थापना केली. टुंकू अब्दुल रहमानच्या नेतृत्वाखाली मलाया चांगली प्रगती करू लागला. रबर आणि टिनच्या निर्यातीवर आधारित तिची अर्थव्यवस्था आग्नेय आशियातील सर्वात समृद्ध होती. १९६१ मध्ये जेव्हा टंकू अब्दुल रहमानने सिंगापूर आणि इतर तीन ब्रिटिश वसाहती, उत्तर बोर्नियो (सबाह), ब्रुनेई आणि सारावाक यांनी मलायामध्ये सामील होऊन फेडरेशन ऑफ मलेशिया तयार करावे असे ब्रिटनने मान्य केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या तपास पथकाने अहवाल दिला की संबंधित लोकसंख्येचा एक मोठा भाग अशा संघाच्या बाजूने आहे, सप्टेंबर १९६३ मध्ये फेडरेशन ऑफ मलेशियाची अधिकृत घोषणा करण्यात आली. १९८४ मध्ये सिंगापूरने स्वतंत्र प्रजासत्ताक होण्यासाठी महासंघ सोडण्याचा निर्णय घेतला असला तरी उर्वरित महासंघाने यशस्वीरित्या कामकाज सुरु ठेवले.

**गोल्ड कोस्ट:**

गोल्ड कोस्ट हे सहाराच्या दक्षिणेकडील आफ्रिकन राष्ट्र होते ज्याने दुसऱ्या महायुद्धानंतर (१९५७) घाना या नवीन नावाने स्वातंत्र्य मिळवले. लंडन आणि अमेरिकेत मध्ये शिक्षण घेतलेले राष्ट्रवादी नेते क्वामे एनक्रुमाह १९४९ मध्ये कन्व्हेन्शन पीपल्स पार्टीचे नेते बनले आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष सुरु केला. युरोपियन वस्तूंवर बहिष्कार, हिंसक निदर्शने आणि संप इत्यादी मार्गाने त्यांनी लढा दिला. एनक्रुमाह आणि इतर नेत्यांना काही काळ तुरुंगात टाकण्यात आले.परंतु ब्रिटीशांनी त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा असल्याचे लक्षात घेऊन लवकरच सोडले आणि प्रौढ मताधिकार आणि निवडून आलेल्या विधानसभेचा समावेश असलेल्या नवीन संविधानाला परवानगी देण्याचे मान्य केले. १९५१ च्या निवडणुकांमध्ये नवीन घटनेनुसार कन्व्हेन्शन पीपल्स पार्टीने ३८ पैकी ३४ जागा जिंकल्या. सरकार स्थापन करण्यासाठी एनक्रुमाह यांना आमंत्रित केले गेले आणि १९५२ मध्ये ते पंतप्रधान झाले. हे ब्रिटीश अंतर्गत स्व-शासन होते परंतु अद्याप पूर्ण स्वातंत्र्य मिळाले नव्हते.१९५७ मध्ये घानाला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले.

**नायजेरिया:**

६० दशलक्षाहून अधिक लोकसंख्येसह नायजेरिया ब्रिटनच्या आफ्रिकन वसाहतींमध्ये सर्वात मोठा देश होता. अग्रगण्य नायजेरियन राष्ट्रवादी नेते नामदी अझिकिवे कार्यरत होते.

munotes.in

ते त्यांच्या समर्थकांमध्ये 'झिक' म्हणून प्रसिद्ध होते. १९३७ मध्ये नायजेरियात परतल्यानंतर त्याला लवकरच प्रचंड लोकप्रिय पाठिंबा आणि प्रतिष्ठा मिळाली. १९४५ मध्ये नायजेरियाच्या स्वातंत्र्यासाठी दबाव आणण्यासाठी नामदी अझिकिवे यांनी संप आयोजित केले व चळवळ उभारली. १९५४ मध्ये नवीन संविधानानुसार राजधानी लागोस येथे फेडरल स्थानिक असेंब्ली निर्माण झाली. १९६० मध्ये नायजेरियाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले.

**टांगानिका:**

टांगानिकामध्ये राष्ट्रवादी चळवळीचे नेतृत्व डॉ. ज्युलियस न्येरेरे यांच्या नेतृत्वाखाली टांगानिका आफ्रिकन नॅशनल युनियन (TANU) करत होती. हेरॉल्ड मॅकमिलनच्या सरकारने न्येरेरे यांच्या क्षमतेने आणि प्रामाणिकपणाने प्रभावित होऊन कृष्णवर्णीय बहुसंख्य राजवटीत १९६१ मध्ये तंगानिकाला स्वातंत्र्य दिले. झांझिबार बेट नंतर १९६४ मध्ये टांगानिकाशी जोडले गेले आणि देश टांझानिया म्हणून ओळखला जाऊ लागला. न्येरेरे १९८५ मध्ये निवृत्त होईपर्यंत टांझानियाचे अध्यक्ष होते.

**युगांडा :**

युगांडामध्ये संघर्ष करूनही स्वातंत्र्याला काही काळ विलंब झाला. १९६२ मध्ये डॉ मिल्टन ओबोटे पंतप्रधान बनून युगांडा स्वतंत्र झाला.

**केनिया:**

केनियात ६६००० गोरे स्थायिक कृष्णवर्णीय बहुसंख्य राजवट स्थापन करण्याला विरोध करत होते. त्यांनी आफ्रिकन राष्ट्रवादी नेत्यांशी वाटाघाटी करण्यास नकार दिला. युरोपियन मालकीच्या शेतांवर माऊ माऊ या किकुयू जमातीच्या गुप्त संघटनेने हल्ले आयोजित केले. अविरत संघर्ष केल्यानंतर अखेरी  केनिया १९६३ मध्ये स्वतंत्र झाला.

**न्यासालँड आणि उत्तर ऱ्होडेशिया:**

ब्रिटीशांनी न्यासालँड आणि उत्तर ऱ्होडेशियामध्ये नवीन संविधाने आणली ज्यामुळे आफ्रिकन लोकांना त्यांच्या १९६१ मध्ये स्वतंत्र संसद स्थापन करण्याची परवानगी मिळाली. १९६३ मध्ये मलावी आणि झांबिया ही नावे घेऊन न्यासालँड आणि उत्तर ऱ्होडेशिया पूर्णपणे स्वतंत्र झाले.

## १३.४ फ्रेंच निर्वसाहतिकरण

इंग्लंडनंतर फ्रान्सचे सर्वात मोठे वसाहतवादी साम्राज्य होते. शिवाय पहिल्या महायुद्धाच्या शेवटी तुर्कस्तानकडून घेतलेली मध्यपूर्वेतील भूभाग ब्रिटन आणि फ्रान्सकडे अजूनही होते.ब्रिटनने ट्रान्सजॉर्डन आणि पॅलेस्टाईन तर फ्रान्सने सीरिया प्रदेश ताब्यात घेतला.

**इंडो-चीन:**

१८८४ ते १९४० पर्यंत इंडो-चीन ही फ्रेंच साम्राज्याचे सर्वात मोक्याचे ठिकाण होते. इंडो-चीन पाच प्रदेशांमध्ये विभागले होते- कोचीन-चीन, टोंकिन, अन्नम (हे तीन आधुनिक व्हिएतनामचा भाग आहेत). कंबोडिया आणि लाओस. ही वसाहत संपूर्णपणे फ्रेंच अर्थव्यवस्थेच्या फायद्यासाठी आणि फ्रेंच स्थायिक सहयोगींच्या लहान वर्गाच्या फायद्यासाठी राज्य करत होती. फ्रेंचाविरुद्ध प्रतिकार १८८० च्या दशकात सुरू झाला परंतु हो ची मिन्ह यांनी इंडो-चायना कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली आणि व्यापक उठाव आयोजित केले. १९३० पर्यंत यशस्वी विरोधी चळवळ उभारण्याचे सर्व प्रयत्न निर्दयी दडपशाहीने हाणून पाडले. युद्धादरम्यान जपानी लोकांनी संपूर्ण क्षेत्र व्यापले आणि हो ची मिन्ह यांनी लीग फॉर व्हिएतनामी इंडिपेंडन्स (व्हिएतमिन्ह) च्या माध्यमातून जपानी लोकांचा प्रतिकार केला. १४४५ मध्ये जपानी लोकांनी माघार घेतली तेव्हा हो ची मिन्ह यांनी व्हिएतनामला स्वतंत्र घोषित केले. हे फ्रेंचांना मान्य नव्हते आणि आठ वर्षांचा सशस्त्र संघर्ष सुरू झाला. मे १९५४ मध्ये फ्रेंचांचा पराभव झाला. हा पराभव फ्रेंचांसाठी अपमानास्पद होता. जनमत फ्रेंचांच्या विरोधात वळत आहे हे लक्षात घेऊन त्यांनी इंडो-चीनमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

**ट्युनिशिया:**

ट्युनिशियामध्ये हबीब बोरघिबा यांच्या नेतृत्वाखालील न्यू डेस्टोर हा मुख्य राष्ट्रवादी गट होता. स्वातंत्र्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारेल असा विश्वास असलेल्या ग्रामीण आणि शहरवासीयांमध्ये त्यांना व्यापक पाठिंबा होता. बोरघिबा आणि इतर नेते तुरुंगात असूनही गनिमी चळवळ अधिक गतिमान बनू लागली. वाटाघाटी करण्यास ते इच्छुक नव्हते. इंडो-चीन आणि मोरोक्कोमध्ये एकाच वेळी राजकीय दबाव असल्याने फ्रेंचांना तडजोड करण्याची गरज भासू लागली. या परिस्थितीत बोरघिबा तुरुंगातून सुटला आणि मेंडिस-फ्रान्सने त्याला सरकार स्थापन करण्यास परवानगी दिली. मार्च १९५६ मध्ये बोरघिबाच्या नेतृत्वाखाली ट्युनिशिया पूर्णपणे स्वतंत्र झाला.

**मोरोक्को:**

मोरोक्कोचे प्रकरण ट्युनिशियापेक्षा फारसे वेगळे नव्हते. मोरोक्कोमधील घटनांचा परिपाट विलक्षण समान होता. मुहम्मद पाचवा याने युद्धाच्या शेवटी इस्तिकलाल (स्वतंत्र) पक्षाशी संबंध ठेवण्याची तयारी दर्शविली. नवीन कामगार संघटनांनी मोरोक्कन स्वातंत्र्य लढ्यातही महत्त्वाची भूमिका बजावली. फ्रेंचांनी १९५३ मध्ये सुलतान मुहम्मद पाचवा यांना पदच्युत केले आणि निर्वासित सुलतानचे काका मुहम्मद बेन अराफा यांना गादीवर बसवले. फ्रेंचांच्या या कृतीमुळे हिंसक निदर्शने आणि गनिमी मोहिमेला चिथावणी मिळाली. आणखी एका दीर्घ विरोधी गनिमी युद्धाच्या संभाव्यतेला तोंड देत फ्रेंचांनी माघार घेण्याचा निर्णय घेतला. १९५५ मध्ये ट्युनिशियाशी समझोता झाल्यानंतर सुलतान मुहम्मद पाचवा याला परत आणण्यात आले आणि वर्ष संपण्यापूर्वी फ्रान्सने पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले. ते २ मार्च १९५६ रोजी लागू झाले. ट्युनिशिया आणि मोरोक्को हे दोन्ही देश १९५८ मध्ये अरब लीगचे पूर्ण सदस्य बनले.

munotes.in

**अल्जेरिया:**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात  शतकात मूळ अल्जेरियन मालकांकडून घेतलेल्या सर्वांत सुपीक जमिनींपैकी जवळजवळ एक तृतीयांश भूभागावर नियंत्रण मिळवून एक दशलक्षाहून अधिक फ्रेंच स्थायिक होते. इंडो-चीनमधील फ्रेंच पराभवामुळे उत्साही असा एक अल्जेरियामध्ये राष्ट्रवादी गट तयार झाला. बेन बेलाच्या नेतृत्वाखालील नॅशनल लिबरेशन फ्रंटने १९५४ च्या अखेरीस गनिमी युद्ध सुरू केले. नॅशनल लिबरेशन फ्रंटच्या गनिमी कारवाया दडपण्यासाठी फ्रेंचांनी अल्जेरियात अधिक सैन्य पाठवल्यामुळे युद्ध हळूहळू वाढत गेले. १९६० पर्यंत फ्रेंचांचे सुमारे ७,००,००० सैन्य अल्जेरियामध्ये मोठ्या प्रमाणात दहशतवादविरोधी ऑपरेशनमध्ये गुंतले होते. फ्रान्समध्येच या युद्धाचे गंभीर परिणाम होत होते. १९५८ मध्ये अल्जेरियातील युद्धामुळे फ्रेंच सरकारचा पाडाव झाला आणि फ्रान्समधील चौथ्या प्रजासत्ताकचा अंत झाला. पॅरिसमध्ये अयशस्वी वाटाघाटी झाल्या, त्यानंतर अल्जीयर्समध्ये पुन्हा हल्ले झाले. अखेर अल्जेरीयात घेण्यात आलेल्या सार्वमतामध्ये बहुसंख्य अल्जेरियन लोकांनी स्वातंत्र्यासाठी मतदान केले. पुढील काही महिन्यांत, फ्रेंच स्थायिकांनी मोठ्या संख्येने फ्रान्समध्ये स्थलांतर केले, अल्जेरियाने त्याचे पहिले स्वतंत्र अध्यक्ष अहमद बेन बेला यांची निवड केली.

**डच निर्वसाहतीकरण :**

दुसऱ्या महायुद्धापूर्वी हॉलंडचे पूर्व आशियामध्ये सुमात्रा, जावा, वेस्ट इरियन (न्यू गिनी बेटाचा भाग) आणि बोर्निओ बेटाच्या सुमारे दोन तृतीयांश बेटांसह प्रचंड मोठे साम्राज्य होते. ब्रिटिश आणि फ्रेंच गयाना यांच्यातील वेस्ट इंडीज आणि दक्षिण अमेरिकेच्या मुख्य भूमीवरील सुरीनाम ही काही बेटांची मालकीही त्यांच्याकडे होती. १९४२ मध्ये जपान्यांनी हल्ला केला तेव्हा त्यांनी सुकार्णो आणि इतरांना सोडले आणि युद्ध संपल्यावर स्वातंत्र्याचे वचन देऊन त्यांना देशाच्या प्रशासनात भाग घेण्याची परवानगी दिली. १९४५ मध्ये जपानच्या पराभवानंतर सुकार्णोने इंडोनेशियाचे स्वतंत्र प्रजासत्ताक घोषित केले. इंडोनेशियन राष्ट्रवाद्यांशी करार करण्यासाठी डचांवर संयुक्त राष्ट्रसंघाचा दबाव होता.

**बेल्जियन निर्वसाहतिकरण :**

बेल्जियन नियंत्रित काँगो आणि रुआंडा-बुरुंडी हे अराजकता, हिंसाचार आणि गृहयुद्धात गुंतले. काँगो फ्री स्टेटमधील वाढत्या जाचक शोषणामुळे सतत अशांतता निर्माण झाली आणि शेवटी विसाव्या शतकाच्या सुरुवातीस हे प्रकरण अंतरराष्ट्रीय मुद्द्दा बनले. ८ डिसेंबर १९५७ रोजी आफ्रिकन लोकांनी प्रथमच टाउनशिप कौन्सिलवरील निवडक जागांसाठी मतदानात भाग घेतला आणि १७० पैकी १३० जागा जिंकल्या. जानेवारी १९५९ मध्ये कॉंगोच्या राजधानीत मोठ्या प्रमाणावर दंगल उसळली तेव्हा बेल्जियमने वसाहत सोडण्याचे मान्य केले. ३० जून १९६० रोजी लुमुम्बा पंतप्रधान आणि जोसेफ कासावुबू एक प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी गटाचे नेते अध्यक्ष म्हणून बनले व काँगो स्वतंत्र झाला. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर देश विनाशकारी गृहयुद्धात बुडाला.

munotes.in

**रुआंडा-बुरुंडी:**
रुआंडा-बुरुंडीला १९६२ मध्ये स्वातंत्र्य देण्यात आले आणि ते दोन राज्यांमध्ये विभागले गेले - रवांडा आणि बुरुंडी. दोन्ही तुत्सी जमातीच्या सदस्यांद्वारे शासित होते. स्वातंत्र्यानंतर तुत्सी आणि हुतु यांच्यातील कटुता, शत्रुत्व आणि हिंसाचार उसळला.

## १३.५ स्पॅनिश निर्वसाहतिकरण

स्पेनची सर्वात मोठी वसाहत स्पॅनिश सहारा होती आणि स्पॅनिश मोरोक्को आणि स्पॅनिश गिनीच्या लहान वसाहती देखील होत्या. १९३९ ते १९७५ पर्यंत स्पेनवर राज्य करणारा हुकूमशहा जनरल फ्रँको याने वसाहतींमध्ये फारसा रस दाखवला नाही. जेव्हा स्पॅनिश वसाहतींमध्ये राष्ट्रवादी चळवळींचा विकास झाला तेव्हा जनरल फ्रँकोने स्पॅनिश मोरोक्कोच्या बाबतीत फार काळ प्रतिकार केला नाही. १९६८ मध्ये इक्वेटोरियल गिनी म्हणून गिनी स्वतंत्र झाला. स्पॅनिश सहाराच्या बाबतीत फ्रँको स्वातंत्र्य देण्याबाबत नाखूष होता कारण तो फॉस्फेटचा एक महत्त्वाचा स्रोत होता. १९७५ मध्ये फ्रँकोच्या मृत्यूनंतरच नवीन स्पॅनिश सरकारने सहाराला स्वातंत्र्य देण्याचे मान्य केले.

**पोर्तुगीज निर्वसाहतिकरण:**
मुख्यत्वेकरून अंगोला आणि मोझांबिक ह्या पोर्तुगीज वसाहती आफ्रिकेत होत्या. १९६० पर्यंत पोर्तुगीज वसाहतींमधील परिस्थिती लक्षणीय बदलली होती. मोठ्या संख्येने इतर आफ्रिकन राज्यांनी स्वातंत्र्य मिळाल्यामुळे राष्ट्रवादी शक्तीना खूप प्रोत्साहन मिळाले. अंगोलामध्ये प्रथम लढाई सुरू झाली (१९६१) जिथे ऍगोस्टिनहो नेटोची 'पीपल्स मूव्हमेंट फॉर अंगोलन लिबरेशन' ही मुख्य राष्ट्रवादी चळवळ होती. तरीही पोर्तुगीज सरकारने आपल्या वसाहतींमधील राष्ट्रवादी चळवळींना दडपण्याचे धोरण सुरु ठेवले. तथापि प्रक्षुब्ध जनमत आणि १९७४ मध्ये लष्करी उठावाने सालाझार हुकूमशाहीचा पाडाव यामुळे लवकरच तिन्ही वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले. सप्टेंबर १९७४ मध्ये स्वतंत्र झालेल्या गिनीने गिनी-बिसाऊ हे नाव घेतले. पुढच्या वर्षी मोझांबिक आणि अंगोला स्वतंत्र झाले.

## १३.६ शीतयुद्धः व्हिएतनाम, पूर्व तिमोर आणि अंगोला

जुलै १९५४ मध्ये झालेल्या जिनिव्हा परिषदेत व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया स्वतंत्र व्हावेत यावर एकमत झाले. दुर्दैवाने हे सहजासहजी घडू शकले नाही. फ्रेंचांनी माघार घेतली असली तरी अमेरिका संपूर्ण व्हिएतनाम कम्युनिस्ट हो ची मिन्हच्या अधिपत्याखाली येऊ द्यायला तयार नव्हती आणि त्यामुळे रक्तरंजित संघर्ष निर्माण झाला. व्हिएतनाम कडव्या शीतयुद्धाचा बळी ठरला आणि कम्युनिस्ट वर्चस्व असलेल्या सोव्हिएत युनियनचे समर्थन मिळालेला उत्तर व्हिएतनाम आणि अमेरिकेने पाठींबा दिलेल्या दक्षिण व्हिएतनाम यांच्यातील संघर्ष १९७६ पर्यंत टिकला.

munotes.in

**व्हिएतनाम:**

व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन क्षेत्रांचा समावेश असलेला इंडो-चीन हा दक्षिणपूर्व आशियातील फ्रेंच वसाहती साम्राज्याचा भाग होता. दुस-या महायुद्धाच्या समाप्तीपासून ते जवळजवळ १९७५ पर्यंत सतत संघर्ष सुरु होता. संघर्षाच्या पहिल्या टप्प्यात या भागातील लोकांनी फ्रेंचांपासून स्वातंत्र्यासाठी लढा दिला आणि त्या लढ्यात त्यांचा विजय झाला. दुसरा टप्पा (१९६१-७५) दक्षिण व्हिएतनाममधील गृहयुद्धाने सुरू झाला. अमेरिकेने साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी या संघर्षात हस्तक्षेप केला परंतु अखेरीस त्यांना अपयश मान्य करून व्हिएतनाममधून माघार घ्यावी लागली. व्हिएतनाम शीतयुद्धाचा बळी ठरला. नियंत्रणाच्या धोरणाचा अवलंब करताना अमेरिकेने कम्युनिस्ट उत्तर व्हिएतनामच्या विरोधात दक्षिण व्हिएतनाममधील गैर-कम्युनिस्ट सरकारला आर्थिक आणि लष्करी मदतीद्वारे मदत केली. ज्यामुळे व्हिएतनाममध्ये मृत्यू आणि विनाश यांचे तांडव सुरु झाले.

**हो-ची- न्ह यांचे नेतृत्व:**

१९४६ ते १९५४ पर्यंत व्हिएतनामी फ्रान्सपासून स्वातंत्र्यासाठी लढत होते. दुसऱ्या महायुद्धात जपान्यांनी इंडो-चीनवर कब्जा केला. लीग फॉर व्हिएतनामी इंडिपेंडन्स (व्हिएतमिन्ह) द्वारे जपानी आणि फ्रेंच दोघांचा प्रतिकार साम्यवादी हो ची मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला गेला होता. हो ची मिन्ह यांनी क्रांती संघर्ष कसा आयोजित करावा हे शिकण्यासाठी रशियामध्ये बरीच वर्षे घालवली होती. व्हिएतनाममध्ये कम्युनिस्ट राजवटीची स्थापना करणे हे त्याचे अंतिम उद्दिष्ट होते. १९४५ पर्यंत उत्तरेत त्यांचे स्थान मजबूत झाले. ऑगस्ट १९४५ मध्ये जपानच्या आत्मसमर्पणानंतर हो ची मिन्ह यांनी उत्तरेकडील मित्र राष्ट्रांच्या सैनिकांच्या आगमनापूर्वी सप्टेंबर १९४५ मध्ये संपूर्ण व्हिएतनामला व्हिएतनामचे स्वतंत्र प्रजासत्ताक म्हणून घोषित केले.

**जिनिव्हा करार:**

जिनिव्हा कराराद्वारे (१९५४) लाओस आणि कंबोडिया स्वतंत्र होणार होते आणि व्हिएतनाम तात्पुरते १७ व्या अक्षांशावर दोन राज्यांमध्ये विभागले गेले. उत्तर व्हिएतनाममध्ये हो ची मिन्हच्या सरकारला मान्यता मिळाली. दक्षिण व्हिएतनाममध्ये सध्या वेगळे बिगर साम्यवादी सरकार असणार होते. परंतु १९५६ पर्यंत संपूर्ण देशासाठी निवडणुका घ्यायच्या होत्या. देशाच्या फाळणीमुळे हो ची मिन्ह निराश झाले तरीही राष्ट्रीय निवडणुकांमध्ये कम्युनिस्ट जिंकतील असा विश्वास होता. मात्र निवडणुका झाल्या नाहीत आणि कोरियन परिस्थितीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली. दक्षिण व्हिएतनाममध्ये हळूहळू गृहयुद्ध सुरु झाले. झाले. दक्षिण प्रांताचे राष्ट्राध्यक्ष दियाम यांच्या नेतृत्वाखालील दक्षिण व्हिएतनामी सरकारने संपूर्ण व्हिएतनामच्या निवडणुकीची तयारी करण्यास नकार दिला. त्यांच्या राजवटीला पाठीशी घालणाऱ्या अमेरिकेने संपूर्ण देशासाठी निवडणुका घेतल्यास कम्युनिस्टांचा विजय होईल या भीतीने निवडणुकांसाठी त्यांच्यावर दबाव आणला नाही. अमेरिकेचे अध्यक्ष आयझेनहॉवर (१९५३-६१) हे साम्यवादाच्या प्रसाराबद्दल चिंतित होते.

munotes.in

**दक्षिण व्हिएतनाममध्ये अमेरिकन सहभाग:**

दक्षिण व्हिएतनाममध्ये परिस्थिती बिघडल्याने अमेरिकेने आपली लष्करी मदत वाढवली आणि अधिक सल्लागार तेथे पाठवले. १९६३ पर्यंत दक्षिण व्हिएतनाममध्ये २०,००० सल्लागार होते. उत्तर कोरिया आणि क्युबामध्ये साम्यवादाचा पराभव करण्यात अयशस्वी ठरलेल्या अमेरिकेला व्हिएतनाममध्ये साम्यवादाच्या विरोधात कठोर भूमिका घ्यावी असे वाटले. केनेडी आणि त्यांचे उत्तराधिकारी लिंडन जॉन्सन दोघेही केवळ आर्थिक मदत आणि सल्लागारांपेक्षा आणखी पुढे जाण्यास तयार होते. सार्वजनिकपणे अमेरिकेचा हस्तक्षेप व्हिएतनामी लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी होता परंतु खरे कारण म्हणजे देशाला कम्युनिस्ट गटात सामील होण्यापासून परावृत्त करणे हा होता.

**व्हिएतनाम मध्ये सोव्हिएत स्वारस्य:**

उत्तर व्हिएतनामी सैन्याच्या तुकड्यांनी दक्षिण व्हिएतनाममध्ये प्रवेश केला आणि अमेरिकन तळांचे रक्षण करण्यासाठी दक्षिण व्हिएतनामचा त्याग करणे किंवा हवाई समर्थन करणे या निवडीचा सामना अमेरिकनांना करावा लागला. सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष कोसिगिन यांनी हनोईला भेट दिली. साम्यवादी व्हिएतनामी गटाला सर्वप्रकारे मदत करून अमेरिकेला पायबंद घालणे व पर्यायाने साम्यवादी गटाचे वर्चस्व अबाधित राखणे हा त्यांचा हेतू होता.

या युद्धाचा दुसरा टप्पा १९५४ पासून सुरू झाला पण खऱ्या अर्थाने युद्ध भडकण्यास १९६४-६५ मध्ये सुरुवात झाली. दक्षिण व्हिएतनाममध्ये व्हिएटकाँग सैनिकांच्या कारवाया वाढल्या. त्या रोखण्यासाठी प्रथम राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकेचे सैन्य पाठविले. फेब्रुवारी १९६५ मध्ये अध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी सुमारे दोन लाख अमेरिकी सैनिक व्हिएतनाम मध्ये उतरवले. याच काळात दक्षिण व्हिएतनाममध्ये सत्तर टक्के लोकसंख्या असणारे बौद्ध व तीस टक्के लोकसंख्या असणारे कॅथलिक यांच्यात संघर्ष सुरू झाला. राष्ट्राध्यक्ष द्येम व खान्ह यांची धोरणे त्यास जबाबदार होती. तेथे यादवी युद्धच सुरू झाले. लष्करातील असंतोष वाढला व सत्ताधारी गटात बेदिली निर्माण झाली. ऑगस्ट १९६४ मध्ये युद्धाबाबत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षास पूर्ण अधिकार देण्यात आले.

व्हिएतनाममध्ये १९६५-६६ मध्ये सुमारे चार लाख अमेरिकी सैनिक उतरले व त्यांनी व्हिएटकाँग बंडखोरांविरुद्ध कारवाई सुरू केली. व्हिएटकाँगला शस्त्रात्रे व दारूगोळा यांचा पुरवठा उत्तर व्हिएतनामकडून होतो म्हणून अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी उत्तर व्हिएतनामवर प्रचंड बाँबफेक केली. या हवाई हल्ल्यांना तोंड कसे द्यायचे हा प्रश्न उत्तर व्हिएतनामपुढे उभा राहिला पण त्याही परिस्थितीत सायकली व इतर साधनांचा वापर करून व्हिएटकाँग सैनिकांना शस्त्रात्रे व दारूगोळा यांचा पुरवठा करण्यात आला. अमेरिकी सैनिकी आक्रमणास व्हिएटकाँग सैन्याने मोठ्या शौर्याने दिले. दक्षिण व्हिएतनामच्या ग्रामीण भागातील सत्तर टक्के भूभाग त्यांच्या ताब्यात होता. त्यांनी गनिमी काव्याचा व छापमार तंत्राचा वापर करून अमेरिकी सैन्यास जेरीस आणले. व्हिएटकाँग सैन्यास जनतेचा पाठिंबा होता याची जाणीव अमेरिकन सैनिकांना झाली.

munotes.in

**व्हिएतनामचा विजय:**

व्हिएतनाम युद्धात साधनसामग्री, तंत्रज्ञान व शस्त्रास्त्रे यांच्या दृष्टीने वरचढ असणाऱ्या अमेरिकेचा गनिमी काव्याने लढणार्याम व्हिएटनामी सैन्याने पराभव केला. अमेरिकी सैनिकांना व्हिएतनामचा भूभाग परिचित नव्हता. व्हिएतनामची जनता अमेरिकेच्या विरोधात होती आणि जागतिक व अमेरिकेतील लोकमत या युद्धात अमेरिकेच्या विरोधात गेले. दक्षिण व्हिएटनामी फौजांचे मनोधैर्य ढासळलेले होते. त्यामुळे अमेरिकेला पराभव पत्करावा लागला. या युद्धात अमेरिकेने लढाऊ विमानदळ, हेलिकॉप्टर्स, बाँब यांचा वापर केला. युद्धशास्त्रातील अनेक नवी तंत्रेही वापरली पण त्यांस यश मिळाले नाही. या युद्धात अमेरिकेने अनेक चुका केल्या. हो-चि-मिन्ह यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व व व्हिएतनाममधील राष्ट्रीय मुक्तीलढ्याचे स्वरूप त्यांनी लक्षात घेतले नाही. तसेच आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीतील नव्याने निर्माण झालेले अंतर्विरोध समजावून घेतले नाहीत. दक्षिण व्हिएतनाममधील लोकद्रोही, प्रतिगामी व जुलमी लष्करशहांना अमेरिकेने पाठिंबा दिला. त्यामुळे अमेरिकेने दक्षिण व्हिएतनाममधील जनतेची सहानुभूती गमावली. व्हिएटकाँग सैन्य हे स्वत:च्या देशामध्ये गनिमी काव्याने लढणारे व राष्ट्रप्रेमाने भारलेले असे असलेले सैन्य होते. त्यांचे मनोधैर्य वरच्या दर्जाचे होते.

**पूर्व तिमोर:**

इंडोनेशियाच्या एका लहान बेटाचा अर्धा भाग म्हणजेच पूर्व तिमोर होय. पश्चिम भाग हॉलंडच्या होता आणि १९४९ मध्ये तो इंडोनेशियाचा भाग बनला. १९७५ मध्ये पूर्व तिमोरच्या राष्ट्रवादी चळवळीने पोर्तुगालसोबत राहू इच्छिणाऱ्या सत्ताधारी गटाच्या विरोधात युद्ध जिंकले. अमेरिकेने नवीन सरकारची मार्क्सवादी म्हणून निंदा केली जी पूर्णपणे सत्य नव्हती. काही आठवड्यांनंतर इंडोनेशियन सैन्याने पूर्व तिमोरवर आक्रमण केले व सरकार उलथून टाकले आणि ते इंडोनेशियामध्ये समाविष्ट केले. अमेरिकेने इंडोनेशियन सरकारला तीमोरविरोधात लष्करी वस्तूंचा पुरवठा सुरू ठेवला. लोकसंख्येच्या जवळपास एक षष्ठांश म्हणजेच सुमारे १,००,००० लोक या संघर्षात मारले गेले. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीसही पूर्व तिमोरचा प्रतिकार सुरूच होता. अखेरीस २००२ च्या सुमारास पूर्व तिमोर स्वतंत्र झाला.

**अंगोला आणि मोझांबिक:**

अंगोला, गिनी आणि मोझांबिक ह्या पश्चिम आफ्रिकन वसाहती पोर्तुगीजांच्या ताब्यात होत्या. सालाझारच्या उजव्या विचारसरणीच्या पोर्तुगीज सरकारने उर्वरित आफ्रिकेतील राष्ट्रवादी घडामोडीकडे दुर्लक्ष केले. त्या प्रामुख्याने कृषी वसाहती होत्या. १९५६ मध्ये या वसाहतींमध्ये राष्ट्रवादी विचारांचे गट तयार झाले असले तरी त्यांचा प्रभाव नव्हता. तथापि १९६० नंतर पोर्तुगीज वसाहतींमधील परिस्थिती लक्षणीय बदलली होती. इतर आफ्रिकन राज्यांनी स्वातंत्र्य मिळवल्यामुळे राष्ट्रवादीं विचारसरणीला खूप प्रोत्साहन मिळाले. सालाझार राजवटीने इतर वसाहतवादी शक्तींच्या अनुभवातून काहीही धडा घेतला नाही. आपली दडपशाही धोरणे सुरूच ठेवली. अंगोलामध्ये प्रथम लढाई सुरू झाली (१९६१) जिथे ऍगोस्टिन्हो नेटो यांची पीपल्स मूव्हमेंट फॉर अंगोलन लिबरेशन ही मुख्य राष्ट्रवादी चळवळ होती. मोझांबिकमध्ये एडुआर्डो मोंडलेनने फ्रेलिमो गनिमांचे आयोजन केले.

मार्क्सवादी संबंध असलेल्या या राष्ट्रवादींना कम्युनिस्ट गटाकडून आर्थिक आणि लष्करी मदत मिळाली. पोर्तुगीज सैन्याला राष्ट्रवादी गनिमांना दाबणे अशक्य वाटले. पोर्तुगीज सैन्याचे मनोधैर्य खचले. १९७३ पर्यंत सरकार आपल्या बजेटच्या चाळीस टक्के निधी एकाच वेळी या वसाहती युद्धांवर खर्च करत होते. तरीही पोर्तुगीज सरकारने आपल्या वसाहतींमधील राष्ट्रवादी चळवळींना दडपण्याचे धोरण सोडण्यास नकार दिला. तथापि जनमत आणि बरेच सैन्य अधिकारी यांचे खचलेले मनोधैर्य यामुळे वसाहत टिकवणे अवघड झाले. १९७४ मध्ये लष्करी उठावाने सालाझार हुकूमशाहीचा पाडाव झाला. लवकरच या वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले. सप्टेंबर १९७४ मध्ये स्वतंत्र झालेल्या गिनीने गिनी-बिसाऊ हे नाव घेतले. त्यानंतरच्या वर्षी मोझांबिक आणि अंगोला स्वतंत्र झाले. यामुळे रोडेशिया आणि दक्षिण आफ्रिकेसाठी गंभीर संकट निर्माण झाले. आता आफ्रिकेतील गोऱ्या अल्पसंख्याकांनी शासित असलेली केवळ तीच राज्ये उरली होती आणि त्यांच्या दडपशाही धोरणांना आळा बसण्याची चिन्हे दिसू लागली.

## १३.७ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिकेतील स्वतंत्र राष्ट्रांचे निर्वसाहतीकरण हा समकालीन जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय होता. सर्वसाधारणपणे निर्वसाहतिकरण ही एक वेदनादायक प्रक्रिया होती ज्यामध्ये वसाहतवाद्यांकडून हिंसाचार आणि दहशतवाद आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांचा समावेश होता. विशेषत: आफ्रिकन खंडात दीर्घकाळ चाललेल्या युद्धांबरोबरच निर्वसाहतिकरणची प्रक्रिया सुरु झाली होती. पायाभूत सुविधांचा अभाव, गरिबी आणि अप्रशिक्षित राजकीय आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे नव्याने उदयास आलेली स्वतंत्र आफ्रिकन राष्ट्रे दीर्घकालीन सत्ता संघर्ष आणि गृहयुद्धांचे बळी ठरली. शिक्षण आणि सामाजिक सेवांमध्ये नवीन राष्ट्रांना अनेक नवीन समस्यांना तोंड द्यावे लागले. लवकरच काही राष्ट्र शीतयुद्धाचे बळी ठरले.

## १३.८ प्रश्न

१) निर्वसाहतिकरण प्रक्रियेसाठी जबाबदार घटकांचे वर्णन करा.

२) फ्रेंच वसाहती साम्राज्यातील निर्वसाहतिकरणच्या प्रक्रियेचे परीक्षण करा.

३) डच आणि बेल्जियन वसाहतींमधील निर्वसाहतिकरण प्रक्रियेचा लेखाजोखा द्या.

४) निर्वसाहतिकरण झालेल्या राष्ट्रात शीतयुद्धाचा मागोवा घ्या

## १३.९ संदर्भ


- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४

- कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९
- ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५
- टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड
- थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.


*****

munotes.in